Bop-9

[illegible]

रामदैवज्ञकृत.

मुहूर्तचिंतामणि.

मराठी भाषांतरासहित.

हें पुस्तक.

विष्णु वासुदेव शास्त्री जोशी यांनीं मराठींत केलें

तें

महादेव भास्कर गोडबोले

यांनीं

आपले 'वृत्तप्रसारक' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

पुणें पेठ सदाशिव

आवृत्ति ३ री

ता० १ एप्रिल सन १९११ इसवी.

सन १८६७ चे २५ वे आक्टाप्रमाणें सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें

आपलेकडे ठेविले आहेत.

किंमत बारा आणे.

प्रस्तावना.

अप्यर्णवस्यपुरुषःप्रतरंकदाचिदासादयेदनिलवेगवशेनपारम् ॥
नत्वस्यकालपुरुषाख्यमहार्णवस्यगच्छेत्कदाचिदनृषिर्मनसापिपारम् ॥ १ ॥

आर्यविष्णुगुप्तः

विश्व उत्पन्नकर्त्या परमेश्वरानें ह्या जगांत अनेक वस्तु निर्माण केल्या आहे त्यांतीलच मनुष्य हा एक आहे. त्या मनुष्याला सुख व्हावें ह्मणून त्या परमकारुणिक व सर्व शक्तिमान् ईश्वरानें अनेक साधनें उत्पन्न करून ठेविलीं आहेत. त्या साधनापैकीच एक ज्योतिःशास्त्र हें सुखसाधन आहे शास्त्र शब्दाचा अर्थ जाणून घ्यावें शिकविणें असा आहे. व ज्योतिः शब्दाचा अर्थ तेज ह्या दोन शब्दांचा एक रूपानें अर्थ केला तर तेजाविषयीं शिकविणें असा होतो ह्मणजे आकाशांत तेजोमय गोलरूप दिसणारे जे पदार्थ त्यांपासून पृथ्वीवरील प्राण्यांस होणारीं जीं सूखदुःखें त्याविषयींचा विचार ज्यांत सांगितला आहे तें ज्योतिः शास्त्र होय

सृष्टीच्या आरंभी मनुष्यें सहज आकाशाकडे पाहूं लागलीं तेव्हां त्यांच्या दृष्टीस अनेक तेजस्वी व वर्तुळाकार पदार्थ आले असून ते सर्व निरंतर भ्रमण करणारे आहेत असें त्यांच्या अनुभवास येऊं लागलें; ह्मणून दिवसें दिवस त्या पदार्थांच्या भ्रमणादि व्यापाराकडे त्या मनुष्यांचें लक्ष्य लागत गेलें मग अनेक प्रकारच्या कल्पना बांधिल्या. काहीं नवीन पाहिलें ह्मणजे त्याविषयीं अनेकांच्या अनेक कल्पना आधीं होऊन मग त्या सर्व कल्पनांतून विवादानें किंवा अनुभवानें सर्व कल्पनांपैकीं एक कोणती तरी खरी ठरते त्याप्रमाणेंच सृष्टीच्या आरंभापासून आकाशांतील तेजोरूप पदार्थांविषयीं अनेक मनुष्यांच्या अनेक काळीं झालेल्या अनेक कल्पनांचा अनुभव पाहून त्या सर्व कल्पनांपैकीं ज्या ज्या अनेक वेळ अनुभवास येत गेल्या त्या त्या कल्पना लोकोपकारक विद्वान् मनुष्यांनीं लिहून ठेविल्या तेंच हें ज्योतिः शास्त्र आहे.

ह्या ज्योतिःशास्त्राची प्रवृत्ति अनादि कालापासून आहे. हिंदुधर्मांचे मूळभूत जे वेद त्याचें ज्योतिष हें एक अंग आहे. असें असून मोठमोठ्या विद्वानांस याचा अनुभव येत गेल्यामुळें त्यानी अनेक ग्रंथ ह्या विषयावर रचिले आहेत. कारण त्यांस जे जे अनुभव येत गेले ते ते आपल्या पुढील मनुष्यांस सहज प्राप्त व्हावे, आणि जीं जीं संकटें आपणास भोगावीं लागलीं तीं तीं ज्याच्या योगानें आपणास टाळतां आलीं असतीं असे जे ज्योतिषांतील नियम ते आपल्या पुढच्या मनुष्यांस समजावे व त्यापासून आपणावर येणाऱ्या संकटांचा परिहार करून त्यांनीं सुखाचा अनुभव घ्यावा.

ह्या ज्योतिषाचे तीन स्कंध आहेत ह्मणून'' त्रिस्कंधात्मकं ज्योतिषं,, असें ह्मणण्याची संस्कृत भाषेत चाल आहे, त्या तीन स्कंधाला गणित, शाखा व होरा असें ह्मणतात गणितस्कंधामध्यें आकाशस्थ तेजोमय गोलांच्या भ्रमणाच्या योगानें कालाचा निर्णय केला असतो, आणि कालानुरोधानें त्याच गोलांच्या भ्रमणानें त्याच्या स्थलांतराचा नियम बांधिला असतो. शाखास्कंधामध्यें गोलांची भिन्न होणारीं जीं स्थलांतरें त्याच्या योगानें होणाऱ्या ज्या भिन्न स्थिति त्या त्या स्थितींच्या काळीं आपोआप घडून येणारीं कृत्यें व मनुष्यांनीं आरंभिलेल्या कृत्यांचें परिणाम सांगितले असतात होरास्कंधामध्यें प्राणिमात्रांच्या उत्पत्ति काळीं आकाशस्थ गोलांच्या स्थितीवरून उत्पन्न झालेल्या प्राण्यांच्या भावि सुखदुःखांचा विचार सांगितला असतो.

आतां ह्या तीनस्कंधांपैकीं गणितस्कंधाविषयीं सत्यता दाखविण्याचें मुळींच कारण नाहीं. कारण कीं, आकाशस्थ अमुक गोल ह्मणजे अमुक ग्रह किंवा नक्षत्र अमक्या वेळीं आकाशातील अमुक भागीं येईल, असें जें सिद्ध केलेलें असतें त्याप्रमाणें तो त्याच स्थळीं आकाशांत दृष्टिगोचर झाला ह्मणजे गणितस्कंधाची सत्यता पूर्णपणें अनुभवास येऊन मग कोणाचाही वादविवाद मुळींच राहत नाहीं कदाचित तसें नझाल्यास गणितामध्यें जी चुक झाली असेल ती शोधून काढून तिची सुधारणा केली ह्मणजे मग सत्यता आपोआप येतेच. दुसरें असें आहे कीं, आकाशस्थ गोल हे ईश्वरप्रेरणेनें ज्या नियमानीं आकाशांत भ्रमण करितात त्या भ्रमणाची अनेक वेळा अनुभव घेऊन सिद्धता करणें, व एकदां सिद्ध केलेल्या नियमावरून पुढें त्यांचीं भ्रमणें भिन्न काळीं कसकशीं होतील हें सिद्ध करून देणें हेंच गणितस्कंधाचें तत्व आहे. ह्या प्रका-

शस्त गोलाची भ्रमणें निरंतर सारख्या प्रमाणानेंच होतात असा नियम नाहीं. अल्पकालांत जरी त्याच्या भ्रमणांत बहुतकरून फेर पडत नाहीं तरी दीर्घकालाचा विचार केला ह्मणजे व आजपर्यंत घडून आलेल्या गोष्टीवरून पुढें घडणाऱ्या गोल भ्रमणाच्या फेरफाराविषयीं सर्वांचीही मति कुंठित होतेच. असा सध्याच्या कालांतील पृथ्वीवरील सर्व देशांतील गणिताविषयीं विचार केला असतां कोणाचीही भिन्नमते दृष्टीस पडत नाहींत. सर्वांची मतें एक असून त्याची सत्यताही सर्वांच्या अनुभवास येत आहे.

दुसरा व तिसरा ह्मणजे शाखास्कंध व होरास्कंध ह्या दोहोविषयीं मात्र अनेकांची अनेकमतें पूर्वीपासूनच आहेत. व सध्यातर हे दोनही स्कंध मुळीं खोटेच आहेत यांत सत्यता ह्मणून मुळींच कांहीं नाहीं अशीहि मतें प्रसिद्ध होत चालली आहेत; परंतु माझी तर अशी पूर्ण खातरी आहे कीं हे जर ज्योतिःशास्त्रांतलेंच दोन स्कंध आहेत, व याची जगामध्यें प्रवृत्ति होऊन फारच काल झाला आहे. आणि हे स्कंध शास्त्रभेद ह्मणून मानिले गेले आहेत व शास्त्र शब्दाचा अर्थ 'खरें जें ज्याचा अनुभव येतो, ज्याला कधींहि बाध नाहीं' असा आहे, तर त्यांची सत्यता अवश्य लोकांच्या अनुभवास आलीच पाहिजे. असें असून या दोन स्कंधांचीं जी सध्या दुर्दशा झालेली आढळते ही दूर करून टाकण्याचें काम आजपर्यंत असें कोणी केलेंच नाहीं अशी माझी पक्की खातरी झालेली आहे. ही दुर्दशा मोडून टाकून ह्या दोन स्कंधाचीं खरीं तत्व जगास दाखविणें हें काम फार दुर्घट व मोठ्या श्रमाचें जरी आहे तरी हें श्रमसाध्य आहे. यांत कांहीं संशय नाहीं; परंतु आजपर्यंत याविषयीं कोणी झटून श्रम केले आहेत असें मुळींच नाहीं. वरें ज्यांच्या मनांत श्रम करून ह्या दोन स्कंधांची सत्यता दाखविण्याचें येतें त्यांची उत्पद्यंतेविलीयंतें दरिद्राणां मनोरथाः। ह्या वाक्याप्रमाणें स्थिति होते. मग यांची सत्यता जगास दाखविण्याचें शेवटास जावें तरी कसें? हें काम द्रव्य, विपुलकाल व श्रम यांनीं साध्य आहे खरें. परंतु ह्या तिहींचा संयोग आजपर्यंत मुळींच झाला नाहीं, किंवा जरी थोडासा झाला असेल तरी जसा झाला पाहिजे तसा तरी झाला नाहीं असेंच सुज्ञजन खचित कबूल करितील. असो ह्या दोन स्कंधाची सत्यता वर सांगितलेल्या तीन प्रकारांचा एकत्र संयोग होऊन कधीं प्रगट होणार असेल तीं जगन्नियंत्या परमेश्वराच्या कृपेनें होवो.

पूर्वीं पासून ह्या पृथ्वीवरील सर्व मनुष्यांचीं (ज्यांचा केवळ पशुवत् आचार आहे अशीं रानटी मनुष्यें सोडून) जा कांहीं विवाहादि विशेषकृत्यें व्हावयाचीं तीं कालनियमानेंच होत असतात. आतां अनेक लोकांचे धर्म अनेक असून त्याचे विषेप कृत्यें करण्याचें काल नियमही अनेक आहेत.

हिंदुधर्मांत जो विशेष कृत्याचा कालनियम आहे तो फार विस्तृत ग्रंथांनीं प्राचीनकाळीं मोठमोठ्या ज्ञान संपन्न ऋषींनीं लिहून ठेविला आहे. ते ग्रंथ पाहून त्याच ग्रंथांच्या आधारानें वराहमिहिराचार्य, लल्ल, बोपदेव इत्यादि महापंडितांनीं ऋषिप्रणीत ग्रंथाचा अभ्यास करणें अल्पमति मनुष्यांला कठीण पडूं नये ह्मणून लहान लहान ग्रंथ करून ठेविले आहेत. परंतु ते कधींही समजण्याला कठिणच आहेत, व ज्याला गीर्वाण वाणीचें उत्कृष्टज्ञान असेल त्यालाच ते समजतात. पण जसजसें दिवसें दिवस संस्कृत भाषेचें ज्ञान कमी कमी होऊं लागलें तसतसे त्या वराहमिहिरादिकांच्याही ग्रंथांचा सारांश घेऊन विद्वान लोकांनीं अगदीं लहान लहान ग्रंथ रचिले. हल्लीं लोक त्याच ग्रंथावरून आपल्या धर्म कृत्यांस अवश्य लागणाऱ्या लोकनियमाचा निर्वाह करितात. हे ग्रंथ ज्योतिषी लोकांत मुहूर्तमार्तंड, मुहूर्तचिंतामणि, मुहूर्तगणपति वगैरे बरेच प्रसिद्ध आहेत, व ते जोतिषीलोक फार करून सध्या त्याच ग्रंथावरून विवाहादि कार्यांच्या मुहूर्तांचा निर्वाह करितात असें आहे खरें, परंतु ज्योतिषीलोक फार करून संस्कृतभाषनभिज्ञ असेच फार असतात. त्यांना हे मार्तंडादि मुहूर्तग्रंथही कोणाजाणणारांकडूनच समजून घ्यावे लागतात; आणि समजून घेतल्यानेंही त्या ग्रंथांचा सारांश मात्र त्यांना समजतो. ही त्यांची अडचण मनांत आणून मी सर्व ग्रंथांत कठिण अशा मुहूर्ततत्वाचें मार्गें यथामति भाषांतर केलें आहे. नंतर प्रकृत 'मुहूर्तचिंतामणि' ग्रंथाचेंही मराठींत भाषांतर करण्याचें मनांत आलें तें यथामति करून लोक सेवेला सादर केलें. सुज्ञानीं याचा आदर केल्यानें मी भाषांतर श्रमांची कृतार्थता मानीन.

हा मुहूर्तचिंतामणि शालिवाहन शक १५२२ ह्या वर्षीं रामदैवज्ञनामक एका विद्वानपुरुषानें केला. यानें आपलें थोडेसे वृत्त ग्रंथाच्या शेवटीं दिलें आहे. या ग्रंथकाराचा पितामह (आजा) फार विद्वान

असें तो नर्मदातीरीं मातृपुरांत राहत असे. त्याचा पुत्र अनंतदैवज्ञ हाही विद्वान् होता. त्याचे पुत्र दोन ज्येष्ठ नीलकंठदैवज्ञ व कनिष्ठ रामदैवज्ञ. नीलकंठदैवज्ञ हा अकबरबादशाहाच्या सभेंत मान्य पंडित होता. ह्या सर्वांनीं ज्योतिषाच्या तीनही स्कंधावर अनेक ग्रंथ केले आहेत.

ह्या मुहूर्तचिंतामणि ग्रंथावर दोन टीका आहेत, त्या दोनही टीकांचा आधार घेऊन मी हें भाषांतर केलें आहे.) आणखीही कदाचित् कोणी केलेल्या असतील पण त्या मला उपलब्ध झाल्या नाहींत.) एक टीका प्रमिताक्षरा नांवाची आहे. ही मूळ ग्रंथकारानेंच केलेली असल्यामुळें सर्व ग्रंथाचा अभिप्राय स्पष्टपणें तीवरून समजतो, हींत प्रत्येक श्लोकांचा वाक्यार्थ फार सुगमपणानें लिहिला आहे. दुसरी टीका ही ग्रंथकाराचा वडील भाऊ जो नीलकंठदैवज्ञ त्याच्या गोविंददैवज्ञ नांवाच्या पुत्रानें केली आहे ही टीका पीयूषधारा टीका फार विस्तृत असून वाक्यार्थानें परिपूर्ण व व्याकरणासंबंधीं माहितीनें युक्त आहे. ह्या दोनही टीका मूळ ग्रंथासहित छापून प्रसिद्धझाल्या आहेत.) पीयूषधारेंत इतर पुष्कळ ग्रंथाचे आधार दाखविले आहेत, त्यावरून व त्यानें लिहिलेल्या व्याकरण विषयावरून ह्या टीकाकाराचें अध्ययन, ग्रंथवाचन, शोध, व समयस्फूर्ति ह्या स्पष्ट दिसून येतात. भाषांतर करतांना ह्या दोन्ही टीका मला फार उपयोगीं पडल्या. असो.

शेवटीं विद्वज्जनांस सविनय प्रार्थना करितों कीं, मी अल्प मतीनें यथामति केलेलें हें भाषांतर पाहून गुणदोष विवेचनपूर्वक अवलोकन करावें व गुण ग्रहण करून दोष कळविण्याचें श्रेय माझ्या अज्ञाननिरसनाकरितां जोडावें, ह्मणजे परमेश्वर कृपेनें ह्या ग्रंथाची पुनःआवृत्ति छापण्याची वेळ आल्यास माझ्याकडून प्रमादानें, हस्तदोषानें किंवा अज्ञानानें घडलेले दोष ह्या भाषांतरांत निरवकाश करण्याला मला ठीक पडेल.

भाषांतरकर्ता.

॥ मुहूर्तचिंतामणेश्चानुक्रमणिका प्रारंभः ॥

विषय.	पृष्ठ.	विषय.	पृष्ठ.	विषय.	पृष्ठ.	विषय.	पृष्ठ.
मंगलम्.	१	दोष.	३	घटिका.	५	कुलिक, कालवेळा, यमघंट आणि कंटक हे दुर्मूहूर्त जाणण्याचा प्रकार.	८
विषयनिरूपण.	१	चैत्रादि मासांतील शून्य नक्षत्रें.	३	दोषांचे अपवादकरवियोग.	६	दुर्मूहूर्त, कुलिक, कंटक कालवेला, यामार्ध व यमघंट	८
शुभाशुभप्रकरण १.		चैत्रादि मासातील शून्य राशि.	४	रव्यादिवारीं कित्येक नक्षत्र आल्यानें होणारे सिद्धियोग.	६	होलिकाष्टक निषेध.	८
तिथींचे स्वामी.	१	दग्धलग्नें.	४	उत्पात, मृत्यु काण आणि अमृतसिद्धि योग	६	मृत्युयोगादिकांचा परिहार.	८
तिथींच्यानंदादिसंज्ञा	२	मागील दोषांचा परिहार.	४	देश विशेषानें दुष्टयोगांचा परिहार.	६	दुर्योगाचे आणखी अपवाद	९
इत्यादिवारीं निषिद्ध तिथि आणि दग्ध नक्षत्रें.	२	अमृतसिद्धि योग आणि त्याचा तिथिपरत्वें निषेध.	४	सर्व शुभकार्यीं वर्ज्य	७	भद्राकरणाचा काल	९
क्रकच व संवर्तयोग आणि दंतधावनाच्या निषिद्ध तिथि	२	कार्यपरत्वें अमृतसिद्धियोगाचा निषेध.	५	मासपरत्वें ग्रहणनक्षत्र निषेध आणि मागेंपुढें वर्ज्य दिवस.	७	भद्रेचं मुख आणि पु.	९
अनेक कृत्यांला निषिद्ध तिथि	२	आनंदादि अठ्ठावीस योग.	५	सर्व शुभ कार्याला अवश्यवर्ज्य.	७	भद्रेचं स्थान.	९
दग्धयोग, विषयोग, हुताशनयोग व यमघंटयोग.	२	आनंदादियोग जाणण्याचा उपाय.	५	रंध्रतिथींच्या त्याज्य घटी.	७	दुष्टकालीं न करण्याचीं कृत्यें. [प	९
चैत्रादिमासांतील शून्य तिथि	३	आनंदादिकांतील दुष्ट योगांच्या त्याज्य				सिंहस्थादिगुरूचादो-	१०
तिथि नक्षत्र संयोगाचे						सिंहस्थगुरूचे तीन	

विषय.	पृष्ठ.	विषय.	पृष्ठ.	विषय	पृष्ठ.	विषय.	पृष्ठ.
अपवाद.	१०	पशु रक्षणादिकांचे मु-	१४	स्वर्ग मृत्यु पाताळ ह्यां		क्रांति झाल्याचीं फळे	
पूर्वी सांगितलेल्या सिं		औषधाचा मुहूर्त व सू-		पैकीं कोणत्यलोकीं		आणि उत्तरायन व	
हस्थ गुरूच्या वि-		ची कर्माचा (शि-		अग्नि आहे हें पाहणें.	१९	दक्षिणायन संज्ञा	२५
धिनिषेधांचा निर्णय	१०	लाईचा) मुहूर्त.	१५	नवान्नभक्षणाचामुहूर्त	२०	इतर संक्रांतींच्यासंज्ञा	२६
मकरस्थगुरूचापरिहार	१०	क्रयविक्रय मुहूर्तांचा		नौकाबांधण्याचा		संक्रांतीचा पुण्यकाळ	२६
लुप्तसंवत्सराचा दोष		परस्पर विरोध व		मुहूर्त.	२०	अर्धरात्रीच्या अयन	
व त्याचा अपवाद.	११	क्रयाचीं नक्षत्रें	१५	वीरसाधन व अ-		संक्रांतीचा पुण्यकाळ.	२६
वारप्रवृत्ति.	११	विक्रयाचा मुहूर्त आ-		भिचार यांचा मुहूर्त.	२०	पूर्वकाळाचा विशेषनि	
कालहोरा	११	णि दुकान घालण्याचा		रोगनिर्मुक्त स्नान	२०	यम	२६
कालहोरेचा उपयोग.	१२	मुहूर्त.	१५	शिल्पविद्येच्या आर-		पूर्वकाळचेंअतिपुण्यत्व	२६
मन्वादि वयुगादिति.	१२	अश्व व हत्ती ह्यांच्या		भ चा महूर्त.	२०	सायनसंक्रांति व त्या-	
नक्षत्रप्रकरणम् २		संबधी कृत्याचे मु०	१५	संधानाचा म० तद्द-		चा पुण्यकाळ	२७
नक्षत्राचे स्वामी.	१२	अलंकार (दागिनं)		करण्याचा महूर्त	२०	सम,बृहत् व जघन्य	
ध्रुव, स्थिर संज्ञक न-		घडविणें व शस्त्राला		दिव्य करण्याचा मुहूर्त	२१	नक्षत्रें.	२७
क्षत्र व त्यांवरील		धार काढणें	१५	सर्व शुभकार्यांची सा		नक्षत्राच्या सम,बृहत्	
साधारण कृत्यें.	१२	नाणें पाडणें आणि		धारण लग्न शुद्धि.	२१	जघन्य संज्ञाचा	
चर, चलसंज्ञकनक्षत्रें		वस्त्रें धुणें.	१६	नक्षत्रांवर ज्वरादिरो-		उपयोग.	२७
व त्यावरील साधारण	१२	नूतनशस्त्र धारण आ-		ग उत्पन्न झाल्याच्या		कर्क संक्रांतीच्या वार-	
उग्र,क्रूर, संज्ञक नक्ष-		णि शय्यासनादिकां-		पीडेचे दिवस.	२१	परत्वें विशोपका.	२७
त्रें व त्यावरील		चा उपभोग.	१६	अवश्य मरण येण्याचे		संक्रांतिकाळीं रविची	
साधारण कृत्यें.	१३	अंध मंदाक्ष मध्याक्ष		योग.	२१	अवस्था व तिचींफळें	२८
मिश्र साधारण संज्ञक		आणि सुलोचन न०	१६	प्रेताची क्रियाकरण्या		संक्रांतीचीं वाहनें,वस्त्रें	
नक्षत्रें व त्यावरील		अंधादि नक्षत्रांचीफळे	१७	चा मुहूर्त व प्रेतदा-		आयुधें,भक्ष्ये,लेपनें.	
साधारण कृत्यें.	१३	द्रव्य घेण्याला निषि-		हाचा निषिद्धकाळ.	२२	जाति, पुष्प आणि	
लघु, क्षिप्र संज्ञक न-		द्ध नक्षत्रें	१७	काष्ठादिसंग्रहाचामुहू-	२२	त्याची फळें	२८
क्षत्रें व त्यांवरील सा-		जलाशय खणणें व नृ-		त्रिपुष्कर योग.	२२	संक्रांतीच्या वाहनादि	
धारण कृत्यें.	१३	त्यारंभ.	१७	प्रेतप्रतिमेच्या दाहा-		कांचें कोष्टक	२८
मृदु,मैत्र संज्ञक नक्ष-		सेवेचा (नोकरीचा		चा काळ	२२	जन्मनक्षत्रावरून सं-	
त्रें व त्यावरील साधा-		मुहूर्त.	१७	अभुक्त मूळ.	२३	क्रांतीचें फळ.	२९
रण कृत्य	१३	द्रव्यप्रयोग व ऋणग्र-	१७	मूळ व आश्लेषा ह्या-		ग्रहबल.	२९
तीक्ष्णदारुण संज्ञक न		हण हलप्रवहणाचा		वर जन्म झाल्याचा		अधिकमास व क्षयमा	
क्षत्रे व त्यावरील		(नांगरण्याचा)मुहूर्त.	१८	फळें.	२३	स लक्षण	२९
साधारण कृत्यें.	१३	बीं पेरण्याचा मुहूर्त प-		मूळ नक्षत्राची स्थिति		अथगोचरप्रकर-	
अधोमुख ऊर्ध्वमुख व		णिचक्र व हलचक्र	१८	व फळ	२३	णम् ४	
तिर्यङ्मुख नक्षत्र	१३	शिरांतून रक्त काढणें		जननारिष्टें व परिहार	२४	जन्मराशीपासून नव	
प्रवालादि अलंकार		दत्तक ग्रहण व धर्म-		अश्विन्यादि नक्षत्रांची		ग्रहांचीं शुभस्थानें	
धारणाचा महूर्त.	१३	कार्ये यांचे मुहूर्त.	१८	तारासंख्या व स्वरूपें.	२४	आणि वेधस्थानें.	२९
नक्षत्रवृक्षाची इष्टानि-		धान्य-छेदन मुहूर्त.	१८	जलाशय, आराम देव		वेधाविषयीं दोन मतें.	३०
ष्ट फल.	१४	कणमर्दन व सस्यारो-		प्रतिष्ठा यांचे मुहूर्त	२४	ग्रहण फळें.	३०
मुहूर्ताशिवाय वस्त्रधा		पण	१९	अथसंक्रांतिप्रक.		चंद्रबलाचा विशेष	३१
रणाची कारणें.	१४	धान्यस्थिति व धान्य		रणम्. ३		चंद्रबलाचा दुसराप्र-	
वृक्षारोपण,राजदर्शन		वृद्धि याचे मुहूर्त	१९	नक्षत्रांवरून संक्रांती-		कार.	३१
मद्यारंभ आणि गोक्र-		शांतिक पौष्टिक कृत्यें.	१९	चीं नावें व फळें	२५	ग्रहपीडापरिहारार्थ न	
यादिक्रम.	१४	होमाहुतिज्ञान.	१९	दिवसांस व रात्रीस सं-		वरत्नमुद्रकानिर्माण	३१

विषय.	पृष्ठ.
प्रत्येक ग्रहाची निरनिराळीं रत्नें	३१
अल्पमूल्यरत्नें आणि ताराबल.	३१
तारांचीं नांवे.	३२
दुष्टतारांचेदानपरिहार	३२
चंद्राच्या अवस्था.	३२
ग्रहपीडा परिहारार्थ स्नान आणि दक्षिणा.	३३
पुढील राशात जाण्या	३३
पूर्वी ग्रहांच्या फळाचा अवधि.	३३
दुष्टतिथ्यादिकांवर मंगलकार्य करण्याविषयीं दानें.	३३
ग्रहांचेंपूर्ण फल आणि जन्मनक्षत्र व वार यांच्यां योगाचें फळ.	३४
अथसंस्कारप्रकरणम् ५	
प्रथम रजोदर्शनीं शुभमासादि.	३४
रजोदर्शनाला शुभ मध्यम आणि अशुभ नक्षत्रें.	३४
रजोदर्शनीं दुष्ट तिथ्यादि.	३४
रजस्वला स्त्रीला स्नानाचा मुहूर्त.	३४
गर्भाधान मुहूर्त.	३५
गर्भाधानाचे लग्नबळ आणिमध्यम नक्षत्रें.	३५
सीमंतोन्नयनाचा मुहूर्त	३६
पूंसवन आणि स्त्रियांच्या चंद्रबलाविषयीं निर्णय.	३६
मासपति आणि विष्णुबली.	३६
जातकर्म आणि नामकरण याचें मुहूर्त	३६
सूतिकास्नान मुहूर्त	३६
बालकाला प्रथमादि. मासांत दंतोत्पत्ति झाल्यावाचा फळ.	३६
दोलाचक्र.	३७
दोलारोहण व निष्क्रमण यांचे मुहूर्त	३७
प्रसूत झालेल्या स्त्रीनें जलपूजा करण्याचा मुहूर्त.	३७
अन्नप्राशन मुहूर्त.	३७
अन्नप्राशनाचेंलग्नबल	३८
अन्नप्राशनां स्थानपरत्वें ग्रहांचीं फळें.	३८
भूम्युपवेशनाचा मुहूर्त.	३८
भूम्युपवेशनीं बालकाच्या उपजीविकेची परीक्षा	३८
बालकाच्या तांबूल भक्षणाचा मुहूर्त.	३८
कर्णवेध मुहूर्त.	३९
कर्णवेधाची लग्नशुद्धि	३९
चौलादि संस्काराचा निषिद्धकाल	३९
गुरु शुक्रांच्या बाल्य वार्धक्याच त्याज्य दिवसवत्याविषयीं मतांतर.	३९
चौलाचा मुहूर्त.	४०
मातागर्भवती असतां चौलाचा निर्णय.	४०
अशुभ ताराबाळाचा अपवाद.	४०
चौलाचा निषिद्धकाल क्षौराचा मुहूर्त	४०
क्षौराचा विशेष विधि आणि गर्भिणीपति धर्म	४१
राजाला क्षौराचा विशेष विधि आणि क्षौराला सर्वथा वर्ज्य नक्षत्र.	४१
अक्षरारंभाचा मुहूर्त.	४१
विद्यारंभ मुहूर्त.	४१
उपनयनाचा काळ.	४२
व्रतबंधाचा नक्षत्रें वगैरे	
व्रतबंध लग्नाचा भंग करणारे ग्रह.	४२
उपनयनाची लग्न शुद्धि.	४२
वर्णस्वामी व शाखेश	४२
वर्णेश व शाखेश यांच्या बलाचा विचार	४३
जन्ममासादिकांचा विशेष विचार	४३
गुरुबल.	४३
अशुभ गुरूचे अपवाद	४३
उपनयनीं त्याज्यकाल	४३
सूर्यादिकांच्या नवांशीं उपनयनाचीं फळें	४३
चंद्राचीं नवांशफळें.	४४
व्रतबंधीं केंद्रस्थ ग्रहाचीं फळें.	४४
ग्रहयोग फळ.	४४
व्रतबंधीं चंद्रयोग.	४४
अनध्याय.	४४
प्रदोषलक्षण. [थे.	४५
व्रतबंधासंबंधींशास्त्रार्थ.	४५
वेदपरत्वें व्रतबंधनक्षत्रें.	४५
चौलादिकांविषयीं शास्त्रार्थ.	४५
छुरिका बंधन मुहूर्त	४५
केशांताचा व समावर्तनाचा मुहूर्त.	४५
अथ विवाहप्रकरणम् ६. [न	
विवाहमुहूर्तांचेप्रयोजन	४६
विवाह प्रश्नाचे फळ.	४६
प्रश्न लग्नावरून आणखी विवाह योग.	४६
विधवा योग.	४६
कन्या कुलटा किंवा मृतवत्साहोण्याचा योग	४६
वैवाहभंग योग.	४७
विधवा योगाचेपरिहार	४७
कन्येला प्रथम पुत्र किंवा कन्या होईल या प्रश्नाचें फळ.	४७
श्राचीं सामान्य लक्षणें	४७
कन्यावरण मुहूर्त.	४७
वरवरण मुहूर्त	४८
कन्येचा विवाहकाल आणि ग्रहशुद्धि.	४८
विवाह मास	४८
जन्ममासादिकांचा विवाहाला विधिनिषेध.	४८
ज्येष्ठमासांत विवाहाचा विशेष नियम.	४८
विवाहासंबंधींशास्त्रार्थ	४९
प्रतिकूल निर्णय.	४९
चौलादि संस्काराचा शास्त्रार्थ.	४९
दुष्टनक्षत्रोत्पन्न कन्या पुत्रांचीं फळें.	४९
पूर्व श्लोकोक्त फळाचा अपवाद.	४९
घटित व विचारघटिताच्या आठ प्रकारांचीं नांवें.	५०
वर्ण विचार	५०
वश्य विचार.	५०
ताराकूट विचार.	५०
योनिकूट विचार	५०
ग्रह मैत्रीचा विचार.	५१
ग्रह मैत्री कोष्टक	५१
गणकूट विचार.	५१
राशिकूट विचार	५२
अशुभ कूटाचें परिहार	५२
दुष्ट गणकूटाचा व राशिकूटाचा परिहार.	५२
नाडीकूट विचार.	५३
पूर्वभाग योगी, मध्यभाग योगी व अंत्यभाग योगी नक्षत्रें.	५३
वर्गकूट विचार.	५३
वधूवरांचें नक्षत्र व राशि एक असतां विशेष निर्णय.	५४
जन्म नक्षत्राचा फळ विशेष	५४
राशिस्वामी व वर्णांची प्रवृत्ति.	५४
होरा.	५४

विषय.	पृष्ठ
त्रिशांश आणि द्रेष्काण	५५
द्वादशांश व षड्वर्ग फळ.	५५
नक्षत्रगंडांत, लग्नगंडांत आणि तिथिगंडांत	५५
कर्तरी दोष	५६
रव्यादि ग्रहयुक्त चंद्राचीं फळें	५६
अष्टमलग्नांचा दोष व त्याचा अपवाद	५६
अष्टमलग्नांचा स्पष्ट निर्णय.	५६
निषिद्ध नवांश.	५६
नक्षत्राच्या विषघटी.	५६
दिवामुहूर्त आणि रात्रीमुहूर्त.	५७
सूर्यादिवारीं त्याज्य मुहूर्त.	५७
विवाह नक्षत्रें आणि. अभितिज् नक्षत्राचें. प्रमाण. [का.	५८
विवाहाचा पंचशालावेध,	५८
सप्तशलाका वेध.	५८
पंचशलाका चक्र.	५९
सप्तशलाका चक्र,	५९
क्रूरग्रहयुक्तादि नक्षत्र दोष व त्यांचा परिहार.	५८
लत्ता.	५९
चंडीशचंडायुध पाता-	५९
चा दोष	५९
क्रांतिसाम्य नामक महापात दोष.	६०
खार्जूर चक्रोत्पन्न एकार्गल दोष	६०
उपग्रहदोष आणि त्याचा अपवाद.	६०
पात उपग्रह व लत्ता याचा अपवाद आणि अर्धयाम.	६०
सूर्यादिवारांचें कुलिक	६०
दग्धतिथि.	६०
जामित्रदोष.	६१
एकार्गलादि दोषांचा अपवाद.	६१
कित्येक दोषांचे अपवाद	६१
दशयोग दोष.	६१
दशयोगाचें फळ व अपवाद.	६१
पंचकदोष	६२
बाण व त्याचा अपवाद.	६२
कालपरत्वें, वारपरत्वें व कर्मपरत्वें बाणाचा परिहार.	६३
ग्रहांची दृष्टि.	६३
उदयास्तशुद्धि दोन प्रकार.	६३
उदयास्तशुद्धि (तिसरा प्रकार.)	६४
सूर्याच्या संक्रांतीचा दोष.	६४
सर्व ग्रहांच्या संक्रांतीच्या त्याज्य घटिका.	६४
लग्नांच्या पंगु, अंध, बधिर संज्ञा.	६५
केचिन्मतानें लग्नाच्या अंध, बधिर, पंगुसंज्ञा	६५
अंध, बधिर, पंगु या लग्नांचीं फळें आणि त्यांचा अपवाद.	६५
शुभनवांश.	६५
पूर्वोक्त शुभनवांशाचा निषेध.	६५
लग्नाचा भंग करणारे ग्रह.	६६
लग्नाचे इष्टग्रह.	६६
कर्तरी वगैरे महादोषाचे अपवाद.	६६
सामान्य दोषाचा अपवाद.	६६
दोषपरिहार.	६६
साधारण दोषांच्या समूहाचा परिहार.	६६
लग्नविंशोपका.	६६
ग्रहपरत्वें श्वशुरादि कल्पना आणि उपयोग.	६७
संकीर्ण जातींचा विवाहमुहूर्त.	६७
गांधर्वादि दुष्ट विवाहांचें त्रिपदीचक्र.	६७
विवाहाच्या पूर्वींच्या अवश्य कर्माची दिनशुद्धि.	६८
वेदी लक्षण आणि देवकोत्थापन	६८
तेलहळदलावण्याचा नियम	६८
स्तंभस्थापन (खांब पुरणें.)	६८
गोधूलि मुहूर्ताचीं प्रशंसा.	६९
कालपरत्वें गोधूलिभे-	६९
गोधूलिकाळींअवश्य वर्ज्य.	६९
सूर्याची स्थूलस्पष्टग-	६९
ति इष्टकाळींचा स्पष्ट. सूर्य करण्याची रीति-	६९
नवांशावरून लग्नसाधन.	७०
इष्टघटी साधन.	७०
इष्टघटी साधनाचा विशेष.	७०
विवाहादि शुभकार्यीं अवश्य वर्ज्य दोष.	७०
अथवधूप्रवेशप्रकरणम्७.	
वधूप्रवेशाचा काळ.	७१
वधूप्रवेशाचीं नक्षत्रा-	७१
दिकन्येनेपितृगृही व पतिगृहीं राहण्याचा मास नियम	७१
अथद्विरागमनप्रकरणम्८.	
द्विरागमनाचा मुहूर्त.	७२
संमुख शुक्राचा दोष	७२
प्रतिशुक्राचा अपवाद	७२
द्विरागमनाविषयीं आणि गोत्रपरत्वें प्रतिशुक्राचा अपवाद.	७२
अथ अग्न्याधानप्रकरणम्९.	
अग्निहोत्राचा मुहूर्त.	७३
अग्निहोत्राची लग्नशुद्धि.	७३
अग्निहोत्र चिरकाल चालण्याचे योग.	७३
अथराजाभिषेकप्रकरणम्१०	
राजाभिषेकाचा काल	७३
राजाभिषेकाचीं नक्षत्रें आणि लग्न शुद्धि.	७४
पापग्रहांची स्थानपरत्वें फळें आणि अपवाद.	७४
राजाभिषेकाचे दोन शुभयोग,	७४
अथयात्राप्रकरणम्	
यात्रेचे अधिकारी.	७४
यात्राप्रश्नाचें फळ.११	७५
यात्राप्रश्न फळें.	७५
यात्राप्रश्नाचीं शुभनिमित्तें.	७५
यात्राप्रश्नाचीं अशुभ फळें.	७५
गमनकर्ता कोणत्या दिशेला जाईल ह्या प्रश्नाचा निर्णय	७५
गमन दिशेचा निर्णय	७६
यात्राकाल.	७६
प्रयाणाच्या तिथि व नक्षत्रें.	७६
वारशूल व नक्षत्रशूल	७६
कालशूल.	७६
प्रयाणीं नक्षत्राच्या वर्ज्य घटी.	७७
प्रयाण नक्षत्राच्या मतांतरानें वर्ज्यघटी.	७७
नक्षत्रांच्या जीव प-	७७
क्षादि संज्ञा.	७७
जीवपक्षादिनक्षत्राचीं फळें.	७७

विषय.	पृष्ठ.
नक्षत्राच्या अकुल, कुलाकुल व कुल ह्या तीन संज्ञा आणि त्याचीं फळें.	७८
पथिराहू चक्र निर्माण.	७८
पूर्वोक्त पथिराहु चक्रांचें फळ.	७८
तिथिचक्र.	७९
सर्वांकज्ञान.	७९
अडळ, व भ्रमण नासकदोष.	८०
हिंवरनामक योग.	८०
घातचंद्र.	८०
घातचंद्राचा परिहार.	८०
घाततिथि.	८०
घातवार.	८१
घातनक्षत्रें.	८१
घातलग्नें.	८१
योगिनी तिथि.	८१
कालयोग आणि पाशयोग.	८१
परिघदंडनामक दोष	८२
विदिशागमनाचा नियम आणि परिघाचा अपवाद.	८२
सर्व दिशागमनाचीं नक्षत्रें आणि वक्री ग्रहांचा निर्णय.	८२
अयनशूल	८३
संमुख शुक्राचा दोष.	८३
शुक्राचा वक्रास्तादि दोष व त्याचा अपवाद.	८३
प्रतिशुक्रापवाद व शुक्रास्तीं विशेष निर्णय	८३
प्रयाणीं निषिद्ध लग्नादि.	८४
अनिष्टलग्न व शुभलग्नें	८४
गमनाचीं अनिष्टलग्न	८४
प्रयाणाचीं शुभलग्न.	८४
दिशापरत्वें शुभाशुभ लग्नें.	८४
शुभलग्नें.	८४
दिशास्वामी.	८५
दिशास्वामीचाउपयो-	८५
गललाठिक योग.	८५
पर्युषितयात्रेचे चार योग.	८५
समयबल.	८६
लग्नादि भावाच्यासंज्ञाग्रहांचाविशेष फळें	८६
योगयात्रा प्रयोजन.	८६
यात्रायोग.	८६
लग्नयोग.	८६
लग्नयोग.	८६
लग्नयोग	८७
विशेष लग्नयोग.	८७
लग्नयोग.	८७
लग्नयोग.	८७
यात्रायोग द्वय.	८७
लग्नयोग	८७
लग्नयोग.	८७
लग्नयोग.	८७
लग्नयोग.	८८
लग्नयोग.	८८
लग्नयोग	८८
दोन लग्नयोग.	८८
तीन लग्नयोग.	८८
लग्नयोग द्वय.	८८
यात्रालग्नाचे तीनयोग	८९
योग, अधियोग व योगाधियोग.	८९
विजयादशमीचा सिद्ध मुहूर्त.	८९
प्रयाणा चित्तशुद्धीची अवश्यकता [सें	८९
अवश्यनिषिद्ध नैमित्तिक दिवसाच्या यात्रेचा विशेष नियम	८९ / ९०
एकदिन यात्रेचा मुहूर्त विचार.	९०
प्रयाणी नवम तिथिवार नक्षत्राचा निषेध.	९०
प्रयाणदिवसाचा विधि	९०
नक्षत्र दोहद.	९०
दिशादोहद.	९०
वारदोहद.	९१
तिथिदोहद.	९१
गमनकाळीं कर्तव्य विधि.	९१
पूर्वादि दिशांच्या गमनाचीं वाहनें.	९१
निघण्याचीं स्थानें.	९२
प्रस्थानवस्तु.	९२
प्रस्थानपरिमाणें (प्राचीनमतें.)	९२
मुनिमतानें प्रस्थानपरिमाण.	९२
प्रस्थानाचा अवधि व प्रयाणीं मैथुननिषेध.	९२
यात्राकर्त्याचे नियम.	९३
गमनकर्त्याचें नियम,	९३
अकालवृष्टि लक्षण.	९३
अकालवृष्टीचा व दुष्ट शकुनाचा परिहार.	९३
शुभशकुन.	९३
अपशकुन.	९४
अन्यशुभशकुन.	९४
पशुपक्षिशकुन	९४
पशुपक्षिशकुन.	९५
पशुपक्षिशकुन.	९५
अपशकुनाचा परिहार	९५
यात्रेहून आल्यावर गृहप्रवेश करण्याचीं	९५
नक्षत्रें.	९५
प्रयाणीं वर्ज्य पंचांगदोष.	९६
प्रयाणीं वर्ज्य ग्रहदोष	९६
अथवास्तुप्रकरणम् १२	
ग्रामाचें शुभाशुभत्व, काकिणी आणि गृहद्वार नियम.	९७
गांवांतील अशुभ स्थानें.	९७
इष्टनक्षत्र व इष्टआय यापासून घराची लांबीरुंदी आणणें.	९७
ध्वजादि आय आणि वर्गपरत्वें द्वारदिशा	९८
गृहारंभाचा विशेष निषिद्ध काल.	९८
गृहव्यय, अंशक व त्याचें फळ.	९८
शालाध्रुवज्ञान.	९८
ध्रुवादिनांवांची अक्षरसंख्या.	९८
ध्रुवादि गृहनामें.	९८
गृहाचे आयादिनवक.	९९
गृहारंभाचें वृषवास्तुचक्र.	९९
कालपरत्वें गृहद्वार नियम, गृहारंभनक्षत्रें व सूतिकागृह प्रवेश	९९
केचिन्मतानें गृहारंभाचे शुभमास.	९९
तिथिपरत्वें द्वारदिशा नियम.	१००
गृहारंभाची पंचांग शुद्धि आणि लग्नशुद्धि.	१००
राहुमुख	१००
गृहांत वापीकूपादि करण्याचीं दिशापरत्वे फळ.	१००
दिशापरत्व स्नानादि कृत्यांचीं व पदार्थसंग्रहाचीं स्थानें.	१०१
गृहाचे दोन आयुर्योग	१०१
गृहायुर्योगद्वय.	१०१
गृह चिरकाल लक्ष्मीयुक्त नांदण्याचे तीन योग	१०१
गृह परहस्तीं जाण्याचा योग.	१०१
गृहारंभाला शुभ-नक्षत्र वारयोग.	१०२
गृहारंभाचा अशुभयोग आणि शुभयोग.	१०२
गृहारंभीं अशुभयोग	१०२
द्वारचक्र (केचिन्मताचे)	१०२
अथगृहप्रवेशप्रकरणम् १३.	
गृहप्रवेशकाल	१०२
जीर्णगृह प्रवेशाचा	

विषय.	पृष्ठ	विषय.	पृष्ठ	विषय.	पृष्ठ	विषय.	पृष्ठ
व गृहप्रवेशाचा क्रम		धन आणि तिथिपरत्वें	१०३	प्रवेशानंतरचें कर्तव्य	१०४	पितृवर्णन.	१०५
शुद्धि.	१०३	शुभप्रवेश.	१०४	ग्रंथालंकार पिता.		स्वनामकथन व ग्रं-	
वासगत सूर्याचा नि-		कलशवास्तुचक्र.	१०४	मह वर्णन.	१०५	थनिर्माणकाल.	१०५

अनुक्रमणिका समाप्त.

श्रीः

मुहूर्तचिंतामणिः

मंगलम् (इंद्रवज्रा)

गौरीश्रवः केतकपत्रभंगमाकृष्यहस्तेन दधन्मुखाग्रे ॥
विघ्नं मुहूर्ताकलितद्वितीयदंतप्ररोहो हरतु द्विपास्यः ॥ १ ॥

अर्थ– ग्रंथकार रामदैवज्ञ ग्रंथारंभी गणपतीचें लीलारूपानें स्तवन करितो–पार्वतीनें आपल्या कानावर भूषण ह्मणून ठेविलेल्या, केतकाच्या (केवड्याच्या) पानाचा लहानसा तुकडा सोंडेनें ओढून घेऊन मुखांत धारण केल्यामुळें आपण एक दंत असतांही मुहूर्तपर्यंत (तोंडात असे-पर्यंत) दुसरा दंत उत्पन्न झाल्याप्रमाणे दिसणारा गणपति विघ्न हरण करो.

या श्लोकांत गणपतीची बालपणांतील लीला वर्णिली आहे. हल्ली बायका जशा अनेक प्रकारची फुलें आपल्या केशपाशांत घालित असतात, त्याप्रमाणें पूर्वी अनेक वृक्षांचे कोंवळे कोंवळे पल्लव आणि पुष्पें शोभेकरिता कानावर ठेवीत असत, ह्मणून पार्वतीनें आपल्या कानावर ठेविलेले केतक गणपतीनें आपल्या सोंडेनें ओढून घेतलें अशी कल्पना केली आहे. कांहीं पदार्थ सांपडला कीं, तो तोंडांत घालावयाचा अशी जी बाललीला ती सर्व प्रसिद्धच आहे. त्याप्रमाणें गणपतीनें केतक तोंडांत धरिलें असे वर्णन केलें आहे. केतकाचा वर्ण दांतासारखाच असतो, ह्मणून तोंडांत असेपर्यंत दुसरा दांत उत्पन्न झाल्याची कल्पनाही सयुक्तिक आहे बालक आपल्या आईजवळ लडिवाळपणानें अनेक प्रकारच्या क्रीडा करितो तोच प्रकार ग्रंथकारानें मनांत आणून पार्वतीजवळ गणपतीनें बालपणी केलेली लीला ह्या श्लोकांत फार सुरस वर्णिली आहे.

विषयनिरूपण. (उपजाती)

क्रियाकलापप्रतिपत्तिहेतुं संक्षिप्तसारार्थविलासगर्भम् ॥
अनंतदैवज्ञसुतः सरामो मुहूर्तचिंतामणिमातनोति ॥ २ ॥

अर्थ–गर्भाधानादि अनेक क्रिया ह्मणजे संस्काररूपकर्मे अमक्या शुभ वेळीं करावी आणि अमक्या वेळीं करूं नये हें समजण्याच्या ज्ञानाचें कारण असा, आणि संक्षिप्त व तत्वरूप अर्थाचा विलास ज्यात आहे असा, "मुहूर्तचिंतामणि" नामक ग्रंथ, अनंत दैवज्ञाचा पुत्र रामदैवज्ञ (म्हणजे मी करितों) असे ग्रंथकार ह्मणतो.

अथ शुभाशुभप्रकरणम्.

तिथींचेस्वामी. (अनुष्टुप)

तिथीशावन्हिकौगौरीगणेशोऽहिर्गुहोरविः ॥
शिवोदुर्गांतकोविश्वेहरिःकामःशिवःशशी ॥ ३ ॥

अर्थ–पुढें लिहिलेले प्रतिपदादि तिथींचे स्वामी समजावे जसें प्रतिपदेचास्वामी अग्नी, द्वितीयेचा ब्रम्हा, तृतीयेचा गौरी, चतुर्थीचा गणेश, पंचमीचा सर्प, षष्ठीचा गुह, सप्तमीचा रवी, अष्टमीचा शिव नवमीचा दुर्गा, दशमीचा यम, एकादशीचा विश्वेदेव, द्वादशीचा विष्णु, त्रयोदशीचा काम, चतुर्दशीचा शिव, पौर्णिमेचा चंद्र, अमावास्येचा पितर, याप्रमाणें स्वामी जाणावें.

तिथींच्या नंदादि संज्ञा. (उपजाति.)

नंदा च भद्रा च जया च रिक्ता पूर्णेति तिथ्योऽशुभमध्यशस्ताः ॥
सितेऽसिते शस्तसमाधमाः स्युः सितेज्ञभौमार्किगुरौ च सिद्धाः ॥ ४ ॥

अर्थ—शुक्लपक्षांतील प्रतिपदेपासून पंचमीपर्यंतच्या पांच तिथींला नंदा, भद्रा, जया रिक्ता, पूर्णा ह्या पांच संज्ञा आहेत. ह्याच संज्ञा षष्ठीपासून दशमीपर्यंत आणि एकादशीपासून पूर्णिमेपर्यंतच्या तिथींल आहेत. ह्या अशुभ, मध्यम आणि शुभ जाणाव्या. कृष्णपक्षांतील तिथिलाही त्यांच संज्ञा आहेत. मात्र ह्या तिथि शुभ, मध्यम, आणि अशुभ अशा आहेत. शुक्रवारीं नंदा, बुधवारी भद्रा, मंगळवारीं जया, शनिवारी रिक्ता, गुरुवारीं पूर्णा अशा आल्या असतां सिद्धिकर जाणाव्या.

रव्यादिवारीं निषिद्ध तिथि आणि दग्धनक्षत्रे. (शालिनी.)

नंदा भद्रा नंदिकाख्या जया च रिक्ता भद्रा चैव पूर्णा मृतार्कात् ॥
याम्यं त्वाष्ट्रं वैश्वदेवं धनिष्ठार्यम्णं ज्येष्ठांत्यं रवेर्दग्धभं स्यात् ॥ ५ ॥

अर्थ—रव्यादिवारी नंदादि संज्ञक तिथी आल्या असता त्या शुभकर्मी वर्ज जाणाव्या असे आधुनिकांचे मत आहे त्या खाली लिहिल्याप्रमाणें जाणाव्या रविवारी नंदा सोमवारी भद्रा, मंगळवारी नंदा, बुधवारी जया गुरुवारी रिक्ता, शुक्रवारी भद्रा, शनिवारी पूर्णा या आधम तिथी जाणाव्या, प्राचिनांच्या मतानें ह्याच तिथी त्यांच वारी आल्या असतां अमृत संज्ञक होतात असें आहे. रव्यादिवारी पुढें लिहिलेली नक्षत्रे आली असतां ती दग्ध होतात रविवारी भरणी, सोमवारी चित्रा, मंगळवारी उत्तरापाढा, बुधवारी धनिष्टा, गुरुवारी उत्तराफाल्गुनी शुक्रवारी जेष्ठा शनिवारी रेवती, हीं दग्ध नक्षत्रें जाणावी. (हींच सूर्यादि ग्रहांचीं जन्म नक्षत्रें होत. सूर्याची १४ चंद्राची १० मंगळाची १२ बुधाची ९ गुरूची ८ शुक्राची १५ शनीची ३० ह्या तिथि त्या त्या ग्रहांच्या जन्म तिथि समजाव्या. रव्यादि ग्रहांच्यावारी त्यांच्या जन्मनक्षत्रावर आणि जन्म तिथिवर शुभ कर्म करूं नये. हल्लीं हा प्रकार प्रचारांत नाहीं.)

क्रकच व संवर्तयोग आणि दंतधावनाच्या निशिद्ध तिथि. (अनुष्टुप्.)

षष्ठ्यादितिथयो मंदाद्विलोमं प्रतिपद्बुधे ॥
सप्तम्यर्केऽधमाः षष्ठ्याद्यामाश्च रदधावने ॥ ६ ॥

अर्थ—शनिवारीं षष्ठी, शुक्रवारीं सप्तमी, गुरुवारीं अष्टमी, बुधवारीं नवमी, मंगळवारीं दशमी, सोमवारीं एकादशी, रविवारीं द्वादशी, अशा शनिवारापासून उलट वार मोजून त्यावारी षष्टी पासून तिथि आल्या असतां तो क्रकच योग जाणावा. हा शुभाला निंद्य होय. बुधवारीं प्रतिपदा आणि रविवारीं सप्तमी असतां संवर्त योग होतो; हाही शुभाला निंद्य. षष्टी, प्रतिपदा, अमावास्या ह्या तिथि दंतधावनाला निषिद्ध जाणाव्या.

अनेक कृत्यांला निषिद्ध तिथि (इंद्रवंशा.)

षष्ठ्यष्टमीभूतविधुक्षये पुनो सेवेत नातैलपलक्षुरं रतम् ॥
नाभ्यंजनं विश्वदशद्विके तिथौ धात्रीफलैः स्नानममाद्रिगोष्वसत् ॥ ७ ॥

अर्थ—षष्टी, अष्टमी, चतुर्दशी आणि आमावास्या ह्या तिथींला अनुक्रमें तैल, मांस, क्षौर, आणि मैथुन हीं वर्ज्य करावी. त्रयोदशी, दशमी, द्वितीया ह्या तिथींवर अभ्यंगस्नान करूं नये. अमावास्या, सप्तमी, नवमी ह्या तिथींवर आमलकस्नान (आंवळयानीं युक्त उदकानें स्नान) करूं नये.

दग्धयोग, विषयोग, हुताशनयोग, व यमघंटयोग. (इंद्रवज्रा)

सूर्येशपंचाग्निरसाष्टनंदा वेदांकसप्ताश्विगजांकशैलाः ॥
सूर्यांगसप्तोरगगोदिगीशा दग्धाविषाख्याश्च हुताशनाश्च ॥ ८ ॥

(उपजाति)

सूर्यादिवारेतिथयोभवंतिमघाविशाखाशिवमूलवन्हि ॥
ब्राह्मंकरोऽर्काद्यमघंटकाश्चशुभेविवर्ज्यागमनेत्ववश्यम् ॥ ९ ॥

अर्थ—रविवारीं द्वादशी, सोमवारीं एकादशी, मंगळवारीं पंचमी, बुधवारीं तृतीया, गुरुवारीं षष्ठी शुक्रवारीं अष्टमी, शनिवारीं नवमी, अशा तिथि आल्या असतां दग्धयोग होतो. रविवारीं चतुर्थी, सोमवारीं, षष्ठी, मंगळवारीं सप्तमी, बुधवारीं द्वितीया, गुरुवारीं अष्टमी, शुक्रवारीं नवमी, शनिवारीं सप्तमी आशा तिथि असतां विषयोग होतो. रविवारीं द्वादशी, सोमवारीं षष्ठी, मंगळवारीं सप्तमी, बुधवारीं, अष्टमी, गुरुवारीं नवमी, शुक्रवारीं दशमी, आणि शनिवारीं एकादशी अशा तिथि आल्या असतां हुताशन योग होतो. याप्रमाणें सूर्यादिवारीं त्या त्या तिथींच्या योगानें निरनिराळे तीन योग होतात. त्यांशिवाय रविवारीं मघा, सोमवारीं विशाखा, मंगळवारीं आर्द्रा, बुधवारीं मूळ, गुरुवारीं कृत्तिका, शुक्रवारीं रोहिणी, आणि शनिवारीं हस्त अशीं नक्षत्रें आल्यानें यमघंट योग होतो. हे चारही योग सर्व शुभ कृत्यांला वर्ज्य होत. त्यांतही प्रयाणाला अवश्य वर्ज्य होत.

चैत्रादिमासांतील शून्यतिथि. (शार्दूलविक्रीडित.)

भाद्रेचंद्रदृशौनभस्यनलनेत्रेमाधवेद्वादशी ॥ पौषेवेदशराइषेदशशिवामार्गेऽद्रिना
गाम्मधौ ॥ गोष्ठौचोभयपक्षगाश्चतिथयःशून्याबुधैःकीर्तिता ॥ ऊर्जाषाढतपस्य
शुक्रतपसांकृष्णेशरांगाब्धयः ॥ १० ॥ शक्राःपंचसितेशक्राद्र्यग्निविश्वरसाःक्रमात्

अर्थ—पुढे लिहीलेल्या चैत्रादि महिन्यांतील शून्यातिथी जाणाव्या, भाद्रपद महिन्यांतील प्रतिपदा, द्वितीया, श्रावणांतील त्रितिया, द्वितीया, वैशाखांतील द्वादशी, पौषांतील चतुर्थी, पंचमी, अश्विनांतील दशमी, एकादशी, मार्गशीर्षांतील सप्तमी, अष्टमी, चैत्रांतील नवमी, आष्टमी. याप्रमाणें शून्य जाणाव्या. पुढील तिथी कृष्ण व शुक्लपक्षांत शुद्ध जाणाव्या. कार्तिक कृष्ण पंचमी व शुक्ल चतुर्दशी, आषाढ कृष्ण षष्ठी व शुक्ल सप्तमी, फाल्गुन वद्य चतुर्थी व शुद्ध त्रितीया, जेष्ठ वद्य चतुर्दशी व शुद्ध त्रयोदशी, माघ वद्य पंचमी व शुद्ध षष्ठी याप्रमाणें शून्य जाणाव्या या शून्य तिथीवर शुभ कर्मे करूं नये.

तिथि नक्षत्र संयोगाचे दोष. (अनुष्टुप्).

तथानिंद्यंशुभेसार्पद्वादश्यांवैश्वमादिमे ॥ ११ ॥ अनुराधाद्वितीयायांपंचम्यां
पित्र्यभंतथा ॥ त्र्युत्तराश्चतृतीयायामेकादश्यांचरोहिणी ॥ १२ ॥ स्वातीचि-
त्रेत्रयोदश्यांसप्तम्यांहस्तराक्षसे॥नवम्यांकृत्तिकाष्टम्यांपूभाषष्ठ्यांचरोहिणी ॥ १३ ॥

अर्थ—सर्व महिन्यांतील खाली लिहिलेल्या तिथीला त्यापुढें लिहिलेली नक्षत्रें आली असतां तीं शुभ कृत्यांला वर्ज्य होत.

तिथी.	नक्षत्रें.	तिथी.	नक्षत्रें.	तिथी.	नक्षत्रें.		
			उत्तराफाल्गुनी	पंचमी.	मघा.	सप्तमी.	हस्त, मूळ.
द्वादशी.	आश्लेषा.	तृतीया.	उत्तराषाढा.	एकादशी.	रोहिणी.	नवमी.	कृत्तिका.
प्रतिपदा.	उत्तराषाढा		उत्तराभाद्रपदा	त्रयोदशी.	स्वाती, चित्रा.	अष्टमी.	पूर्वाभाद्रपदा.
द्वितीया.	अनुराधा.					षष्ठी.	रोहिणी.

चैत्रादि मासांतील शून्य नक्षत्रें. (अनुष्टुप्.)

कदास्रभेत्वाष्ट्रवायुविश्वेज्यौभगवासवौ॥वैश्वश्रुतीपाशिपौष्णे अजपादग्निपित्र्यभे।१४।
चित्राद्वीशौशिवाश्व्यर्काःश्रुतिमूलेयमेंद्रभे ॥ चैत्रादिमासेशून्याख्यास्ताराविक्तवि-
नाशदाः ॥ १५ ॥

अर्थ—चैत्रादि बारा महिन्यांत त्या त्या महिन्याचे पुढें दिलेलीं नक्षत्रें. शून्य जाणावी जसे चैत्रांत

रोहिणी, अश्विनी. वैशाखांत चित्रा, स्वाती. ज्येष्टांत उत्तराषाढा, पुष्य. आषाढांत पूर्वाफल्गुनी, धनिष्ठा. श्रावणांत उत्तराषाढा, श्रवण भाद्रपदांत शततारका, रेवती. अश्विनांत पूर्वाभाद्रपदा. कार्तिकांत कृत्तिका, मघा. मार्गशीर्षांत चित्रा, विषाखा. पौषांत आर्द्रा, अश्विनि, हस्त. माघांत श्रवण, मूळ, फाल्गुनांत भरणी, ज्येष्ठा याप्रमाणें नक्षत्रें शून्य जाणावी. यावर कांहीं कार्य करूं नये हीं नक्षत्रें द्रव्याचा नाश करणारी आहेत.

चैत्रादि मासांतील शून्य राशि. (अनुष्टुप्)

घटोझषोगौर्मिथुनंमेषकन्यालितौलिनः ॥ धनुःकर्कोमृगःसिंहश्चैत्रादौशून्यराशयः ॥ १६ ॥

अर्थ--चैत्रादिमासांत पुढें लिहिलेल्या राशि शून्य जाणाव्या. ज्या मासास जी राशि शून्य असेल त्या लग्नावर त्या मासांत कांहीं शुभकर्म करूं नये (ह्या राशि, वंशाचा आणि द्रव्याचा नाश करणाऱ्या आहेत.) जशी चैत्रांत कुंभ, वैशाखांत मीन, जेष्ठांत वृषभ, आषाढांत मिथून, श्रावणांत मेष, भाद्रपदांत कन्या, आश्विनांत वृश्चिक, कार्तिकांत तूळ, मार्गशीर्षांत धन, पौषांत कर्क, माघांत मकर, फाल्गुनांत सिंह याप्रमाणें शून्य राशी जाणाव्या.

दग्ध लग्नें. (इंद्रवज्रा.)

पक्षादितस्त्वोजतिथौघटैणौमृगेंद्रनक्रौमिथुनांगनेच ॥ चापेंदुभेकर्कहरीहयांत्यौ गोंत्यौचनेष्टेतिथिशून्यलग्ने ॥ १७ ॥

अर्थ—सर्व महिन्यांच्या शुक्ल आणि कृष्ण पक्षांतील प्रतिपदेपासून विषम तिथींवर पुढें सांगितल्या प्रमाणें शून्य लग्नें जाणावी. हीच दग्ध लग्नें होत. ती अशी प्रतिपदा तुला, मकर. तृतीया सिंह, मकर. पंचमी मिथुन, कन्या सप्तमी धन, कर्क. नवमी कर्क, सिंह. एकादशी धन, मीन. त्रयोदशी वृषभ, मीन. याप्रमाणें दग्ध लग्नें जाणावीं.

मागील दोषांचा परिहार. (अनुष्टुप्)

**तिथयोमासशून्याश्चशून्यलग्नानियान्यपि ॥ मध्यदेशेविवर्ज्यानिनदुष्याणीतरे-
षुतु ॥ १८ ॥ पंग्वंधकाणलग्नानिमासशून्याश्चराशयः ॥ गौडमालवयोस्त्या-
ज्याअन्यदेशेनगर्हिताः ॥ १९ ॥**

अर्थ---मागें ज्या शून्य तिथि सांगितल्या आणि शून्य लग्नें सांगितलीं तीं मध्य देशांत अवश्य वर्ज्य करावीं इतर ठिकाणीं शुभ कार्याला कालांतर असतां मात्र वर्ज्य करावीं, नाहीं पेक्षां करण्यांचें कारण नाहीं तशीं पंगुलग्नें, अंधलग्नें, आणि काणलग्नें (हीं तीनही विवाह प्रकरणांत समजतील.) व ज्या मासांत जीं शून्य लग्नें सांगितलीं तींसर्व गौड आणि मालव ह्या देशांत सोडावीं. त्यांहून अन्य देशीं तीं निंद्य नाहींत ह्मणून सोडूं नये.

अमृतसिद्धियोग आणि त्याचा तिथिपरत्वें निषेध. (अनुष्टुप्)

वर्जयेत्सर्वकार्येषुहस्तार्कंपंचमीतिथौ ॥ भौमाश्विनींचसप्तम्यांषष्ठ्यांचंद्रेंद्रवंतथा ॥ २० ॥ बुधानुराधामष्टम्यांदशम्यांभृगुरेवतीम् ॥ नवम्यांगुरुपुष्यंचैकादश्यांशनिरोहिणीम् ॥ २१ ॥

अर्थ--खालीं लिहिलेल्यावारीं त्यापुढें लिहिलेलीं नक्षत्रें आलीं असतां अमृतसिद्धियोग होतो असें जाणावें. आणि त्या वारांच्या मागें ज्या तिथि लिहिल्या आहेत त्या तिथींवर तोच अमृतसिद्धियोग आला असतां तो सर्व कार्याला अशुभ ह्मणून अशा योगांवर कोणतेंही शुभकार्य करूं नये.

तिथि	वार	नक्षत्रें	तिथि.	वार.	नक्षत्रें.	तिथि.	वार.	नक्षत्रें.
पंचमी.	रवि.	हस्त.	अष्टमी.	बुध.	अनुराधा	एकादशी.	शनि.	रोहिणी.

सप्तमी.	मंगल.	अश्विनी	दशमी.	शुक्र.	रेवती.
षष्ठी.	सोम.	मृगशीर्ष.	नवमी	गुरु.	पुष्य

कार्यपरत्वें अमृतसिद्धियोगाचा निषेध. (अनुष्टुप्)

गृहप्रवेशेयात्रायांविवाहेचयथाक्रमम् ॥ भौमाश्विनींशनौब्राम्हंगुरोपुष्यंविवर्जयेत् ॥ २२ ॥

अर्थ--मंगळवारीं अश्विनी नक्षत्र येऊन होणारा अमृतसिद्धियोग गृह प्रवेशाला अति निंद्य म्हणून तो घेऊं नये. शनिवारीं रोहिणी नक्षत्र आल्यानें होणारा अमृतसिद्धियोग यात्रेला अशुभ होय, तसाच गुरुवारीं पुष्य असतां होणारा अमृतसिद्धियोग विवाहाला अशुभ जाणावा.

आनंदादि अठ्ठावीस योग. (शालिनी)

आनंदाख्यःकालदंडश्चधूम्रोधातासौम्योध्वांक्षकेतूक्रमेण ॥
श्रीवत्साख्योवज्रकंमुद्गरश्चछत्रंमित्रंमानसंपद्मलुंबौ ॥ २३ ॥

(उपजाति)

उत्पातमृत्युकिलकाणसिद्धाशुभोऽमृताख्योमुसलोगदश्च ॥
मातंगरक्षश्चरसुस्थिराख्याःप्रवर्धमानाःफलदाःस्वनाम्ना ॥ २४ ॥

अर्थ--१ आनंद, २ कालदंड, ३ धूम्र, ४ धाता, ५ सौम्य, ६ ध्वांक्ष, ७ केतु, ८ श्रीवत्स, ९ वज्रक, १० मुद्गर, ११ छत्र, १२ मित्र, १३ मानस. १४ पद्म, १५ लुंब, १६ उत्पात; १७ मृत्यु, १८ काण, १९ सिद्धि, २० शुभ, २१ अमृत, २२ मुसल, २३ गद, २४ मातंग. २५ राक्षस, २६ चर, २७ स्थिर, २८ वर्धमान, असे हे अठ्ठावीस योग आहेत. यांची फलें त्यांच्या नांवाच्या अर्थासारखीं आहेत, ज्यांचीं नांवें चांगलीं त्यांचीं फलें शुभ आणि ज्यांचीं नांवें वाईट त्यांचीं फलें अशुभ जाणावीं.

आनंदादि योग जाणण्याचा उपाय. (अनुष्टुप्)

दास्रादर्केमृगादिंदौसार्पाद्भौमेकराद्बुधे ॥
मैत्राद्गुरौभृगौवैश्वाद्गण्यामंदेचवारुणात् ॥ २५ ॥

अर्थ -(आनंदादि योग २८ आहेत म्हणून पुढें सांगितल्याप्रमाणें नक्षत्रें मोजतांना अभिजितासह मोजावीं. रविवारीं अश्विनींपासून, सोमवारीं मृगशीर्षापासून, मंगळवारीं आश्लेषांपासून, बुधवारीं हस्तापासून, गुरवारीं अनुराधापासून, शुक्रवारीं उत्तराषाढांपासून, आणि शनिवारीं शततारकांपासून असें ज्या वारीं जें दिवसनक्षत्र असेल तें मोजावें आणि जी संख्या होईल तितकावा मागील श्लोकांतील आनंदादि अठ्ठावीस योगापैकीं योग आहे असें जाणावें. उदाहरणः-रविवारीं श्रवण नक्षत्र आहे असें मानिलें तर अश्विनीपासून श्रवण मोजिल्यानें २३ होतात म्हणून त्या दिवशीं आनंदादि योगांपैकीं तेविसावा गदयोग आहे असें जाणावें. सोमवारीं श्रवण असतां मृगशीर्षापासून मोजून एकोणीस होतात म्हणून आनंदादि योगापैकीं सिद्धियोग आहे. याप्रमाणें सर्वत्र जाणावें.

आनंदादिकांतील दुष्ट योगांच्या त्याज्य घटिका. (शालिनी.)

ध्वांक्षेवज्रेमुद्गरेचेपुनाड्योवर्ज्यावेदाःपंचलुंबेगदेश्वाः ॥
धूम्रेकाणेमौसलेभूर्द्वयंद्वेरक्षोमृत्युत्पातकालाश्चसर्वे ॥ २६ ॥

अर्थ—ध्वांक्ष, वज्र आणि मुद्गर ह्या तीन योगांच्या आरंभीच्या पांच ५ घटिका शुभकार्याला सोडाव्या. पद्म आणि लुंब ह्या दोहोंच्या आरंभीच्या चार ४ घटिका सोडाव्या. गदयोगांच्या सात सोडाव्या. धूम्राची १ एक, काणाच्या दोन २ आणि मौसलाच्या दोन २ घटिका सोडाव्या. राक्षस, मृत्यु, उत्पात, आणि कालदंड हे चार योग सर्व सोडावे.

दोषांचे अपवादक रवियोग (अनुष्टुप्)

सूर्यभाद्वेदगोतर्कदिग्विश्वनखसंमिते ॥ चंद्रर्क्षे रवियोगाः स्युर्दोषसंघविनाशकाः ॥ २७

अर्थ—सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्र मोजून ती संख्या ४ । ९ । ६ । १० । १३ । २० ह्या पैकी असतां रवियोग आहे असें समजावें इतर असतां नाहीं. हा रवियोग असला तर तो अनेक दोषांचा नाश करितो.

रव्यादिवारीं कित्येक नक्षत्रे आल्यानें होणारे सिद्धियोग. (इंद्रवज्रा.)

सूर्येर्कमूलोत्तरपुष्यदास्रं चंद्रे श्रुतिब्राह्मशशीज्यमैत्रम् ॥
भौमेश्विहिर्बुध्न्यकृशानुसार्पं ज्ञे ब्राह्ममैत्रार्ककृशानुचांद्रं ॥ २८ ॥

(उपजाती)

जीवेंत्यमैत्राश्व्यदितीज्यधिष्ण्यं शुक्रेंत्यमैत्राश्व्यदितिश्रवोभं ॥
शनौ श्रुतिब्राम्हसमीरभानि सर्वार्थसिद्ध्यै कथितानि पूर्वैः ॥ २९ ॥

अर्थ—खाली लिहिल्याप्रमाणें सूर्यादिवारी तीं तीं नक्षत्रे आली असतां सिद्धियोग होतात. ह्यावर सर्व कार्ये सिद्ध होतात असें प्राचीन आचार्यांचें मत आहे. (हे आनंदादि योगांतून निवडलेले आहेत.)

रविवार—हस्त, मूळ, उत्तरा, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, पुष्य, अश्विनी सोमवार—श्रवण, रोहिणी, मृग, पुष्य, अनुराधा. मंगळवार—अश्विनी, उत्तराभाद्रपदा, कृत्तिका, आश्लेषा. बुधवारी-रोहिणी, अनुराधा, हस्त, कृत्तिका, मृगशीर्ष. गुरुवार—रेवती, अनुराधा अश्विनी, पुनर्वसु, पुष्य. शुक्रवार—रेवती, अनुराधा, अश्विनी, पुनर्वसु, श्रवण. शनिवार.—श्रवण, रोहिणी, स्वाती याप्रमाणे सिद्धियोग जाणावे.

उत्पात, मृत्यु, काण, आणि. अमृतसिद्धियोग. (शालिनी.)

द्वीशात्तोयाद्वासवात्पौष्णभाच्चब्राम्हात्पुष्यादर्यमर्क्षाद्युगर्क्षैः ॥
स्यादुत्पातोमृत्युकाणौचसिद्धिर्वारेर्काद्येतत्फलंनामतुल्यं ॥ ३० ॥

कोष्टक.

वार.	उत्पात.	मृत्यु.	काण.	अमृतसिद्धि
रवि.	विशाखा.	अनुराधा.	ज्येष्ठा.	मूळ.
सोम	पूर्वाषाढा.	उत्तराषाढा.	अभिजित्.	श्रवण.
मंगळ	धनिष्ठा	शततारका.	पूर्वाभाद्रपदा.	उत्तराभाद्रपदा
बुध.	रेवती	अश्विनी	भरणी	कृत्तिका.
गुरु	रोहिणी.	मृग	आर्द्रा	पुनर्वसु.
शुक्र	पुष्य.	आश्लेषा.	मघा.	पूर्वाफल्गुनी.
शनि	उत्तराफल्गुनी.	हस्त.	चित्रा.	स्वाती.

अर्थ—विशाखा, पूर्वाषाढा, धनिष्ठा, रेवती, रोहिणी, पुष्य, आणि उत्तराफल्गुनी ह्या सात नक्षत्रांपैकीं प्रत्येक नक्षत्रापासून चार नक्षत्रें, रविवारापासून सातवारीं. आलीं असतां अनुक्रमें उत्पांत मृत्यु काण व अमृतसिद्धीयोग होतात त्यांची फळें नांवासारखीं असतात ह्मणजे पहिले तीन अशुभ आणि चौथा अमृतद्धिसियोग फार उत्तम होय, हे चार योग बाजूचे कोष्टकावरून स्पष्ट समजतील.

देश विशेषानें दुष्ट योगांचा परिहार (अनुष्टुप्)

कुयोगास्तिथिवारोत्थास्तिथिभोत्थाभवारजाः ॥
हूणवंगखशेष्वेववर्ज्यास्त्रितयजास्तथा ॥ ३१ ॥

अर्थ—तिथि आणि वार, तिथि आणि नक्षत्र, नक्षत्र आणि वार, ह्या दोहोंच्या संयोगानें होणारे दुष्ट योग आणितसेच तिथि, वार व नक्षत्र ह्या तिहींच्या संयोगानें होणारे दुष्टयोग हे सर्व हूण, वंग, आणि खश ह्या देशांमध्यें शुभ कार्यीं वर्जावे हे अन्य देशीं सोडण्याचें कारण नाहीं.

सर्व शुभ कार्यी वर्ज्य. (शार्दूलविक्रीडित.)

सर्वंस्मिन्विधुपापयुक्तनुलवावर्धेनिशान्होर्घटीं ॥ त्यंशंत्वेकुनवांशकंग्रहणतः पूर्वांदिनानांत्रयम् ॥ उत्पातग्रहतोग्रहांश्वशुभदोत्पातैश्वदुष्टंदिनं ॥ षण्मासंग्रहभिन्नभंत्यजशुभेयौद्धंतथोत्पातभम् ॥ ३२ ॥

अर्थ-सर्व शुभ कार्याला चंद्र आणि पापग्रह ह्यानीं युक्त लग्न व नवांश सोडावे. रात्रीच्या व दिवसाच्या अर्धाचे वेळीं २० पळें सोडावी (म्हणजे मध्यरात्रीं व मध्यान्हीं मागें आणि पुढें दहा दहा पळें सोडावीं.) तसाच पापग्रहाचा नवांश देऊं नये. ग्रहणाचे पूर्वीं तीन दिवस कोणतेही शुभ कार्य करूं नये. उत्पात आणि ग्रहण ह्यांच्या पुढें सात दिवस कांहीं शुभ कार्य करूंनये ज्या दिवशीं शुभदायक उत्पात होईल तो दिवस सोडावा. (चंद्रसूर्याला खळें पडणें, धुकें पडणें, सूर्य तांबडा होणें इ० प्रकार ज्या ऋतूंत जे व्हावे असें सांगितलें आहेत ते उत्पात शुभदायक होत ह्याची विशेष माहिती वराहसंहितेंत आहे.) भिन्नग्र० ग्रहानीं भेद केलेलें नक्षत्र ग्रहांचे ज्यावर युद्ध झालें असेल ते नक्षत्र, आणि उत्पात झालेले नक्षत्र हीं सर्व शुभकृत्याला सहा महिने सोडावी.

आसपरत्वें ग्रहण नक्षत्र निषेध आणि मागें पुढें वर्ज्य दिवस. (इंद्रवज्रा)

नेष्टंग्रहर्क्षंसकलार्धपादग्रासेक्रमात्तर्कगुणेंदुमासान् ॥
पूर्वंपरस्तादुभयोस्त्रिरस्ताग्रस्तेस्तगेनाप्युदितेर्धखंडे ॥ ३३ ॥

अर्थ—खग्रास, अर्ध, किंवा एक पाद ग्रहण ज्या दिवस नक्षत्रावर लागलें असेल तें ग्रहणनक्षत्र अनुक्रमें ६ । ३ । १ महिने पर्यंत शुभकार्यी वर्ज्य करावें. ग्रस्तास्त म्हणजे ग्रहण लागलें असतां चंद्राचें किंवा सूर्याचें अस्त होणार असले तर पूर्वीचे तीन दिवस अशुभ, आणि पुढचे सर्व शुभ होत. तसेंच ग्रस्तोदय म्हणजे ग्रहण लागलेलें असून उदय होणार असेल तर पुढचे तीन दिवस अशुभ व मागचे शुभ जाणावें. ग्रस्तास्त किंवा ग्रस्तोदय नसून बिंबमानाच्या अर्धापर्यंत ग्रहण असेल तर मागें व पुढें तीन तीन दिवस अशुभ होत. अर्धापेक्षा अधिक ग्रहण असतां मागील श्लोकांत सांगितलेले दिवस (पूर्वी ३ व पुढें ७) सोडावें.

सर्व शुभकार्याला अवश्य वर्ज्य. (वसंततिलका.)

जन्मर्क्षमासतिथयोव्यतिपातभद्रावैधृत्यमापितृदिनानितिथिक्षयर्द्धी ॥
न्यूनाधिमासकुलिकप्रहरार्धपातविष्कंभवज्रघटिकात्रयमेववर्ज्यम् ॥ ३४ ॥

(अनुष्टुप्.)

परिघार्धंपंचशूलेषट्चगंडातिगंडयोः ॥ व्याघातेनवनाड्यश्ववर्ज्याःसर्वेषुकर्मसु ॥ ३५ ॥

अर्थ—जन्मनक्षत्र, जन्ममास, जन्मतिथि, व्यतीपातयोग, भद्रा, करण, वैधृतियोग, अमावास्या, माता व पिता यांचे मरण दिवस, तिथिक्षय, तिथिवृद्धि, क्षयमास, अधिकमास, कुलिक यामार्ध, (हे दोन पुढें स्पष्ट समजतील.) पात म्हणजे चंद्रसूर्याचें क्रांतिसाम्य (यास महापात म्हणतात. हे दोन आहेत, व्यतीपात आणि वैधृति हे गणितगम्य आहेत) विष्कंभ आणि वज्र ह्या दोन योगांच्या आरंभाच्या ३ घटिका, परिघ योगाचें पूर्वीचें अर्ध, शूल योगाच्या पहिल्या ५ घटिका, गंड आणि अतिगंड यांच्या आरंभीच्या ६ घटिका, व्याघाताच्या प्रथम ९ घटिका, हीं सर्व शुभ कर्माला वर्ज्य करावीं. (यांतलि पहिलीं जन्मनक्षत्र, तिथि व मास हीं तीन प्रथमापत्याला मात्र वर्ज्य. द्वितीयादि अपत्यांच्या शुभाला वर्ज्य नाहीं.)

रंध्र तिथींच्या त्याज्य घटी (अनुष्टुप्)

वेदांगाष्टनवार्केंद्रपक्षरंध्रतिथौत्यजेत् ॥ वस्वंकमनुतत्वाशाशरानाडीःपराःशुभाः ॥ ३६ ॥

अर्थ—चतुर्थी, षष्ठी, अष्टमी, नवमी, द्वादशी, चतुर्दशी ह्या सहा पक्षरंध्र तिथि होत. आणि यांच्या

आरंभीच्या ८ । ९ । १४। २५ । १० । ५ इतक्या घटिका अनुक्रमानें शुभकार्थी वर्ज्य कराव्या. ह्या घटिकां-पुढें पक्षरंध्र तिथि शुभ होत.

कुलिक, कालवेला, यमघंट आणि कंटक हे दुर्मुहूर्त जाणण्याचा प्रकार. (अनुष्टुप्)

कुलिकःकालवेलाचयमघंटश्चकंटकः ॥ वाराद्द्विघ्नेकमान्मंदेबुधेजीवेकुजेक्षणः ॥ ३७ ॥

अर्थ—ज्या वाराचा कुलिक नामक दुर्मुहूर्त काढावयाचा असेल त्या वारापासून शनिवारापर्यंत मोजून आलेल्या संख्येची दुप्पट करावी. ह्मणजे ती दुप्पट कुलिक जाणावी. तशीच बुधवारापर्यंत मोजून दुप्पट केली म्हणजे कालवेला होते. गुरुवारापर्यंत मोजल्यानें यमघंट होतो आणि मंगळवारापर्यंत मोजल्यानें कंटक होतो. उदाहरणः—बुधवारीं कुलिक कोणता हें पाहणें असेल तर बुधवारापासून शनिवारपर्यंत मोजल्यानें ४ होतात त्यांची दुप्पट ८ झाली म्हणून बुधवारीं आठवा मुहूर्त कुलिक होय. याप्रमाणेंच इतरही जाणावें.

दुर्मुहूर्त, कुलिक, कंटक, कालवेला, यामार्ध व यमघंट. (शार्दूलविक्रीडित)

सूर्येषट्स्वरनागदिङ्मनुमिताश्चंद्रेब्धिषट्कुंजरा ॥ कार्कीविश्वपुरंदराःक्षितीसु-
तेब्ध्यग्नितर्कादिशः ॥ सौम्येब्ध्यब्धिगजांकदिङ्मनुमिताजीवेद्विपङ्भास्कराः ॥
शक्राख्यास्तिथयः ॥कलाश्वभृगुजेवेदेपुतर्कांग्रहाः ॥ ३८ ॥

वसंततिलका.

द्विग्भास्करामनुमिताश्चशनौशशिद्वि नागादिशोभवदिवाकरसंमिताश्च ॥
दुष्टक्षणःकुलिककंटककालवेलाः स्युश्चार्धयामयमघंटगताःकलांशाः ॥३९॥

वा	र.	सो	म.	बु	गु	शु.	श.
	६	४	२	२	२	४	१
	७	६	४	४	६	५	२
	८	८	३	८	१२	६	८
मु	१०	९	६	९	१४	९	१०
	१४	१२	१०	१०	१५	१०	११
		१३		१४	१६	१२	१२
		१४				१४	

अर्थ—कोष्टकांत वारांखालीं ज्या संख्या लिहिल्या आहेत ते त्या त्या वारीं दुर्मुहूर्त, कुलिक, कंटक, कालवेला, यामार्ध आणि यमघंट या सहांपैकीं मुहूर्त आहेत असें जाणावें दिनमानाचे १६ भाग करून प्रत्येकाला मुहूर्त ह्मणावें. पुढील मुहूर्त त्या त्या वारीं सोडिले ह्मणजे वरील सहा प्रकारच्या अशुभ मुहूर्तांचा विचारकरण्याचें कारण नाहीं. सहाही त्यांत येऊन जातात.

होलिकाष्टकनिषेध. (अनुष्टुप्)

विपाशेरावतीतीरेशतुद्र्याश्चत्रिपुष्करे ॥ विवाहादिशुभेनेष्टंहोलिकाप्राग्दिनाष्टकम् ॥ ४०॥

अर्थ-विपाशा, इरावती, आणि शुतुद्री ह्या नद्यांच्या तिरांवरच्या देशांत आणि त्रिपुष्कर देशांत होलिकेच्या ह्मणजे फाल्गुनपूर्णिमेच्या पूर्वीं आठ ८ दिवस (फाल्गुन शुक्ल अष्टमीपासून पुर्णिमेपर्यंत) विवाहादि शुभ कार्यें करूं नये. वरच्याहून अन्य देशांत ह्या होलिकाष्टकाचा शुभाला निषेध नाहीं ह्मणून अन्य देशीं शुभकार्यें करावीं.

मृत्युयोगादिकांचा परिहार. (अनुष्टुप्)

मृत्युक्रकचदग्धादीनिंदौशस्तेशुभान्जगुः ॥ केचिद्यामोत्तरंचान्येयात्रायामेवनिंदितान् ४१

अर्थ—मागे सांगितलेले मृत्यु, क्रचक, दग्ध, विष आणि हुताशन हेयोग; (पुढें गोचर प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें) कल्योला चंद्र शुभकर असतां सोडूनये चंद्र शुभकर असल्यानें ते योगही शुभ होतात. कित्येक ग्रंथकार वरील योगांचा पहिला एक प्रहर अशूभ व पुढें सर्व शुभ असें ह्मणतात किती एक आचार्य वरील योग यात्रेला मात्र सोडावे असें सांगतात.

दुर्योगांचे आणखी अपवाद. (भुजंगप्रयात.)

अयोगेसुयोगोपिचेत्स्यात्तदानीमयोगंनिहत्यैषसिद्धिंतनोति ॥
परेलग्नशुद्ध्याकुयोगादिनाशंदिनार्धोत्तरंविष्टिपूर्वंचशस्तम् ॥ ४२ ॥

अर्थ--पूर्वीं सांगितलेले क्रकचादि दुर्योग असून सिद्धियोगादि शुभकर योग असतां ते दुर्योगांचा नाश करून कार्यसिद्धि करितात ह्मणून अशा कालीं शुभकार्य करण्याला हरकत नाहीं दुसरे कित्येक इष्ट लग्न चांगले शुद्ध असतां कुयोगांचा नाश होतो असें ह्मणतात. आणि भद्राव्यतीपात इत्यादि मध्यान्हानंतर शुभ असें ह्मणतात.

भद्राकरणाचा काळ. (शालिनी.)

शुक्लेपूर्वार्धेऽष्टमीपंचदश्योर्भद्रैकादश्यांचतुर्थ्यांपरार्धे ॥
कृष्णेंत्यार्धेस्यात्तृतीयादशम्योःपूर्वेभागेसप्तमीशंभुतिथ्योः ॥ ४३ ॥

अर्थ--सर्व महिन्यांच्या शुक्लपक्षांत अष्टमी व पूर्णिमा तिथींच्या पूर्वार्धीं, व एकादशी, चतुर्थी तिथींच्या उत्तरार्धीं भद्राकरण नियमानें असते तसेंच कृष्णपक्षांत तृतीया व दशमी तिथींच्या उत्तरार्धीं आणि सप्तमी व चतुर्दशी तिथींच्या पूर्वार्धीं भद्राकरण येतें मिळून प्रत्येक महिन्यांत आठ वेळ भद्रा येते. हिला विष्टि व कल्याणी असेंही ह्मणतात. महिन्यांतील आठ भद्रेचीं नांवें रत्नकोशांत सांगितलीं आहेत तीं--१ हंसी, २ नंदिनी ३ त्रिशिरा, ४ सुमुखी, ५ करालिका, ६ वैकृति, ७ रौद्रमुखी, ८ चतुर्मुखी. हीं अनुक्रमें जाणावीं. ह्या नांवांच्या अर्थाप्रमाणें भद्रेचें शुभत्व किंवा अशुभत्व मानावें.

भद्रेचें मुख आणि पुच्छ (शार्दुलविक्रीडित.)

पंचद्व्यद्रिकृताष्टरामरसभूयामादिघट्यःशरा ॥ विष्ट्यास्यमसत्गजेंदुरसरा
माश्व्यश्विबाणाब्धिषु ॥ यामेष्वंत्यघटीत्रयंशुभकरंपुच्छंतथावासरे ॥
विष्टिस्तिथ्यपरार्धजाशुभकरीरात्रौतुपूर्वार्धजा ॥ ४४ ॥

अर्थ--प्रत्येक महिन्यांत आठ वेळा येणारी भद्रा ज्या ज्या तिथींला येते ह्मणून मागें सांगितले त्या त्या तिथींच्या (ह्मणजे शुद्ध चतुर्थी, अष्टमी, एकादशी, पुर्णिमा, आणि कृष्णतृतीया सप्तमी, दशमी, व चतुर्दशी,ह्याच्या) ५।२।७।४।८।३।६।१ ह्या प्रहरांच्या आरंभी ५ पांच घटिका भद्रेचें मुख असतें हें अति अशुभ होय तसें त्याच तिथींच्या ८।१।६।३।७।२।५।४। ह्या प्रहरांच्या शेवटच्या तीन ३ घटिका भद्रेचे पुच्छ असते हें शुभ होय. अर्थात मुख व पुच्छ यांशिवाय इतर भद्रा मध्यम जाणावी पूर्वीं ज्या तिथींच्या उत्तरार्धीं भद्रा येते ह्मणून सांगितले आहे त्या तिथींला दिवसास आली तर ती शुभ होय तशीच पूर्वार्धीं येते ह्मणून सांगितलेली त्या तिथींला रात्रीस आली असताही शुभ जाणावी.

भद्रेचें स्थान. (अनुष्टुप्)

कुंभकर्कद्वयेमर्त्येस्वर्गेऽब्जेजात्त्रयेलिगे ॥ स्त्रीधनुर्जूकनक्रेधोभद्रातत्रैवतत्फलम् ॥ ४५ ॥

अर्थ--कुंभ व कर्क ह्यांपासून दोन दोन राशीला (ह्मणजे कुंभ, मीन,कर्क, सिंह.) ह्या चार राशीला चंद्र असतां मृत्यलोकीं भद्रा असते. मेष, वृषभ, मिथून आणि वृश्चिक ह्या चार राशीला चंद्र असतां स्वर्गालोकी असते. आणि कन्या , धन, तूळ मकर ह्या चार राशीला चंद्र असतां पाताळी भद्रा असते. ज्या लोकी भद्रा असेल त्यालोकी तिचे फळ मानावें. अन्यत्र फळ नाहीं

दुष्टकालीं न करण्याची कृत्यें. (शार्दूलविक्रीडित.)

वाप्यारामतडागकूपभवनारंभप्रतिष्ठेव्रतारंभोत्सर्गवधूप्रवेशनमहादानानिसोमा
ष्टके ॥ गोदानाग्रयणप्रपाप्रथमकोपाकर्मवेदव्रतंनीलोद्वाहमथातिपन्नशिशुसं-
स्कारान्सुरस्थापनम्॥४६॥दीक्षामौंजिविवाहमुंडनमपूर्वंदेवतीर्थेक्षणंसंन्यासा-

ग्निपरिग्रहौनृपतिसंदर्शाभिषेकौगमम् ॥ चातुर्मास्यसमावृतिश्रवणयोर्वेधंपरी-
क्षांत्यजेद्वृद्धत्वास्तशिशुत्वइज्यसितयोर्न्यूनाधिमासेतथा ॥ ४७ ॥

अर्थ--वापी, आराम (बाग,) तडाग, कूप गृह ह्यांच आरंभ व प्रतिष्ठा (गृहाची प्रतिष्ठा ह्मणजे प्रवेश) सर्व व्रतांचा आरंभ आणि उद्यापन, वधूप्रवेश, पोडशमहादानें, सोमयाग, अष्टकाश्राद्धे, गोदान (केशान्त) आग्रयण (नवान्नभक्षण) प्रपा (पाणपोई) प्रथम करावयाची श्रावणी, वेदव्रतें, (महानाम्नीव्रत, उपनिषद्व्रत आणि वेदव्रत ही तीन). नीलोद्वाह (काम्यवृपोत्सर्ग) जातकर्मादि अंतरित संस्कार, देवप्रतिष्ठा, दीक्षा (मंत्राची किंवा देवतेची) उपनयन, विवाह चौल, न पाहिलेल्या देवाचे व तीर्थाचें दर्शन, संन्यास, अग्निपरिग्रह, (अग्निहोत्र) राजदर्शन, राज्याभीपेक, गमन (यात्रा) चातुर्मास्य (अग्निहोत्रसंबंधीएकविधि) समावर्तन (सोडमुंज) कर्णवेध (कानटोचणें) परीक्षा (दिव्य अगर शपथ) इतकी कर्मे; गुरु व शुक्र ह्याच्या वृद्धत्वांत अस्तांत, आणिबाल्यत्वात करूंनये. तशीच क्षयमासांत व अधिक मासांतही करूं नये.

सिंहस्थादि गुरुचा दोष. (शालिनी.)

अस्तेवर्ज्यंसिंहनक्रस्थजीवेवर्ज्यंकेचिद्वक्रगेचातिचारे ॥
गुर्वादित्येविश्वघस्रेपिपक्षेप्रोचुस्तद्वद्दंतरत्नादिभूषाम् ॥ ४८ ॥

अर्थ--पूर्वी गुरूच्या अस्तामध्यें जी कर्मे वर्ज्य सांगितलीं ती कर्मे सिंहाला व मकराला गुरु असतां वर्ज्य करावी गुरु वक्र झाला असतां व अतिचर झाला असतांही वर्ज्य करावी. तशीच गुर्वादित्य ह्मणजे गुरु ज्या राशीला असेल त्या राशीला सूर्य असतां आणि तेरा दिवसांचा पक्ष ह्मणजे पंधरवडा असता सर्व कर्मे वर्ज्य होत. आणि या निषिद्ध कालीं हस्तिदंत, रत्नें, सोने इत्यादिकांचे अलंकार धारण करूं नयेत.

सिंहस्थ गुरूचे तीन अपवाद. (इंद्रवज्रा)

सिंहेगुरौसिंहलवेविवाहोनेष्टोथगोदोत्तरतश्चयावत् ॥
भागीरथीयाम्यतटेहिदोषोनान्यत्रदेशेतपनेपिमेषे ॥ ४९ ॥

अर्थ--गुरु सिंह राशीला असून सिंह नवांशाला असतांना मात्र विवाह करूं नये. सिंहावांचून इतर नवांशी गुरु असतां विवाहाला निषेध नाहीं (हा एक अपवाद) गोदावरी नदीच्या उत्तरे कडील तीरापासून भागीरथीच्या दक्षिण तीरापर्यंतच्या मधल्या सर्व देशांत (ह्या दोन नद्यांच्या मधील देशांत) सिंहस्थ गुरुचा शुभ कार्याला दोष आहे. अन्य देशांत नाहीं, (हा दुसरा अपवाद) सिंहस्थांत सूर्य मेषाला असतां दोष नाहीं. (हा तिसरा अपवाद.)

पूर्वी सांगितलेल्या सिंहस्थ गुरूच्या विधिनिषेधांचा निर्णय. (अनुष्टुप्.)

माघादिपंचपादेषुगुरुःसर्वत्रनिंदितः ॥ गंगागोदांतरंहित्वाशेषांघ्रिषुनदोषकृत् ॥ ५० ॥
मेषेर्केसत्रतोद्वाहौगंगागोदांतरेपिच ॥ सर्वःसिंहगुरुर्वर्ज्यःकलिंगेगौडगुर्जरे ॥ ५१ ॥

अर्थ--सिंहस्थ गुरु, मघानक्षत्राच्या पहिल्या चरणापासून पांच चरणांला असतां ' मघांचे ४ व पूर्वाचा १ मिळून ५) तो सर्व देशीं वर्ज्य होय. ह्या पांच चरणांच्या पुढें गेल्यावर गंगागोदेच्या मधील देशांशिवाय अन्य देशीं दोष नाहीं; परंतु मेषाला सूर्य असतां गंगागोदेच्या मधील देशींही उपनयन आणि विवाह शुभ होत. कलिंग, गौड व गुर्जर ह्या देशांत मात्र सर्व सिंहराशीचा गुरु वर्ज्य होय.

मकरस्थ गुरूचा परिहार. (शालिनी.)

रेवापूर्वेगंडकीपश्चिमेचशोणस्योदग्दक्षिणेनीचइज्यः ॥
वर्ज्योनायंकौंकणेमागधेचगौडेसिंधौवर्जनीयःशुभेषु ॥ ५२ ॥

अर्थ–रेवानदीच्या पूर्वेस, गंडकीच्या पश्चिमेस आणि शोण नदाच्या उत्तरेस व दक्षिणेस नीचींचा ह्मणजे

मकराचा गुरु शुभकार्यीं वर्ज्य नाहीं. परंतु हा मकरस्थ गुरु, कोंकण, मागध, गौड, व सिंधु, ह्या देशामध्यें शुभकार्यीं वर्ज्य करावा. (अर्थात् वरील देशांहून इतर देशांत मकरस्थ गुरु शुभाला मध्यम जाणावा.)

लुप्तसंवत्सराचा दोष व त्याचा अपवाद. (वंशस्थ.)

गोजांत्यकुंभेतरभेतिचारगोनोपूर्वराशिंगुरुरेतिवक्रितः ॥
तदाविलुप्ताब्दइहातिनिंदितःशुभेपुरेवासुरनिम्नगांतरे ॥ ५३ ॥

अर्थ--मेष, वृषभ, मीन, आणि कुंभ ह्या चार राशीं वांचून बाकीच्या आठांतून कोणत्याही राशीला असणारा गुरु, अतिचर होऊन पुढच्या राशीला गेल्यावर वक्र झाला तरी पूर्वीच्या राशीला येत नाहीं, अशा स्थितीला लुप्तसंवत्सर ह्मणतात. हा शुभ कार्याला अशुभ होय. आणि नर्मदा व भागीरथी ह्यांच्यामध्यें तर फारच निंद्य जाणावा.

वारप्रवृत्ति. (उपजाति.)

पादोनरेखापरपूर्वयोजनैःपलैर्युतोनास्तिथयोदिनार्धतः ॥
ऊनाधिकास्तद्विवरोद्भवैःपलैरुर्ध्वंतथाधोदिनपप्रवेशनम् ॥ ५४ ॥

अर्थ--ज्या स्थळी वारप्रवृत्ति केव्हां होते हें पाहणें असेल त्या स्थळापर्यंतचे मध्यरेषे पासून योजनात्मक अंतर घ्यावें. मग ती योजनें पादोन करावी. (योजनाला ४ नी भागून आलेला भागाकार त्याच योजनांत वजा केला ह्मणजे पादोन होतात.) आणि ही पळे असें समजून ती आपले स्थळ मध्य रेषेच्या पश्चिमेस असतां १५ घटिकेत मिळवावी, व पूर्वेस असतां वजा करावी ज्यादिवशीं वारप्रवृत्ति पाहणें असेल त्या दिवसाचे दिनमान घेऊन त्याचे अर्ध करावे. हें अर्ध आणि पूर्वींची घटिका पळें ह्याचे अंतर काढावें. दिनार्धाहून पूर्वींची घटिकापळें कमी असतां आलेल्या अंतरा इतक्या घटिका पळांनीं सूर्योदयानंतर वारप्रवृत्ति होईल व अधिक असतां अंतरा इतक्या घटिका पळांनीं सूर्योदयापूर्वीं वारप्रवृत्ति होईल असें समजावें उदाहरण.--कोणी एक स्थळ मध्य रेषेच्या पूर्वेस असून त्याचे ६३ योजनें अंतर आहे असे मानिलें, अंतर ६३ योजनें ह्यांला ४ नी भागून भागाकार १५। ४५। हा ६३ तून वजा केल्यानें ४७। १५। हीं पादोन योजनें ह्मणून पळें होत. स्थलरेषेच्या पूर्वेस ह्मणून हीं ४७ पळें १५ घटिकांतून वजा केलीं तेव्हां बाकी घटिका १४ पळें १३ ह्या दिवशीं दिनमान बरोबर ३३ घटिका. ह्याचें अर्धें घटिका १६ पळें ३० ह्याचें व पूर्वींच्या घटिका १४ पळें १३ ह्या दोहोचें अंतर घटिका २ पळें १७ आतां पूर्वींच्या घटिपळांपेक्षां दिनार्ध अधिक आहे म्हणून त्यांचें अंतर घटिका २ पळें १७ इतक्या वेळानें सूर्योदयानंतर वारप्रवृत्ति होईल; परंतु दिनार्ध घटिका १३ पळें ५० जर असतें तर पूर्वींच्या घटिका १४ पळें १३ ह्यांचें अंतर घटिका ० पळें २३ आलें असतें व पूर्वींच्या घटीपळाहून दिनार्ध कमी आहे ह्मणून त्याच दिवशीं २३ पळें सूर्योदया पूर्वीं वारप्रवृत्ति झाली असती.

कालहोरा. (अनुष्टुप्.)

वारादेर्घटिकाद्विघ्नाःस्वाक्षस्तच्छेषवर्जिताः।सैकास्तष्टानगैःकालहोरेशादिनपात्क्रमात्५५

अर्थ--पूर्वींच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें वारप्रवृत्ति आणून त्यावेळेपासून आपल्या इष्ट वेळेपर्यंत घटिका पळें आणावी. नंतर त्यांची दुप्पट करून तिला ५ नीं भागून जी बाकी राहील ती पूर्वींच्यादुपटींतून वजा करावी. मग तींत एक मिळवून ७ नीं भागावे बाकी राहील तीवरून होरेश समजावें. ज्या ग्रहाचा वार त्याची पहिली होरा. ह्याठिकाणीं रवि, चंद्र, मंगळ इ० वाराप्रमाणेंच ग्रह मोजावें उदाहरणः--रविवारी वारप्रवृत्तिपासून इष्टवेळेपर्यंत ६ घटिका आहेत असे मानूं. ह्यांची दुप्पट १२ त्याला ५ नीं भागून बाकी २ हे दुप्पट ११ ह्यांतून वजा केल्यानें बाकी १० त्यांत १ एक मिळविल्यानें ११ त्यांला ७ नीं भागूनबाकी ४ राहिले ह्मणून इष्ट वेळेस चौथ्या ग्रहाची होरा आहे. त्या दिवशीं रविवार म्हणून त्यापासून चौथा बुध ह्यां करितां इष्टवेळ बुधाची काल होरा आहे.

कालहोरेचा उपयोग. (शालिनी)

वारेप्रोक्तंकालहोरासुतस्यधिष्ण्येप्रोक्तंस्वामितिथ्यंशकेस्य ॥
कुर्यादिक्शूलादिचिंत्यंक्षणेषुनैवोल्लंघ्यःपारिघश्चापिदंडः ॥ ५६ ॥

अर्थ-- ज्या ग्रहांच्या वारीं जें कर्म करण्यास सांगितलें असेल तें कर्म (अवश्य करणें असतां) त्या ग्रहाच्या कालहोरेवरही करावें. तसेच ज्या नक्षत्रीं जें कर्मसांगितलें तें त्या नक्षत्रस्वामीच्या मुहूर्तावर करावें. (हे मुहूर्त स्वामी पुढें विवाहप्रकरणांत आहेत.) अशा मुहूर्तांवर दिक्शूल, वारशूल, नक्षत्रशूल ह्यांचा विचार करावा. आणि ह्यांवर परिघदंडाचेंही उल्लंघन करूं नये (ही दिक्शूलादि यात्रा प्रकरणांत येतील.)

मन्वादि व युगादि तिथी (शार्दूलविक्रीडित.)

मन्वाद्यास्तितिथीमधौतिथीशविऊर्जेशुचौदिक्तिथी ॥ ज्येष्ठेंत्येचतिथिस्त्वषेनवत पस्यश्वाःसहस्येशिवा ॥ भाद्रेग्निश्वेसितेत्वमाष्टनभसःकृष्णेयुगाद्यासितेः ॥ गोमी वाहुलराधयोर्मदनदर्शौभाद्रमाघासिते ॥ ५७ ॥

अर्थ--चैत्रशुक्ल ३।१५ कार्तिकशुक्ल १५।१२ आषाढशुक्ल १०।१५ ज्येष्ठ व फाल्गुन ह्या दोहोंची शुक्ल १५ आश्विनशुक्ल ९ माघशुक्ल ७ पौषशुक्ल ११ भाद्रपदशुक्ल ३ श्रावणकृष्ण ३०, ८ ह्या तिथि मन्वादि होत. आणि कार्तिकशुक्ल ९ वैशाखशुक्ल ३ भाद्रपदकृष्ण १३ माघकृष्ण ३० ह्या चार तिथि युगादि होत.

॥ इतिशुभाशुभप्रकरणम् ॥

अथ नक्षत्रप्रकरणम्

नक्षत्रांचे स्वामी (शार्दूलविक्रीडित.)

नासत्यांतकवन्हिधातृशशभृद्रुद्रादितीज्योरगा ऋक्षेशाःपितरोभगोर्यमरवित्वष्ट्रा शुगाश्वक्रमात् ॥ शक्राग्नीखलुमित्रशक्रनिर्ऋतिक्षीराणिविश्वेविधिर्गोविंदोवसुतो यपाजचरणाहिर्बुध्न्यपूषाभिधाः ॥ १ ॥

अर्थ--पुढें लिहिलेले नक्षत्रांचे स्वामी समजावें. जसें आश्विनी नासत्य. भरणीचा यम. कृत्तिकेचा अग्नी. रोहिणी धाता. मृगाचा चंद्र. आर्द्राचा रुद्र. पुनर्वसुचा, अदिति. पुष्याचा गुरु. आश्लेषाचा सर्प. मघाचा पितर. पूर्वाचा भग. उत्तराचा अर्यमा. हस्त रवि, चित्राचा त्वष्टा. स्वातीचा वायु. विशाखाचा इंद्राग्नि. अनुराधाचा मित्र, ज्येष्टाचा इंद्र. मूळाचा. राक्षस, पूर्वाषाढाचाजल. उत्तराषाढाचा विश्वेदेव. अभिजित्चा विधि, श्रवणाचा विष्णु, धनिष्टाचा वसु, शततारकाचा वरुण. पूर्वाभाद्रपदाचा अजचरण. उत्तराभाद्रपदाचा अहिर्बुध्न्य. रेवतीचा पूषा, याप्रमाणें स्वामी जाणावें.

ध्रुव, स्थिर, संज्ञक नक्षत्रें व त्यावरील साधारण कृत्यें.

उत्तरात्रयरोहिण्योभास्करश्चध्रुवंस्थिरम् ॥ तत्रस्थिरंबीजगेहशांत्यारामादिसिद्धये ॥ २ ॥

अर्थ--उत्तराफाल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा व रोहिणी हीं चार नक्षत्रें आणि सूर्य ह्याला ध्रुव आणि स्थिर अशा दोन संज्ञा आहेत. ह्यांवर स्थिर कर्में व बीज, गृह, शांति उपवन ह्याच्या संबंधाची कार्यें सिद्ध होतात. (पुढें मृदुनक्षत्रीं सांगितलेलींही ह्या ध्रुव संज्ञकांवर करावीं.)

चर, चल संज्ञक नक्षत्रें व त्यांवरील साधारण कृत्यें. (अनुष्टुप्.)

स्वात्यादित्येश्रुतेस्त्रीणिचंद्रश्चापिचरंचलम् ॥ तस्मिनगजादिकारोहोवाटिकागमनादिकम् ॥ ३ ॥

अर्थ--स्वाती पुनर्वसु, श्रवण, धनिष्टा, शततारका ही पांच नक्षत्रें व चंद्र ह्यांला चर व चल ह्या संज्ञा

आहेत झावर हत्ती, घोडा इत्यादि वाहनांवर बसणें आणि उपवनांत (बागेंत) जाणें हीं कर्मे करावी. (झावर लघु नक्षत्रांचींही कर्मे सिद्ध होतात.)

उग्र, क्रूर संज्ञक नक्षत्रें व त्यावरील साधारण कृत्यें (अनुष्टुप्)

पूर्वात्रयंयाम्यमघेउग्रंक्रूरंकुजस्तथा ॥ तस्मिन्घाताग्निशाठ्यानिविषशस्त्रादिसिध्यति ॥ ४ ॥

अर्थ – पूर्वाफल्गुनी, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, भरणी, मघा हीं पांच नक्षत्रें व मंगळ ह्याला उग्र आणि क्रूर ह्या संज्ञा आहेत ह्यांवर घात, अग्निदाह, शाठ्य, विष, शस्त्र ह्यांच्या संबंधीं कार्यें करावीं. (ह्यांवर दारुण नक्षत्रांचीं कर्मे सिद्ध होतात.)

मिश्र, साधारण संज्ञक नक्षत्रें व त्यांवरील साधारण कृत्यें (अनुष्टुप)

विशाखाग्नेयभेसौम्योमिश्रंसाधारणंस्मृतम् ॥ तत्राग्निकार्यंमिश्रंचवृषोत्सर्गादिसिद्धये ॥५॥

अर्थ--विशाखा व कृत्तिका हीं दोन नक्षत्रें व बुध ह्याला मिश्र व साधारण ह्या संज्ञा आहेत. ह्यांवर अग्निहोत्र, मिश्रकर्मे, काम्यवृषोत्सर्ग हीं कर्मे करावीं. (ह्यावर उग्र नक्षत्रांचीं कर्मे सिद्ध होतात.)

लघु, क्षिप्र संज्ञक नक्षत्रें व त्यांवरील साधारण कृत्यें. (अनुष्टुप्)

हस्ताश्विपुष्याभिजितःक्षिप्रंलघुगुरुस्तथा॥तस्मिन्पण्यरतिज्ञानंभूषाशिल्पकलादिकम् ॥६ ॥

अर्थ--हस्त, आश्विनी, पुष्य, अभिजित् हीं चार नक्षत्रें व गुरु ह्याला लघु व क्षिप्र ह्या संज्ञा आहेत. ह्यांवर विकण्याच्या वस्तूंची देवघेव, स्त्री संभोग, शास्त्रांचें ज्ञान, अलंकार, शिल्प म्हणजे चित्रें काढणे इत्यादि व कलांचें ज्ञान हीं करावीं (ह्यांवर चर नक्षत्रांचीं कर्मे सिद्ध होतात.)

मृदु, मैत्र संज्ञक नक्षत्रें व त्यांवरील साधारण कृत्यें. (अनुष्टुप्)

मृगांत्यचित्रामित्रर्क्षंमृदुमैत्रंभृगुस्तथा ॥ तत्रगीतांबरक्रीडामित्रकार्यंविभूषणम् ॥ ७ ॥

अर्थ– मृगशीर्ष, रेवती, चित्रा, अनुराधा, हीं चार नक्षत्रें व शुक्र ह्याला मृदु आणि मैत्र ह्या संज्ञा आहेत. ह्यांवर गायन, वस्त्र, क्रीडा (स्त्रियांसह), मित्रांचें कार्य, अलंकार हीं करावीं.

तीक्ष्ण, दारुण संज्ञक नक्षत्रें व त्यांवरील साधारण कृत्यें. (अनुष्टुप्.)

मूलैंद्रार्द्राहिभंसौरिस्तीक्ष्णंदारुणसंज्ञकम् ॥ तत्राभिचारघातोग्रभेदाःपशुदमादिकम् ॥८॥

अर्थ--मूळ, ज्येष्ठा. आर्द्रा, आश्लेषा हीं चार नक्षत्रें व शनि ह्याला तीक्ष्ण आणि दारुण ह्या संज्ञा आहेत. ह्यांवर अभिचार म्हणजे जारण मारणादि कृत्यें घात, भयंकर कर्मे, भेद ह्मणजे जिवलग मित्रांमध्यें कलह लावून देणे, हत्ती, घोडा इ० पशूंला शिकविणें किंवा बंधन करणें हीं कर्मे करावीं.

अधोमुख, ऊर्ध्वमुख व तिर्यङ्मुख नक्षत्रें. (इंद्रवंशा.)

मूलाहिमिश्रोग्रमधोमुखंभवेदूर्ध्वास्यमार्द्रेज्यहरित्रयंध्रुवं ॥

तिर्यङ्मुखंमैत्रकरानिलादितिज्येष्ठाश्विनानीदृशकृत्यमेषुसत् ॥ ९ ॥

अर्थ--खालीं अधोमुख, ऊर्ध्वमुख आणि तिर्यङ्मुख नक्षत्रें लिहिलीं आहेत त्यावर त्या सारखींच कृत्यें करणें शुभ होय. (ह्मणजे अधोमुख नक्षत्रावर विहिर, तळें वगैरे खणणें, ऊर्ध्वमुखांवर घर, वाडा, देवालय वगैरे बांधणे, आणि तिर्यङ्मुखावर गाडी, रथ, नांगर वगैरे करणें.

अधोमुख नक्षत्रें–मूळ, आश्लेषा, कृत्तिका, विशाखा, पूर्वाफल्गुनी, पूर्वाषाढा पूर्वाभाद्रपदा, मघा, भरणी. ऊर्ध्वमुख नक्षत्रें--आर्द्रा, पुष्य, श्रवण, धनिष्ठा, शततारका, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, रोहिणी. तिर्यङ्मुख नक्षत्रें–मृग, रेवती, चित्रा, अनुराधा, हस्त, स्वाती, पुनर्वसु, ज्येष्ठा, अश्विनी.

प्रवालादि अलंकार धारणाचा मुहूर्त. (वसंततिलका.)

पौष्णध्रुवाश्विकरपंचकवासवेज्यादित्येप्रवालरदशंखसुवर्णवस्त्रम् ॥

धार्यंविरिक्तशनिचंद्रकुजेन्हिरक्तंमौंगेध्रुवादितियुगेसुभगानदध्यात ॥ १० ॥

अर्थ -रेवती, ध्रुवसंज्ञक नक्षत्रें (उत्तरा फ०, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, रोहिणी,) अश्विनी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, धनिष्ठा, पुष्य, पुनर्वसु ह्या नक्षत्रांवर, रिक्ततिथि व शनि, चंद्र, मंगळवार ह्यांवांचून इतर तिथिवारांचे दिवशीं पोंवळें, हस्तिदंत, शंख, व सोने ह्यांचे अलंकार व शुभ्र वस्त्र हीं धारण करावीं. तांबडें वगैरे रंगाचें वस्त्र मंगळवारीं ही धारण करावें. सौभाग्यवती स्त्रीनें ध्रुवसंज्ञक, पुनर्वसु, पुष्य ह्या नक्षत्रांवर पूर्वी सांगितलेले प्रवालादि अलंकार व वस्त्रें धारण करूं नये.

नव्या वस्त्राचीं इष्टानिष्ट फलें. (शार्दूलविक्रीडित.)

वस्त्राणांनवभागकेषुचचतुष्कोणेऽमराराक्षसामध्यत्र्यंशगतानरा
स्तुसदशेपाशेचमध्यांशयाः ॥ दग्धेवास्फुटितेंबरेनवतरेपंकादि-
लिप्तेनसद्रक्षोंशेनृसुरांशयोःशुभमसत्सर्वांशकेप्रांततः ॥ ११ ॥

अर्थ—वस्त्राचे ९ भाग मानावे आणि चारही कोनदेवांचे, मधले तीन भाग राक्षसांचे; आणि दशांसहित शेवटें व राहिले दोन अंश मनुष्यांचे समजावे. राक्षसांच्या भागांत नवें वस्त्र जळलें किंवा फाटलें, किंवा चिखल शेण इत्यादिकांनीं मळलें तर अशुभ जाणावें. परंतु मनुष्य किंवा देव ह्यांच्या अंशांत वरील प्रकार घडून आले तर शुभ फल समजावें. आणि राक्षस, देव, मनुष्य, यांच्या भागाच्या शेवटीं वरील प्रकार झाले तर अशुभच फल होय. (नव्या वस्त्राला अशुभ फल प्राप्त झालें असतां तें ब्राह्मणास दक्षिणेसहित देऊन दुसरें घ्यावें.

मुहूर्ताशिवाय वस्त्र धारणाचीं कारणें (अनुष्टुप्)

विप्राज्ञयातथोद्वाहेराज्ञाप्रीत्यार्पितंचयत् ॥ निंद्येपिधिष्ण्येवारादौवस्त्रंधार्यंजगुर्बुधाः १२

अर्थ—ब्राह्मणाची आज्ञा झाली असतां विवाहामध्यें, व राजानें प्रीतीनें दिलें असतां, अनुक्त नक्षत्रांवर व वारांवरही वस्त्र धारण करावें असें विद्वानांचें ह्मणणें आहे.

वृक्षारोपण, राजदर्शन, मद्यारंभ आणि गोक्रयविक्रय (शार्दूलविक्रीडित.)

राधामूलमृदुध्रुवर्क्षवरुणक्षिप्रैर्लतापादपारोपोथोनृपदर्शनं
ध्रुवमृदुक्षिप्रश्रवोवासवैः ॥ तीक्ष्णोग्रांबुपभेषुमद्यमुदितं
क्षिप्रांत्यवन्हींदुभादित्यैंद्रांबुपवासवेषुद्विगवांशस्तःक्रयोविक्रयः ॥ १३ ॥

अर्थ —विशाखा, मूळ, मृदु संज्ञक ४ (चित्रा, अनुराधा, मृग, रेवती) ध्रुवसंज्ञक. ४ (उत्तराफ० षा. उ. भा. रोहिणी) शततारका आणि क्षिप्र संज्ञक ४ (अश्विनी, हस्त, पुष्य, अभिजित्) ह्या १५ नक्षत्रांवर वेलीं व सर्व प्रकारचे वृक्ष लावावे, ध्रुव ४, मृदु ४, क्षिप्र ४, श्रवण, धनिष्ठा ह्या १४ नक्षत्रांवर राजदर्शन करावें. तीक्ष्ण ४ (मूळ आश्लेषा, ज्येष्ठा, आर्द्रा.) उग्र ५ (पू. फ, पू. षा., पू. भा; मघा; भरणी) व शततारका ह्या १० नक्षत्रीं मद्यारंभ करावा. क्षिप्र ४, रेवती, कृत्तिका, मृग, पुनर्वसु, ज्येष्ठा, शततारा, धनिष्ठा, ह्या ११ नक्षत्रांवर गाई, बैल, इ. जनावरें विकत घावी व द्यावीं.

पशु रक्षणादिकांचें मुहूर्त. (इंद्रवंशा.)

लग्नेशुभेचाष्टमशुद्धिसंयुतेरक्षापशूनांनिजयोनिभेचरे
रिक्ताष्टमीदर्शकुजश्रवोध्रुवत्वाष्ट्रेपुयानंस्थितिवेशनंनसत् ॥ १४ ॥

अर्थ—अष्टमस्थान शुद्ध ह्मणजे पाप व शुभग्रह रहित अशा शुभग्रहाचे लग्नीं, व ज्या पशूचें रक्षण करावयाचें असेल त्या योनीच्या नक्षत्रांवर व चर संज्ञक नक्षत्रांवर पशूंचें रक्षण शुभ होय. (नक्षत्रांच्या योनि विवाहप्रकरणांत आहेत.) रिक्तातिथि, अष्टमी, अमावास्या, मंगळवार, श्रवण, ध्रुव संज्ञक व चित्रा ह्यांवर पशूंला घरांतून बाहेर नेणें, व गोठ्यांत आणून बांधणें हीं दोन्हीं कामें अशुभ होत.

औषधाचा मुहूर्त व सूचीकर्मांचा (शिळाईचा) मुहूर्त. (मंदाक्रांता.)

भैषज्यंसल्लघुमृदुचरेमूलभेद्व्यंगलग्ने शुक्रेंद्विज्येविदिचदिवसेचापितेषांरवेश्च ॥ शु
द्धेरिःफद्युनमृतिगृहेसत्तिथौनोजनेर्भेसूचीकर्माप्यदितिवसुभेतक्षमैत्राश्विपुष्ये ॥१५॥

अर्थ--लघु ४ मृदु ४ चर ५ व मूळ ह्या १४ नक्षत्रांवर द्विस्वभाव लग्नें असून त्यांला शुक्र चंद्र, गुरु, बुध हे ग्रह असतां, आणि ह्याच चार ग्रहांच्या वारीं व रविवारीं नवीन औषध तयार करणें किंवा घेण्यास आरंभ करणें शुभ होय त्याला लग्नापासून १२।७।८ हीं स्थानें शुद्ध ह्मणजे पाप व शुभ ग्रह रहित असावीं तिथिही रिक्ता व अमावास्या रहित शुभ असाव्या. औषधारंभीं जन्म नक्षत्र असूं नये. पुनर्वसु, धनिष्ठा. चित्रा, अनुराधा, अश्विनी, पुष्य हीं ६ नक्षत्रें सूचीकर्माला शुभ होत.

क्रयविक्रय मुहूर्तांचा परस्पर विरोध व क्रयाचीं नक्षत्रें. (अनुष्टुप्)

क्रयर्क्षेविक्रयोनेष्टोविक्रयर्क्षेक्रयोपिन ॥ पौष्णांबुपाश्विनीवातश्रवश्चित्राक्रयेशुभाः ॥ १६॥

अर्थ--क्रयाच्या नक्षत्रांवर विक्रय करूं नये आणि विक्रयाच्या नक्षत्रांवर क्रय करूं नये. रेवती, शततारका, अश्विनी, स्वाती, श्रवण, चित्रा हीं ६ नक्षत्रें क्रयाला शुभ होत (किंमत देऊन कांहीं पदार्थ घेणें हा क्रय; आणि आपण किंमत घेऊन पदार्थ दुसऱ्याला देणें हा विक्रय होय क्रय किंवा विक्रय हे अन्य सापेक्ष आहेत. एक मनुष्य ज्या वेळीं क्रय करितो त्याच वेळीं दुसरा विक्रय करितो. ह्मणून क्रयाचा व विक्रयाचा मुहूर्त एकच असला पाहिजे खरा. परंतु क्रयाच्या मुहूर्ताहून विक्रयाचा मुहूर्त तर भिन्न असें ग्रंथकार सांगतो; याकरितां क्रय विक्रय करणारांत ज्याला गरज विशेष असेल त्याला मुहूर्ताचा विचार करितां येणार नाहींच, अर्थात् कमी गरजवाल्यानें मुहूर्ताचा विचार करावा ह्मणून क्रयाचा व विक्रयाचा असे दोन्हीं वेगळे मुहूर्त सांगितले आहेत त्यापैकीं इष्ट असेल तो घ्यावा)

विक्रयाचा मुहूर्त आणि दुकान घालण्याचा मुहूर्त. (शार्दूलविक्रीडित.)

पूर्वाद्वीशकृशानुसार्पयमभेकेंद्रद्विकोणेशुभैःषट्त्र्यायेष्वशुभैर्वि
नाघटतनुंसन्विक्रयःसत्तिथौ ॥ रिक्ताभौमघटान्विनाचविपणि
मैंत्रध्रुवाक्षिप्रभैर्लग्नेचंद्रासितेव्ययाष्टरहितैःपापैःशुभैर्द्व्यायखे ॥ १७ ॥

अर्थ—पूर्वाफ०, पूर्वापा०, पूर्वाभाद्र०, विशाखा, कृत्तिका आश्लेषा, भरणी ह्या ७ नक्षत्रांवर आणि केंद्र (१।४।७।१०) द्वितीयस्थान २ व कोण (९।५) ह्या स्थानीं शुभ ग्रह असतां तसेच ६।३।११ ह्यास्थानीं पापग्रह असतां. कुंभावांचून इतर लग्नीं व रिक्ता अमावास्या रहित शुभ तिथींवर सर्व वस्तूंचा विक्रय शुभ होय. रिक्ता तिथी, मंगळवार, कुंभलग्न ह्यावांचून मैत्र ४ ध्रुव ४ क्षिप्र ४, ह्या १२ नक्षत्रांवर नवीन दुकान घालणें शुभहोय. ह्याला लग्नीं चंद्र व शुक्र असावे. खलग्रह १२।८ ह्याशिवाय अन्य स्थानीं असावे व शुभग्रह २।११।१० ह्या स्थानीं असावे.

अश्व व हत्ती ह्याच्या संबंधीं कृत्यांचे मुहूर्त. (इंद्रवज्रा.)

क्षिप्रांत्यवास्विंदुमरुज्जलेशादित्येष्वरिक्तारदिनेप्रशस्तम् ॥
स्याद्वाजिकृत्यंत्वथहास्तिकार्यंकुर्यान्मृदुक्षिप्रचरेषुविद्वान् ॥ १८ ॥

अर्थ--क्षिप्र४, रेवती, धनिष्टा, मृगशीर्ष, स्वाती, शततारका, पुनर्वसु, ह्या १० नक्षत्रांवर रिक्ता तिथि मंगळवार ह्यांशिवाय अन्य तिथिवारांवर अश्व संबंधीं कृत्यें म्हणजे क्रयविक्रय, शिकविणें, अलंकार घालणें, बसणें इत्यादि सर्व करावी मृदु ४, क्षिप्र ४, चर ५ ह्या १३ नक्षत्रांवर (रिक्ता तिथि व मंगळवार सोडून) हत्ती संबंधी सर्वकृत्यें करावीं.

अलंकार (दागिने) घडविणें व शस्त्रांला धार काढणें. (शार्दूलविक्रीडित.)

स्याद्भूषाघटनंत्रिपुष्करचरक्षिप्रध्रुवेरत्नयुक्तीक्ष्णोग्रव्यहिनभेरविकुजभे गार्ग्यहितैर्नौ

तन्मुक्तासहितंचरध्रुवमृदुक्षिप्रेशुभेसत्तनौ । तीक्ष्णोग्राश्विमृगेंद्रिदैवदहनेशस्त्रंशुभंतद्घितम् १९

अर्थ.--त्रिपुष्करयोगावर (या प्रकरणांतील ४९ व्या श्लोकांत पहा) आणि चर ५ क्षिप्र ४ ध्रुव ४ ह्या १३ नक्षत्रांवर अलंकार घडवावे. ज्यांवर रत्नें बसवावयाची, असे अलंकार तीक्ष्ण ४, उग्र ५ ह्या ९ नक्षत्रांवांचून बाकी १८ नक्षत्रांवर घडवावे. अशा रत्नखचित भूषणांला रविवार, मंगळवार व मेष वृश्चिक, सिंह हीं लग्नें शुभ होत मोत्यांचे दागिने चर ५ ध्रुव ४ मृदु ४ क्षिप्र ४ ह्या १७ नक्षत्रीं करावे त्यांला वार व लग्नें शुभ असावीं. (म्हणजे सोमवार, शुक्रवार, आणि कर्क, वृषभ, तूळ हीं लग्नें) तीक्ष्ण ४ उग्र ५ अश्विनी, मृग, विशाखा, कृत्तिका हीं १३ नक्षत्रें शस्त्रांला धार काढण्याला शुभ होत.

नाणें पाडणें आणि वस्त्रें धुणें (स्रग्धरा.)

मुद्राणांपातनंसद्ध्रुवमृदुचरभक्षिप्रभैर्वींदुसौरेघस्त्रेपूर्णाजयाख्येनचगुरुभृगुनास्ते विलग्नेशुभैःस्यात् । वस्त्राणांक्षालनंसद्वसुहयदिनकृत्पंचकादित्यपुष्येनोरिक्ता प· र्वषष्ठीपितृदिनरविजज्ञेशुक्रार्यकदापि ॥ २० ॥

अर्थ.—ध्रुव ४ मृदु ४ चर ५ क्षिप्र ४, या १७ नक्षत्रांवर; सोम शनिवांचून इतर वारीं तसेंच पूर्णा व जया संज्ञक तिथींवर सोने, रुपें इत्यादि धातूचें नाणें पाडणें शुभ जाणावें. गुरु शुक्रांचें अस्त असू नये. लग्नीं शुभग्रह असावे. धनिष्ठा, अश्विनी, हस्त यापासून पांच पांच नक्षत्रें व पुनर्वसु, पुष्य मिळून १७ नक्षत्रांवर नवीं वस्त्रें धुवावीं (अगर धोब्याकडे द्यावीं) रिक्ता, पर्व, षष्ठी, अमावास्या ह्या तिथींवर व रविवारीं, बुधवारीं वस्त्र क्षालन कधींहीं करूं नये.

नूतन शस्त्रधारण आणि शय्यासनादिकांचा उपभोग. (स्रग्धरा.)

संधार्याःकुंतवर्मेष्वसनशरकृपाणासिपुत्र्योविरिक्तेशुक्रेज्याऽर्केन्हिमैत्रध्रुवलघुस· हितादित्यशाक्रद्विदैवे ॥ स्युर्लग्नेहिस्थिराख्येशशिनिचशुभदृष्टेशुभैःकेंद्रगैःस्या- द्भोगःशय्यासनादेर्ध्रुवमृदुलघुहर्यंतकादित्यइष्टः ॥ २१ ॥

अर्थ.–रिक्ता तिथि वर्ज्य करून अन्य तिथींवर व शुक्र, गुरु, रविवारीं आणि मैत्र ४ ध्रुव ४ लघु ४ पुनर्वसु ज्येष्ठा; विशाखा ह्या १५ नक्षत्रावर, स्थिरलग्नीं, चंद्रावर शुभ ग्रहांचीं दृष्टि असतां, तसेंच लग्नापासून शुभ ग्रह केंद्रस्थानीं (१ ४।७।१०) असतां कुंत, कवच (चिलखत) धनुष्य, बाण, तरवार, सुरी इत्यादि सर्व प्रकारची नवीं शस्त्रें वापरण्यास आरंभ करावा ध्रुव ४ मृदु ४ श्रवण, भरणी, पुनर्वसु ह्या १५ नक्षत्रांवर शय्या, माचा, पलंग, बाज इ०) आसन (पाट, कृष्णाजिन इ०) पादुका यांचा उपभोग करण्यास आरंभ करावा.

अंध, मंदाक्ष, मध्याक्ष आणि सुलोचन नक्षत्रें. (शार्दूलविक्रीडित)

अंधाक्षंवसुपुष्यधातृजलभाद्विशार्यमांत्याभिधंमंदाक्षंरविविश्वमैत्रजलपाश्लेषा· श्विचांद्रंभवेत् ॥ मध्याक्षंशिवपित्रजैकचरणत्वाष्ट्रेंद्रविधींतकं ॥ स्वक्षंस्वात्य दितिश्रवोदहनभाहिर्बुध्न्यरक्षोभगम् ॥२२ ॥

अर्थ.—खालीं लिहिलेलीं नक्षत्रें अंध, मंदाक्ष, मध्याक्ष आणि सुलोचन अशीं जाणावीं. रोहिणीपासून मोजल्यानें हीं स्पष्ट समजतात ह्मणजे रोहिणी अंध, मृग, मंदाक्ष, आर्द्रा मध्याक्ष, पुनर्वसु सुलोचन, पुन्हः पुष्य अंध इ० .) अंध नक्षत्रें.—धनिष्ठा, पुष्य, रोहिणी, पूर्वाषाढा विशाखा रेवती, उत्तराफ०, मंदाक्ष नक्षत्रें.—हस्त, उत्तराषाढा, अनुराधा शततारा, आश्लेषा, अश्विनी मृग. मध्याक्ष नक्षत्रें –आर्द्रा, मघा पूर्वाभाद्रपदा, चित्रा ,ज्येष्ठा, अभिजित, भरणी. सुलोचन नक्षत्रें -स्वाती, पुनर्वसु, श्रवण, कृत्तिका उत्तराभाद्रपदा मूळ, पूर्वाफल्गुनी.

अंधादि नक्षत्रांचीं फळें. (अनुष्टुप्.)

विनष्टार्थस्यलाभोंधेशीघ्रंमंदेप्रयत्नतः ॥ स्याद्दूरेश्रवणंमध्येश्रुतिर्नासीन्नसुलोचने ॥ २३ ॥

अर्थ.—अंध नक्षत्रांवर सांडलेलें द्रव्य किंवा कांहीं वस्तु त्वरित सांपडते. मंदाक्ष नक्षत्रीं सांडलेलें यत्नानें सांपडतें. मध्याक्ष नक्षत्रीं सांडलें असतां दूर गेल्याचें ऐकूं येतें ह्मणजे अमक्यानें नेलें असून अमुक ठिकाणीं आहे असा पत्ता लागतो. परंतु मिळण्याची आशा नाहीं असें समजावें. सुलोचन नक्षत्रीं सांडल्याचा पत्ताही लागत नाहीं मग सांपडण्याची आशा तर नाहींच नाहीं.

द्रव्य देण्याला निषिद्ध नक्षत्रें. (अनुष्टुप्.)

तीक्ष्णमिश्रध्रुवोग्रैर्यद्द्रव्यंदत्तंनिवेशितम् ॥ प्रयुक्तंचविनष्टंचविष्ट्यांपातेनचाप्यते ॥ २४ ॥

अर्थ—तीक्ष्ण ४ मिश्र २ ध्रुव ५ उग्र ५ ह्या १५ नक्षत्रांवर कोणाला द्रव्य उसनें दिलें असतां अगर खुणेनें पुरून ठेविलें असतां किंवा व्याजाकरितां दिलें असतां अथवा आपल्याकडून सांडलें असतां तें परत मिळत नाहीं. तसेंच भद्राकरणावर, व्यतिपातावर व महापातावर (आणि ग्रहणांतहीं) आपल्याकडून कोणत्याहि प्रकारें गेलेलें द्रव्य परत मिळत नाहीं. (ह्या १५ नक्षत्रांतहीं मागच्या श्लोकांतील अंधादि नक्षत्रांचा विचार करून कदाचित् सांपडण्याची कल्पना करावी.)

जलाशय खणणें व नृत्यारंभ. (शार्दूलविक्रीडित.)

मित्रार्कध्रुववासवांबुपमघातोयांत्यपुष्येंदुभिः ॥ पापैर्हीनबलैस्तनौसुरगुरौज्ञेवा-
भृगौखेविधौ ॥ आप्येसर्वजलाशयस्यखननंव्यंभोमघैःसेंद्रभैः ॥ स्तैर्नृत्यंहिबुके
शुभैस्तनुगृहेज्ञेज्ञराशौशुभं ॥ २५ ॥

अर्थ—अनुराधा, हस्त, ध्रुव ४ धनिष्ठा, शततारा, मघा, पूर्वाषाढा, रेवती, पुष्य, मृगशीर्ष ह्या १३ नक्षत्रीं, आणि खलग्रह बलहीन असतां व लग्नीं गुरु किंवा बुध असतां, तसाच शुक्र दशमस्थानीं असतां व चंद्र जलराशीला असतां सर्व जलाशय ह्मणजे वापी, कूप, तडाग इ० खणण्यास आरंभ करणें शुभ होय. वरच्या १३ नक्षत्रांपैकीं पूर्वाषाढा व मघा हीं दोन वर्ज करून आणि ज्येष्ठा घेऊन होणाऱ्या त्याच १२ नक्षत्रांवर नृत्यारंभ करावा. त्याला चतुर्थस्थानीं शुभग्रह, लग्नीं बुध आणि बुधाच्या राशीला (मिथुन, कन्या) चंद्र असे ग्रह असावे.

सेवेचा (नोकरीचा) मुहूर्त. (शालिनी.)

क्षिप्रेमैत्रेवित्सितार्केज्यवारेसौम्येलग्नेर्केकुजेवाखलाभे ॥
योनेर्मैत्र्याराशिपोश्चापिमैत्र्यांसेवाकार्यास्वामिनःसेवकेन ॥ २६ ॥

अर्थ—क्षिप्र ४ मैत्र ४ ह्या ८ नक्षत्रांवर, आणि बुध, शुक्र, रवि, गुरु ह्या ४ वारीं, व शुभग्रह लग्नीं असतां, रवि किंवा मंगळ लग्नापासून १० । ११ स्थानीं असतां धन्याची सेवा करण्याला आरंभ करावा. राजाची किंवा ज्या धन्याची सेवा करावयाची त्याच्या व सेवकाच्या जन्म नक्षत्रांच्या योनींची आणि जन्मराशींच्या अधिपतींची मैत्री असली पाहिजे (ह्मणजे सेव्य सेवक भाव चिरकाळ टिकतो. योनिमैत्री व राशीस्वामींची मैत्री विवाहप्रकरणांत पहावी).

द्रव्य प्रयोग व ऋणग्रहण. (शार्दूलविक्रीडित)

स्वात्यादित्यमृदुद्विदैवगुरुभेकर्णत्रयाश्वेचरोलग्ने धर्मसुताष्टशुद्धिसहितेद्रव्यप्रयो-
गःशुभः ॥ नारेग्राह्यमृणंतुसंक्रमदिनेवृद्धौकरर्केन्हियत्तद्वंशेषुभवेद्दणंनचबुधेदे-
यंकदाचिद्धनम् ॥ २७ ॥

अर्थ—स्वाती, पुनर्वसु, मृदु ४, विशाखा, पुष्य, श्रवण, धनिष्ठा, शततारा, अश्विनी ह्या १२ नक्षत्रांवर, चरलग्नीं, व लग्नापासून ९।५।८ हीं स्थानें शुद्ध असतां (ह्मणजे ९।५ स्थानीं पापग्रह आणि अष्टमस्थानीं खल व शुभ ग्रह नसतां) द्रव्य प्रयोग ह्मणजे दुसऱ्याला कर्ज देणें शुभ होय. मंगळवारीं कर्ज काढूं नये

संक्रांतीच्या दिवशीं वृद्धि योगावर, हस्त नक्षत्रीं आणि रविवारीं कर्ज काढिलें असतां तें वंशपरंपरेनेंही फिटत नाहीं. बुधवारीं ऋण देऊं नये.

हलप्रवहणाचा (नांगरण्याचा) मुहूर्त. (शार्दूलविक्रीडित)

मूलद्वीशमघाचरध्रुवमृदुक्षिप्रैर्विनार्कार्किभिर्वारैःपापविहीनकेन्द्रनवलैर्वधौ जलक्षलवेशुक्रेविधौभा- सके ॥ लग्नेदेवगुरौहलप्रवहणंशस्तंनसिंहघटेकर्काजैणघटेतनौक्षयकरंरिक्तासु- षष्ठ्यांतथा ॥ २८ ॥

अर्थ--मूल, विशाखा, मघा, चर ५ ध्रुव ४ मृदु ४ क्षिप्र ४ ह्या २० नक्षत्रांवर, आणि रवि शनि यांचून अन्यवारीं, पापग्रह निर्बळ असतां चंद्र जल राशीला व जलचर नवांशीं असतां आणि शुक्र व चंद्र उदित असतां, व गुरु लग्नीं असतां हल प्रवहणारंभ ह्मणजे नांगरण्याला प्रथम आरंभ करणें शुभ होय. ह्याला सिंह आणि कुंभ लग्नें असूं नयेत. तशींच कर्क, मेष, मकर, तूळ हीं लग्नें; रिक्ता, व षष्ठी, (आणि अष्टमी) ह्या तिथि अशुभ होत. कारण ह्यांवर आरंभ केला असतां धान्य क्षय पावतें.

बीं पेरण्याचा मुहूर्त, फणिचक्र व हलचक्र. (शार्दूलविक्रीडित.)

एतेषुश्रुतिवारुणादितिविशाखोडूनिभौमंविनावीजोप्तिर्गदिताशुभात्वशुभतोष्टा- ग्नींदुरामेंदवः ॥ रामेन्द्विग्नियुगान्यसच्छुभकराण्युग्रौहलेकोंज्झिताङ्काद्रामाष्टनवाष्ट मानिमुनिभिःप्रोक्तान्यसत्संतिच ॥ २९ ॥

अर्थ--मागच्या श्लोकांत २० नक्षत्रें सांगितलीं त्यांतून श्रवण, शततारा, पुनर्वसु, विशाखा हीं ४ नक्षत्रें वर्ज्य करून व मंगळवार वर्ज्य करून राहिल्या हल प्रवहणाच्या दिवशीं सर्व प्रकारचें बीं पेरणें शुभ जाणावें. बीजोप्तीचें फणिचक्रः--राहु ज्या नक्षत्राला असेल त्यापासून पहिलीं ८ अशुभ, त्यापुढें ३ शुभ, १ अशुभ ३ शुभ, १ अशुभ, ३ शुभ, १ अशुभ ३ शुभ, ४ अशुभ अशीं अनुक्रमें जाणावीं. वर सांगितलेलीं बीं पेरण्याचीं नक्षत्रें ह्या फणि चक्रांतील शुभ नक्षत्रीं असलीं ह्मणजे फणिचक्र आहे असें समजावें.

हल प्रवहणाचें हलचक्र--सूर्य ज्या नक्षत्रास असेल त्याच्या मागच्या नक्षत्रापासून (जसा कृत्तिकेस असतां भरणीपासून) पहिलीं ३ अशुभ, पुढचीं ८ शुभ, ९ अशुभ, ८ शुभ अशीं जाणावीं. हें हलचक्र मागच्या श्लोकांतील नांगरण्याच्या नक्षत्रांस पहावें.

शिरांतून रक्त काढणें, रेचकादि घेणें, व धर्मकार्यें यांचे मुहूर्त. (शार्दूलविक्रीडित.)

त्वाष्ट्राग्निमित्रकभाद्व्येंदुपलघुश्रोत्रेशिरामोक्षणं भौमार्केज्यदिनेत्रिरेकवमनाद्यं स्याद्बुधार्कीविना ॥ मित्रक्षिप्रचरध्रुवेरविशुभाहेलग्नवर्गेविदोजीवस्यापितनौगु रौनिगदिताधर्मक्रियातद्बले ॥ ३० ॥

अर्थ--चित्रा, स्वाती, अनुराधा, ज्येष्ठा, रोहिणी, मृग, शततारा, लघु ४ आणि श्रवण ह्या १२ नक्षत्रांवर व मंगळ, रवि, गुरुवारीं रक्तवाहिनी शिरा तोडून रक्त काढून टाकणें शुभ जाणावें. पूर्वींच्याच चित्रादि १२ नक्षत्रीं, व बुध शनि सोडून अन्यवारीं रेचक घेणें आणि वांतीचें औषध घेणें शुभ होय. अनुराधा, क्षिप्र; ४ चर ५ ध्रुव ४ ह्या १४ नक्षत्रांवर आणि रविवारीं, व शुभ ग्रहांच्या वारीं, (सोम, बुध, गुरु, शुक्रवारीं) बुध व गुरु ह्यांच्या लग्नीं आणि षड्वर्गीं; तसाच गुरु इष्ट लग्नीं असतां व कर्त्याला गुरुबळ असतां धर्मकार्यें ह्मणजे कोटि होम, रुद्रानुष्ठान इत्यादि करावीं.

धान्यच्छेदन मुहूर्त (वसंततिलका.)

तीक्ष्णाजपादकरवन्हिवसुश्रुतींदुस्वातीमघोत्तरजलांतकतक्षपुष्ये ॥ मंदाररिक्तरहितेदिवसेतिशस्ताधान्यच्छिदानिगदितास्थिरभेविलग्ने ॥ ३१ ॥

अर्थ --तीक्ष्ण ४ पूर्वाभाद्रपदा, हस्त कृत्तिका, धनिष्ठा, श्रवण, मृग, स्वाती, मघा, उत्तरा ३, पूर्वा

षाढा, भरणी, चित्रा पुष्य ह्या १९ नक्षत्रांवर, व शनि मंगळवार आणि रिक्ता तिथि ह्या वांचून अन्य वार तिथींवर आणि स्थिरलग्नीं धान्यछेदन ह्मणजे सर्व प्रकारच्या धान्यांचीं शेतें कापणें प्रशस्त जाणावें.

कणमर्दन, व सस्यारोपण. (वसंततिलका.)

भाग्यार्यमश्रुतीमघेंद्रविधातृमूलमैत्रांत्यभेषुकथितंकणमर्दनंसत् ॥
द्वीशाजपान्निर्ऋतिधातृशतार्यमक्षैसस्यस्यरोपणमिहाकिंकुजौविनासत् ॥ ३२ ॥

अर्थ–पूर्वाफल्गुनी, उत्तराफ०, श्रवण, मघा, ज्येष्ठा, रोहिणी, मूळ, अनुराधा, रेवती हीं ९ नक्षत्रें कणमर्दनाला ह्म० सर्व धान्यांच्या मळणीला शुभ जाणावी. विशाखा, पूर्वाभाद्रपदा, मूळ रोहिणी, शततारा उत्तराफल्गुनी ह्या ६ नक्षत्रांवर, व शनि मंगळावांचून अन्यवारीं सस्यारोपण ह्मणजे एका ठिकाणीं पेरलेलें धान्य दुसरीकडे नेऊन लावणें शुभ होय, (कोंकणच्या प्रांतीं ह्याला "तरवा लावणें" असें ह्मणतात.

धान्यस्थिति व धान्यवृद्धि यांचे मुहूर्त. (वसंततिलका.)

मिश्रोग्ररौद्रभुजगेंद्रविभिन्नभेषुकर्काजतौलिरहितेचशनौशुभाहे ॥
धान्यस्थितिःशुभकरीगदिताध्रुवेज्यद्वीशेंद्रदस्रचरभेषुचधान्यवृद्धिः ॥ ३३ ॥

अर्थ––मिश्र २, उग्र ५, आर्द्रा, आश्लेषा, ज्येष्ठा हीं १० नक्षत्रें वर्जून बाकी १७ नक्षत्रांवर कर्क, मेष, तूळ ह्यांशिवाय इतर लग्नीं, आणि शनिवारीं व शुभ ग्रहांच्या वारीं धान्याची स्थिति ह्मणजे पेंवात ठेवणें इत्यादि शुभ होय. ध्रुव ४, पुष्य, विशाखा, ज्येष्ठा, अश्विनी, चर ५ हीं १३ नक्षत्रें धान्य वृद्धीला शुभ होत, कांहीं काळानें दिल्याच्या सवाईनें किंवा दिढीनें परतदेण्याचा ठराव करून धान्य देतात ही धान्यवृद्धी समजावी.

शांतिक पौष्टिक कृत्यें (वसंततिलका.)

क्षिप्रध्रुवांत्यचरमैत्रमघासुशस्तंस्याच्छांतिकंचसहमंगलपौष्टिकाभ्याम् ॥
खेर्कविधौसुखगतेतनुगेगुरौनोमौढ्यादिदुष्टसमयेशुभदंनिमित्ते ॥ ३४ ॥

अर्थ–क्षिप्र ४, ध्रुव ४, रेवती, चर ५, अनुराधा, मघा, हीं १६ नक्षत्रें ग्रहशांति, विनायकशांति, मूळादि नक्षत्र जनन शांति इत्यादि शांतिक पौष्टिक कर्माला शुभ होत. ह्यांला दशमस्थानीं रवि, चतुर्थ चंद्र, व लग्नीं गुरु असे ग्रह असावे. हीं शांतिकादि कृत्यें गुरु शुक्राच्या अस्तादिकांनीं दुष्ट झालेल्या काळीं करूं नये. परंतु धूमकेतूचा उदय होणें वगैरे उत्पात निमित्तक शांतिक कर्मे करणें तीं गुरु शुक्रांच्या अस्तांतही करावी.

होमाहुति ज्ञान. (अनुष्टुप्.)

सूर्यभात्त्रित्रिभेचांद्रेसूर्यविच्छुक्रपंगवः ॥ चंद्रारेज्यागुशिखिनोनेष्टाहोमाहुतिःखले ॥ ३५ ॥

अर्थ—सूर्य नक्षत्रांपासून तीन तीन नक्षत्रांव दिवस नक्षत्र असतां सूर्य, बुध, शुक्र, शनि चंद्र, मंगळ, गुरु, राहू, केतु अशा क्रमानें ग्रहांला आहुति पोंचते. यांतून खल ग्रहाला आहुति पोंचत असतां अशुभ. अर्थात् शुभ ग्रहाला पोंचणारी शुभ होय. (सूर्य नक्षत्रापासूनदिवस नक्षत्र मोजावें मग त्या संख्येला ३ नीं भागून जो भागाकार येईल तितके ग्रह श्लोकांतसांगितल्या अनुक्रमानें सोडून १ किंवा २ बाकी असतां पुढील ग्रहाला आहुति मिळणार असें समजावें. बाकी शून्य असतां भागाकार आला असेल तितकाव्या ग्रहाला आहूति मिळणार हें उघड आहे. याप्रमाणें आलेला ग्रह शुभ असतां त्या दिवशीं होम करणें शुभ व खलग्रह असतां अशुभ होय.

स्वर्ग मृत्यु पाताळ ह्यांपैकीं कोणत्या लोकीं अग्नि आहे हें पाहणें. (इंद्रवज्रा.)

सैकातिथिर्वारयुताकृताप्ताशेषेगुणेभ्रेभुविवन्हिवासः ॥
सौख्यायहोमेशशियुग्मशेषेप्राणार्थनाशौदिविभूतलेच ॥ ३६ ॥

अर्थ––ज्यादिवशीं व ज्यावेळीं होम करणें असेल त्यावेळच्या तिथिपर्यंत शुक्लपक्षाच्या आरंभापा-

सून तिथि मोजाव्या मग त्या संख्येत १ मिळवावा आणि रविवारापासून मोजून त्या दिवसाचा वा. रही मिळवावा. नंतर त्या संख्येला ४ नी भागावें. बाकी ३ किंवा ० शून्य राहिली तर भूमीवर अग्नी आहे झणून कर्त्याला अशा दिवशींचा होम सुखकर जाणावा. बाकी १ अथवा २ राहिली असतां अनुक्रमें स्वर्गी व पाताळी अग्नि जाणावा. अग्नि स्वर्गी असतां होम केलेला प्राण नाशक व पाताळीं असतां द्रव्य नाशक होय उदाहरण-कोणी एक महिन्यांतील कृष्ण ५ गुरुवारीं ६ घटी असून त्या दिवशीं १० घटिका दिवसास होम करणें आहे. अर्थात होमाचे वेळीं पष्ठी झणून ह्या ६ व शुक्लपक्षाच्या १५ मिळून २१ तिथी झाल्या त्यांत १ मिळवून २२ रविवारपासून गुरुवार पांचवा झणून हें पांच मिळविल्यानें झाले २७ ह्याला ४ नीं भागून बाकी ३ याकरितां अग्नि भूमीवर आहे. अशा रीतीनें अग्नि पहावा.

नवान्न भक्षणाचा मुहूर्त. (अनुष्टुप्.)

नवान्नस्याचरक्षिप्रमृदुभेसत्तनौशुभम् ॥ विनानंदाविषघटीमधुपौषार्किभूमिजान् ॥३७॥

अर्थ—चर ५ क्षिप्र ४ मृदु ४ ह्या १३ नक्षत्रांवर, आणि शुभ गृहांची दृष्टि असून शुभ ग्रहांनीं युक्त अशा लग्नी नवान्न भक्षण करावें. नंदातिथि, विषघटी, चैत्र व पौष महिने आणि शनिवार, मंगळवार हीं नवान्न भक्षणाला असूं नयेत.

नौका बांधण्याचा मुहूर्त. (अनुष्टुप्.)

याम्यत्रयविशाखेंद्रसार्पपित्र्येशभिन्नभे ॥ भृगवीज्यार्कदिनेनौकाघटनंसत्तनौशुभम् ॥३८॥

अर्थ—भरणी, कृतिका रोहिणीं, विशाखा जेष्ठा, आश्लेषा, मघा, आर्द्रा हीं ८ नक्षत्रें वर्ज्य करून बाकीच्या सर्व नक्षत्रांवर, शुक्र, गुरु, रवि ह्मावारीं; आणि शुभ ग्रहांनीं युक्त व दृष्ट अशा शुभ लग्नांवर नौका बांधणें शुभ जाणावें.

वीरसाधन व अभिचार, यांचा मुहूर्त. (अनुष्टुप्)

मूलार्द्राभरणीपित्र्यमृगेसौम्येघटेतनौ ॥ शुक्रेशुक्रेऽष्टमेशुद्धे सिद्धिर्वीराभिचारयोः ॥ ३९॥

अर्थ—मूळ, आर्द्रा, भरणी, मघा, मृग ह्या ५ नक्षत्रांवर; बुध कुंभराशीला असतां, चतुर्थ शुक्र असतां, आणि अष्टमस्थान खल व शुभग्रहरहित असतां वीरसाधन ह्म० वेताळ वश करून घेणें, व अभिचार ह्म० जारणमारणादि कर्मे केलीं असतां सिद्धि पावतात.

रोगनिर्मुक्त स्नान. (वसंततिलका.)

न्यंत्यादितिध्रुवमघानिलसार्पधिष्ण्ये । रिक्तेतिथौचरतनौविकविंदुवारे ॥

स्नानंरुजाविरहितस्यजनस्यशस्तं । हीनेविधौखलखगैर्भचकेंद्रकोणे ॥ ४० ।

अर्थ—रेवती, पुनर्वसु, ध्रुव ४, मघा, स्वाती, आश्लेषा हीं नऊ नक्षत्रें वर्जून बाकी राहिल्या सर्व नक्षत्रांवर, रिक्तातिथींस, चरलग्नांवर; शुक्र सोमावांचून अन्यवारी रोग नाहींसा झालेल्या मनुष्यानें स्नान करणें प्रशस्त जाणावें. स्नान करणाराच्या जन्मराशीपासून पुढें गोचरप्रकरणांत सांगितलेल्या अशुभस्थानीं चंद्र असावा. व इष्ट लग्नापासून १।११।४।७।१०।९।५ स्थानीं खल ग्रह असावें.

शिल्पविद्येच्या आरंभाचा मुहूर्त. (अनुष्टुप्).

मृदुध्रुवक्षिप्रचरेज्ञेगुरौवाखलग्नगे ॥ विधौज्ञजीववर्गस्थेशिल्पविद्याप्रशस्यते ॥ ४१ ॥

अर्थ—मृदु ४ ध्रुव ४ क्षिप्र४चर ५ ह्या१७नक्षत्रांवर, आणि बुध किंवा गुरु दशम स्थानीं अगर इष्ट लग्नी असतां; व चंद्र बुधाच्या किंवा गुरूच्या षड्वर्गी असतां शिल्प विद्या शिकण्याला आरंभ करणें प्रशस्त जाणावें. शिल्प ह्मणजे दगडाच्या मूर्ति खोदणें, धातूच्या ओतून करणें, लांकडे तासणें वगैरे सर्व सुतारकामें हीं होत.

संधानाचा ह्म० तह करण्याचा मुहूर्त (अनुष्टुप्.)

सुरेज्यमित्रभाग्येषुवाष्ट्रम्यांतैतिलेहरौ ॥ शुक्रदृष्टेतनौसौम्यवारेसंधानमिष्यते ॥ ४२

अर्थ.—पुष्य, अनुराधा, पूर्वाफल्गुनी ह्या ३ नक्षत्रांवर अष्टमी, तैतिल करण, द्वादशी ह्या तिथि करणांवर, शुक्रानें दृष्ट किंवा युक्त अशा लग्नीं व शुभग्रहांच्या वारीं संधान ह्मणजे तह करणें इष्ट जाणावें.

दिव्य करण्याचा मुहूर्त. (वसंततिलका.)

त्यक्त्वाष्टभूतशनिविष्टिकुजान्जनुर्भं । मासौमृतौरविविधूअपिभानिनाड्याः ॥
द्व्यंगेचरेतनुलवेशशिजीवतारा । शुद्धौकरादितिहरींद्रकपेपरीक्षा ॥ ४३ ॥

अर्थ—अष्टमी, चतुर्दशी, शनिवार, भद्रा मंगळवार, जन्मनक्षत्र, जन्ममास, जन्मराशीपासून अष्टम सूर्य, चंद्र, आणि नाडीनक्षत्रें ह्म. जन्मनक्षत्र व त्यापासून १०।१६।१८।२३।२५ हीं सर्व सोडून आणि द्विस्वभाव किंवा चर लग्नीं व नवांशीं, चंद्र गुरु, व तारा यांची शुद्धि असतां; आणि हस्त पुनर्वसु, श्रवण, ज्येष्ठा, शततारका ह्या ५ नक्षत्रांवर परीक्षा ह्म० दिव्य करणें शुभ होय, (सुवर्ण चोरणें वगैरे अपराध करणाऱ्या मनुष्यापासून अपराध केल्याबद्दल त्याजकडून शपथ करविणें याचें नांव दिव्य जाणावें. अपराध कबूल करविण्याकरितां मनु, याज्ञवल्क्य इ० स्मृतींच्या व्यवहार प्रकरणांत दिव्य प्रकरण सांगितलें आहे.

सर्व शुभ कार्यांची साधारण लग्नशुद्धि (अनुष्टुप्.)

व्ययाष्टशुद्धोपचयेलग्नगेशुभदृग्युते ॥ चंद्रेत्रिषड्दशायस्थेसर्वारंभःप्रसिध्यति ॥४४॥

अर्थ—इष्ट लग्नापासून द्वादश व अष्टम हीं दोनस्थानें शुद्ध ह्मणजे खल व शुभग्रह रहित असून जन्मराशि जन्म लग्नापासून ३।६।१०।११ ह्या उपचय स्थानांतील इष्ट लग्नावर; आणि तेंच इष्ट लग्न शुभ ग्रहांनीं दृष्ट व युक्त असतां; व इष्ट लग्नापासून चंद्र ३।६।१०।११ ह्या स्थानीं असतां सर्व शुभकार्यांला आरंभ केल्यानें तीं सिद्धि पावतात.

नक्षत्रांवर ज्वरादि रोग उत्पन्न झाल्याच्या पीडेचे दिवस. (इंद्रवंशा.)

स्वातींद्रपूर्वाशिवसार्पभेमृतिर्व्यंरेंत्यमैत्रेस्थिरताभवेद्रुजः ॥
याम्यश्रवोवारुणतक्षभेशिवाघस्राद्विपक्षोव्यधिपार्कवासवे ॥ ४५ ॥
मूलाग्निदास्रेनवपित्र्यभेनखाबुध्न्यार्यमेज्यादितिधातृभेनगाः ॥
मासोजवैश्वेथयमाहिमूलभेमिश्रेशपित्र्येफणिदंशनेमृतिः ॥ ४६ ॥

अर्थ—स्वाती, ज्येष्ठा, पूर्वा ३, आर्द्रा, आश्लेषा ह्या ७ नक्षत्रांवर कोणा मनुष्याला ज्वर उत्पन्न झाला तर मरण येईल असें समजावें. रेवती अनुराधा ह्या दोहोंवर बहुकालानें रोग कमी होईल. भरणी, श्रवण, शततारा, चित्रा ह्या चारांवर ११ दिवस रोगाची पीडा होऊन नंतर जाईल विशाखा, हस्त, धनिष्ठा ह्या तिहींवर १५ दिवस रोग पीडा. मूळ, कृत्तिका, अश्विनी ह्या तिहींवर ९ दिवस पीडा. मघा नक्षत्रीं २० दिवस पीडा. उत्तराभाद्रपदा, उत्तराफ०, पुष्य, पुनर्वसु, रोहिणी ह्या ५ नक्षत्रीं ७ दिवस पीडा. मृगशीर्ष, उत्तराषाढा ह्या दोहोंवर एक महिनापर्यंत पीडा जाणावी. भरणी, आश्लेषा, मूळ, कृत्तिका, विशाखा, आर्द्रा, मघा ह्या ७ नक्षत्रांवर सर्पदंश झाला असतां मरण येईल असें जाणावें (ह्या नक्षत्रीं सर्पदंश झाला असून दंश झालेल्या मनुष्याला चंद्र अनिष्ट असतां खचित मरण येईल.

अवश्य मरण येण्याचे योग (उपजाति.)

रौद्राहिशाक्रांबुपयाम्यपूर्वाद्विदैववस्वाग्निषुपापवारे ॥
रिक्ताहरिस्कंददिनेचरोगेशीघ्रंभवेद्रोगिजनस्यमृत्युः ॥४७ ॥

अर्थ—आर्द्रा, आश्लेषा, ज्येष्ठा, शततारा, भरणी पूर्वा३, विशाखा, धनिष्ठा, कृत्तिका हीं ११ नक्षत्रें; पापवार ह्मणजे रवि, मंगळ शनि हे वार, आणि रिक्ता, द्वादशी, षष्ठी तिथि ह्या नक्षत्रावर तिथींच्या योगावर रोग उत्पन्न झाला असतां त्वरित मृत्यु जाणावा.

प्रेताची क्रिया करण्याचा मुहूर्त व प्रेत दहाचा निषिद्ध काळ. (उपेंद्रवज्रा.)

क्षिप्राहिमूलेंद्रहरीशवायुभेप्रेतक्रियास्याज्झषकुंभगेविधौ ॥
प्रेतस्यदाहंयमदिग्गमंत्यजेच्छय्यावितानंगृहगोपनादिच ॥४८ ॥

अर्थ—क्षिप्र ४ आश्लेषा, मूळ, ज्येष्ठा, श्रवण, आर्द्रा, स्वाती ह्या १० नक्षत्रांवर प्रेताची क्रिया करण्यास आरंभ करावा (दहाचे वेळीं कांहीं कारणानें क्रिया आरंभिणें राहिली असतां हीं नक्षत्रें घ्यावीं. दाहाचे वेळींच आरंभ करणें असल्यास मुहूर्ताचें कारणच नाहीं) मीन व कुंभ या दोन राशींला चंद्र असतां प्रेतदाह, दक्षिण दिशेस गमन, शय्या (माचा, बाज इ०) विणणें, घर शाकारणें, गवत लांकूड, यांचा संग्रह हीं कर्में करूं नयेत.

काष्टादि संग्रहाचा मुहूर्त. (शार्दूलविक्रीडित.)

सूर्यर्क्षाद्रसभैरधःस्थलगतैःपाकोरसैःसंयुतः । शीर्षेयुग्ममितैः शवस्यदहनंमध्येयुगैःसर्पभीः ॥ प्रागाशादिषुवेदभैःस्वसुहृदांस्यात्संगभोरोगभीः । क्काथादेःकरणंसुखंचगदितंकाष्ठादिसंस्थापने ॥ ४९ ॥

अर्थ—सूर्यनक्षत्रापासून ६ नक्षत्रांवर लांकडें, शेणी इत्यादि सर्पणाचा संग्रह केला असतां त्यांच्या योगानें उत्तम पाकनिष्पत्ति होते. हीं अधोभागीं असतात, त्यांपुढचीं २ मस्तकांवर असतात, त्यांवर काष्ठादिकांचा संग्रह केल्यानें तीं प्रेतदहनाकडे जातात, त्यांपुढचीं ४ मध्यें असतात, त्यांच्या योगानें सर्पभीति होते. पूर्वेला ४ असतात त्यांचें फळ मित्रसंगम होतो दक्षिणेला ४ असतात त्याचें फळ रोगभय, पश्चिमेच्या ४ नक्षत्रांचें फळ अनेक प्रकारचीं काढा वगैरे औषधें करणें व शेवटील ४ उत्तरेला असतात. त्यांचें फळ सुख, अशीं फळें आहेत. (तात्पर्य, काष्ठादिसंग्रह करण्याला सूर्यनक्षत्रापासून पहिलीं ६ नक्षत्रें शुभ, त्यांपुढचीं ६ अशुभ ४ शुभ ८ अशुभ व शेवटचीं ४ शुभ.

त्रिपुष्करयोग. (वसंततिलका.)

भद्रातिथीरविजभूतनयार्कवारे । द्वीशार्यमाजचरणादितिवान्हिवैश्वै ॥
त्रैपुष्करोभवतिमृत्युविनाशवृद्धौ । त्रैगुण्यदोद्विगुणकृद्वसुतक्षचांद्रे ॥ ५० ॥

अर्थ—भद्रातिथि (२।७।१२) शनि, मंगळ, रविवार; आणि विशाखा, उत्तरा फ०, पूर्वाभाद्रपदा, पुनर्वसु. कृत्तिका, उत्तराषाढा हीं तिथिवार नक्षत्रें एक दिवशीं आलीं असतां त्रिपुष्कर योग होतो. ह्यावर मृत्यु, विनाश आणि वृद्धि हीं झालीं असतां त्यानंतर ती तीन वेळ होतात. ह्मणजे ह्या त्रिपुष्कर योगावर कोणी मनुष्य मरण पावलें तर त्याच्या कुळांतलीं आणखी तीन मनुष्यें मरतात. तसाच कांहीं कोणाचा विनाश झाला असतां आणखी तीन वेळ नाश होतो व कांहीं वृद्धि झाली असली तर तीन वेळ पुढें वृद्धि होते. ह्याच भद्रातिथि, शनि, मंगळ, रविवार ह्या दिवशीं धनिष्ठा, चित्रा, मृग हीं नक्षत्रें आलीं तर द्विपुष्करयोग होतो. याचें फळ मागील प्रमाणेंच परंतु मृत्यु, विनाश वृद्धीविषयीं द्विगुण जाणावें.

प्रेतप्रतिमेच्या दाहाचा काल (शार्दूलविक्रीडित)

शुक्रारार्किषुदर्शभूतपदनेनंदासुतीक्ष्णोग्रभे । पौष्णेवारुणभेत्रिपुष्करदिनेन्यूनाधिमासेयने । याम्येन्द्रात्परतश्चपातपरिघेदेवेज्यशुक्रास्तके । भद्रावैधृतयोःशवप्रतिकृतेर्दाहोनपक्षेसिते ॥ ५१ ॥ जन्मप्रत्यरितारयोर्मृतिसुखात्योज्जेचकर्तुर्नसन् । मध्योमैत्रभगादितिध्रुवविशाखाद्व्यंघ्रिभेष्वपिच ॥ श्रेष्ठोर्केज्यविधोर्दिनेश्रुतिकरस्वात्यश्विपुष्येतथा । स्राशौचात्परतोविचार्यमखिलंमध्येयथासंभवम् ॥५२ ॥

अर्थ—शुक्रवार, मंगळवार, शनिवार; आमावास्या, चतुर्दशी, त्रयोदशी, नंदातिथि (१।६।११); तीक्ष्ण

४, उग्र ५. रेवती, शततारा, हीं ११ नक्षत्रें, त्रिपुष्कर योगाचा दिवस; क्षयमास; अधिकमास, दक्षिणायन, वर्षानंतर दाह करणें असतां निषिद्ध होत. पण वर्ष होण्यापूर्वी दक्षिणायनांतही प्रेतप्रतिकृतीचा दाह करावा. व्यतीपात, महापात, परिघयोग; गुरु शुक्रांचें अस्त; भद्राकरण, वैधृतियोग आणि शुक्लपक्ष ह्या सर्वांवर प्रेत प्रतिकृतीचा दाह करूं नये. प्रेत कर्म करणाराच्या जन्मतारा (जन्मनक्षत्र, त्यापासून दहावें आणि एकोणिसावें ह्या जन्मतारा होत). प्रत्यरितारा (जन्म नक्षत्रापासून पांचवें, चौदावें आणि तेविसावें हीं नक्षत्रें प्रत्यरितारा होत). आणि कर्त्याच्या राशीपासून ८।४॥१२ ह्या स्थानीं चंद्र दाह विधीला अशुभ जाणावा. अनुराधा, पूर्वाफल्गुनी, पुनर्वसु, ध्रुव ४, विशाखा आणि ध्यंत्रिभ ह०मृग, चित्रा, धनिष्ठा, हीं ११ नक्षत्रें व बुधवार दाहाला मध्यम होत. रवि, गुरु, सोमवार व श्रवण, हस्त स्वाती, अश्विनी, पुष्य, हीं ५ नक्षत्रें दाहाला शुभ जाणावीं. ह्या सर्वांचा विचार अशौचा नंतर दाह करणें असतांचा जाणावा. अशौचांतच प्रेतप्रतिकृतीचा दाह करणें असतां वर सांगितलेल्या नक्षत्रादिकांतून जीं कांहीं सांपडत असतील तितक्यांत अवश्य करावा. मनुष्य मरण पावला असून कांहीं कारणानें क्रिया कर्त्याकडून दाह झाला नसतां क्रियेच्या आरंभीं प्रेताची मूर्ति करून तिचा दाह क्रिया कर्त्याला करावा लागतो. हा सर्व प्रकार धर्म शास्त्रांत प्रसिद्ध आहे.

अभुक्तमूल. (उपजाति.)

अभुक्तमूलंघटिकाचतुष्टयंज्येष्ठांत्यमूलादिभवंहिनारदः ॥ वशिष्ठएकद्विघटीमितं
जगौबृहस्पतिस्त्वेकघटिप्रमाणकम् ॥ १३ ॥ अथोचुरन्येप्रथमाष्टघट्यमूलस्यशा-
क्रांतिमपंचनाड्यः ॥ जातंशिशुंतत्रपरित्यजेद्वामुखंपितास्याष्टसमानपश्येत् ॥९४॥

अर्थ---ज्येष्ठा नक्षत्राच्या शेवटील ४ घटिका, आणि मूळ नक्षत्राच्या आरंभीच्या ४ घटिका ह्या एक प्रहराला अभुक्तमूल ह्मणावें, असें नारदाचें मत आहे. व हाच मुख्य पक्ष होय. वसिष्ठाच्या मतानें ज्येष्ठाच्या शेवटची १ घटी व मूळाच्या आरंभींच्या २ घटी मिळून ३ घटिका अभुक्तमूळ असें आहे ज्येष्ठाची शेवटची अर्ध घटिका व मूळाची आरंभीचीं अर्धी मिळून एक घटिका अभुक्तमूळ हें बृहस्पतीचें मत होय. याशिवाय ज्येष्ठाच्या शेवटच्या ५ घटि व मूळाच्या पाहिल्या ८ घटिका मिळून १३ घ० अभुक्तमूळ असेंही कित्येक आचार्यांचें मत आहे ह्या अभूक्तमूळावर झालेल्या अपत्याचा त्याग करावा किंवा आठ वर्षे पर्यंत पित्यानें अशा अपत्याचें मुख पाहूं नये (ह्यांत अपत्याचा त्याग करणें हाच पक्ष मुख्य परंतु तसें करणें कठीण ह्मणून मुख न पाहण्याचा दुसरा पक्ष सांगितला.)

मूळ व आश्लेषा ह्यांवर जन्म झाल्याचीं फळें. (उपजाती.)

आद्येपितानाशमुपैतिमूळपादेद्वितीयेजननीतृतीये ॥
धनंचतुर्थोस्यशुभोथशांत्यासर्वत्रसत्स्यादहिभेविलोमम् ॥ ९५ ॥

अर्थ—मूळ नक्षत्राच्या पहिल्या चरणावर जन्मलेलें अपत्य आपल्या पित्याला मारक जाणावें. दुसऱ्या चरणावर मातेला मारक, व तिसऱ्या चरणावर धनाचा नाश करितें असें जाणावें. चवथा चरण शुभ होय. असें अपत्य अनिष्ठकर झालें असतां धर्मशास्त्रांत सांगितलेली शांति करावी. ह्मणजे अरिष्ठ टळतें. ह्याच्या उलट आश्लेषाचें फळ जाणावें. (ह्मणचे आश्लेषांचा प्रथम चरण शुभ द्वितीय चरणी धननाश, तृतीय चरणीं मातेला मृत्यु, व चतुर्थ चरणीं पित्याला मरण.)

मूळ नक्षत्राची स्थिति व फळ. (इंद्रवज्रा.)

स्वर्गेशुचिप्रोष्ठपदेषमाघेभूमौनभःकार्तिकचैत्रपौषे ॥
मूलंह्यधस्तात्तुतपस्यमार्गवैशाखशुक्रेष्वशुभंचतत्र ॥ ९६ ॥

अर्थ---आषाढ, भाद्रपद, अश्विन, माघ, ह्या चार महिन्यांत मूळ स्वर्गी असतें. श्रावण, कार्तिक, चैत्र,

पौष ह्या ४स भूमीवर असतें, आणि फाल्गुन, मार्गशीर्ष, वैशाख, ज्येष्ठ ह्यांत पाताळीं असतें. हें मूळ नक्षत्र ज्या ठिकाणीं असेल तेथेंच त्याचें फळ जाणावें. (स्वर्गी व पाताळीं असतांना अपत्य जन्मलें असून शांति करण्यास सामर्थ्य नसेल तर न केली तरी हरकत नाहीं. सामर्थ्य असतां करावी. हें योग्यच; परंतु भूमीवर असतां मात्र अवश्य केलीच पाहिजे.

जननारिष्टें व परिहार. (शार्दूलविक्रीडित)

गंडांतेंद्रभशूलपातपरिघव्याघातगंडावमे संक्रांतिव्यतिपातवैधृतिसिनीवालीकुहू दर्शके ॥ वज्रेकृष्णचतुर्दशीषुयमघंटेदग्धयोगेमृतौ विष्टौसोदरभेजनिर्नापितृभे शस्ताशुभाशांतितः ॥ ९७ ॥

अर्थ—गंडांत विवाह प्रकरण श्लोक ४३) ज्येष्ठानक्षत्र, शूलयोग, व्यतीपात आणि वैधृति संज्ञक महापात,परिघ, व्याघात, गंड, क्षयतिथि, सूर्याच्या संक्रांतीचा पुण्यकाल, व्यतिपात, वैधृति, सिनीवाली (चंद्र दिसतो ती आमावास्या) कुहू (चंद्र दिसत नाहीं तो आमावास्या) दर्श (चंद्र दर्शन रहित आमावास्या) वज्रयोग, कृष्णपक्षांतील चतुर्दशी, यमघंट, दग्धयोग, मृत्युयोग, भद्राकरण, पूर्वी झालेल्या भावंडांचें जन्म नक्षत्र, माता व पिता ह्यांचीं जन्म नक्षत्रें, ह्या सर्वांवर कन्या किंवा पुत्र अपत्य जन्मलें असतां अशुभ जाणावें. व अशुभ परिहारार्थ धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें शांति करावी. (सूर्य चंद्राच्या ग्रहणीं अपत्य झालें असतां अशुभ; आणि अनुक्रमें तीन पुत्र झाल्यावर कन्या होणें किंवा तीन कन्या झाल्यावर पुत्र होणें हेंही अशुभ होय. अशा अपत्याला तिखलें ह्मणतात. ह्यांच्याही शांति धर्मशास्त्रांत आहेत त्या कराव्या)

अश्विन्यादि नक्षत्रांची तारासंख्या व स्वरूपें (उपजाति.)

त्रित्र्यंगपंचाग्निकुवेदवन्हयःशरेषुनेत्राश्विशरेंदुभूकृताः ॥ वेदाग्निरुद्राश्वियमाग्निवन्हयोऽब्धयःशतंद्विद्विरदाभतारका ॥ ९८ ॥ अश्व्यादिरूपंतुरगास्ययोनिक्षुरो नएणास्यमणीग्रहंच ॥ पृषत्कचक्रेभवनंचमंचःशय्याकरोमौक्तिकविद्रुमंच ९९ तोरणंवलिनिभंचकुंडलंसिंहपुच्छगजदंतमंचकाः ॥ त्र्यस्त्रिचत्रिचरणाभमर्दलो वृत्तमंचकयमाभमर्दलाः ॥ ६० ॥

अर्थ—पुढें लिहिलेल्या प्रत्येक नक्षत्रांत जितक्या तितक्या तारा व स्वरूपें आहेत असें जाणावें.

नक्षत्रें.	स्वरूपें.	ता.सं.	नक्षत्रें.	स्वरूपें.	ता सं.	नक्षत्रें.	स्वरूपें.	ता.स.
अश्विनी.	अश्वमुख.	३	मघा.	गृह	५	मूळ.	सिंहपुच्छ.	११
भरणी.	योनि.	३	पूर्वा.	माचा.	२	पूर्वापाढा.	हस्तिदंत.	२
कृत्तिका.	वस्तरा.	६	उत्तरा.	माचा.	२	उत्तरापाढा.	माचा.	२
रोहिणी.	गाडा.	५	हस्त.	हात.	५	अभिजित्.	त्रिकोण.	३
मृगशीर्ष.	हरिणमुख.	३	चित्रा.	मोतीं.	१	श्रवण.	वामन.	३
आर्द्रा.	मणि.	१	स्वाती.	पोंवळें.	१	धनिष्ठा.	मृदंग.	४
पुनर्वसु.	गृह.	४	विशाखा.	तोरण.	४	शततारका.	वर्तुळ.	१००
पुष्य.	बाण.	३	अनुराधा	वली.	४	पूर्वाभाद्रप.	माचा.	२
आश्लेषा.	चक्र.	५	ज्येष्ठा.	कुंडल.	३	उत्त. भा.	जुवळ.	२
						रेवती.	मृदंग.	३२

(ज्या नक्षत्रावर विवाह होतो त्याच्या जितक्या तारा असतील तितक्यों वर्षांनीं शुभाशुभ फल प्राप्त होईल असें जाणावें).

जलाशय, आराम, देवप्रतिष्ठा यांचे मुहूर्त. (उपजाति.)

जलाशयारामसुरप्रतिष्ठासौम्यायनेजीवशशांकशुक्रे ॥ दृश्येमृदुक्षिप्रचरध्रुवेस्यात्पक्षेसितेस्वर्क्षतिथिक्षणेवा ॥ ६१ ॥ रिक्तारवर्जेदिवसेतिशस्ताशशांकपापैस्त्रिभवांगसंस्थैः ॥ व्यंत्याष्टगैःसत्खचरैर्मृगेंद्रेसूर्योघटेकोयुवतौचविष्णुः ॥ ६२ ॥ शिवोनृयुग्मेद्वितनौचदेव्यःक्षुद्राश्चरेसर्वइमेस्थिरर्क्षे ॥ पुष्येग्रहाविघ्नपयक्षसर्पभूतादयोंत्येश्रवणेजिनश्च ॥ ६३ ॥

अर्थ—जलाशय म्ह० वापी कूप तटाक इ० व आराम म्ह० बाग यांचे उत्सर्ग आणि शिव, विष्णु, गणपती इ० देवताची प्रतिष्ठा, हीं पुढें सांगितल्या तिथि नक्षत्रादिकांवर करावीं. उत्तरायणांत गुरु, चंद्र व शुक्र हे अस्तंगत नसून दिसत असतां मृदु ४ क्षिप्र ४ चर ५ ध्रुव ४ ह्या १७ नक्षत्रांवर, शुक्ल पक्षांत; व ज्या देवाची प्रतिष्ठा करावयाची त्याचें नक्षत्र, तिथि आणि मुहूर्त ह्यांवर मागें सांगितलेलीं कर्में शुभ होत. रिक्ता तिथि व मंगळवार ह्या वांचून अन्य तिथिवार प्रशस्त होत. चंद्र व खलग्रह इष्ट लग्नापासून ३।११।६ या स्थानीं आणि शुभ ग्रह १२।८ ह्या दोहोंवांचून अन्य स्थानीं असावे. सूर्याची सिंह लग्नीं, ब्रह्मदेवाची कुंभ लग्नीं, व विष्णूची कन्या लग्नीं स्थापना करावी. शिवाची मिथुन, लग्नीं दुर्गादि देवींची द्विस्वभावलग्नीं, चौसष्ट योगिनी वगैरे क्षुद्र देवतांची चर लग्नीं, आणि सर्व देवांची स्थिरलग्नीं प्रतिष्ठा शुभ जाणावी. सर्व ग्रहांची स्थापना पुष्य नक्षत्रीं करावी. (रत्नमालेंत विशेष सांगितला आहे तो:—सूर्याचें हस्त नक्षत्रीं, इंद्राचें व ब्रह्मदेवाचें पुष्य, श्रवण, अभिजित् ह्या ३ नक्षत्रीं, कुबेर व स्कंद यांचें अनुराधा नक्षत्रीं, दुर्गादि देवतांचें मूळ नक्षत्रीं. सप्तऋषींचें ते ज्या नक्षत्रीं असतील त्यांवर आणि लक्ष्मी, व्यास, वाल्मिकी अगस्त्य यांचें पुष्य नक्षत्रीं स्थापन करावें. गणपति, यक्ष, सर्प, भूत, राक्षस, प्रमथ, सरस्वती इ० ह्यांचीं रेवती नक्षत्रीं प्रतिष्ठा करावी. बौद्धधर्मी लोकांचा देव बुद्ध ह्याला 'जिन, असें ह्मणतात. त्याची श्रवण नक्षत्रीं स्थापना करावी .

॥ इतिनक्षत्रप्रकरणं समाप्तम् ॥

अथसंक्रांतिप्रकरणम्

नक्षत्रवारांवरून संक्रांतीचीं नांवें व फळें. (वसंततिलका.)

घोरार्कसंक्रमणमुग्ररवौहिशूद्रान्ध्वांक्षिविशोलघुविधौचचरर्क्षभौमे ॥
चोरान्महोदरयुतानृपतीन्ज्ञमैत्रेमंदाकिनीस्थिरगुरौसुखयेच्चमंदा ॥ १ ॥
विप्रांश्चमिश्रभभृगौतुपशूंश्चमिश्रातीक्ष्णार्कजेंत्यजसुखाखलुराक्षसीच ॥

अर्थ—ग्रहाच्या राश्यंतराला संक्रांति ह्मणावें. राश्यंतर ह्मणजे एक राशि भोगून झाल्यावर तिच्या पुढील दुसऱ्या राशींत ग्रह जाणे. सर्व ग्रहांच्या संक्रांति होवात. परंतु पुढील फळें सूर्य संक्रांतींचीं जाणावीं. उग्र नक्षत्रांवर आणि रविवारीं संक्रांति झालि असतां तिचें घोरा नांव ही शुद्रांला सुख देतें लघु नक्षत्रांवर आणि सोमवारीं ध्वांक्षी नांव ही वैश्यांला सुख देतें. चर नक्षत्रें व मंगळवार ह्यांवर महोदरी नांव ही चोरांला सुखविते. मैत्रनक्षत्रीं व बुधवारीं मंदाकिनी नांवाची ही राजाला सुख देणारी. स्थिर नक्षत्रीं व गुरुवारीं मंदा नामक सक्रांति ब्राह्मणांला सुखी करीते. मिश्र नक्षत्रांवर व शुक्रवारीं मिश्रा नामक संक्रांति पशूंला सुख कर्त्री जाणावी. तीक्ष्णनक्षत्रीं व शनिवारीं झालेली संक्रांति राक्षसी नामक अंत्यजाला सुख देते.

दिवसास व रात्रीस संक्रांति झाल्याची फळें आणि उत्तरायण व दक्षिणायन संज्ञा. (वसंततिलका .)

त्र्यंशेदिनस्यनृपतिन्प्रथमेनिहंतिमध्येद्विजानपिविशोपरकेचशूद्रान् ॥

अस्तेनिशाप्रहरकेषुपिशाचकादीन्रक्षवरानपिनटान्पशुपालकांश्च ॥
सूर्योदयेसकललिंगिजनंचसौम्ययाम्यायनंमकरकर्कटयोर्निरुक्तं ॥ ३ ॥

अर्थ--दिनमानाचे ३ भाग करावे. पहिल्या भागांत संक्रांति झाली असली तर ती राजाला अशुभ, दुसऱ्या भागांत ब्राह्मणाला अशुभ, तिसऱ्या भागांत वैश्यांला अशुभ; अस्तमानीं झाली असतां शूद्रांला अशुभ जाणावी. रात्रीच्या पहिल्याप्रहरीं पिशाच भूत इत्यादिकांला अशुभ, दुसऱ्याप्रहरीं राक्षसाला, तिसऱ्या नटांला; व चवथ्याप्रहरीं पशुपालकांला ह्मणजे गवळ्याला अशुभ जाणावी. सूर्योदयीं झाली असतां पाखंड लोकांला अशुभ होय. मकर संक्रांतीपासून उत्तरायण होतें व कर्कापासून दक्षिणायन सुरू होतें. मकर व कर्क दोन संक्रांतीला अयन संक्रांति ह्मणावें.

इतर संक्रांतींच्या संज्ञा (अनुष्टुप्)

षडशीत्याननंचापनृयुक्कन्याझषेभवेत् ॥ तुलाजौविषुवंविष्णुपदंसिंहालिगोघट ॥ ४ ॥

अर्थ--धन, मिथुन, कन्या, मीन ह्या चार संक्रांतीला षडशीतिमुख अशी संज्ञा आहे. तूळ, मेष ह्या दोहोंला विषुव संज्ञा आणि सिंह, वृश्चिक, वृषभ, कुंभ ह्या चोहांला विष्णुपद संज्ञा जाणावी.

संक्रांतीचा पुण्यकाळ. (उपजाति.)

संक्रांतिकालादुभयत्रनाडिकाःपुण्यामताःषोडशषोडशोष्णगोः ॥
निशीतथोर्वागपरत्रसंक्रमेपूर्वापराहांतिमपूर्वभागयोः ॥ ५ ॥

अर्थ--दिवसास ज्या वेळीं सूर्याची संक्रांति होत असेल त्या वेळेच्या पुढें १६ व मागें १६ घटिका पुण्यकाळ जाणावा रात्रौ मध्यरात्रीच्या पूर्वीं संक्रांति असतां त्या दिवशीं दोन प्रहरापासून अस्तमानापर्यंत पुण्यकाळ व मध्यरात्री नंतर संक्रांति असता दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरांपर्यंत पुण्यकाळ आहे असें जाणावें.

अर्धरात्रींच्या अयनसंक्रांतींचा पुण्यकाळ. (उपजाति.)

पूर्णेनिशीथेयदिसंक्रमः स्याद्दिनद्वयंपुण्यमथोदयास्तात् ॥
पूर्वंपरस्ताद्यदियाम्यसौम्यायनेदिनेपूर्वपरेतुपुण्ये ॥ ६ ॥

अर्थ--बरोबर मध्य रात्रींच कोणतीही संक्रांति असतां पूर्वींच्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं असा दोन दिवस पुण्यकाळ जाणावा. सूर्योदयाच्या पूर्वीं कर्कसंक्रांति असतां पूर्व दिवशींच पुण्यकाळ आणि सूर्यास्तानंतर मकर संक्रांति असतां दुसऱ्या दिवशींच पुण्यकाळ जाणावा.

पर्वकाळाचा विशेष नियम. (इंद्रवज्रा.)

संध्यात्रिनाडीप्रमितार्कबिंबादर्धोदितास्तादधऊर्ध्वमत्र ॥
चेद्याम्यसौम्येअयनेक्रमात्स्तःपुण्यौतदानींपरपूर्वघस्रौ ॥ ७ ॥

अर्थ.--सूर्य बिंबाचा अर्धा उदय होण्याच्या वेळेपर्यंत तीन घटिका प्रातःसंध्या व सूर्य बिंबाचे अर्धाचें अस्त झाल्यापासून तीन घटिका सायंसंध्या नामक तीन घटिकेस जर मकर संक्रांति असेल तर त्याच दिवशीं पुण्यकाळ; आणि सायंसंध्ये नंतर मकर संक्रांति असता दुसरे दिवशीं पुण्यकाळ मानावा. तशीच प्रातःसंध्येंत कर्कसंक्रांति असतां दुसरे दिवशीं ह्मणजे सूर्योदयानंतर पुण्यकाळ व प्रातःसंध्येच्या पूर्वीं कर्क संक्रांति असता पूर्वदिवशीं पुण्यकाळ जाणावा.

पर्वकाळाचें अतिपुण्यत्व (अनुष्टुप्)

याम्यायनेविष्णुपदेचाद्यामध्यास्तुलाजयोः ॥षडशीत्याननेसौम्येपरानाड्योतिपुण्यदाः८

अर्थ—कर्क आणि विष्णुपद संज्ञक संक्रांति (वृषभ सिंह, वृश्चिक, कुंभ) ह्यांच्या पूर्वींच्या १६ घटिका अति पुण्यकारक जाणाव्या. आर्थात् पुढील १६ घ० पर्व काल असतो खरा परंतु तो अल्प पुण्यकारक

होय. तूळ व मकर संक्रांतिच्या पुढें ८ व मागें ८ घटी अति पुण्यकर जाणाव्या. षडशीतिमुख (मिथून कन्या धन मीन) आणि मकर ह्यांच्या पुढील १६ घटी अति पुण्यकर जाणाव्या सर्व संक्रांतींच्या पूर्वी १६ आणि पुढें १६ मिळून ३२ घटिका पर्व काळ असतोच पण ह्या श्लोकांत सांगितलेल्या त्या त्या संक्रांतींच्या घटी विशेष पुण्यकारक होत.

सायनसंक्रांति व त्यांचा पुण्यकाल (उपजाति.)

तथायनांशाःखरसाहताश्चस्पष्टार्कगत्याविहृतादिनाद्यैः ॥
मेषादितःप्राक्चलसंक्रभाःस्युर्दानेजपादौबहुपुण्यदास्ते ॥ ९ ॥

अर्थ--पूर्वी सांगितल्या ह्या निरयण संक्रांति होत. त्यांचा पर्वकाळ जसा स्नान दानादि विधींला पुण्यकारक, तसाच सायन संक्रांतींचाही असतो म्हणून त्या जाणण्याचा प्रकार ह्या श्लोकांत आहे तो:--ज्या वर्षांतली निरयण संक्रांति सायन करणें असेल त्या सालच्या अयनांशाला ६० नीं गुणावें. मग त्या आलेल्या गुणाकारास संक्रांतीच्या वेळेच्या सूर्याच्या स्पष्ट गतीने भागावें तीन फळे काढून तीं दिवस, घटी, पळे अशीं अनुक्रमे जाणावीं आणि निरयण संक्रांतीच्या पूर्वी तितके दिवस सायन संक्रांति व्हावयाची असें जाणावें ह्या सायन संक्रांति सुद्धां पुण्याकारक आहेत सायन मकर संक्रांतीचा पुढें २० घटिका पुण्यकाळ जाणावा. आणि बाकीच्या ११ सायन संक्रांतींचा पुण्यकाळ मागें सांगितल्याप्रमाणेंच जाणावा. उदाहरण--चैत्र कृष्ण ८ शुक्रवार शके १८११ ह्या दिवशीं मेष संक्रांति, १२ घटिका दिवसास झाली होती. ही निरयण ही वरून सायन कधीं होतें असें पाहणें आहे. शकांतून ४४४ वजा करून ६० नीं भागिलें म्हणजे अयनांश होतात. ह्यावरून चालू शकाचे २२ अंश ४७ कला इतके अयनांश आहेत. त्यांचीं ६० पट करून १३६७ कला झाल्या. आतां सूर्याची स्पष्टगति५८।० यांनीं भागिलें. तेव्हां २३ दिवस ३४ घ० ८ प० आलीं म्हणून अष्टमी शुक्रवाराचे पूर्वी इतके दिवस सायन संक्रांति झाली असें लिखालें. याप्रमाणें निरयण संक्रांतिवरून सर्व संक्रांति सायन कराव्या.

सम, बृहत् व जघन्य नक्षत्रें, (उपजाति.

समंमृदुक्षिप्रवसुश्रवोग्निमघात्रिपूर्वास्वपभंबृहत्स्यात् ॥
ध्रुवद्विदैवादितिभंजघन्यंसार्पाम्बुपार्द्रानिलशाक्रयाम्यम् ॥ १० ॥

अर्थ--मृदु ४ क्षिप्र ४ धनिष्ठा श्रवण, कृत्तिका, मघा, पूर्वा ३ व मूळ हीं १५ नक्षत्रें सम होत. ध्रुव ४ विशाखा, पुनर्वसु हीं ६ बृहत होत आणि आश्लेषा, शततारा, आर्द्रा, स्वाती, ज्येष्ठा, भरणी, हीं ६ नक्षत्रें जघन्य संज्ञक जाणावीं.

नक्षत्रांच्या सम बृहत् व जघन्य संज्ञांचा उपयोग. (उपेंद्रवज्रा.)

जघन्यभेसंक्रमणेमुहूर्ताःशरेंदवोबाणकृताबृहत्सु ॥
खरामसंख्यासमभेमहर्घसमर्घसाम्यंविधुदर्शनेपि ॥ ११ ॥

अर्थ--जघन्य संज्ञक नक्षत्रांवर संक्रांति झाली असतां तिचे १५ मुहूर्त, बृहत्संज्ञक नक्षत्रावरील संक्रांतीचे ४५आणि समसंज्ञकावरील संक्रांतीचे ३० मुहूर्त जाणावे. ह्या मुहूर्तांचीं फळें अनुक्रमें महर्घ,समर्घ साम्य हीं तीन जाणावीं. महर्घ म्हणजे महागाई होणें, समर्घ म्हणजे सर्व धान्यें विपुल सवंग होणें आणि साम्य म्हणजे मध्यम स्थिति असणें अशीं फळें जाणावीं. चंद्रदर्शनाचेंही फळ वरीलप्रमाणेंच आहे. जघन्य नक्षत्रीं चंद्रदर्शन असतां महर्घ, बृहत् नक्षत्रीं समर्घ, आणि सम नक्षत्रीं साम्य.

कर्क संक्रांतीच्या वारपरत्वें विंशोपका. (अनुष्टुप्.)

अर्कादिवारेसंक्रांतौकर्कस्याद्दविंशोपकाः।दिशोनखागजाःसूर्याधृत्योष्टादशसायकाः१२

अर्थ-रविवारादि सातवारीं कर्क संक्रांति झाली तर पुढें लिहिल्याप्रमाणें विंशोपका जाणाव्या; रवि १०, चंद्र २०, मंगळ ८, बुध १२, गुरु १८, शुक्र १८, शनि ५.

संक्रांतिकाळीं रवीची अवस्था व तिची फळें. (इंद्रवज्रा.)

स्यात्तैतिलेनागचतुष्पदेरविः सुप्तोविष्टस्तुगरादिपंचके॥
किंस्तुघ्नऊर्ध्वःशकुनौसकौलवेऽनिष्टःसमःश्रेष्ठइहार्घवर्षणे ॥ १३ ॥

अर्थ.—तैतिल, नाग, चतुष्पाद ह्या ३ करणांवर संक्रांति असतां त्या वेळीं रवि सुप्त ह्मणजे निजलेला असतो. गरज, वणिज, भद्रा, बव, बालव ह्या ५ कारणांवर संक्रांति असता रवि निविष्ठ ह्मणजे बसलेला असतो किंस्तुघ्न, शकुनि व कौलव ह्या ३ कारणांवर ऊर्ध्व ह्मणजे उभा असतो. सुप्त, निविष्ट, ऊर्ध्व ह्या रवीच्या अवस्था; द्रव्य आणि वृष्टि ह्यांविषयीं क्रमानें अनिष्ट, सम, श्रेष्ठ अशा जाणाव्या.

संक्रांतिचीं वाहनें, वस्त्रें, आयुधें, भक्ष्यें, लेपनें, जाति, पुष्पें, आणि त्यांचीं फळें. (शार्दूलविक्रीडित.)

सिंहव्याघ्रवराहरासभगजावाहाद्विषद्घोटकःश्वाजोगौश्चरणायुधश्चनवतोवाह्या
रवेःसंक्रमे ॥ वस्त्रंश्वेतसुपीतहारितकपाण्डुारक्तकालासितं चित्रंकंबलदिग्घना
भमथशस्त्रंस्याद्भुशुंडीगदा ॥ १४ ॥ खड्गोदंडशरासतोमरमथोकुंतश्चपाशांकुशो
ऽस्त्रंबाणस्त्वथभक्ष्यमन्नपरमान्नंभैक्ष्यपान्नकम् ॥ दुग्धदध्यपिचीत्रितान्नगुडमध्वा
ज्यंतथाशर्कराथोलेपोमृगनाभिकुंकुममथोपाटीरमृद्रोचनम् ॥ १५ ॥ यावश्चोतु
मदोनिशांजनमथोकालागुरुश्चंद्रकोजातिर्दैवतभूतसर्पविहगाःपश्वेणविप्रास्ततः॥
क्षत्रावैश्यकशूद्रसंकरभवाःपुष्पंचपुन्नागकंजातीबाकुलकेतकानिचतथाविल्वार्कदू
र्वांबुजम् ॥ १६ ॥ स्यान्मल्लिकापाटलिकाजपाचसंक्रांतिवस्त्राशनवाहनादेः॥ नाश
श्चतद्वृत्त्युपजीविनांचस्थितोपविष्टस्वपतांचनाशः ॥ १७ ॥

अर्थ—बवादि ११ करणांवर संक्रांति झाली असतां खालीं कोष्टकांत लिहिलेलीं वाहनादि जाणावीं. संक्रांति ज्या वस्त्र, भक्ष्य, वाहन इत्यादिकांचा उपयोग करील त्यांचा सहा महिन्यांत नाश होतो. व संक्रांतिच्या पदार्थांवर उपजीविका करणारांचाही नाश जाणावा. मागच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें संक्रांतीची जी स्थिति असेल ती प्रमाणें ज्यांची स्थित, उपविष्ट किंवा सुप्त स्थिति असेल त्यांचाही नाश जाणावा.

संक्रांतीच्या वाहनादिकांचें कोष्टक.

करणें	बव	बालव	कौलव	तैतिल	गरज	वणिज	भद्रा	शकुनि	चतुष्पाद	नाग	किंस्तुघ्न
वाहन	सिंह	व्याघ्र	डुक्कर	गर्दभ	हत्ती	महिष	अश्व	श्वान	बकरा	बैल	कोंबडा
वस्त्र	श्वेत	पीत	हरितक	पांडुर	आरक्त	कृष्णवर्ण	श्वेतरहित	चीट	कंबल	नग्न	मेघवर्ण
आयुध	भुशुंडी	गदा	तरवार	दंड	धनुष्य	तोमर	कुंत	पाश	अंकुश	अस्त्र	बाण
भक्ष्य	भात	पायस	भिक्षान्न	घारगे	दुग्ध	दधि	खिचडी	गुड	मधु	आज्य	शर्करा
लेपन	कस्तूरी	कुंकुम	चंदन	गोपीचंद	गोरोच	आळता	जवादें	हळद	कज्जल	कृष्णागरु	कर्पूर
जाति	देव	भूत	सर्प	पक्षी	पशु	हरिण	ब्राह्मण	क्षत्रिय	वैश्य	शूद्र	वर्णसंकर
पुष्प	पुन्नाग	जाती	बकुल	केतक	बिल्व	रुई	दूर्वा	कमल	मल्लिका	पाटलि	जासवंद
वय	शिशु	कुमारिका	गलितके	तरुणी	प्रौढा	प्रगल्भा	वृद्धा	वंध्या	अतिवं०	सुतार्थि०	प्रव्रजिता
भोजनपा	सुवर्ण	रौप्य	ताम्र	लोह	सीस	कथिल	कांस्य	पाषाण	काष्ट	मृत्तिका	वेळुपात्र
अवस्था	पांथस्थ	भोगोत्सु	रतिप्रिय	हास्य	दुर्मुखी	ज्वरयुक्त	भुक्ता	कंपिता	ध्यानस्थ	कर्कशा	वृद्धा

(वय, भोजनपात्र आणि अवस्था हीं मूळ ग्रंथांत नाहींत टीकेंत आहेत ह्मणून उपयुक्त वाटल्यामुळें कोष्टकांत दिलीं आहेत.

जन्मनक्षत्रावरून संक्रांतीचें फळ (उपजाति.)

संक्रांतिधिष्ण्याद्धराधिष्ण्यतस्त्रिभेस्वभेनिरुक्तंगमनंततोंगभे ॥
सुखंत्रिभेपीडनमंगभेंशुकं त्रिभेर्थहानीरसभेधनागमः ॥ १८ ॥

अर्थ— संक्रांति ज्या दिवस नक्षत्रावर असेल त्याच्या पूर्वीच्या नक्षत्रापासून ३ नक्षत्रांत आपलें जन्मनक्षत्र असतां गमन जाणावें. त्यापुढें ६ नक्षत्रांत सुख; पुढील ३ नक्षत्रांत पीडा, पुढच्या ६ नक्षत्रांत वस्त्रलाभ पुढील तीन नक्षत्रांत असतां द्रव्यनाश; आणि शेवटच्या ६ नक्षत्रांत धनलाभ, अशीं फळें जाणावीं.

ग्रहबल (उपजाति.)

नृपेक्षणंसर्वकृतिश्चसंगरः शास्त्रंविवाहोगमदीक्षणेरवेः॥
वीर्येथतारावलतःशुभोविधुर्विधेर्बलेकोंकेवलेकुजादयः ॥ १९ ॥

अर्थ.—रवि बलवान् असतां राजदर्शन करावें. चंद्र असतां सर्व कार्ये करावीं. मंगळ बलवान् असतां युद्ध; बुध बलवान् असतां शास्त्र शिकावें व शिकवावें. गुरु बलवान् असतां विवाह; शुक्र बलवान् असतां यात्रा आणि शनि बलवान् असतां दीक्षा, यज्ञ इत्यादि कर्में करावीं. जो ग्रह बलवान् असतां जें कृत्य करूं सांगितलें तें त्या ग्रहाच्या वारींही करावें तारावल असतां चंद्र शुभ जाणावा ह्मणजे एका राशींतून दुसऱ्या राशींत ज्या वेळीं चंद्र जावयाचा त्या वेळीं तारावल असून चंद्र अशुभ असेल तरी तो त्या राशींत असेपर्यंत शुभ जाणावा. आणि तारावल नसतां शुभ चंद्रही अशुभ अर्थात् तारावल असून चंद्रही शुभ असतां तो अतिशुभ जाणावा. रवीच्या संक्रांतीचे ह्म० राश्यंतराचे वेळीं वरील प्रमाणें चंद्र शुभ असतां, रवि अशुभही शुभ जाणावा. शुभ असतां फारच चांगला. रवीच्या संक्रांतिकाळीं चंद्र अशुभ असून रवी शुभ असेल तरीहीं तो अशुभ होय. मंगळादि ग्रहांच्या संक्रांतिकाळीं रवी शुभ असून ते ग्रह अशुभ असतां शुभच जाणावे. शुभ असतां फार चांगलें होत. रवि अशुभ असून मंगळादि ग्रह शुभ असले तरी ते अशुभ जाणावे. राश्यंतर करून ग्रह ज्या राशींत जातो त्या राशींत तो असेपर्यंत वरील शुभत्व किंवा अशुभत्व जाणावें.

अधिकमास व क्षयमास लक्षण. (उपजाति.)

स्पष्टार्कसंक्रांतिविहीनउक्तोमासोधिमासःक्षयमासकस्तु ॥
द्विसंक्रमस्तत्रविभागयोस्तःस्तिथोर्हिमासौप्रथमांत्यसंज्ञौ ॥ २० ॥

अर्थ— स्पष्ट सूर्याची संक्रांति ज्या महिन्यांत मुळींच असत नाहीं त्या चांद्रमासाला अधिकमास ह्मणावें. व दोन संक्रांति ज्यांत असतात त्या चांद्रमासाला क्षयमास ह्मणावे. त्या क्षयमासाच्या प्रत्येक तिथीच्या पूर्वार्धीं लुप्तमास आणि उत्तरार्धीं पुढील मास असें समजावें.

॥ इति संक्रांतिप्रकरणं समाप्तम् ॥

॥ अथ गोचरप्रकरणम् ॥ ४ ॥

जन्म राशीपासून नवग्रहाचीं शुभस्थानें आणि वेधस्थानें.

(उपजाति २ इंद्रवज्रा १.)

सूर्योरसांत्येखयुगेग्निनंदेशिवाक्षयोर्भौमशनीतमश्च ॥ रसांकयोर्लाभशरेगुणांत्येचंद्रोंबराद्यौगुणनंदयोश्च ॥ १ ॥ लाभाष्टमेचाद्यशरे रसांत्येनगद्वयोर्न्नेद्विशराब्धिरामे रसांकयोर्नानविधौखनागेलाभव्ययेदेवगुरुःशराब्धौ ॥ २ ॥

द्व्यंत्येनवांशेद्रिगुणेशिवाग्नौशुक्रःकुनागेद्विनगेग्निरूपे॥नेदांबरेपंचनिधौनरो-
षौनंदेशयोर्भानुरलेशिवाग्नौ ॥ ३ ॥ क्रमाच्छुभोविद्धइतिग्रहःस्यात्पितुःसुत-
स्यात्रनवेधमाहुः ॥ दुष्टोपिखेटोविपरीतवेधाच्छुभोद्विकोणेशुभदःसितेऽब्जः॥ ४ ॥

ग्र.	रवि.	म.श.रा.के.	चंद्र.	बुध.	गुरु.	शुक्र.
शु.	६।१०।३।११	६।११।३	१०।३।११।१।६।७	२।४।६।८।१०।११	५।२।९।७।११	१।२।३।४।५।८।९।१२।११
वे.	१२।४।९।५	९।५।१२	४।९।८।५।१२।२	५।३।९।१।८।१२	४।१२।१०।३।३	८।७।१।१०।९।५।११।६।३

वर सर्व ग्रहांचीं शुभस्थानें आणि वेधस्थानें दिलीं आहेत. जन्म राशीपासून त्या त्या ठिकाणीं ग्रह असतां तें शुभ जाणावें. पण वेधस्थानीं कोणी ग्रह असतां शुभस्थानचा ग्रह अशुभ होतो. त्यांत पितापुत्रांचा मात्र एकमेकांस वेध होत नाहीं. रवीचा पुत्र शनि आणि चंद्राचा पुत्र बुध ह्मणून रवि शनिचा किंवा चंद्र बुधाचा कधीं एकमेकांस वेध नाहीं. इतर सर्वांचा वेध होतो. वेधस्थानीं ग्रह असून शुभस्थानीं वेध करणारा कोणी ग्रह असतां वेध स्थानाचा अशुभ ग्रहही शुभ जाणावा. अशा उलट वेधास वामवेध ह्मणतात. शुक्ल पक्षांत चंद्र २।५।९ ह्या स्थानीं शुभ जाणावा. यांस वेधस्थानें नाहींत. श्लोकांत प्रत्येक ग्रहांपुढें दोन दोन स्थानें आहेत त्यांतून पहिलें शुभस्थान व दुसरें त्याचें वेधस्थान अशीं आहेत. उदाहरण.–रवि जन्म राशीपासून ६ वा शुभ; परंतु त्याचें वेधस्थान १२ ह्या ठिकाणीं वेधकारक ग्रह असतां अशुभ होतो तसाच रवि बारावा अशुभ; परंतु षष्ठस्थानीं वेधकारक ग्रह असतां तो वामवेधामुळें शुभ होतो. याप्रमाणें सर्व ग्रह शुभ किंवा अशुभ पहावे.

वेधाविषयीं दोन मतें. (उपजाति.)

स्वजन्मराशेरिहवेधमाहुरन्येग्रहाधिष्ठितराशितःस्तः ॥
हिमाद्रिविंध्यांतरएववेधोनसर्वदेशेष्वितिकाश्यपोक्तिः ॥ ५ ॥

अर्थ--आपल्या जन्मराशीपासून वेधस्थान मोजावें. कित्येक ग्रंथकार ग्रह ज्या स्थानीं असेल त्या स्थानापासून वेधस्थान मोजावें असें ह्मणतात. परंतु हिमाद्रि आणि विंध्य ह्या दोन पर्वतांमधील देशांत मात्र वेध पहावा, बाकी सर्व देशांत पाहूं नये असें काश्यपाचें मत आहे. (मेष राशीपासून कन्येचा रवि सहावा ह्मणून शुभ; परंतु मेषापासून मीन बारावें ह्मणून त्या स्थानीं वेधकारक ग्रह असतां अशुभ होतो, हा एक प्रकार मेषापासून कन्येचा रवि सहावा ह्मणून शुभ; परंतु कन्येपासून सिंह बारावें त्या सिंहास वेधकारक ग्रह असतां कन्येचा षष्ठ रवि मेष राशीला अशुभ होतो हा दुसरा प्रकार. वामवेधांतही असेंच ह्मणजे मेष राशीपासून मीनाचा बारावा रवि अशुभ. परंतु कन्येला वेधकारक ग्रह असतां तो शुभ होतो हा पहिला प्रकार. मेषाला मीनाचा बारावा रवि अशुभ, परंतु मीनापासून सिंह सहावी राशि ह्मणून सिंहाला कोणी ग्रह असतां मीनाचा बारावा रवि मेषाला शुभ होतो हा दुसरा प्रकार होय. ह्या चार प्रकारांत वेधाविषयीं पहिलाच प्रशस्त दिसतो.)

ग्रहण फलें. (शार्दूलविक्रीडित.)

जन्मर्क्षेनिधनंग्रहेजनिभतोघातःक्षतिःश्रीर्व्यथाचिंतासौख्यकलत्रदौस्थ्यमृतयः
स्युर्माननाशःसुखं ॥ लाभोऽपायइतिक्रमात्तदशुभध्वस्त्यैजपःस्वर्णगोदानंशां-
तिरथोग्रहंत्वशुभदंनोवीक्ष्यमाहुःपरे ॥ ६ ॥

अर्थ --जन्म नक्षत्रावर सूर्याला किंवा चंद्राला ग्रहण लागलें असतां त्याचें फळ मृत्यु जाणावें जन्म राशीपासून १ घात (शरीरपीडा), २ क्षति (द्रव्य नाश), ३ श्री (लक्ष्मी प्राप्ति), ४ व्यथा, ५ चिंता-

६ सुख ७ पत्नीला दुःख, ८ मृत्यु, ९ मानभंग, १० सुख ११ लाभ, १२ अपाय हीं बारा फळें जाणावीं. जन्म राशीला ग्रहण असतां घात, द्वितीय राशीला ग्रहण असतां क्षति इत्यादि फळें पहावीं. ग्रहण अशुभ असतां जप आणि सुवर्ण, गो, रौप्य इ० दानें व धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें शांति करावी ह्मणजे ग्रहाचें अशुभ फळ टळतें अशुभ ग्रहण पाहूं नये असें कित्येकांचें मत आहे.

चंद्रबलाचा विशेष. (अनुष्टुप्)

पापांतःपापयुग्द्यूनेपापाच्चंद्रःशुभोऽप्यसन् ॥ शुभांशेचाधिमित्रांशेगुरुदृष्टोशुभोपिसन् ॥७॥

अर्थ -चंद्र, दोन पापग्रहांच्यामध्यें असतां किंवा पापग्रहानें युक्त असतां अगर कोणत्याही पापग्रहापासून सप्तम असतां तो शुभ असला तरी अशुभ जाणावा. आणि शुभ ग्रहाच्या नवांशीं किंवा अधिमित्राच्या नवांशीं, अथवा गुरूनें दृष्ट असतां अशुभ चंद्रही शुभ जाणावा.

चंद्रबलाचा दुसराप्रकार (अनुष्टुप्)

सितासितादौसद्दुष्टेचंद्रेपक्षौशुभावुभौ ॥ व्यत्यासेचाशुभौप्रोक्तौसंकटेब्जबलंत्विदम् ॥ ८ ॥

अर्थ-शुक्ल आणि कृष्णपक्षांच्या आरंभीं जन्मराशीपासून चंद्र शुभ आणि अशुभ असा क्रमानें असतां दोनही पक्ष शुभ जाणावे. ह्मणजे शुक्लपक्षाच्या आरंभीं चंद्र शुभ असला तर त्या सर्व पक्षांत चंद्रबल आहे; व कृष्णपक्षाच्या आरंभीं चंद्र अशुभ असला तर त्या सर्व पक्षांतही चंद्रबल आहे असें जाणावें. याच्या उलट ह्मणजे शुक्लपक्षारंभीं अशुभ आणि कृष्णपक्षारंभीं शुभ असा चंद्र असतां दोनही पक्ष अशुभ ह्मणजे चंद्रबल नाहीं असें जाणावें. हें चंद्रबल संकटाचे वेळीं घ्यावें विवाह यात्रादि अवश्य कर्तव्य असून अनिष्ट चंद्र असतां त्या वेळीं हें उपयोगांत आणावें.

ग्रहपीडा परिहानार्थ नवरत्न मुद्रिका निर्माण (शालिनी.)

वज्रंशुक्रेऽब्जेसुमुक्ताप्रवालंभौमेगौगोमेदमार्कौसुनीलम् ॥
केतौवैडूर्यंगुरौपुष्पकंज्ञेपाचिःप्राङ्माणिक्यमर्कंतुमध्ये ॥ ९ ॥

अर्थ-सुवर्णाची मुद्रिका ह्मणजे आंगठी करून तिच्यावर बाजूस सांगितल्याप्रमाणें पूर्वेपासून सर्व दिशांला त्या त्या ग्रहांचीं रत्नें बसवून ती धारण करावी ह्मणजे सर्व ग्रहांच्या पीडेचा परिहार होतो. पूर्वेस शुक्राप्रीत्यर्थ शुभ्रवर्ण हिरा आग्नेयीस चंद्रप्रीत्यर्थ मोती दक्षिणेस मंगळा प्रीत्यर्थ पोंवळें नैर्ऋत्येस राहु प्री०गोमेद, पश्चिमेस शनि प्री० नील, वायव्येस केतु प्री० वैडूर्य, उत्तरेस गुरु प्री० पुष्पराज ईशान्येस बुध प्री०पाच, सर्वांच्यामध्यें रवि प्री० माणिक्य.

ई.		पू.	आ.
	बु. पाचि	शु. हिरा	चं. मोती
उ.	गु. पुष्पराज.	सू. माणिक्य.	मं. पोंवळें द.
	के. वैडूर्य	श. नील	रा. गोमेद
वा.		प	नै.

प्रत्येक ग्रहाचीं निरनिराळीं रत्नें. (इंद्रवज्रा)

माणिक्यमुक्ताफलविद्रुमाणिगारुत्मकंपुष्पकवज्रनीलम् ॥
गोमेदवैडूर्यकमर्कतःस्यूरत्नान्यथोज्ञस्यमुदेसुवर्णम् ॥ १० ॥

अर्थ—मागील श्लोकांत सर्व ग्रहांच्या पीडा परिहारार्थ नवरत्न मुद्रिकाधारण करण्याविषयीं सांगितलें. परंतु तशी मुद्रिका करण्यास सामर्थ्य नसेल त्यानें जो ग्रह अनिष्ट असेल त्याचें रत्न धारण करावें ह्मणजे त्या ग्रहाच्या पीडेचा परिहार होतो. सूर्यपीडा परिहारार्थ माणिक्य, चंद्रापी० मोतीं, मंगळा पी० पोंवळें, बुधा पी० गरुडपाचि, गुरुपी० पुष्पराज, शुक्रपी० हिरा, शनिपी० नील, राहुपी० गोमेद केतुपी० वैडूर्य. 'ज्ञस्यमुदेसुवर्ण' याचा संबंध पुढील श्लोकांत आहे.

अल्प मूल्यरत्नें आणि ताराबल (शालिनी)

धार्यैलाजावर्तकंराहुकेत्वोरौप्यंशुक्रेंद्वोश्चमुक्तंगुरोस्तु ॥

लोहंमंदस्यारभान्वोःप्रवालंताराजन्मर्क्षात्त्रिरावृत्तितःस्यात् ॥ ११ ॥

अर्थ–मागील श्लोकांत सांगितलेलीं रत्नें ही धारण करण्याचें ज्यास सामर्थ्य नसेल त्यानें पुढें सांगितलेलीं अल्प किंमतीचीं धारण करावीं. बुधा प्रीत्यर्थ सुवर्ण, राहु आणि केतु प्री० लाजावर्त मणि, शुक्र व चंद्र प्री० रौप्य, गुरु प्री० मोतीं शनि प्री० लोखंड, मंगल आणि रवि प्री० पोंवळें. जन्मनक्षत्रापासून तीन आवृत्तींनीं म्हणजे फेऱ्यांनीं तारा जाणावीं. म्हणजे ज्या दिवशीं ताराबल पहावयाचें असेल त्या दिवसाच्या नक्षत्रापर्यंत आपल्या जन्मनक्षत्रापासून मोजून ९ नीं भागावें बाकी ३।५।७ असतां ताराबल नाहीं. अर्थात् याहून इतर बाकी असतां ताराबल आहे असें जाणावें. शुक्ल पक्षांत चंद्रबल श्रेष्ठ आणि कृष्णपक्षांत ताराबल श्रेष्ठ होय.

तारांची नांवें. (अनुष्टुप्.)

जन्माख्यसंपद्विपदःक्षेमप्रत्यरिसाधकाः ॥ वधमैत्रातिमैत्राःस्युस्तारानामसदृक्फलाः ॥ १२ ॥

अर्थ–मागच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें ९ नीं भागून बाकी राहील त्या तारांचीं अनुक्रमें पुढील नांवें समजावीं. नांवाच्या अर्थाप्रमाणें तारांचीं फळें आहेत. १ जन्म, २ संपत्, ३ विपत्, ४ क्षेम, ५ प्रत्यरि, ६ साधिका, ७ वध, ८ मैत्र, ९ अतिमैत्र. ह्यांतील ३।५।७ अशुभ आणि इतर सर्व नांवें शुभ आहेत.

दुष्ट तारांचे दोन परिहार. (शार्दूलविक्रीडित.)

मृत्यौस्वर्णतिलान्विपद्यपिगुडंशाकंत्रिजन्मस्वथोदद्यात्प्रत्यरितारकासुलवणं
सर्वोविपत्प्रत्यरिः ॥ मृत्युश्चादिमपर्ययेनशुभदोथैषांद्वितीयेंशकानादिमांत्य
तृतीयकाअथशुभाःसर्वेतृतीयेस्मृताः ॥ १३ ॥

अर्थ-मृत्यु तारा ह्मणजे सातवी वध तारा असून त्या वेळीं अवश्य शुभ कार्य कर्तव्य असतां सुवर्ण सहित तीळ दान द्यावें विपत् नामक तिसऱ्या तारेला गुळ द्यावा. सत्तावीस नक्षत्रांत ९ तारांच्या तीन आवृत्ति होतात. सर्व नक्षत्रांत प्रत्येक नांवाची तारा ३ तीन वेळ येते म्हणून तीन ही जन्म तारांस शाक ह्मणजे वांगीं, पडवळ इ० द्यावीं. पांचवी प्रत्यरितारा हिला (मीठ) दान द्यावें. हीं दानें दिल्यानें संकटीं दुष्ट तारा शुभ जाणाव्या. हा दुष्ट तारांचा पहिला परिहार होय. पहिल्या आवृत्तींतील तिसरी विपत् पांचवी प्रत्यरि आणि सातवी वध ह्या तीन ही तारांचा सर्व काळ ह्मणजे ६० घटिका अशुभ होत. दुसऱ्या आवृत्तींतील विपत् तारेचा पहिला चरण अशुभ, प्रत्यरि तारेचा चतुर्थ चरण अशुभ, आणि वध तारेचा तिसरा चरण अशुभ असें जाणावें तिसऱ्या आवृत्तींतील, विपत् प्रत्यरि आणि वध ह्या तीनही तारा शुभ जाणाव्या. हा दुसरा परिहार. ह्या दोहोंचाही उपयोग संकट विषयक जाणावा. (मागें जन्मतारा शुभ सांगितली परंतु ह्या श्लोकांत तिलाच दान लिहिलें आहे ह्मणून जन्मतारा मध्यम आहे. असे स्पष्ट दिसतें.

चंद्राच्या अवस्था (अनुष्टुप् १) उपजाति. १)

षष्ठिघ्नंगतभंभुक्तघटीयुक्तंयुगाहतम् ॥ शराग्निहृल्लब्धतोर्कशेषेवस्थाःक्रियाद्विधोः ॥ १४ ॥
प्रवासनाशौमरणंजयश्च हास्यारतिक्रीडितसुप्तभुक्ताः ॥
ज्वराख्यकंपास्थिरता अवस्था मेषात्क्रमान्नामसदृक्फलाःस्युः ॥ १५ ॥

अर्थ–इष्ट काळीं जें नक्षत्र असेल त्याच्या पूर्वींचीं अश्विनीपासून भुक्त नक्षत्रें मोजून त्यांला ६० नीं गुणावें. त्या गुणाकारांत वर्तमान नक्षत्रांच्या इष्ट वेळेंपर्यंतच्या भुक्त घटिका मिळवाव्या. मग त्या संख्येला ४ नीं गुणून ४५ नीं भागावें बाकी राहील तिला १२ नीं भागून १ बाकी असतां प्रवास अवस्था असतां नाशावस्था इ० मेषापासून चंद्राच्या १२ अवस्था पुढें लिहिलेल्या जाणाव्या १ प्रवास, २ नाश, ३ मरण ४ जय, ५ हास्य, ६ रति, ७ क्रीडित; ८ सुप्त. ९ भुक्त, १० ज्वर, ११ कंप, १२ स्थिर, ह्या चंद्राच्या अवस्था नांवांच्या अर्थासारख्या शुभ किंवा अशुभ फल देणाऱ्या आहेत. ज्याची मेष राशि असेल त्यानें प्रवासापासून मोजाव्या. वृषभ राशि असेल त्यानें नाशापासून मोजाव्या, मिथुन असेल त्यानें म

पासून इ० सर्व पुढच्याही मोजाव्या. उदाहरण;--कन्या राशीच्या पुरुषाचे कांहीं शुभकार्य रोहिणी नक्षत्रावर आहे. त्या दिवशीं रोहिणी घटी ४५ पळें ० शुभकार्याची इष्ट वेळा घटी १२ पळें ० ह्या वेळी चंद्राची अवस्था कोणती आहे हें पहावयाचें ह्मणून गत नक्षत्र कृतिका हें अश्विनीपासून ३ × ६० = १८० हा गत नक्षत्राला साठांनीं गुणून गुणाकार झाला. आतां पूर्व दिवशीं कृतिका घ० ४२ नंतर रोहिणी भोगूं लागलें म्हणून अहोरात्रीच्या घटी ६० ह्यांतून ४२ वजा केल्यानें बाकी १८ इतके सूर्योदया पूर्वी रोहिणी नक्षत्र भोगलें ह्यांत उदयापासून घ० १२ मिळवून घ० ३० हा भुक्त घटी रोहीणीच्या झाल्या. मागील १८०+३०=२१० × ४=८४० हा ४ नीं गुणून गुणाकार आला. झाला ४५ नीं भागून बाकी ३० राहिली तिला १२ नीं भागून बाकी ६ आतां ज्याचें शुभ कार्य त्याची राशि कन्या ह्मणून रति अवस्थेपासून सहावी कंप ही इष्टकाळीं चंद्राची अवस्था निघाली. ही कंपावस्था अशुभ या करिता अशा वेळीं शुभकार्य करूं नये.

ग्रहपीडा परिहारार्थ स्नान आणि दक्षिणा. (शार्दूलविक्रीडित.)

लाजाकुष्ठबलाप्रियंगुघनसिद्धार्थैर्निशादारुभिःपुंखालोध्रयुतैर्जलैर्निगदितंस्नानं ग्रहोत्थाघहृत् ॥ धेनुःकंबुररुणोवृषश्च कनकंपीताम्बरंघोटकःश्वेतोगौरसिता महासिरजइत्येतारवेर्दक्षिणाः ॥ १६ ॥

अर्थ-लाजा ह्मणजे भाताच्या लाह्या, किंवा लाजरी; कुष्ठ ह्मणजे कोष्ठ कोळिंजन; बला ह्मणजे चिकणा; प्रियंगु ह्मणजे कांग; घन ह्मणजे नागरमोथा, सिद्धार्थ ह्मणजे पांढरी मोहरी; निशा ह्मणजे हळद व दारुहळद, देवदारू; पुंगा ह्मणजे उन्हाळी; लोध्र ह्मणजे बाभळीच्या झाडाची साल हे १२ पदार्थ शुद्ध उदकांत घालून त्या उदकानें स्नान सर्व ग्रहांच्या पीडेचा परिहार करणारें आहे. सूर्याला धेनु, चंद्राला शंख, मंगळाला तांबडा बैल, बुधाला सुवर्ण, गुरूला तांबडें वस्त्र (कापसाचें किंवा रेशमी), शुक्राला पांढरा घोडा, शनीला काळी गाय, राहूला तरवार किंवा मोठी सुरी, केतूला बकरा, अशा ग्रहांच्या दक्षिणा आहेत ज्या ग्रहाची पीडा असेल त्याची दक्षिणा दिल्यानें पीडेचा परिहार होतो.

पुढील राशींत जाण्यापूर्वी ग्रहांच्या फळाचा अवधि. (उपजाति.)

सूर्यारसौम्यास्फुजितोक्षनागसप्ताद्रिघस्रान्विधुरग्निनाडीः ॥
तमोयमेज्याश्चिरसाब्धिमासान्गंतव्यराशेः फलदाःपुरस्तात् ॥ १७ ॥

अर्थ-प्रत्येक ग्रह पुढच्या राशींत जाण्यापूर्वी मागच्या राशींतूनच पुढल्या राशींचें फळ कांहीं काळ देतो. त्याचा नियम पुढें सांगितल्याप्रमाणें जाणावा. सूर्य ५ दिवस, मंगळ ८ दिवस, बुध ७दिवस, शुक्र ७ दिवस पुढील राशींत जाण्यापूर्वी फळ देऊं लागतो. चंद्र ३ घटिका पूर्वी फळ देतो. राहू ३ मास, शनि ६ मास, आणि गुरु २ मास मागील राशींत असून पुढच्या राशींचें फळ देतो केतूचें राहुप्रमाणेंच फळ जाणावें.

दुष्ट तिथ्यादिकांवर मंगल कार्य करण्याविषयीं दानें. (शालिनी)

दुष्टेयोगेहेमचंद्रेचशंखंधान्यंतिथ्यर्धेतिथौतंदुलांश्च ॥
वारेरत्नंभेचगांहेमनाड्यांदद्यात्सिंधूत्थंचतारासुराजा ॥ १८ ॥

अर्थ—विवाह यात्रा इत्यादि मंगल कार्यें अवश्य कर्तव्य असून त्या त्या कार्याला सांगितलेली तिथि नक्षत्रादि मिळत नसतां पुढें सांगितलेली दानें करून राजानें मंगल कार्यें करावी, व्यतिपातादि दुष्ट योग असतां सुवर्ण; चंद्र अशुभ असतां शंख; तिथ्यर्ध ह्मणजे करण अशुभ असतां धान्य; रिक्तादि दुष्ट तिथि असतां तांदूळ; वारदुष्ट असतां रत्न ह्मणजे पोवळें, मोतीं, वगैरे खल ग्रह युक्त इ० दुष्ट लग्न असतां धेनु दुर्मुहूर्तादि दुष्ट नाडी असतां सुवर्ण; विपत्, प्रत्यरि, वध ह्या दुष्ट तारा असतां लवण दान द्यावें. राजा वाचून इतरानेंही हीं दानें करून मंगळ कार्यें संकटीं करावें.

ग्रहांचें पूर्ण फळ आणि जन्मनक्षत्र व वार यांच्या योगाचें फळ. (वसंततिलका.)

राश्यादिगौरविकुजौफलदौ सितेज्यौमध्येसदाग्निसुतश्चरभेन्जमंदौ ॥

अध्वान्नवन्हिभयसन्मतिवस्त्रसौख्यदुःखानिमासिजनिभैरविवासरादौ ॥ १९ ॥

अर्थ--रवि आणि मंगळ हे कोणत्याही राशींत गेल्यावर त्या राशींतील आरंभींचे १० अंश भोगीपर्यंत शुभ किंवा अशुभ फळ पूर्ण देतात. शुक्र आणि गुरु हे मध्यें ह्मणजे १० अंशापासून २० अंश भोगीपर्यंत पूर्ण फळ देतात. बुध सर्व राशींत निरंतर पूर्ण फळ देतो. चंद्र आणि शनि हे शेवटीं ह्मणजे राशींच्या २० अंशापासून अखेरपर्यंत पूर्ण फळ देतात. सर्व ग्रहराशींच्या इतर अंशी असतां अल्प फळ देतात. प्रत्येक महिन्यांत रव्यादि ७ वारी जन्मनक्षत्राचा आरंभ झाला असतां अध्वा, अन्नलाभ, वन्हिभय सन्मति, वस्त्रप्राप्ति. सौख्य, दुःख हीं अनुक्रमें ७ फळें जाणावीं. ज्या महिन्यांत ज्याचें जन्म नक्षत्र रविवारीं येईल त्या महिन्यांत त्या पुरुषाला अध्वा ह्मणजे देशपर्यटन, सोमवारीं अन्न लाभ इत्यादि जाणावें. या ठिकाणीं चांद्रमानाचा मास ह्मणजे शुक्ल प्रतिपदेपासून आमावास्यांत घ्यावा.

॥ इतिगोचरप्रकरणं समाप्तम् ॥

॥ अथ संस्कारप्रकरणम् ॥ ५ ॥

प्रथम रजोदर्शनीं शुभ मासादि. (अनुष्टुप्)

आद्यंरजःशुभंमाघमार्गराधेषफाल्गुने ॥ ज्येष्ठश्रावणयोःशुक्लेसद्वारेसत्तनौदिवा ॥ १ ॥

अर्थ--माघ, मार्गशीर्ष, आश्विन, फाल्गुन, ज्येष्ठ, श्रावण, ह्या ६ महिन्यांत शुक्ल पक्षांत, शुभ (चंद्र-बुध, गुरु, शुक्र) ग्रहांच्या वारीं, तसेच शुभ ग्रहाच्या लग्नीं आणि दिवसास प्रथम रजोदर्शन शुभ जाणावें (कृष्णपक्षांत दशमीपर्यंत मध्यम व पुढें अशुभ जाणावें.)

रजोदर्शनाला शुभ, मध्यम आणि अशुभ नक्षत्रें. (अनुष्टुप्)

श्रुतित्रयमृदुक्षिप्रध्रुवस्वातौसितांबरे ॥ मध्यंचमूलादितिभेपितृमिश्रेपरेष्वसत् ॥ २ ॥

अर्थ-श्रवणापासून तीन ह्मणजे श्रवण, धनिष्ठा, शततारका, मृदु ४ क्षिप्र ४ ध्रुव४ आणि स्वाती ह्या १६ नक्षत्रांवर व शुभ्र वस्त्र स्त्रीनें परिधान केलेलें असता प्रथमार्तव शुभ होय. मूळ, पुनर्वसु, मघा, मिश्र २ ह्या ५ नक्षत्रीं प्रथम रजोदर्शन मध्यम आणि इतर नक्षत्रीं ह्मणजे भरणी, ज्येष्ठा, आर्द्रा, आश्लेषा, पूर्वाफ० पूर्वाषाढा व पूर्वाभाद्रपदा ह्या ७ नक्षत्रीं अशुभ जाणावें.

रजोदर्शनीं दुष्ट तिथ्यादि. (शालिनी.)

भद्रानिद्रासंक्रमेदर्शरिक्तासंध्याषष्ठीद्वादशीवैधृतेषु ॥
रोगेष्टम्यांचंद्रसूर्योपरागेपातेचाद्यंनोरजोदर्शनंसत् ॥ ३ ॥

अर्थ--भद्राकरणीं, निद्रावस्थेंत संक्रांतिवर, अमावास्येला, रिक्तातिथींला, प्रातःकाळ, मध्यान्हकाळ व सायंकाळ ह्या संध्या संज्ञक ३ काळीं, षष्ठी व द्वादशी तिथींवर वैधृतियोगीं स्त्रीला ज्वरादि रोग उत्पन्न झालेला असतां, अष्टमी तिथींवर, चंद्र सूर्यांच्या ग्रहणीं, व्यतीपात योगावर आणि महापातावर स्त्रीला प्रथम रजोदर्शन झालें असतां अशुभ जाणावें.

रजस्वला स्त्रीला स्नानाचा मुहूर्त. (वसंततिलक.)

हस्तानिलाश्विमृगमैत्रवसुध्रुवाख्यैःशक्रान्वितैःशुभतिथौशुभवासरेच ॥
स्नायादथार्तववतीमृगपौष्णवायुहस्ताश्विधातृभिररंलभतेचगर्भम् ॥ ४ ॥

अर्थ--हस्त, स्वाती, आश्विनी, मृगशीर्ष, अनुराधा, धनिष्ठा, ध्रुव ४ ज्येष्ठा ह्या ११ नक्षत्रांवर, रिक्ता अमावास्या रहित शुभ तिथींवर, आणि शुभ ग्रहांच्या वारीं ऋतुमती स्त्रियेनें स्नान करावें. मृगशीर्ष, रेवती

स्वाती, हस्त, अश्विनी, रोहिणी ह्या ६ नक्षत्रांवर ऋतुमतीनें स्नान केलें असतां ती स्त्री त्वरित गर्भ धारण करितें. (ऋतुमती स्त्रीनें चतुर्थ दिवशीं स्नान करण्याचा प्रघात बहुतेक देशांत आहे आणि तो धर्मशास्त्राच्या नियमानें सशास्त्र आहे खरा; परंतु कित्येक देशांत चतुर्थ दिवशीं स्नान न करितां वर सांगितलेल्या मुहूर्तांवर करितात, याकरिता ग्रंथांत सांगितला आहे.)

गर्भाधान मुहूर्त. (शार्दूलविक्रीडित. १ शालिनी. १)

गंडांतंत्रिविधंत्यजेन्निधनजन्मर्क्षेचमूलांतकंदास्त्रंपौष्णमघोपरागदिवसान्पातंत-
थावैधृतिम् ॥ पित्रोःश्राद्धदिनंदिवाचपरिघाद्यर्धंस्वपत्नीगमेभान्युत्पातहता-
निमृत्युभवनंजन्मर्धतःपापभम् ॥ ५ ॥ भद्राषष्ठीपर्वरिक्ताश्चसंध्याभौमार्कार्की
नाद्यरात्रीश्चतस्रः ॥ गर्भाधानंत्र्युत्तरेंद्वर्कमैत्रब्राह्मस्वातीविष्णुवस्वंबुपेसत् ॥ ६ ॥

अर्थ--तिथिगंडांत, नक्षत्रगंडांत लग्नगंडांत हीं तीन गंडांतें (विवाह प्र० श्लोक ४३ पहा) निधनर्क्ष ह्मणजे जन्मनक्षत्रापासून सातवें नक्षत्र, जन्मनक्षत्र, मूळ, भरणी, अश्विनी, रेवती, मघा हीं ५ नक्षत्रें, ग्रहण दिवस व्यतीपात, महापात, वैधृति, मातापितरांचा श्राद्धदिवस, उदयापासून अस्तापर्यंतचे सर्व दिवस, परिघयोगाचे पूर्वार्ध, उत्पात दूषित नक्षत्रें, जन्म लग्नापासून व जन्म राशीपासून अष्टम लग्नें, खल ग्रहानें युक्त नक्षत्र हीं सर्व पत्नीगमनाला ह्मणजे गर्भाधानाला वर्ज्य करावीं भद्रा संज्ञक तिथि, षष्ठी, पर्वें ह्मणजे चतुर्दशी, अष्टमी, आमावास्या, पूर्णिमा, संक्रांति हीं पांच, रिक्ता तिथि, संध्या ह्मणजे सूर्योदयापूर्वी ३ घटि आणि सूर्यास्ता नंतर ३ घटि मंगळ, रवि, शनिवार, आणि रजोदर्शन झाल्यापासून पहिल्या ४ रात्रीं हीं सर्व गर्भाधानीं वर्ज्य जाणावीं उत्तराफा० उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, मृगशीर्ष, हस्त, अनुराधा, रोहिणी, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका ह्या ११ नक्षत्रावर गर्भाधान शुभ जाणावें.

गर्भाधानाचे लग्न आणि मध्यम नक्षत्रें. (इंद्रवज्रा)

केंद्रत्रिकोणेषुशुभैश्चपापैस्त्र्यायारिगैःपुंग्रहदृष्टलग्ने ॥
ओजांशकेब्जेपिचयुग्मरात्रौचित्रादितिज्याश्विषुमध्यमंस्यात् ॥ ७ ॥

अर्थ--रात्रौ गर्भाधानाच्या इष्ट लग्नापासून केंद्रीं (१।४।७।१०) आणि त्रिकोणीं (५।९) शुभ ग्रह असता, आणखी ३।११।६ ह्या स्थानी पापग्रह असतां; पुरुष संज्ञक ग्रह ह्मणजे रवि, मंगळ, गुरु ह्यांची लग्नावर दृष्टि असतां; विषम राशीच्या नवांशीं चंद्र असतां; आणि लग्नाच्या विषम नवांशीं, व ऋतुदर्शनापासून समरात्रीस गर्भाधान करणें शुभ जाणावें. चित्रा पुनर्वसु पुष्य अश्विनी हीं ४ नक्षत्रें गर्भाधानाविषयीं मध्यम होत. (हा पुत्रार्थी असेल त्याविषयीं मुहूर्त होय. कन्यार्थी असेल त्यानें वरीलच नक्षत्रादिकांवर गर्भाधान करावें. परंतु स्त्रीसंज्ञक ग्रह म्हणजे चंद्र शुक्र यांची लग्नीं दृष्टि असतां आणि समराशीच्या नवांशीं चंद्र असतां व लग्नाच्या सम आणि विषम रात्रीस करावें.)

सीमंतोन्नयनाचा मुहूर्त. (शार्दूलविक्रीडित.)

जीवार्कारदिनेमृगेज्यनिर्ऋतिश्रोत्रादितिब्रध्नभैरिक्तामार्करसाष्टवर्ज्यतिथिभि-
र्मासाधिपेपीवरे ॥ सीमंतोष्टमषष्ठमासिशुभदैःकेंद्रत्रिकोणेखलैर्लाभारित्रिषु-
वाध्रुवांत्यसदहेलग्नेचपुंभांशके ॥ ८ ॥

अर्थ--गुरु, रवि मंगळ ह्यांच्यावारीं मृगशीर्ष, पुष्य, मूळ, श्रवण, पुनर्वसु हस्त ह्या ६ नक्षत्रीं; रिक्ता तिथि, अमावास्या, षष्ठी, अष्टमी ह्या तिथि वर्ज्य करून अन्य तिथींवर, मासपति पीवर ह्मणजे बलवान् असून पुष्ट असतां तसेच गर्भ धारण झाल्यापासून आठव्या किंवा सहाव्या मासांत, शुभग्रह इष्ट लग्नापासून केंद्रीं व त्रिकोणीं असतां आणि खलग्रह ११।६।३ ह्या स्थानीं असता सीमंतोन्नयन शुभ जाणावें. वरील नक्षत्रें मिळत नसतां ध्रुव ४ आणि रेवती हीं ५ नक्षत्रें व शुभ ग्रहाचे वार सीमंतोन्नयनाला शुभ

जाणावे (विषम राशी पुरुषसंज्ञक आणि सम राशी स्त्रीसंज्ञक आहेत.) लग्न पुरुषसंज्ञक म्ह० विषम आणि त्याचा नवांशही पुरुष संज्ञक म्हणजे विषमच असावा.

मासपति आणि स्त्रियांच्या चंद्रबलाविषयीं निर्णय. (वसंततिलक.)

मासेश्वराःसितकुजेज्यरवींदुसौरचंद्रात्मजास्तनुपचंद्रदिवाकराःस्युः ॥
स्त्रीणांविधाबलमुशंतिविवाहगर्भसंस्कारयोरितरकर्मसुभर्तुरेव ॥ ९ ॥

अर्थ–स्त्रियांच्या ठिकाणीं गर्भ धारण झाल्यापासून दहाव्या मासांत प्रसूति होते असा सामान्य नियम आहे. ह्या १० मासांचे अनुक्रमानें पुढील ग्रह मासपति समजावे. १ शुक्र, २ मंगळ, ३गुरु, ४ रवि,५चंद्र, ६ शनि, ७ बुध, ८ तनुप, ९ चंद्र,१०रवि. ह्यांतील अष्टम मासपति तनुप ह्मणजे ज्या लग्नावर स्त्रीला गर्भ राहिला असेल त्या लग्नाचा अधिपति जाणावा मागें गोचर प्रकरणांत सांगितलेलें चंद्रबल स्त्रियांच्या विवाहीं आणि गर्भ संस्कारीं अवश्य असलें पाहिजे ह्या शिवाय स्त्रीच्या कोणत्याही मंगल कार्याला. तिच्या भर्त्याचेंच चंद्रबल घ्यावें. स्त्रीला नसलें तरी चालेल. विधवा स्त्रीला मात्र तिचेंच चंद्रबल घ्यावें.

पुंसवन आणि विष्णुबलि. (इंद्रवज्रा.)

पूर्वोदितैःपुंसवनंविधेयंमासेतृतीयेत्वथविष्णुपूजा ॥
मासेष्टमेविष्णुविधातृजीवैर्लग्नेशुभेमृत्युगृहेचशुद्धे ॥ १० ॥

अर्थ–पूर्वी सीमंतोन्नयनाला सांगितलेल्या तिथि नक्षत्रादिकांनीं युक्त मुहूर्तावर गर्भधारण. झाल्यापासून तिसऱ्या महिन्यांत पुंसवन करावें. गर्भापासून अष्टम मासांत श्रवण रोहिणी, पुष्य ह्या ३ नक्षत्रांवर; आणि शुभ ग्रहाच्या लग्नीं किंवा शुभग्रह युक्त अथवा शुभग्रहं दृष्ट लग्नीं विष्णुपूजा ह्मणजे विष्णुबलि करावा. ह्या विष्णुबलीच्या इष्ट लग्नापासून अष्टम स्थान शुद्ध ह्मणजे शुभ व खलग्रह रहित असावें.

जातकर्म आणि नामकरण यांचे मुहूर्त (उपजाति.)

तज्जातकर्मादिशिशोर्विधेयंपर्वाख्यरिक्तोनतिथौशुभेन्हि ॥
एकादशेद्वादशकेपिघस्रेमृदुध्रुवक्षिप्रचरोडुषुस्यात् ॥ ११ ॥

अर्थ–पुत्रजन्म झाल्याबरोबर नालच्छेदनाचे पूर्वी जातकर्म करावें. त्यावेळीं राहिलें असतां पर्वं ह्मणजे चतुर्दशी, अष्टमी, अमावस्या, पूर्णिमा, सूर्य संक्रांति हीं पांच आणि रिक्तातिथि वर्जून अन्य तिथींवर, शुभग्रहांच्यावारीं, पुत्र जन्मापासून अकराव्या किंवा बाराव्या दिवशीं मृदु ४, ध्रुव ४, क्षिप्र ४, चर ५ ह्या १७ नक्षत्रांवर जातकर्म करावें. नामकरणालाही हाच मुहूर्त जाणावा.

सूतिकास्नान मुहूर्त. (वसंततिलक.)

पौष्णध्रुवेंदुकरवातहयेषुसूतीस्नानंसमित्रभरवीज्यकुजेषुशस्तम् ॥
नार्द्रात्रयश्रुतिमघांतकमिश्रमूलत्वाष्ट्रेज्ञसौरिदिवसेषुषड्विरिक्ततिथ्याम् ॥ १२ ॥

अर्थ–रेवती, ध्रुव ४ मृगशीर्ष, हस्त, स्वाती, अश्विनी, अनुराधा ह्या १० नक्षत्रांवर आणि रवि, गुरु, मंगळ यांच्यावारीं सूतिकास्नान प्रशस्त जाणावें. आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, श्रवण, मघा, भरणी, मिश्र, २ मूळ चित्रा ह्या १० नक्षत्रीं, आणि बुधवारीं, शनिवारीं अष्टमी, षष्ठी, द्वादशी रिक्ता ह्या तिथींवर सूतिकास्नान अशुभ होय

बालकाला प्रथमादिमासांत दंतोत्पत्ति झाल्याचीं फळें. (शार्दूलविक्रीडित.)

मासेचेत्प्रथमेभवेत्सदशनोबालोविनश्येत्स्वयंहन्यात्सक्रमतोनुजातभगिनीमा-
त्रग्रजान्द्यादिके ॥ षष्ठादौलभतेहिभोगमतुलंतातात्सुखंपुष्टतांलक्ष्मींसौख्यम-
र्थांजनौसदशनोवोर्ध्वस्वपित्रादिहा ॥ १३ ॥

अर्थ–जन्मानंतर बालकाला प्रथम मासांत जर दंतोत्पत्ति झाली तर तें बालक आपणच नाश पावतें द्वितीयमासांत आपल्याहून कनिष्ठ भ्रात्याला, तृतीयांत भगिनीला, चतुर्थांत मातेला, आणि पंचमांत दंतोत्पत्ति झाली असतां ज्येष्ठ भ्रात्याला बालक मारितें. सहाव्या महिन्यांत अनेक सुखोपभोग, सातव्यांत पित्यापासून सुख, आठव्यांत शरीर पुष्टता, नवव्यांत लक्ष्मी, आणि दहाव्यांत दंतोत्पत्ति झाली तर बालक सौख्य पावतें. यापुढें ही दंतोत्पत्ति झाल्यास सुखच जाणावें जन्मताच दात आलेले असले तर किंवा पुढें कोणत्याही महिन्यांत वरच्या पंक्तींत प्रथम दंतोत्पत्ति होईल तर असें बालक आपला, पित्याचा व मातेचा नाश करितें.

दोलाचक्र (अनुष्टुप्)

दोलारोहेर्कभात्पंचशरपंचेषुसप्तभैः॥नैरुज्यंमरणंकार्श्यंव्याधिःसौख्यंक्रमाच्छिशोः॥१४॥

अर्थ–सूर्य नक्षत्रापासून दिवस नक्षत्र मोजून पहिल्या ५ नक्षत्रांत बालकाला पाळण्यांत ठेविलें असतां तें निरोगी होतें त्या पुढील ५ नक्षत्रीं मरण पुढच्या ५ नक्षत्रीं कृशत्व, पुढील ५ नक्षत्रीं व्याधि आणि शेवटील ७ नक्षत्रीं सौख्य अशीं फळें जाणावीं. हें दोलाचक्र होय. ह्यांतील पहिलीं ५ व शेवटचीं ७ मिळून १२ नक्षत्रें शुभ आणि बाकी १५ नक्षत्रें अशुभ होत.

दोलारोहण व निष्क्रमण यांचे मुहूर्त. (वसंततिलक)

दंतार्कभूपधृतिदिङ्मितवासरेस्याद्वारेशुभेमृदुलघुध्रुवभैःशिशूनां॥
दोलाधिरूढिरथनिष्क्रमणंचतुर्थमासेगमोक्तसमयेर्कमितेन्हिवास्यात्॥१५॥

अर्थ–बालकाच्या जन्मापासून ३२।१२।१६।१८।१० ह्यांतील कोणत्याही दिवशीं शुभ ग्रहाच्यावारीं आणि मृदु ४ लघु ४ ध्रुव ४ ह्या १२ नक्षत्रांवर दोलारोहण करावें म्हणजे बालकाला पाळण्यांत ठेवावें. मागच्या श्लोकांतील दोलाचक्राचा या मुहूर्तीं उपयोग करावा. चतुर्थ मासांत व पुढें यात्रा प्रकरणांत सांगितलेल्या गमन मुहूर्तीं. किंवा बारावे दिवशीं निष्क्रमण (घरांतून बाहेर नेणें) करावें.

प्रसूत झालेल्या स्त्रीनें जलपूजा करण्याचा मुहूर्त. (भुजंगप्रयात.)

कवीज्यास्तचैत्राधिमासेनपौषेजलंपूजयेत्सूतिकामासपूर्तौ॥
बुधेंद्वीज्यवारेविरिक्तेतिथौहिश्रुतीज्यादितीढ्र्कनैर्ऋत्यमैत्रे॥१६॥

अर्थ–शुक्र आणि गुरु यांच्या अस्तामध्यें चैत्र अधिकमास व पौष ह्या महिन्यांत; प्रसूत झालेल्या स्त्रीनें जलपूजा करूं नये. ही जलपूजा प्रसूतीला एक महिना झाल्यावर पुढें कोणत्याही महिन्यांत, बुध, चंद्र, गुरु ह्यांच्या वारीं, रिक्ता रहित तिथींवर, आणि श्रवण, पुष्य पुनर्वसु, मृगशीर्ष, हस्त मूळ अनुराधा ह्या ७ नक्षत्रांवर शुभ जाणावी.

अन्नप्राशन मुहूर्त. (स्रग्धरा.)

रिक्तानंदाष्टदर्शंहरिदिवसमथोसौरिभौमार्कवारान्। लग्नंजन्मर्क्षलग्नाष्टमगृहलव गंमीनमेषालिकंच॥ हित्वाषष्ठात्समेमास्यथहिमृगदृशांपंचमादोजमासे। नक्षत्रैःस्यात्स्थिराख्यैः समृदुलघुचरैर्बालकान्नाशनंसत्॥१७॥

अर्थ––रिक्तातिथि ह्म० ४।९।१४ नंदातिथि ह्म० १।६।११ आणि अष्टमी, आमावास्या, द्वादशी ह्या सर्व तिथि; शनि, मंगळ, रवि हे वार; व जन्मराशी,आणि जन्मलग्न ह्यांपासून अष्टम लग्नें व अष्टमनवांश; तशींच मीन, मेष; वृश्चिक लग्नें हीं सर्व वर्ज्य करून पुरुषाला सहाव्या महिन्यापासून सम ह्म० ६।८।१०। १२ ह्या महिन्यांत अन्न प्राशन करावें. कन्येला पांचव्या महिन्यापासून विषम ह्मणजे ५।७।९।११ ह्या महिन्यांत करावें. स्थिर ४ मृदु ४ लघु ४ चर ५ हीं १७ नक्षत्रें अन्न प्राशनाला शुभ समजावीं.

अन्नप्राशनाचें लग्नबल. (वसंततिलका.)

केंद्रत्रिकोणसहजेषु शुभैः खशुद्धे लग्ने त्रिलाभरिपुगैश्च वदंति पापैः ॥
लग्नाष्टषष्ठरहितं शशिनं प्रशस्तं मैत्रांबुपानिलजनुर्भमसच्च केचित् ॥ १८ ॥

अर्थ –केंद्र (१।४।७) त्रिकोण (५।९) ह्या स्थानीं व तृतियस्थानीं शुभ ग्रह असतां तसेंच दशम स्थान शुद्ध ह्म० शुभ व खलग्रहरहित असतां; आणि ३।११।६ ह्या स्थानीं खलग्रह असता; व १।८।६ ह्यां शिवाय सर्व स्थानीं चंद्र असतां अन्नप्राशन प्रशस्त जाणावें. अनुराधा, शततारा, स्वाती व जन्मनक्षत्र हीं अन्नप्राशनाला अशुभ असें कित्येकांचें मत आहे.

अन्नप्राशनीं स्थानपरत्वें ग्रहांचीं फळें (अनुष्टुप्.)

क्षीणेंदुपूर्णचंद्रेज्यज्ञभौमार्कार्किभार्गवैः ॥ त्रिकोणव्ययकेंद्राष्टस्थितैरुक्तं फलंग्रहैः ॥१९॥
भिक्षाशीयज्ञकृद्दीर्घजीवीज्ञानीचपित्तरुक् ॥ कुष्ठीचान्नक्लेशवातव्याधिमान्भोगभागिति२०

अर्थ–(कृष्णपक्षांतलि अष्टमीपासून शुक्ल अष्टमीपर्यंत क्षीण चंद्र आणि शुक्ल पक्षांतल्या अष्टमीपासून कृष्ण अष्टमीपर्यंत पूर्ण चंद्र असें याठिकाणीं मानावें). क्षीण चंद्र, पूर्णचंद्र, गुरु, बुध, मंगळ, रवि, शनि, शुक्र हे ग्रह, अन्नप्राशनाच्या इष्ट लग्नापासून ९।५।१२।१।४।७।८ ह्या स्थानांतून कोण्त्याही स्थानीं असतां क्रमानें पुढील फळें जाणावीं. १ भिक्षा मागून खाणारा. २ ज्योतिष्टोमादि यज्ञ करणारा, ३ दीर्घायुषी. ४ ज्ञानवान् ५ पित्तरोगी ६ कुष्टरोगी ७ अन्न नसल्यामुळें दुःखी व वातरोगी ८ सुख भोगणारा. मागच्या ९।५।१२।१।४।७।८ ह्या स्थानांतून कोणत्याही स्थानीं क्षीण चंद्र असतां ज्या बालकांचें अन्नप्राशन होईल तें भिक्षाशी होईल पूर्ण चंद्र असून अन्नप्राशन केलें तर यज्ञकृत् बालक होईल त्याच स्थानीं गुरु असतां केलें तर दीर्घजीवी बालक होईल इ० फळें जाणावीं.

भूम्युपवेशनाचा मुहूर्त (वसंततिलक.)

पृथ्वीं वराहमभिपूज्य कुजे विशुद्धेऽरिक्ते तिथौ व्रजति पंचममासि बालं ॥
बध्वा शुभेन्हि कटिसूत्रमथ ध्रुवेंदुज्येष्ठर्क्षमैत्रलघुभैरुपवेशयेत्क्षौ ॥ २१ ॥

अर्थ–पृथ्वी आणि वराह ह्या दोन देवतांची पूजा करून, मंगळ बलवान् असतां, रिक्ता, रहित अन्य तिथींवर, पंचममासांत, शुभग्रहांच्या वारीं ध्रुव ४, मृगशीर्ष, ज्येष्ठा अनुराधा, लघु ४ ह्या नक्षत्रांवर कटिसूत्र बांधून बालकाला भूमीवर बसवावें.

भूम्युपवेशनी बालकाच्या उपजीविकेची परिक्षा. (शालिनी.)

तस्मिन्काले स्थापयेत्तत्पुरस्ताद्वस्त्रं शस्त्रं पुस्तकं लेखनीं च ॥
स्वर्णं रौप्यं यच्च गृण्हाति बालस्तैराजीवैस्तस्य वृत्तिः प्रदिष्टा ॥ २२ ॥

अर्थ–भूम्युपवेशनाच्या वेळीं त्या बालकापुढें; वस्त्र, शस्त्र पुस्तक, लेखणी सुवर्ण, आणि रौप्य, हे पदार्थ ठेवावे रांगत जात असतां जो पदार्थ बालक घेईल त्या पदार्थां पासून बालकाची जन्मपर्यंत उपजीविका होईल असें समजावें.

बालकाच्या तांबूल भक्षणाचा मुहूर्त. (स्रग्धरा.)

वारे भौमार्किहीने ध्रुवमृदुलघुभैर्विष्णुमूलादितींद्रस्वातीवस्वभ्युपेतैर्मिथुनमृगसुता
कुंभगोमीनलग्ने ॥ सौम्यैः केंद्रत्रिकोणैरशुभगगनगैः शत्रुलाभत्रिसंस्थैस्तांबूलं
सार्धमासद्वयमितसमये प्रोक्तमन्नाशने वा ॥२३ ॥

अर्थ–मंगळ शनिवांचून इतर वारीं; ध्रुव ४ मृदु ४ लघु ४ श्रवण, मूळ पुनर्वसु, ज्येष्ठा स्वाती, धनिष्ठा नक्षत्रीं; मिथुन,मकर, कन्या, कुंभ, वृषभ, मीन ह्यांतून कोणत्याही लग्नीं शुभ ग्रह केंद्रीं व त्रिकोणीं

असतां आणि पापग्रह ६ । ११ । ३ ह्या स्थानीं असतां बालकाला आठीच महिने झाल्यावर तांबूल भक्षण करविणें शुभ होय, किंवा अन्न प्राशनाच्या वेळीं करविणें ही प्रशस्त जाणावें.

कर्णवेध मुहूर्त (स्रग्धरा.)

हित्वैतांश्चैत्रपौषावमहरिशयनंजन्ममासंचरिक्तांयुग्माब्दंजन्मतारामृतुमुनिवसु भिःसंमितेमास्यथोवा ॥ जन्माहात्सूर्यभूपैःपरिमितदिवसेज्ञेज्यशुक्रेंदुवारेथोजा ब्देविष्णुयुग्मादितिमृदुलघुभैःकर्णवेधःप्रशस्तः ॥ २४ ॥

अर्थ—चैत्र, पौष हे दोन महिने क्षयतिथि, हरिशयन ह्मणजे आषाढ शुक्ल एकादशी पासून कार्तिक शुक्ल एकादशी पर्यंतचा चतुर्मास, जन्ममास, रिक्तातिथि, समवर्ष, आणि जन्मतारा हीं सर्व वर्ज्य करून, जन्मापासून ६।७।८ ह्या महिन्यांत किंवा जन्म दिवसापासून १२।१६। ह्या दिवशीं, बुध, गुरु, शुक्र, सोमवारीं, विषम वर्षांत श्रवण, धनिष्ठा, पुनर्वसु, मृदु ४ लघु ४ ह्या नक्षत्रीं कर्णवेध ह्मणजे बालकाचे कान टोंचणें शुभ होय.

कर्णवेधाची लग्नशुद्धि. (प्रहर्षिणी.)

संशुद्धेमृतिभवनेत्रिकोणकेंद्रत्र्यायस्थैःशुभखचरैःकवीज्यलग्ने ॥
पापाख्यैररिसहजायगेहसंस्थैर्लग्नस्थेत्रिदशगुरौशुभावहःस्यात् ॥ २५ ॥

अर्थ—इष्ट लग्नापासून अष्टमस्थान शुद्ध ह्मणजे शुभ व खलग्रह रहित असतां त्रिकोण ९।५केंद्र १।४।७।१० आणि ३।११ ह्या स्थानीं शुभग्रह असतां, व शुक्र गुरूंच्या लग्नीं ह्मणजे वृषभ, तूळ, धन, मीन ह्या लग्नीं; आणि पापग्रह ६।३।११ ह्या स्थानीं असतां व लग्नीं गुरु असतां कर्णवेध शुभावह जाणावा.

चौलादि संस्कारांचा निषिद्ध काळ. (स्रग्धरा.)

गीर्वाणांबुप्रतिष्ठापरिणयदहनाधानगेहप्रवेशाश्चौलंराजाभिषेकोव्रतमपिशुभदं नैवयाम्यायनेस्यात् ॥ नोवाबाल्यास्तवार्ध्येसुरगुरुसितयोर्नैवकेतूदयेस्यात्प क्षंवार्धंचकेचिज्जहतितमपरेयावदीक्षांतदुग्रे ॥ २६ ॥

अर्थ—देवप्रतिष्ठा, जलाशयोत्सर्ग, विवाह, अग्न्याधान, गृहप्रवेश, चौल, राजाभिषेक, मौंजीबंधन हीं कर्में दक्षिणायनांत आणि गुरु शुक्रांच्या बाल्यामध्यें, अस्तामध्यें आणि वार्ध्यामध्यें करूं नयेत. तशीच धूम-उदय पावत असतांही करूं नयेत किस्येकांच्या मतान धूमकेतु दिसूं लागल्यापासून एक पक्ष ह्मणजे १५ दिवस शुभ कार्य करूं नये व पुढें करावें असें आहे. दुसऱ्या कित्येकांचें मत दिसूं लागल्यापासून पक्षार्ध ह्मणजे ७ दिवस सोडून पुढें शुभकार्य करावें असेंही आहे. आणखी ही कित्येक ग्रंथकार, दिसूं लागल्या पासून दिसेनासा होईपर्यंत शुभकार्य करू नये असें ह्मणतात, परंतु तो धुमकेतु उग्र ह्मणजे द्विचूड त्रिचूड इत्यादि प्रकारचा असतां असें जाणावें.

गुरुशुक्रांच्या बाल्यवार्ध्यांचे त्याज्य दिवस व त्यांविषयीं मतांतर. (अनुष्टुप्)

पुरःपश्चाद्भृगोर्बाल्यंत्रिदशाहंचवार्धकम् ॥ पक्षंपंचदिनं द्वेगुरोः पक्षमुदाहृते ॥ २७ ॥
तेदशाहंद्वयोःप्रोक्केकेचित्सप्तदिनंपरः ॥ त्र्यहंवात्ययिकेप्यन्यैरर्धाहंचत्र्यहंविधोः ॥ २८ ॥

अर्थ—कोणत्याही ग्रहाचें अस्त व्हावयाचें जवळ आलें असतां त्यास वृद्ध असें समजावें, व त्याचें अस्त संपल्यावर उदय झाला ह्मणजे त्यास बाल असें जाणावें. ग्रह वृद्ध झाल्यामुळें सोडावयाच्या दिवसांस वार्ध्य आणि बाल असतां सोडण्याच्या दिवसांस बाल्य ह्मणतात. शुक्राचा पूर्वेस उदय झाला असतां ३ दिवस बाल्य, आणि पश्चिमेस उदय झाला असतां १० दिवस बाल्य मानावें. तसेंच शुक्राचे पूर्वेस अस्त व्हावयाचें असतां पक्ष ह्मणजे १५ दिवस वार्ध्य, आणि पश्चिमेस अस्त होणार असतां ५ दिवस वार्ध्य मानावें.

गुरूचें बाल्य आणि वार्ध्य एक एक पक्ष जाणावें. गुरु व शुक्र यांचें बाल्य आणि वार्ध्य दहा दहा दिवस सोडावे असें कित्येकांचें मत आहे. दुसऱ्या कित्येकांच्या मतें सात सात दिवस सोडावे असें आहे. कित्येक तर दोघांचीही बाल्यवार्ध्यें तीन तीन दिवस सोडावे असेंही ह्मणतात, परंतु कार्याची अवश्यकता जाणून ह्मांतील मतांचा स्वीकार करावा. शेवटचा तीन दिवसाचा पक्ष संकटविषयीं घ्यावा. चंद्राचें बाल्य अर्धा दिवस आणि वार्ध्य तीन दिवस जाणावें.

चौलाचा मुहूर्त. (स्रग्धरा १ रथोद्धता १)

चूडावर्षात्तृतीयात्प्रभवतिविषमेऽष्टार्करिक्ताद्यषष्ठी । पर्वोनाहेविचैत्रोदगयनसमयेज्ञेंदुशुक्रेज्यकानां ॥ वारेलग्नांशयोश्चास्वभनिधनतनौनैधनेशुद्धियुक्ते । शाक्रोपेतैर्विमित्रैर्मृदुचरलघुभैरायषट्त्रिस्थपापैः ॥ २९ ॥ क्षीणचंद्रकुजसौरिभास्करैर्मृत्युशस्त्रमृतिपंगुताज्वराः ॥ स्युःक्रमेणबुधजीवभार्गवैःकेंद्रगैश्चशुभमिष्टतारया ॥ ३०

अर्थ—गर्भधारणापासून किंवा जन्मापासून तृतीयादि विषम ह्मणजे ३।५।७ ह्या वर्षी चौल करणें शुभ जाणावें. अष्टमी, द्वादशी, रिक्ता, प्रतिपदा, षष्ठी आणि पर्वें ह्या तिथिवर्ज करून अन्य तिथींवर तसेंच चैत्र महिन्यावांचून उत्तरायणांत, बुध चंद्र शुक्र गुरु ह्यांच्या वारीं, लग्नीं व नवांशीं, आणि जन्मलग्न ह्मांपासून अष्टम लग्नें वर्ज करून अन्य लग्नीं, व ज्येष्ठायुक्त आणि अनुराधारहित मृदु ४ चर ५ लघु ४ इतक्या नक्षत्रीं (ज्येष्ठा, रेवती, मृग, चित्रा, श्रवण, धनिष्ठा, शततारा, पुनर्वसु स्वाती, अश्विनी, हस्त, पुष्य ह्या नक्षत्रीं) आणि ११।६।३ ह्या स्थानीं पापग्रह असतां चौल शुभ जाणावें. क्षीणचंद्र, मंगळ, शनि, सूर्य हे चार ग्रह केंद्रीं असतां अनुक्रमें मृत्यु, शस्त्रापासून मरण, पंगुता आणि ज्वर हीं फळें जाणावीं. चौलाच्या इष्ट लग्नापासून बुध, गुरु, शुक्र हे केंद्रीं असतां शुभ होत. चौलाला ताराबलही पहावें.

माता गर्भवती असतां चौलाचा निर्णय. (अनुष्टुप्)

पंचमासाधिकेमातुर्गर्भेचौलंशिशोर्नसत् ॥ पंचवर्षाधिकस्येष्टंगर्भिण्यामपिमातरि ॥ ३१ ॥

अर्थ.—ज्या बालकाचें चौल करावयाचें त्याची माता गर्भवती असून तिला पांच महिने पूर्ण झाल्यावर त्या बालकाचें चौल करूं नये, परंतु बालकाचें वय पांच वर्षांहून अधिक असतां गर्भवती मातेला पांचाहून अधिक महिने झाले असतांही चौल करणें शुभ जाणावें.

अशुभ ताराबलाचा अपवाद (शालिनी)

तारादौष्ट्येऽब्जेत्रिकोणोच्चगेवाक्षौरंसत्स्यात्सौम्यमित्रस्ववर्गे ॥
सौम्येभेऽब्जेशोभनेदुष्टताराशस्ताज्ञेयाक्षौरयात्रादिकृत्ये ॥ ३२ ॥

अर्थ—इष्ट लग्नापासून चंद्र त्रिकोणीं (९।५) असतां, किंवा उच्ची ह्मणजे वृषभ राशीला असतां ताराबल नसलें तरी चौल करणें शुभ होय. आणि शुभ ग्रहांच्या ह्मणजे बुध, गुरु, शुक्राच्या षड्वर्गीं किंवा मित्रांच्या अगर आपल्या षड्वर्गीं चंद्र असतां, अथवा शुभग्रहाच्या राशीला चंद्र असतां, किंवा ज्याचें शुभ कार्य त्याच्या जन्मराशीला चंद्र शुभ असतां क्षौर यात्रादि शुभकार्यीं दुष्टतारा असतां ती प्रशस्त जाणावी.

चौलाचा निषिद्ध काल (अनुष्टुप्)

ऋतुमत्याःसूतिकायाःसूनोश्चौलादिनाचरेत् ॥ ज्येष्ठापत्यस्यनज्येष्ठे कैश्चिन्मार्गोपिनेष्यते ३३

अर्थ—माता ऋतुमति असतां किंवा प्रसूत झाली असतां तिच्या पुत्राचें किंवा कन्येचें चौल, व्रतबंध, विवाह, इत्यादि कांहीं मंगल कार्यें करूं नये. तसेंच ज्येष्ठ अपत्याचें ज्येष्ठ मासांत कोणतेंही मंगल कार्य करूं नये. ज्येष्ठ अपत्याचें मार्गशीर्षांत मंगल कार्य न करावें असें कित्येकांचें मत आहे.

क्षौराचा मुहूर्त (शार्दूलविक्रीडित)

दंतक्षौरनखक्रियात्रविहिताचौलोदितेवारभेपातंग्यारखीन्विद्यायनवमंघस्रंच

संध्यांतथा ॥ रिक्त पर्वनिशांनिरासनरणग्रामप्रयाणोद्यतस्नाताभ्यक्तकृताश
नैर्नहिपुनःकार्यांहितप्रेप्सुभिः ॥ ३४ ॥

अर्थ—चौल करण्याला सांगितलेल्या वार नक्षत्रांवर दंतधावन, क्षौर व नखें काढणें हीं कर्मे करावीं. शनि, मंगळ, रवि ह्या वारीं, एकदा क्षौर केल्यापासून नवव्या दिवशीं, प्रातःकाल व सायंकाल ह्या दोन संध्यंच्या समयीं, रिक्ता तिथींवर, पर्वसंज्ञक दिवशीं आणि रात्रीस क्षौर निषिद्ध जाणावें. आसन रहित बसून, युद्धाला किंवा अन्य ग्रामीं जाण्याच्या दिवशीं स्नान केल्यानंतर; अभ्यंग केलें असतां आणि भोजन करून स्वहितेच्छु मनुष्यानें क्षौर करूं नये.

क्षौराचा विशेष विधि, आणि गर्भिणीपतिधर्म. (मंजुभाषिणी.)

ऋतुपाणिपीडमृतिबंधमोक्षणेक्षुरकर्मचद्विजनृपाज्ञयाचरेत् ॥
शववाहतीर्थगमसिंधुमज्जनक्षुरमाचरेन्नखलुगर्भिणीपतिः ॥ ३५ ॥

अर्थ—यज्ञामध्यें, विवाहांत, माता व पिता मरण पावलीं असतां, तुरुंगांतून सुटल्यावर, आणि ब्राह्मणानें किंवा राजानें आज्ञा केली असतां मुहूर्ताचा विचार न करितां तत्काल क्षौर करावें. गर्भिणी स्त्रीच्या पतीनें प्रेत उचलणें, तीर्थयात्रेला जाणें अथवा परदेशीं जाणें, समुद्रस्नान करणें, आणि हजामत हीं कर्मे करूंनये

राजाला. क्षौराचा विशेष विधि आणि क्षौराला सर्वथा वर्ज्य नक्षत्रें. (भुजंगप्रयात.)

नृपाणांहितंक्षौरमेश्मश्रुकर्मदिनेपंचमेपंचमेस्योदयेवा ॥
षडाग्नेस्त्रिमैत्राष्टकःपंचपित्र्योद्गनोब्दयर्यमाक्षौरकृन्मृत्युमेति ॥ ३६ ॥

अर्थ—क्षौर करण्यालासांगितलेल्या शुभ नक्षत्रांवर राजांनीं पांचव्या पांचव्या दिवशीं अवश्य श्मश्रुकर्म करावें. पांचव्या दिवशीं क्षौरनक्षत्र नसतां त्या नक्षत्रांच्या स्वामीच्या मुहूर्तावर करावें अथवा क्षौरनक्षत्रें ज्या राशींत असतील त्या राशीच्या उदयकाळीं क्षौरनक्षत्राचा उदय होत असतां करावें. (मेष राशीच्या पहिल्या ४ चरणाचा ह्मणजे १३ अंश २० काळांचा उदय होईपर्यंत अश्विनी नक्षत्राचा उदय होतो. पुढें ४ चरणाचा उदय होईपर्यंत भरणीचा उदय होत असतो इत्यादि जाणावें) कृत्तिका नक्षत्रांवर ६ वेळां, अनुराधा नक्षत्रांवर ३ वेळां, रोहिणीवर ८ वेळां, मघांवर ५ वेळां व उत्तराफाल्गुनीवर ४ वेळां क्षौर करणारा पुरुष एक वर्षांनंतर मरण पावतो ह्मणून हीं पांच नक्षत्रें क्षौराला सर्वथा त्याज्य होत.

अक्षरारंभाचा मुहूर्त. (पंचचामर.)

गणेशविष्णुवाग्रमाःप्रपूज्यपंचमाब्दके । तिथौशिवार्कदिग्द्विषट्शरत्रिकेरवावुदक् ॥
लघुश्रवोनिलांत्यभादितीशतक्षमित्रभे । चरोनसत्तनौशिशोर्लिपिग्रहःसतांदिने ॥ ३७ ॥

अर्थ—गणपति, विष्णु, सरस्वती आणि लक्ष्मी ह्या चार देवतांची पूजा करून बालकाच्या पांचव्या वर्षांत, एकादशी, द्वादशी, दशमी, द्वितीया, षष्ठी, पंचमी, तृतीया, ह्यांतून कोणत्याही तिथीवर उत्तरायणांत; लघु ४ श्रवण, स्वाती, रेवती, पुनर्वसु, आर्द्रा, चित्रा, अनुराधा ह्या नक्षत्रांवर, चरलग्नावांचून शुभग्रहांच्या लग्नीं (वृषभ, मिथुन, कन्या, धन, मीन, लग्नीं) आण शुभग्रहांच्या वारीं, बालकाला लिपीग्रहण ह्मणजे अक्षरें शिकविणें शुभ जाणावें

विद्यारंभ मुहूर्त (पंचचामर.)

मृगात्कराच्छ्रुतेस्त्रयेऽश्विमूलपूर्विकात्रये । गुरुद्वयेर्कजीववित्सितेन्हिषट्शरत्रिके ॥
शिवार्कदिग्द्विकेतिथौध्रुवांत्यमित्रभेपरैःशुभैरधीतिरुत्तमात्रिकोणकेंद्रगैःस्मृता ॥ ३८ ॥

अर्थ—मृगशीर्ष, आर्द्रा, पुनर्वसु, हस्त, चित्रा, स्वाती, श्रवण, धनिष्ठा, शततारका, अश्विनी, मूळ, पर्वाफा॰ पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, पुष्य, आश्लेषा ह्या नक्षत्रांवर; रवि, गुरु, बुध, शुक्र ह्यांच्या वारीं; षष्ठी,

पंचमी, तृतीया एकादशी, द्वादशी, दशमी, द्वितीया ह्या तिथींवर; आणि त्रिकोणीं व केंद्रीं शुभ ग्रह अ सतां विद्यारंभ शुभदायक होतो ध्रुव ४ रेवती, अनुराधा हीं ६ नक्षत्रें विद्यारंभाला शुभ असें कित्येक आचार्यांचें मत आहे.

उपनयनाचा काळ. (शार्दूलविक्रीडित.)

विप्राणांव्रतबंधनंनिगदितंगर्भाज्जनेर्वाष्टमे । वर्षेवाप्यथपंचमेक्षितिभुजांषष्ठेतथैकादशे ॥
वैश्यानांपुनरष्टमेप्यथपुनःस्याद्द्वादशेवत्सरेकालेथद्विगुणेगतेनिगदितेगौणंतदाहुर्बुधाः ३९

अर्थ–गर्भापासून किंवा जन्मापासून आठव्या किंवा पांचव्या वर्षांत ब्राह्मणांची मुंज करावी. स हाव्या अथवा अकराव्या वर्षी क्षत्रियांची मुंज करावी. आणि आठव्या अगर बाराव्या वर्षी वैश्यांची करावी. ह्या वर्षांच्या दुप्पट काळ होईपर्यंत मौंजीबंधनाचा काळ असतो. परंतु तो क्रमानें हीन होत जातो. व्रतबंधाच्या काळाचे काम्य , नित्य आणि गौण असे तीन प्रकार आहेत. ब्राह्मणाला ५ क्षत्रिया ला ६ वैश्याला ८ हीं जीं वर वर्षें सांगितलीं ह्या त्यांचा काम्य काळ जाणावा. आणि ८।११।१२हीं वर्षें त्याच तीन वर्णांचा क्रमानें नित्य काळ होय. ह्या नित्य काळाच्या दुप्पट ह्मणजे ब्राह्मणाला १६ क्षत्रि याला २२ आणि वैश्याला २४ वर्षें होईपर्यंत व्रतबंधाचा काळ असतो खरा, परंतु तो जसजसा अधिक होत जातो तसतसा हीन हीन होतो ह्मणून नित्य सांगितलेल्या ८।११।१२ ह्या वर्षी मुंज करणें हा मुख्य पक्ष जाणावा. बम्हचर्यव्रताचे नियम पाळून विद्याभ्यास करण्याला समर्थ असा पुत्र असला तरच ५ ६।८ ह्याकाम्य काळाच्या वर्षीं उपनयन करावें. उपनयनकाळाचीं वर्षें सौरमानाने मोजावी.

व्रतबंधाचीं नक्षत्रें वगैरे. (वसंततिलक,)

क्षिप्रध्रुवाहिचरमूलमृदुत्रिपूर्वारौद्रेर्कविद्गुरुसितेंदुदिनेव्रतंसत् ॥
द्वितीपुरुद्ररविदिक्प्रमितेतिथौचकृष्णादिमत्रिलवकेपिनचापराण्हे ॥ ४० ॥

अर्थ–(माघ, फाल्गुन, चैत्र, वैशाख, ज्येष्ठ हे पांच महिने व्रतबंधनाला शुभ होत.) क्षिप्र ४ ध्रुव ४, आश्लेषा, चर ५, मूळ, मृदु ४ पूर्वा ३, आर्द्रा ह्या २२ नक्षत्रांवर; आणि रवि, बुध गुरु, शुक्र, सोम ह्याच्या वारीं; तसेंच द्वितीया, त्रितीया पंचमी, एकादशी, द्वादशी, दशमी ह्या तिथींवर, आणि कृष्णपक्षांतील पंचमीप र्यंत उपनयन करणें शुभ जाणावें. दिवसाचे तीन भाग करून पहिला भाग पूर्वाण्ह, दुसरामध्यान्ह, व तिसरा अपराण्ह ह्यांतील शेवटच्या अपराण्ह भागांत मुंज करूं नये.

व्रतबंध लग्नाचा भंग करणारे ग्रह. (प्रमाणिका)

कवीज्यचंद्रलग्नपारिपौमृतौव्रतेधमाः ॥ व्ययेब्जभार्गवौतथातनौमृतौसुतेखलाः ॥ ४१ ॥

अर्थ – शुक्र, गुरु, चंद्र आणि लग्नस्वामी हे ६।८ स्थानीं असतां, आणि चंद्र व शुक्र बारावे असतां, तसेच खलग्रह लग्नीं, अष्टमस्थानीं व पंचमस्थानीं असता बटूला मृत्युकारक होतात.

उपनयनाची लग्न शुद्धि (अनुष्टुप्)

व्रतबंधेष्टषड्रिःफवर्जिताःशोभनाशुभाः॥त्रिषडायेखलाःपूर्णोगोकर्केस्थोविधुस्तनौ॥४२॥

अर्थ—मुंजीच्या इष्ट लग्नापासून ८।६।१२ ह्या स्थानीं शुभगृह नसावे इतर सर्व स्थानीं शुभग्रह मौंजीला इष्ट होत खलग्रह ३।६;११ ह्या स्थानीं मात्र इष्ट होत. पूर्ण ह्मणजे शुक्ल पक्षांतला चंद्र, वृषभ व कर्कराशीला असून तोइष्ट लग्नीं असतां शुभ जाणावा.

वर्णस्वामी व शाखेश. (शालिनी.)

विप्राधीशौभार्गवेज्यौकुजार्कौराजन्यानामोषधीशोविशांच॥
शूद्राणांज्ञश्चांत्यजानांशनिःस्याच्छाखेशाःस्युर्जीवशुक्रारसौम्याः ॥ ४३ ॥

अर्थ–ब्राह्मणाचे शुक्र व गुरु हे दोन स्वामी, क्षत्रियाचे मंगळ व रवि हे दोन स्वामी, वश्याचा चंद्र

स्वामी, शूद्राचा बुध स्वामी, अंत्यजाचा शनि स्वामी, असे वर्णांचे स्वामी आहेत. ऋग्वेदाचा गुरु यजुर्वेदाचा शुक्र, सामवेदाचा मंगळ आणि अथर्ववेदाचा बुध हे शाखेश होत.

वर्णेश व शाखेश यांच्या बलाचा विचार. (वसंततिलक.)

शाखेशवारतनुवीर्यमतीवशस्तं शाखेशसूर्यशशिजीवबले व्रतं सत् ॥
जीवे भृगौ रिपुगृहे विजिते च नीचे स्याद्वेदशास्त्रविधिना रहितो व्रतेन ॥ ४४ ॥

अर्थ–आपल्या शाखेचा जो अधिपति असेल त्याचा वार, लग्न, व त्याचें बल हीं व्रतबंधाला फार प्रशस्त होत. मागे गोचर प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें वटूच्या जन्मराशीपासून शुभस्थानीं शाखेश असून तो स्वगृहीं, मित्रगृहीं अथवा उच्चस्थानीं असला ह्मणजे शाखेशबल आहे असें समजावें. शाखेश वर्णेश सूर्य, चंद्र, व गुरु यांचें बल असतां मुंज हितकर जाणावी. गुरु, शुक्र, शाखेश, वर्णेश हे आपल्या शत्रूच्या राशीला असतां, किंवा ग्रह युद्धांत पराजय पावलेले असतां, अगर नीचस्थानी असतां व्रतबंध केल्यानें वेदशास्त्र हीन आणि ब्रह्मचर्यविधि रहित असा वटु होतो.

जन्म मासादिकांचा विशेष विचार (अनुष्टुप्)

जन्मर्क्षमासलग्नादौ व्रते विद्याधिको व्रती ॥ आद्यगर्भेऽपि विप्राणां क्षत्रादीनामनादिमे ॥ ४५ ॥

अर्थ–जन्मनक्षत्र, जन्ममास, जन्मलग्न आणि जन्मातिथि ह्यांवर व्रतबंध केल्यानें तो वटु अधिक विद्वान् होतो. यास्तव ब्राह्मणानें प्रथम गर्भोत्पन्नाची व इतरांची मुंज जन्मनक्षत्रादिकांवरच अवश्य करावी. क्षत्रिय आणि वैश्य ह्यांनीं प्रथम गर्भोत्पन्न पुत्राचा मात्र जन्मनक्षत्रादिकांवर मुंज करूं नये, इतरांची अवश्य करावी.

गुरुबल (अनुष्टुप्.)

वटुकन्याजन्मराशेस्त्रिकोणायद्विसप्तगः ॥ श्रेष्ठो गुरुः खषट्त्र्याद्ये पूजयान्यत्र निंदितः ॥४६॥

अर्थ–पुत्राला व्रतबंधाच्या व विवाहाच्या वेळीं, आणि कन्येला तिच्या विवाह समयीं गुरुबळ अवश्य असलें पाहिजे जन्मराशीपासून त्रिकोणीं ९।५ व ११।२।७ ह्या स्थानीं असणारा गुरु श्रेष्ठ जाणावा. १०।६ ३।१ ह्या स्थानीं गुरु असतां तो अशुभ खरा; परंतु पूजा केल्यानें तो शुभ होतो बाकी राहिलया ४।८।१२ ह्या स्थानीं असणारा गुरु अति निंद्य आणि तो पूजेनेंही शुभ होत नाहीं. ४।१२ स्थानचा दोनदां पूजा करून व अष्टम स्थानचा तीन वेळां पूजा करून संकटीं गुरु शुभ करून घेण्याचा संप्रदाय आहे.

अशुभ गुरूचे अपवाद. (अनुष्टुप्)

स्वोच्चे स्वभे स्वमैत्रे वा स्वांशे वर्गोत्तमे गुरुः ॥ रिःफाष्टतुर्यगोऽपीष्टो नीचारिस्थः शुभोऽप्यसन् ॥४७॥

अर्थ—आपल्या उच्चीं ह्मणजे कर्काला, आपल्या राशीला ह्मणजे धनाला व मीनाला, स्वमित्र गृहीं ह्मणजे मेषाला आणि वृश्चिकाला; स्वांशीं ह्मणजे कोणत्याही राशींतील धन किंवा मीन नवांशीं; आणि वर्गोत्तमीं ह्मणजे ज्या राशीला असेल त्याच राशीच्या नवांशीं, जसा मेषाच्या मेषनवांशीं, वृषभाच्या वृषभ नवांशीं इत्यादि ह्यांतून कोणत्याही प्रकारचा गुरु जन्मराशीपासून १२।८।४ ह्या अनिष्ट स्थानीं असतां तो इष्ट जाणावा. नीचस्थानीं ह्मणजे मकर राशीला व शत्रु गृहीं ह्मणजे मिथुन कन्या, तूळ वृषभ ह्या राशीला गुरु असतां मागच्या श्लोकांत सांगितलेल्या शुभकर स्थानीं ही असला तरी तो अशुभ जाणावा. (गुरूचें सिंह मित्रगृह खरें परंतु सिंहस्थगुरूचा मागेंच निषेध केला आहे.)

उपनयनीं स्वाध्यायकाळ. (अनुष्टुप्.)

कृष्णे प्रदोषेऽनध्याये शनौ निश्यपराह्णके ॥ प्राक्संध्यागर्जिते नेष्टो व्रतबंधो गलग्रहे ॥ ४८ ॥

अर्थ–कृष्ण पक्षांत षष्ठीपासून पुढच्या तिथींवर; सायंकाळीं ज्या दिवशीं प्रदोष असेल त्या दिवशीं, अनध्याय दिवशीं, शनिवारीं; रात्रीस अपराह्णकाळीं, प्रातःकाळीं मेघगर्जना झाली असतां त्या दिवशीं

आणि गलग्रहांवर व्रतबंध करणें अनिष्ट जाणावें त्रयोदशीपासून ४ चार तिथि, सप्तमीपासून ३ तीन तिथि व चतुर्थी ह्या आठ तिथि गलग्रह होत.

सूर्यादिकांच्या नवांशीं उपयनाचीं फळें. (अनुष्टुप्)

क्रूरोजडोभवेत्पापःपटुःषट्कर्मकृद्वटुः॥ यज्ञार्थभाक्तथामूर्खोरव्याद्यंशेतनौक्रमात् ॥ ४९ ॥

अर्थ—इष्टलग्नांतील सूर्याच्या नवांशीं व्रतबंध केला असतां तो बटु क्रूर होतो चंद्राच्या नवांशीं जड मंगळाच्या पापी; बुधाच्या पटु ह्मणजे कुशळ, गुरूच्या नवांशी षट्कर्मे करणारा, शुक्राच्या यज्ञार्थभाक् ह्मणजे यज्ञकरून पुण्य जोडणारा; आणि शनीच्या नवांशीं मूर्ख बटु होतो. यजन, याजन, दान, प्रतिग्रह, अध्यापन आणि अध्ययन हीं षट्कर्मे होत. वृषभ, मिथून, कन्या, तूळ, धन, मीन, हे नवांश व्रतबंधाला घ्यावे हें तात्पर्य.

चंद्राचीं नवांश फळें. (मोटनक.)

विद्यानिरतःशुभराशिलवेपापांशगतेहिदरिद्रतरः॥
चंद्रेस्वलवेबहुदुःखयुतःकर्णादितिभेधनवान्खलत्रे ॥ ५० ॥

अर्थ.—व्रतबंधाचे वेळीं ज्या राशीला चंद्र असेल त्या राशींत तो शुभग्रहाच्या नवांशीं असतां बटु विद्या करण्याला तत्पर होतो. आणि पापग्रहाच्या नवांशीं असतां बटु अति दरिद्री होतो. आपल्या नवांशीं ह्मणजे कर्कनवांशीं चंद्र असतां अतिदुःखी बटु होतो. परंतु श्रवण आणि पुनर्वसू ह्या दोन नक्षत्रांवर व्रतबंध असून चंद्र कर्क नवांशीं असतां मात्र बटु धनवान् होतो.

व्रतबंधी केंद्रस्थ ग्रहांची फळें, अनुष्टुप्.)

राजसेवीवैश्यवृत्तिःशस्त्रवृत्तिश्चपाठकः॥प्राज्ञोर्थवान्म्लेच्छसेवीकेंद्रेसूर्यादिखेचरैः ॥५१॥

अर्थ—व्रतबंधाच्या इष्ट लग्नापासून केंद्रीं ह्मणजे १।४।७।१० ह्या स्थानीं सूर्य असतां बटु राजसेवी चंद्र असतां वैश्यवृत्ति; मंगळ असतां शस्त्रवृत्ति ह्मणजे शस्त्रानें उपजीविका करणारा; बुध असतां पाठक ह्मणजे वेदाध्ययन करणारा; गुरु असतां प्राज्ञ ह्मणजे पंडित; शुक्र असतां अर्थवान् ह्मणजे श्रीमंत आणि शनि केंद्रीं असतां म्लेच्छसेवी ह्मणजे अंत्यज यवनादि हीन जातीचा सेवक बटु होतो (लग्नीं चंद्र आणि केंद्रस्थ शनि असूं नये.)

ग्रहयोग फळ (अनुष्टुप्.)

शुक्रेजीवेतथाचंद्रेसूर्यभौमार्किसंयुते॥ निर्गुणःक्रूरचेष्टःस्यान्निर्घृणःसद्युतेपटुः ॥ ५२ ॥

अर्थ—शुक्र, गुरु, किंवा चंद्र यांचा सूर्याशी योग असतां ह्मणजे एका राशीला असतां ज्याचा व्रतबंध होतो तो बटु दुर्गुणी होतो. मंगळाशीं त्याच ग्रहांचा योग असतां बटु क्रूरकर्मे करणारा होतो. आणि शनीं शीं योग झाला असता बटू निर्दय होतो. शुभ ग्रहांचा परस्पर योग असता बटु पटु ह्मणजे कुशल होतो.

व्रतबंधी चंद्रयोग (प्रमाणिका.)

विधौसितांशगेसितेत्रिकोणगेतनौगुरौ॥ समस्तवेदविद्भतीयमांशगेतिनिर्घृणः॥ ५३॥

अर्थ—चंद्र शुक्राच्या अंशी ह्मणजे कोणत्याही राशीतील वृषभ किंवा तूळ नवांशी असून आणि मुंजीच्या इष्टलग्नापासून ९।५ स्थानीं शुक्र असून लग्नी गुरु अशा योगावर उपनयन केलें असतां तो बटु सर्व वेदपारंगत होतो. शनीच्या अंशी ह्मणजे मकर किंवा कुंभ नवांशीं चंद्र असून त्रिकोणी शुक्र व लग्नीं गुरु असा योग असतां बटु कृतघ्न होतो.

अनध्याय. (आर्या.)

शुचिशुक्रपौषतपसांदिगश्विरुद्रार्कसंख्यसिततिथयः॥
भूतादित्रितयाष्टमिसंक्रमणंचव्रतेष्वनध्यायाः॥ ५४ ॥

अर्थ—आषाढ शुक्ल दशमी, ज्येष्ट शुक्ल द्वितीया, पौष शुक्ल एकादशी, माघ शुक्ल द्वादशी चतुर्दशी, पूर्णिमा, अमावास्या, प्रतिपदा, अष्टमी आणि सूर्यसंक्रांति हे मुंजीला अनध्याय जाणावे.

प्रदोपलक्षण. (अनुष्टुप्.)

अर्कतर्कत्रितिथिषुप्रदोषःस्यात्तदग्रिमैः ॥ रात्र्यर्धसार्द्धप्रहरयाममध्यस्थितैःक्रमात्॥ ९५ ॥

अर्थ—द्वादशी, षष्टी, तृतीया ह्या तिथींच्या दिवशी अनुक्रमे दोन, दीड, आणि एक प्रहर रात्रीच्या आंत वरील तिथींच्या पुढल्या तिथींचा प्रवेश होत असतां प्रदोप होतो. ह्मणजे द्वादशीला अर्ध रात्रीचे आत त्रयोदशी, षष्ठीला दीड प्रहर रात्रीचे आत सप्तमी आणि तृतीयेला एक प्रहर रात्रीचेआंत चतुर्थी अशा तिथि येतअसतां प्रदोप आहे असें समजावें.

व्रतबंधासंबंधी शास्त्रार्थ. (आर्या.)

प्राग्ब्रम्हौदनपाकात्व्रतबंधानंतरंयदिचेत् ॥
उत्पातानध्ययनोत्पत्तावपिशांतिपूर्वकंतत्स्यात् ॥ ९६ ॥

अर्थ—मोजीबंधन झाल्यानंतर आणि त्याच दिवशीं रात्रीं ब्रह्मौदनाचा पाक होण्याच्या पूर्वी कांहीं उत्पात किंवा अनध्याय उत्पन्न झाला असतां धर्मशास्त्रांत सांगितलेली शांति करून मग ब्रम्हौदन पाक करावा.

वेदपरत्वें व्रतबंध नक्षत्रें. (वसंततिलका)

वेदक्रमाच्छशिशिवाहिकरत्रिमूलपूर्वासुपौष्णकरमैत्रमृगादितीज्ये ॥
ध्रौवेषुचाश्विवसुपुष्यकरोत्तरेशकर्णेमृगांत्यलघुमैत्रधनादितौसत् ॥ ९७ ॥

अर्थ—मृग, आश्लेषा, आर्द्रा, हस्त, चित्रा, स्वाती, मूळ, पूर्वाफ० पूर्वाषा० पूर्वाभा० ह्या १० नक्षत्रांवर ऋग्वेद्यांनीं मुंज करावी. रेवती, हस्त, अनुराधा, मृग, पुनर्वसु. पुष्य. रोहिणी, उत्तराफ० उत्तरा. षाढा उत्तराभाद्रपदा हीं १० नक्षत्रें यजुर्वेद्याच्या उपनयनाचीं होत. अश्विनी .धनिष्ठा. पुष्य, हस्त उत्तरफा उत्तराषाढा उत्तराभाद्रपदा. आर्द्रा, श्रवण, हीं ९ नक्षत्रें सामवेद्यांचीं होत. मृग, रेवती, पुष्य, अश्विनी, हस्त, अनुराधा, धनिष्ठा. पुनर्वसू ह्या८ नक्षत्रांवर अथर्ववेद्यांनीं उपनयन करावें.

चौलादिकांविपर्यी शास्त्रार्थ. (अनुष्टुप्.)

नांदीश्राद्धोत्तरंमातुःपुष्पेलग्नांतरेनहि ॥ शांत्याचौलंव्रतंपाणिग्रहःकार्योन्यथानसत्॥९८॥

अर्थ—नांदीश्राद्धानंतर संस्कार्याची माता किंवा ज्यानें नांदीश्राद्ध केलें असेल त्याची पत्नी रजस्वला झाली तर तो मुहूर्त सोडून दुसऱ्या मुहूर्तावर चौल, मुंज आणि विवाह हे संस्कार रजस्वला शुद्ध झाल्यानंतर करावे. पुढें दुसरा मुहूर्त नसता धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें श्रीशांति करून त्याच मुहूर्तीं वरील संस्कार करावे. शांति न करिता संस्कार करणें शुभ नव्हे.

छुरिकाबंधन मुहूर्त. (अनुष्टुप्.)

विचैत्रव्रतमासादौविभौमास्तेविभूमिजे ॥ छुरिकाबंधनंशस्तंनृपाणांप्राग्विवाहतः ॥ ९९॥

अर्थ—चैत्र रहित उपनयन मासांत ह्मणजे माघ, फाल्गुन, वैशाख, ज्येष्ठ ह्या चार महिन्यांत, आणि उपनयनाच्या तिथि नक्षत्र लग्नादिकावर मंगळाचें अस्त नसतां, व मंगळा वांचून इतर वारीं क्षत्रियांचें विवाहहाच्या पूर्वी व समावर्तनानंतर छुरिकाबंधन करावें.

केशांताचा व समावर्तनाचा मुहूर्त (अनुष्टुप्.)

केशांतंषोडशेवर्षेचौलोक्तदिवसेशुभं ॥ व्रतोक्तदिवसादौहिसमावर्तनमिष्यते ॥ ६० ॥

अर्थ—केशांतनामक संस्कार वयाच्या सोळाव्या वर्षी चौलाच्या मुहूर्तावर करावा. आणि मुंजीचे मुहूर्तावर समावर्तन (सोडमुंज) करावें. वयाच्या तेराव्या वर्षी महानाम्नीं; चौदाव्या महाव्रत, पंध्राव्या उपनिषद्व्रत आणि सोळाव्या गोदान ह्मणजे केशांत अशीं व्रतें सांगितलेलीं आहेत.ह्या सर्वांला चौलाचाच मूहूर्त शुभजाणावा

इति संस्कारप्रकरणम् समाप्तम् ॥ ५ ॥

॥ अथविवाहप्रकरणम् ॥ ५ ॥

(विवाहमुहूर्तांचें प्रयोजन. वसंततिलका.)

भार्यात्रिवर्गकरणंशुभशीलयुक्ताशीलंशुभंभवतिलग्नवशेनतस्याः ॥
तस्माद्विवाहसमयःपरिचिंत्यतेहितन्निघ्नतामुपगताःसुतशीलधर्माः ॥ १ ॥

अर्थ--उत्तम स्वभावानें आणि सद्वर्तनानें युक्त अशी भार्या ही त्रिवर्गाचें ह्मणजे धर्म, अर्थ व काम ह्या तीन पुरुषार्थांचें स्थान किंवा साधन होय अशी जी पुरुषाला त्रिवर्गांचें साधन करून देणारी भार्या तिचा स्वभाव शुभ होणें हें विवाहकाळाच्या लग्नाधीन आहे विवाहकाळीं. लग्न शुभ असतां भार्येचा. स्वभाव शुभ होतो यास्तव विवाहकाळाचा विचार अवश्यच केला पाहिजे. कारण पुढें होणाऱ्या अपत्यांचे स्वभावधर्मही विवाहकालाधीनच आहेत. ह्मणून आतां विवाहमुहूर्ताचा विचार सांगतो असें ग्रंथकार ह्मणतो.

विवाह प्रश्नाचे फळ (स्रग्धरा.)

आदौसंपूज्यरत्नादिभिरथगणकंवदयेत्स्वस्थचित्तंकन्योद्वाहंदिगीशानलहयशिखिप्रश्नलग्नाद्यदींदुः ॥ दृष्टोजीवेनसद्यःपरिणयनकरोगोतुलाकर्कटाख्यंवास्यास्तत्प्रश्नस्यलग्नंशुभखचरयुतालोकितंतद्विदध्यात् ॥ २ ॥

अर्थ–आरंभीं रत्न, वस्त्र, फळ इत्यादिकांनीं ज्योतिष्याची पूजा करून तो संतुष्ट स्वस्थचित्त असा झाल्यावर कन्येच्या विवाहाविषयीं त्याला प्रश्न करावा. मग ज्योतिष्यानें विचार करून पृच्छाकाला प्रश्नाचें फळ सांगावें. प्रश्नलग्नापासून १०।११।३।७।५ ह्यांतून कोणत्याही स्थानीं चंद्र असून त्यावर गुरूची दृष्टि असतां त्वरित विवाह होईल असें सांगावें हा एक विवाह योग होय. वृषभ, तूळ, कर्क ह्यांतील प्रश्नलग्न असून त्या लग्नीं शुभग्रह असतील किंवा शुभग्रहांची दृष्टि त्या लग्नावर असेल तरीही विवाह होईल असें सांगावें. हा दुसरा विवाह योग जाणावा.

प्रश्नलग्नावरून आणखी विवाहयोग. (द्रुतविलंबित)

विषमभांशगतौशशिभार्गवौतनुगृहंबलिनौयदिपश्यतः ॥
रचयतोवरलाभमिमौयदायुगलभांशगतौयुवतिप्रदौ ॥ ३ ॥

अर्थ–चंद्र व शुक्र हे विषम राशीला आणि विषमनवांशाला असणारे बलवान असून प्रश्नलग्नी त्याची दृष्टि असतां वरेच्छु पृच्छकाला वरलाभ होईल असें सांगावें आणि तेच चंद्र शुक्र बलवान् समराशीला व समनवांशी असून प्रश्नलग्नी पहात असतील तर कन्येच्छु पृच्छकाला कन्यालाभ होईल असें सांगावें.

विधवा योग. (शालिनी.)

षष्ठाष्टस्थःप्रश्नलग्नाद्यदींदुर्लग्नेक्रूरःसप्तमेवाकुजःस्यात् ॥
मूर्ताविंदुःसप्तमेतस्यभौमोरंडासास्यादष्टसंवत्सरेण ॥ ४ ॥

अर्थ–प्रश्नलग्नापासून षष्ठस्थानीं किंवा अष्टमस्थानीं चंद्र असतां ज्या कन्येच्या विवाहाविषयीं पृच्छकाचा प्रश्न असेल ती कन्या विवाहापासून आठवर्षांमध्यें विधवा होईल असें सांगावें. प्रश्न लग्नीं खलग्रह व सप्तमस्थानीं मंगळ असा योग असतां, किंवा प्रश्नलग्नीं चंद्र आणि सप्तम मंगळ हा योग असतांहीं आठ वर्षांच्या आंत कन्या विधवा होईल असें जाणावें.

कन्या कुलटा किंवा मृतवत्सा होण्याचा योग. (दोधक.)

प्रश्नतनोर्यदिपापनभोगःपंचमगोरिपुदृष्टशरीरः ॥
नीचगतश्चतदाखलुकन्यासाकुलटात्वथवामृतवत्सा ॥ ५ ॥

अर्थ-प्रश्नलग्ना पासून पंचमस्थानीं पापग्रह असून त्यावर त्याच्या शत्रूची दृष्टि असेल आणि तो पंचमस्थानींचा पापग्रह आपल्या नीचस्थानीं असेल तर कन्या कुलटा ह्मणजे वेश्या अगर मृतवत्सा होईल असें जाणावें.

विवाहभंग योग (पुष्पिताग्रा.)

यदि भवति सितातिरिक्तपक्षेतनुगृहतः समराशिगः शशांकः ॥
अशुभखचरवीक्षितोरिरंध्रे भवति विवाहविनाशकारकोयम् ॥ ६ ॥

अर्थ-कृष्णपक्षांतील चंद्र वृषभ कर्क इत्यादि समराशींला असून व त्यावर खलग्रहांची दृष्टि असून तो प्रश्नलग्नापासून षष्ठस्थानीं किंवा अष्टमस्थानीं असेल तर असा चंद्र विवाहाचा भंग करील असें जाणावें.

विधवा योगाचे परिहार (शार्दूलविक्रीडित.)

जन्मोत्थंच विलोक्य बालविधवायोगंविधायव्रतंसावित्र्या उतपैप्पलंहिसुतयाद-
द्यादिमांवारहः ॥ सल्लग्नेच्युतमूर्तिपिप्पलघटैःकृत्वाविवाहंस्फुटंदद्याचांचिर
जीविनेत्रनभवेद्दोषःपुनर्भूभवः ॥ ७ ॥

अर्थ--मागें प्रश्नलग्नावरून कन्या विधवा होण्याचे योग सांगितले त्याशिवाय कन्येच्या जन्मकाळाव रूनही जातकांत सांगितलेले विधवा योग पहावे. आणि कन्येला बालविधवा होण्याचे योग असतां तिच्याकडून वैधव्य परिहारक सावित्रीव्रत किंवा पिप्पलव्रत करवून मग ती कन्या दीर्घायु पुरुषाला द्यावी अथवा एकांतीं पुढें सांगितलेल्या विवाहाच्या शुभ मुहूर्तावर विधवायोग असणाऱ्या कन्येचा विष्णुमूर्ति पिप्पल,किंवा कुंभ यांच्याशीं धर्मशास्त्ररीतीनें विवाह करून नंतर ती कन्या चिरायु वराला द्यावी.असा गुप्तपणे विवाह करून ती कन्या दीर्घायुवराला दिल्याने तिला पुनर्भूवाचा ह्मणजे दोनदां विवाह केल्याच दोष प्राप्त होत नाहीं.

कन्येला प्रथम पुत्र किंवा कन्या होईल ह्या प्रश्नाचें फळ. (स्रग्विणी.)

प्रश्नलग्नक्षणेयाद्दशापत्ययुक्स्त्रेच्छयाकामिनीतत्रचेदाव्रजेत् ॥
कन्यकावासुतोवालदापंडितैस्ताद्दशापत्यमस्याविनिर्दिश्यते ॥ ८ ॥

अर्थ-कन्येला प्रथम पुत्र किंवा कन्या अपत्य होईल असा प्रश्न केला असतां प्रश्नाचे वेळीं कोणतीही स्त्री पुत्र अथवा कन्या अपत्य कडेवर घेऊन अगर हातांत धरून प्रश्न पाहणाऱ्या ज्योतिष्याजवळ सहज. गत्या आली असतां किंवा प्रश्न करण्यापूर्वी पासूनच असतां त्या स्त्रीजवळ जें कन्या अथवा पुत्र अपत्य असेल तसेंच अपत्य होईल असें पृच्छकाला चतुर ज्योतिष्यानें सांगावें.

प्रश्नाचीं सामन्य लक्षणें (स्रग्विणी.)

शंखभेरीविपंचीरवैर्मंगलंजायतेवैपरीत्यंतदालक्षयेत् ॥
वायसोवाखरःश्वामृगालोपिवाप्रश्नलग्नक्षणेरौतिनादयंति ॥ ९ ॥

अर्थ-शंख, भेरी; वीणा इत्यादि मंगलवाद्यांचा नाद प्रश्नकाळीं ऐकूं आला असतां प्रश्नाचें फळ शुभ आहे असें जाणावें. आणि कावळा, गर्दभ, श्वान, कोल्हा इत्यादि दुष्ट पशुपक्ष्यांचा शब्द प्रश्नकाळीं ऐकूं आला तर प्रश्नाचें फळ विपरीत ह्मणजे असंगळ किंवा अशुभ जाणावें.

कन्यावरण मुहूर्त (मत्तमयूर)

विश्वस्वातीवैष्णवपूर्वात्रयमैत्रैर्वस्वाग्नेयैर्वाकरपीडोचितऋक्षैः ॥
वस्त्रालंकारादिसमेतैःफलपुष्पैःसंतोष्यादौस्यादनुकन्यावरणंहि ॥ १० ॥

अर्थ-उत्तराषाढा, स्वाती, श्रवण, पूर्वाफा०. पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा,. अनुराधा, धनिष्ठा कृतिका ह्या नक्षत्रावर किंवापुढें सांगितलेल्या विवाहनक्षत्रांवर वस्त्रालंकार, उत्तम फळें आणि सुगंधि पुष्पं कन्येला देऊन ती कन्या संतुष्ट झाल्यावर मग कन्यावरण ह्मणजे वाग्दान करावें.

वरवरण मुहूर्त (वसंतमालिका.)

धरणिदेवोथवाकन्यकासोदरःशुभदिनेगीतवाद्यादिभिःसंयुतः ॥
वरवृतिंवस्त्रयज्ञोपवीतादिनाध्रुवयुतैर्वन्हिपूर्वात्रयैराचरेत् ॥ ११ ॥

अर्थ-पुरोहितादि कोणि ब्राह्मण; किंवा कन्येचाभ्राता यांनी शुभ दिवशीं मंगलगीतवाद्यांसह वराकडे जाऊन वराला वस्त्रें, यज्ञोपवीतें, सुगंधि पुष्पें, मधुर फळें इत्यादि देऊन वरवरण करावें. ध्रुव ४, कृत्तिका पूर्वाफ०,पूर्वाषाढा, पूर्वाभाद्र० हीं नक्षत्रें वर वरणाला शुभ जाणावीं.

कन्येचा विवाहकाल आणि ग्रहशुद्धि (वसंतमाला.)

गुरुशुद्धिवशेनकन्यकानांसमवर्षेषुषडब्दकोपरिष्टात् ॥
रविशुद्धिवशाच्छुभोनराणामुभयोश्चंद्रविशुद्धितोविवाहः ॥ १२ ॥

अर्थ.—कन्येला पूर्ण सहा वर्षें झाल्यानंतर सम वर्षांत, आणि कन्येच्या जन्मराशीपासून गोचर प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें तिला गुरुबळ असतां त्या कन्येचा विवाह करावा. सोळा वर्षें पूर्ण झाल्यावर विषम वर्षीं पुरुषाचा विवाह करावा. विवाहकाळीं कन्येला गुरुबळ अवश्यक आणि तसेंच पुरुषाला रविबळ अवश्यक होय. उभयतांलाही चंद्रबळ विवाहसमयीं अवश्य असलें पाहिजे.

विवाहमास (द्रुतविलंबित.)

मिथुनकुंभमृगालिवृषाजगेमिथुनगेपिरवौत्रिलवेशुचेः ॥
अलिमृगाजगतेकरपीडनंभवतिकार्तिकपौषमधुष्वपि ॥ १३ ॥

अर्थ-मिथुन, कुंभ, मकर, वृश्चिक, वृषभ, मेष, ह्या राशींला सूर्य असतां विवाह शुभ जाणावा. आणि आषाढांत शुक्ल दशमीपर्यंत मिथुनाला रवि असतांही विवाह शुभ होय. तसाच वृश्चिक राशीला सूर्य असतां कार्तिकांत शुक्ल एकादशीपासून पुढें ह्मणजे चातुर्मास्यसंपल्यावर, आणि मकराला सूर्य असतां पौषमासांत, व मेषाला सूर्य असतां चैत्रांतही विवाह शुभ जाणावा. (हे सौरमानाचे मास सांगितले आहेत. परंतु ह्या मासांत विवाह करण्याचा हल्लीं फार करून प्रचार नाहीं. माघ, फाल्गुन, वैशाख, ज्येष्ठ व मार्गशीर्ष ह्या मासांतच सध्या विवाह करितात. आषाढांत शुद्ध दशमीपर्यंत, व कार्तिकांत शुद्ध एकादशीपासून पुढें विवाह करण्याचा कोठें कोठें प्रचार आहे.

जन्म मासादिकांचा विवाहाला विधिनिषेध. (रथोद्धता.)

आद्यगर्भसुतकन्ययोर्जन्ममासभतिथौकरग्रहः ॥
नोचितोथविबुधैःप्रशस्यतेचेद्द्वितीयजनुषोःसुतप्रदः ॥ १४ ॥

अर्थ—प्रथम गर्भोत्पन्न पुत्र, आणि प्रथम गर्भोत्पन्न कन्या अशा दोहोंचा विवाह त्यांच्या जन्ममासांत, जन्मनक्षत्रावर आणि जन्मतिथीवर करणे उचित नाहीं. परंतु द्वितीयादि गर्भोत्पन्न पुत्र व कन्या असतां त्याचा विवाह जन्मामासांत, जन्मनक्षत्रावर व जन्मतिथीवर केला असतां पुत्र प्राप्ति करणारा होतो असें पंडितांचे मत आहे यास्तव तो शुभ जाणावा.

ज्येष्ठ मासांत विवाहाचा विशेष नियम (शालिनी.)

ज्येष्ठद्वंद्वंमध्यमंसंप्रदिष्टंत्रिज्येष्ठंचेन्नैवयुक्तंकदापि ॥
केचित्सूर्येवन्हिगंप्रोह्य चाहुर्नैवान्योन्यंज्येष्ठयोःस्याद्विवाहः ॥ १५ ॥

अर्थ—ज्येष्ठमास, ज्येष्ठकन्या, व ज्येष्ठपुत्र झाला त्रिज्येष्ठ ह्मणावें. असा त्रिज्येष्ठ योग असतां विवाह करूंनये. वरील त्रिज्येष्ठा पैकीं ज्येष्ठमास आणि कन्या किंवा वर यातून एक ज्येष्ठ असा द्विज्येष्ठ योग असत विवाह मध्यम जाणावा. अर्थात त्रिज्येष्ठांतून कोणतेही एक ज्येष्ठ असतां विवाह शुभ होय कृत्तिकेवाचून अन्य नक्षत्रीं सूर्य असतां ज्येष्ठ मासांत ज्येष्ठ कन्येचा किंवा ज्येष्ठ पुत्राचा विवाह करावा असें कित्येकांचें मत आहे. ज्येष्ठकन्येचा ज्येष्ठवराशीं कधींही विवाह करूं नये.

विवाहसंबंधी शास्त्रार्थ. (हरिणी.)

सुतपरिणयात्षण्मासांतःसुताकरपीडनंनचनिजकुलेतद्वद्वामंडनादपिमुंडनम् ॥
नचसहजयोर्देयेभ्रात्रोःसहोदरकन्यकेनसहजसुतोद्वाहोब्दार्धेशुभेनपितृक्रिया॥१६॥

अर्थ--एक कुलामध्यें तीन पुरुषांपर्यंत पुत्रांच्या विवाहानंतर सहा महिन्याचे आंत कन्येचा विवाह करूंनये. तसेंच एक कुळामध्यें मंडनानंतर मुंडनही सहा महिनेपर्यंत करूं नये. चौल, उपनयन, गोदान ह्मणजे केशान्त आणि समावर्तन ह्या चार संस्कारांस मुंडन ह्मणावें. अर्थात् विवाहादि इतर संस्कार मंडन होत. सीमंतोन्नयन, चौल, उपनयन, गोदान, विवाह हे पांच संस्कार गुरुमंगल समजावे ह्यां शिवाय इतर संस्कार लघुमंगल होत. गुरुमंगला नंतर सहा महिने पर्यंत लघुमंगल करूं नये. सख्या भावांला सख्या बहिणी देऊं नये पुत्राच्या किंवा कन्येच्या विवाहा नंतर त्यांच्या सख्या भावंडांचा विवाह सहा महिन्याचे आंत करूं नये. शुभ कार्यांमध्यें पितृक्रिया ह्मणजे श्राद्धादि अशुभ कार्यें करूं नयेत.

प्रतिकूल निर्णय (इंद्रवज्रा.)

वध्वावरस्यापिकुलेत्रिपुरुषेनाशंव्रजेत्कश्चननिश्चयोत्तरम् ॥
मासोत्तरंतत्रविवाहइष्यतेशांत्याथवासूतकनिर्गमेपरैः ॥ १७ ॥

अर्थ-वाग्दानानंतर वधूच्या किंवा वराच्या कुळांत तीन पुरुषांतील कोणी मनुष्य मरण पावणें झाला प्रतिकूल ह्मणतात. असें प्रतिकूल झाले असतां मरणदिवसापासून एक महिन्या नंतर गणेशशांति करून त्या वधूवरांचा विवाह करावा. कित्येक आचार्य सुतक संपताच शांति करून विवाह करावा असें ह्मणतात.

चौलादि संस्कारांचा शास्त्रार्थ. (उपजाति.)

चूडाव्रतंचापिविवाहतोव्रताच्चूडाजनेष्टापुरुषत्रयांतरे ॥
वधूप्रवेशाच्चसुताविनिर्गमःषण्मासतोवाब्दविभेदतःशुभः ॥ १८ ॥

अर्थ--विवाहानंतर सहा महिनेपर्यंत चौल, व्रतबंध, महानाम्न्यादि व्रतें, व समावर्तन हीं तीन पुरुषांपर्यंतच्या सापिंडांनीं करू नये. आणि उपनयनानंतर सहा महिन्यांच्या आंत तीन पुरुषपर्यंत चौल करूं नये. पुत्राचा विवाह होऊन वधूप्रवेश झाल्यावर ह्मणजे नवी सून प्रथम घरांत आल्यावर सहा महिने होण्यापूर्वीं कन्या निर्गम ह्मणजे कन्येचा विवाह झाल्यावर तिला प्रथम सासरीं पाठविणें करूं नये. परंतु हीं सर्व सहा महिने पूर्ण झाल्यावर किंवा वर्ष बदललें असतां शुभ जाणावीं. (माघांत किंवा फाल्गुनांत विवाह करून चैत्रादिकांत चौलादि कार्यें करणें वर्ष भेदामुळें शुभ इत्यादि जाणावें.

दुष्ट नक्षत्रोत्पन्न कन्या पुत्रांची फळें. (वसंततिलका.)

श्वश्रूविनाशमहिजौसुतरांविधत्तःकन्यासुतौनिर्ऋतिजौश्वशुरंहतश्च ॥
ज्येष्ठाभजाततनयास्वधवाग्रजंचशक्राग्निजाभवतिदेवरनाशकर्त्री ॥ १९ ॥

अर्थ-आश्लेषा नक्षत्रावर जन्म झालेल्या कन्या अथवा पुत्र विवाहानंतर आपल्या सासूला मरण देतात तसेंच मूळ नक्षत्रोत्पन्न कन्या किंवा पुत्र आपल्या सासऱ्याला मारतात. ज्येष्ठा नक्षत्रीं जन्मलेली कन्या आपल्या पतीच्या मोठ्या भावाला मारिते. आणि विशाखा नक्षत्रोत्पन्न कन्या आपल्या पतीच्या धाकट्या भावाला मारिते.

पूर्व श्लोकोक्त फळांचा अपवाद. (अनुष्टुप्.)

द्वीशाद्यपादत्रयजाकन्यादेवरसौख्यदा ॥ मूलांत्यपादसार्पाद्यपादजातेतयोःशुभे ॥ २० ॥

अर्थ-विशाखा नक्षत्राच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या चरणावर जन्मलेली कन्या आपल्या पतीच्या धाकट्या भावाला सुख देणारी होते अर्थात् चतुर्थ चरणावर जन्मलेली मात्र धाकट्या दिराला मरण दा-

थक जाणावी. मूळ नक्षत्राच्या चतुर्थ चरणावर आणि आश्लेषा नक्षत्रांच्या प्रथम चरणावर जन्मलेली कन्या अनुक्रमें आपल्या सासऱ्याला सासूला शुभदायक जाणावी.

घटित विचार व घटिताच्या आठ प्रकारांचीं नांवें. (अनुष्टुप्.)

वर्णोवश्यतथातारायोनिश्चग्रहमैत्रकम् ॥ गणमैत्रंभकूटंचनाडीचैतेगुणाधिकाः ॥ २१ ॥

अर्थ—ह्या घटिताला मेलक असेंही नांव आहे. कन्येचा ज्या वराशीं विवाह करणार त्या कन्येच्या आणि वरच्यां जन्म नक्षत्रावरून व जन्मराशीवरून विवाहा नंतर तीं वधूवरें एक मेकाविषयीं अनुकूलपणें वागतील अथवा तीं प्रतिकूल होतील, ह्याविषयींचा विचार कसा करावा हें ह्या घटितांत सांगितलें आहे. ह्या घटिताचे आठ प्रकार आहेत. १ वर्ण, २ वश्य, ३ तारा, ४ योनि, ५ ग्रहमैत्र, ६ गणमैत्र, ७ राशिकूट, ८ नाडी ह्या वर्णादि आठ भेदांचे अनुक्रमें एक दोन तीन इत्यादि गुण जाणावे ह्मणजे पुढें सांगितल्याप्रमाणें वर्ण शुभ असतां १ गुण, वश्य शुभ असतां २ गुण इ० आहेत वर्णादि शुभ गुण असतां येणारे सर्व गुण ३६ होतात.

वर्णविचार (प्रमाणिका.)

द्विजाझषालिकर्कटास्ततोनृपाविशोंघ्रिजाः ॥ वरस्यवर्णतोधिकावधूर्नशस्यतेबुधैः ॥ २२ ॥

अर्थ— मीन, वृश्चिक, कर्क ह्या राशींचा ब्राह्मणवर्ण होय. मेष, सिंह, धन यांचा क्षत्रिय. वृषभ, कन्या, मकर यांचा वैश्य. मिथून, तूळ, कुंभ याचा शूद्र असे वर्ण जाणावे. वराच्या वर्णाहून कन्येचा वर्ण श्रेष्ठ असूं नये. अर्थात् उभयतांचा वर्ण एक असावा किंवा वराच्या वर्णापेक्षा कन्येचा वर्ण हीन असावा. दोघांचा वर्ण एक असतां अथवा कन्येचा वर्ण हीन असता १ एक गुण घ्यावा वराहून कन्येचा वर्ण श्रेष्ठ असतां शुन्य गूण, दोघांचा वर्ण एक असतां अर्धा गुण घ्यावा असे क्वचित् मत आहे.

वश्यविचार (इंद्रवज्रा.)

हित्वामृगेंद्रंनरराशिवश्याःसर्वेतथैषांजलजास्तुभक्ष्याः ॥
सर्वेपिसिंहस्यवशेविनालिंज्ञेयंनराणांव्यवहारतोन्यत् ॥ २३ ॥

अर्थ— मिथुन, कन्या, तूळ ह्या नर राशींला सिंहावांचून मेषादि सर्व राशि वश्य होत; परंतू कर्क, मकर, कुंभ मीन ह्या जलजराशि नरराशींला भक्ष्य जाणाव्या. सिंहाला वृश्चिकावांचून सर्व राशि वश्य समजाव्या. ह्याशिवाय बाकीचा विचार लोकव्यवहारानें करावा. वरराशीला कन्याराशि वश्य असतां २ गुण घ्यावे. व भक्ष्य असतां गुण घ्यावा उभयतांच्या राशींत परस्पर वैर असेल तर शून्य गुण जाणावा.

ताराकूट विचार. (अनुष्टुप्.)

कन्यर्क्षाद्वरभंयावत्कन्या भंवरभादपि ॥ गणयेन्नवहृच्छेषेत्रीष्वद्रिभमसत्स्मृतम् ॥ २४॥

अर्थ कन्येच्या जन्मनक्षत्रापासून वराचें जन्मनक्षत्र मोजावें. तसेंच वराच्या जन्मनक्षत्रापासून कन्येचें जन्मनक्षत्र मोजावें मग त्या दोनही संख्याला ९ नीं भागावें बाकी ३।५।७ राहिली तर तारामैत्री नाहीं असे समजावें आणि १।२।४।६।८।९बाकी असतां शुभ होय. दोनही संख्येची बाकी शुभ असतां ३ गुण घ्यावे. एका संख्येची शुभ व एकीची अशुभ असें असतां दीड १॥ गुण घ्यावा. आणि दोन्ही संख्याची अशुभ बाकी ह्मणजे ३।५।७ह्यातील असतां गुण नाहीं.

योनिकूट विचार. (शार्दूलविक्रीडित.)

अश्विन्यंबुपयोर्हयोनिगदितःस्वात्यर्कयोःकासरःसिंहोवस्वजपाद्भयोःसमुदि
तोयाम्यांत्ययोःकुंजरः ॥ मेषोदेवपुरोहितानलभयोःकर्णाम्बुनोर्वानरःस्याद्वै
श्वाभिजतोस्तथैवनकुलश्चांद्राब्जयोन्योरहिः ॥ २५ ॥ ज्येष्ठामैत्रभयोःकुरंग
उदितोमूलार्द्रयोःश्वातथामार्जारोदितिसार्पयोरथमघायोन्यांस्तथैवोंदुरुः ॥ व्या

घोद्वीशभंचित्रयोरपिचगौरर्यम्णबुध्न्यर्क्षयोः योनिःपादगयोः परस्परमहावैरं भयोन्योस्त्यजेत् ॥ २६ ॥

अर्थ—अश्विनी, शततारका, अश्वयोनी. स्वाती हस्त महिष, धनिष्ठा, पूर्वा भाद्रपदा, सिंह. भरणी, रेवती, हत्ती. पुष्य, कृतिका. मेष. श्रवण, पूर्वाषाढा, वानर. उत्तराषाढा, अभिजित्, मुंगुस. मृग, रोहिणी, सर्प. ज्येष्ठा, अनुराधा, हरिण. मूळ, आर्द्रा, श्वान. पुनर्वसू, आश्लेषा, मांजर. मघा, पूर्वा फल्गुनि, उंदीर विशाखा, चित्रा, वाघ. उत्तराफल्गुनि उत्तराभाद्रपदा, गाय. या प्रमाणे योनि जाणाव्या तसेच अश्व महिष. सिंह हत्ती. मेष वानर. नकुल सर्प. हरिण श्वान. मांजर उंदीर. वाघ गाय. प्रमाणे क्रमानें. प्रत्येक दोन दोन राशींचें महावैर जाणावें.

कन्येच्या आणि वराच्या जन्मनक्षत्रांच्या योनीचें परस्पर महावैर सर्वथा त्याज्य होय. वधुवरांची जन्मनक्षत्र योनि एक असावी हें उत्तम होय. भिन्न योनि असून त्यामध्यें शत्रुत्व नसतां मध्यम जाणावें. उभयतांच्या योनीमध्यें वैर असतां त्या दंपत्याचा वियोग होतो. वर सांगितलेल्या महावैरांतही गोव्याघ्र. नकुल सर्प. व सिंह हत्ती. यांचें अतिवैर म्हणून शून्य गुण घ्यावा. इतर महावैरांचा १ गुण घ्यावा. अश्वमेषादिकांत शत्रुमित्रत्व नाहीं म्हणून अशा उदासीनांचे २ गुण घ्यावे. गोमेषादि कांचीं मैत्री आहे याकरितां त्यांचे ३ गुण घ्यावे. आणि उभयतांची एक योनि असली तर त्यांची अतिमैत्री म्हणून ४ गुण घ्यावे. योनींच्या शत्रुमित्रत्वाचा विचार करतांना लोकव्यवहारही मनांत आणून करावा.

ग्रहमैत्रीचा विचार. (शार्दूलविक्रीडित)

मित्राणिद्युमणेःकुजेज्यशशिनःशुक्रार्कजौवैरिणौ । सौम्यश्चास्यसमोविधोर्बुधर वीमित्रेनचास्यद्विषत् ॥ शेषाश्चास्यसमाःकुजस्यसुहृदश्चंद्रेज्यसूर्याबुधः । शत्रुः शुक्रशनीसमौचशशभृत्सुनोः सिताहस्करौ ॥ २७ ॥ मित्रेचास्यरिपुःशशीगुरु शनिक्ष्माजाःसमागीष्पतेः । मित्राण्यर्ककुजेंदवोबुधसितौशत्रूसमःसूर्यजः ॥ मित्रेसौम्यशनीकवेःशशिरवीशत्रूकुजेज्यौसमौ । मित्रेशुक्रबुधौशनेःशशिरवि क्ष्माजाद्विषोन्यःसमः ॥ २८ ॥

ग्रहमैत्री कोष्टक.

ग्रह.	रवि	चंद्र	मंगळ	बुध	गुरु.	शुक्र,	शनि.
मित्र	मंगुं चं.	बु.र	चं गु र.	शु.र.	र.मं चं.	बु.श.	बुशु.
शत्रु.	शु श.	०	बु.	चं.	बु शु.	चं.र	चं.र.मं.
सम.	बु.	मं गुशुश,	शुश.	गु.शम.	श.	मं.गु	गु.

अर्थ—ह्या कोष्टकांत सूर्यादि प्रत्येक ग्रहांच्या खालीं त्यांचे मित्र. शत्रु आणि सम असे ग्रह लिहिले आहेत मित्र व शत्रु ह्या दोन शब्दांचे अर्थ प्रसिद्धच आहेत. जे शत्रु नव्हेत आणि मित्रही नव्हेत ते सम होत. कन्येची आणि वराची जन्मराशि एक असतां किंवा उभयतांच्या स्वामींची परस्पर मैत्री असतां ५ गुण घ्यावे. राशिस्वामी सम व मित्र असतां ४ गुण. दोनही परस्पराशीं सम असतां ३ गुण मित्र आणि शत्रु असे असतां २ गुण. सम व शत्रु असे असतील तर १ गुण. दोघांच्याही जन्म राशींचे स्वामी परस्पर शत्रु असतां गुण नाहीं.

गणकूटविचार (वसंततिलका १. मालिनी १.)

रक्षोनरामरगणाःक्रमतोमघाहिर्वास्विंद्रमूलवरुणानलतक्षराधाः ॥

पूर्वोत्तरात्रयविधातृयमेशभानिमैत्रादितींदुहरिपौष्णमरुल्लघूनि ॥ २९ ॥
निजनिजगणमध्येप्रीतिरत्युत्तमास्याद्मरमनुजयोःसामध्यमासंप्रदिष्टा ॥
असुरमनुजयोश्चेन्मृत्युरेवप्रादष्टोदनुजविबुधयोःस्याद्वैरमेकांततोत्र ॥ ३० ॥

अर्थ—राक्षसगण, मनुष्यगण आणि देवगण अशा क्रमानें तीनही गणांचीं नक्षत्रें ह्या श्लोकांत सांगितलीं आहेत, तीं स्पष्ट समजतील. राक्षसगण-मघा, आश्लेषा, धनिष्ठा, ज्येष्ठा, मूळ शततारका, कृत्तिका, चित्रा विशाखा. मनुष्यगण-पूर्वाफल्गुनी, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, उत्तराफल्गुनी उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा रोहिणी, भरणी, आर्द्रा. देवगण-अनुराधा, पुनर्वसु, मृगशीर्ष, श्रवण, रेवती, स्वाती, अश्विनी, पुष्य, हस्त.

अर्थ—वधूवरांच्या जन्मनक्षत्रांचे गण एकच असतां त्या दंपत्याची प्रीति एकमेकांविषयीं फार उत्तम होते कन्या आणि वर ह्यांतून कोणाही एकाचा देवगण व दुसऱ्याचा मनुष्यगण असें असतां मध्यम प्रीति जाणावी. एकाचा राक्षसगण आणि दुसऱ्याचा मनुष्यगण असें असतां मृत्युकारक होत. उभयांत एकाचा राक्षसगण व दुसऱ्याचा देवगण असे असतील तर दंपत्यात खचित वैर होईल असें जाणावें. स्त्री पुरुषाचा गण एकच असतां ६ गुण, एकाचा देव आणि दुसऱ्याचा मनुष्य असे असतां ५ गुण, कन्येचा देवगण आणि वराचा मनुष्यगण असतां ४ गुण, देव आणि राक्षस किंवा मनुष्य आणि राक्षस ह्या दोहोंचें शून्य, वराचा राक्षसगण असून कन्येचा देवगण असल्यास २ गुण आणि मनुष्यगण असल्यास १ गुण असे गणाचे गुण घ्यावे.

राशिकूट विचार. (अनुष्टुप्.

मृत्युःषडष्टकेज्ञेयोपत्यहानिर्नवात्मजे ॥ द्विर्द्वादशेनिर्धनत्वंद्वयोरन्यत्रसौख्यकृत् ॥ ३१ ॥

अर्थ—कन्येच्या जन्मराशीपासून वराची जन्मराशि मोजावी. आणि वराच्या जन्मराशीपासून कन्येची जन्मराशि मोजावी. (अशा उभयतांच्या राशि मोजल्यानें येणाऱ्या दोन संख्याची बेरीज निरंतर १४ होते कारण उभयतांच्या राशि परस्पर मोजताना दोघाच्याही जन्मराशि दोनदां मोजल्या जातात.) मग आले ल्या दोन संख्या ६ आणि ८ असतां दंपत्याला मृत्युकारक जाणाव्या ह्याला षडष्टक असें ह्मणतात. संख्या ९ आणि ५ असतां अपत्य हानि जाणावी. ह्याला नव पंचम ह्मणावें. तशाच २ व १२ संख्या असतां निर्धनत्व जाणावें ह्याला द्विर्द्वादश ह्मणावें. अशीं हीं तीन राशिकूटें दंपत्याला अशुभ होत. बाकीचीं सर्व शुभ जाणावी. तृतीयैकादश, चतुर्थदशम, आणि उभय सप्तम हीं शुभ कुटांचीं नांवें होत.

अशुभ कुटांचे परिहार. (शार्दूलविक्रीडित.)

प्रोक्तेदुष्टभकूटकेपरिणयस्त्वेकाधिपत्येशुभोथोराशीश्वरसौहृदेपिगदितोनाड्यृक्षशुद्धियदि ॥ अन्यर्क्षेशपयोर्बलित्वसखितेनाड्यक्षशुद्धौतथाताराशुद्धिवशेच राशिवशताभावेनिवक्तोबुधैः ॥ ३२ ॥

अर्थ-मागील श्लोकांत जीं तीन दुष्ट राशिकूटें सांगितलीं त्यांतलें कोणतेंही असून जरें त्या दोनराशींचा स्वामी एकच ग्रह असेल तर अशुभ राशिकूट असतांही त्या कन्यावरांचा विवाह करावा. असें नसून दोन राशींचे स्वामींची मैत्री असेल आणि नाडी नक्षत्रें शुद्ध असतील ह्मणजे वधूवरांची एक नाडी नसेल तरीही विवाह शुभ जाणावा. ह्या दोन प्रकारांहून अन्य दुष्कूटें असतां ह्मणजे राशि स्वामी एक नसतां किंवा त्यांची परस्पर मैत्री नसतां कन्येचा आणि वराचा जन्मराशींतील ज्या नवांशीं जन्म झाला असेल त्या नवांशांचे स्वामी उच्चादिस्थानीं असल्यामुळें बलवान् असतील आणि त्या नवांश स्वामींची मैत्री असेल व नाडीशुद्धि ताराशुद्धि आणि उभयतांच्या राशि परस्पर वश्य असतील तर विवाह करणें शुभ जाणावें.

दुष्ट गणकूटाचा व राशिकूटाचा परिहार. (शालिनी.)

मैत्र्यांराशिस्वामिनोरंशनाथद्वंद्वस्यापिस्याद्गणानांनदोषः ॥

खेटारित्वंनाशयेत्सद्भकूटंखेटप्रीतिश्चापिदुष्टंभकूटम् ॥ ३३ ॥

अर्थ—कन्येच्या आणि वराच्या राशि स्वामींची मैत्री असेल तर किंवा राशींतल्या नवांश स्वामींची मैत्री असेल तरही दुष्ट गणांचा दोष नाहीं. म्हणजे कन्येचा राक्षसगण असून वराचा मनुष्यगण किंवा देवगण असला तरी चालेल. मागें तीन शुभ राशिकूटें सांगितलीं त्यांतून कोणतेंही शुभ कूट असतां तें उभयतांच्या राशिस्वामींच्या शत्रुत्वाचा नाश करितें. आणि वधूवरांच्या राशिस्वामींची परस्पर मैत्री असली तर ती अशुभ राशिकूटांचाही नाश करिते. राशिकूट अशुभ असतां गुण शून्य, अशुभ राशिकूट असून तें अपवादानें शुभ होत असतां ४ गुण घ्यावे राशिकूट मुळचेंच शुभ असतां पूर्ण ह्मणजे ७ गुण जाणावे.

नाडीकूट विचार. (स्रग्धरा)

ज्येष्ठारौद्रार्यमांभःपतिभयुगयुगंदास्रभंचैकनाडीपुष्येंदुत्वाष्ट्रमित्रांतकवसुजलभंयोनिबुध्न्येचमध्या ॥ वाय्वग्निव्यालविश्वोडुयुगयुगमथोपौष्णभंचापरास्या दंपत्योरेकनाड्यांपरिणयनमसन्मध्यनाड्यांहिमृत्युः ॥ ३४ ॥

अर्थ—घटिताच्या आठ प्रकारच्या कूटांत नाडीकूट हें मुख्य आहे. तिचे आद्यनाडी, मध्यनाडी व अंत्य, नाडी असे तीन भेद आहेत. कोणत्या नक्षत्राची कोणती नाडी हें स्पष्ट समजेल. आद्यनाडी.-ज्येष्ठा, मूळ, उत्तराफाल्गुनी, हस्त, आर्द्रा, पुनर्वसु, शततारका, पूर्वाभाद्रपदा, अश्विनी. मध्यनाडी-पुष्य. मृग, चित्रा, अनुराधा, भरणी, धनिष्ठा, पूर्वाषाढा पूर्वाफल्गुनी उत्तराभा. अंत्यनाडी.-स्वाती, विशाखा, कृत्तिका-रोहिणी, आश्लेषा, मघा, उत्तराषाढा, श्रवण, रेवती.कन्या आणि वर ह्यांचीं जन्मनक्षत्रें कोणत्याही एकनाडींत असतां त्याचा विवाह करणें अशुभ होय त्यातूनही दोघांचीं जन्मनक्षत्रें मध्यनाडींत असून त्यांचा विवाह केला तर उभयतांलाही मृत्यु जाणावा. स्त्री पुरुषांची भिन्न नाडी असतां ८ गुण घ्यावे. आणि एक नाडीचे गुण शून्य होत.

पूर्वभागयोगी, मध्यभागयोगी व अंत्यभागयोगी नक्षत्रें (इंद्रवज्रा.)

पौष्णेशशाक्राद्रसमूर्यनंदापूर्वार्धमध्यापरभागयुग्मम् ।
भर्ताप्रियःप्राग्युजिभेस्त्रियाःस्यान्मध्येद्वयोःप्रेमपरेप्रियास्त्री ॥ ३५ ॥

अर्थ—रेवतीपासून ६ नक्षत्रें पूर्वभागयोगी होत. आर्द्रा नक्षत्रापासून १२ मध्यभागयोगी आणि ज्येष्ठा नक्षत्रापासून ९अंत्यभागयोगी जाणावीं ह्यांतील पूर्वभागयोगी नक्षत्रांवर राजा आपल्या अंतःपुरांत स्त्रीसमागमार्थ किंवा वेश्यासमागमार्थ गेला असतां स्त्रियांला राजा प्रिय होतो.मध्यभागयोगी नक्षत्रांवर राजाची स्त्रियांवर आणि स्त्रियांची राजावर अशी एकमेकांविषयीं प्रीति होते. आणि अंत्यभागयोगी नक्षत्रांवर राजाला स्त्रिया प्रिय होतात. हा तीन प्रकारच्या नक्षत्रांच्या फळांचा विचार सर्व स्त्रीपुरुषांच्या प्रथम समागमाविषयींही जाणावा.

वर्गकूट विचार (आर्या.)

अकचटतपयशवर्गाःखगेशमार्जारसिंहशुनाम ॥
सर्पाखुमृगावीनांनिजपंचमवैरिणामष्टौ ॥ ३६ ॥

अर्थ अ. क च ट त प य श हे आठ वर्ग क्रमानें गरूड, मार्जार, सिंह श्वान सर्प, उंदीर हरिण, बकरा ह्यांचे जाणावे. ह्यांत प्रत्येकाचें आपल्यापासून पांचव्याशीं वैर आहे जसें गरूडापासून सर्प पांचवा ह्मणून त्यांचें परस्पर वैर आणि मार्जारापासून उंदीर पांचवा, त्यांचेंहीं वैर आहे. हे सर्व वर्ग आठ आहेत. पुढें चु चे चो ला इत्यादिकांचें कोष्टक दिलें आहे त्यातील चार अक्षरें प्रतिनक्षत्रांच्या चार चरणाचीं जाणावीं. जन्मनक्षत्राच्या ज्या चरणावर जन्म झाला असेल त्या चरणाचें पुढील कोष्टकांतील अक्षर घेऊन तें प्रथमाक्षर कल्पून त्या पुढें कांहीं अक्षरें योजून नांव करण्याची हल्लीं वहिवाट आहे. व हेंच नक्षत्रनाम मानतात.

नक्षत्रनामाचें प्रथमाक्षर अं. क. च इ० आठ वर्गांतील ज्या वर्गांतलें असेल तो वर्ग वर गरूडादि सांगितले आहेत त्यांतून कोणाचा हें पहावें. याप्रमाणें कन्या आणि वर यांच्या किंवा धनी व चाकर यांच्या जन्मनक्षत्रचरणावरून विचार करून त्यांच्या वर्गांत वैर असतां त्यांची परस्पराविषयीं प्रीति होणार नाहीं असें जाणावें.

अश्विनी. चु चे. चो. ला.	पुष्य. हु हे हो. डा	स्वाती रु. रे रो. ता.	अभिजित्
भरणी. ली लू ले. लो	आश्लेषा. डि डू डे. डो.	विशाखा. ती.तु. ते.तो.	श्रवण,खी खु. खे.खो,
कृत्तिका आ. इ उ.ए	मघा मा मी मु मे	अनुराधा.ना. नी.नू. ने	धनिष्ठा गा गी.गु.गे,
रोहिणी ओ वा. वि,वु	पूर्वाफ०मो टा टि. टू.	ज्येष्ठा. नो.या यी यु	शततारा.गो.सा.सी सू.
मृगशीर्ष वे वो का. की	उत्तराफ०टे टो. प पी.	मूळ ये.यो.भा. भी.	पूर्वाभा से.सो. दा दी.
आर्द्रा कु.घ. ङ छ.	हस्त पू ष. ण. ठ	पूर्वाषा भू ध. फ ढ	उत्तराभा.दू.झ ञ थ.
पुनर्वसु के. को. हा.ही	चित्रा.पे.पो रा.री.	उत्तराषा.भे.भो ज.जी.	रेवती.दे. दी.च.चि.

वधूवरांचें नक्षत्र व राशि एक असतां विशेष निर्णय. (शालिनी.)

राश्यैक्येचेद्भिन्नमृक्षंद्वयोःस्यान्नक्षत्रैक्येराशियुग्मंतथैव ।
नाडीदोषोनोगणानांचदोषोनक्षत्रैक्येपादभेदेशुभंस्यात् ॥ ३७ ॥

अर्थ-कन्येची आणि वराची जन्मराशि एक असून दोघांचीं जन्मनक्षत्रें निरनिराळीं असतां, अथवा जन्म नक्षत्र एकच असून जन्मराशि भिन्न असतां अशुभ नाडीचा व अशुभ गणाचा दोष नाहीं स्त्रीपुरुषाचें नक्षत्र एक असलें तरी चरण भिन्न असणें हें शुभ होय. उभतांचा चरण एक असूं नये. (एक राशि असून भिन्न नक्षत्रें असतील त्यातही वराचें नक्षत्र पूर्वीचें असून त्याच्या पुढील नक्षत्र कन्येचें असावें ह्मणजे शुभ आणि उलट असतां अशुभ होय. जन्मनक्षत्र माहित नसतां व्यवहारिक नांवावरून जन्मनक्षत्रादिकांची कल्पना करावी. व त्यावरूनच सर्व घटित कूटांचा विचार करावा.

जन्मनक्षत्राचा फलविशेष. (वसंततिलका.)

सेव्याधमर्णयुवतीनगरादिभंचेत्पूर्वंहिभृत्यधनिभर्तृपुरादिसद्मात् ॥
सेवाविनाशधननाशनभर्तृनाशग्रामादिसौख्यहृतिदंक्रमशःप्रदिष्टम् ॥ ३८ ॥

अर्थ—सेवकाच्या जन्मनक्षत्राच्या पूर्वीचें नक्षत्र जर धन्याचें असेल तर त्यांच्यामध्यें वैर उत्पन्न होऊन सेव्य सेवकभावाचा नाश होतो. उत्तमर्णाच्या ह्म ० कर्ज देणाऱ्या सावकाराच्या जन्मनक्षत्राच्या पूर्वीचें नक्षत्र अधमर्णाचें ह्म ० कर्ज काढणाराचें असतां धननाश होऊन दोघांचेंही अकल्याण होतें वराच्या नक्षत्रा पूर्वीचें नक्षत्र कन्येचें असतां वराचा नाश जाणावा आणि ज्या नगरांत किंवा गांवांत वास्तव्य करावयाचें त्याचें नक्षत्र वास्तव्य करणाराच्या जन्मनक्षत्रापूर्वीचें असलें तर त्या नगरांत किंवा गांवांत वास्तव्य करणाराचा धननाश होईल असें जाणावें. जसें सेवकाचें जन्मनक्षत्र कृत्तिका व धन्याचें नक्षत्र भरणी हें सेवानाश करणारें होय.

राशिस्वामी व नवांशप्रवृत्ति (मंजुभाषिणी)

कुजशुक्रसौम्यशशिसूर्यचंद्रजाःकविभौमजीवशनिसौरयोगुरुः ॥
इहराशिपाःक्रियमृगास्यतौलिकेंदुभतोनवांशविधिरुच्यतेबुधैः ॥ ३९ ॥

अर्थ-मेष, वृश्चिक या दोन राशीचा स्वामी मंगळ वृषभ, तूळ यांचा शुक्र. मिथून, कन्या यांचा बुध. कर्केचा चंद्र. सिंव्हेचा रवि. धन, मीन, यांचा गुरु. मकर, कुंभ, यांचा शनि या प्रमाणे स्वामी जाणावें. मेषा पासून मेष, सिंव्ह, धन यांची, मकरापासून वृषभ,कन्या, मकर यांची तुळापासून मिथून,तूळ, मकर यांची. कर्कापासून कर्क, वृश्चिक, मीन यांची या प्रमाणे नवांश प्रवृत्ति जाणावी.

होरा (शशिवदना.)

समगृहमध्ये शशिरविहोरा ॥ विषमभमध्ये रविशशिनोःसा ॥ ४० ॥

अर्थ–राशीचें अर्ध म्हणजे १५ अंश झाला होरा म्हणावें प्रत्येक राशीचे अंश ३०आणि होरेचे अंश १५म्हणून प्रतिराशींत दोन दोन होरा असतात.समराशींत प्रथम होरेचा स्वामी चंद्र आणि द्वितीय होरेचा स्वामी रवि होय. विषम राशींत प्रथम होरेचा स्वामी रवि, व द्वितीय होरेचा स्वामी चंद्र जाणावा.

त्रिंशांश आणि द्रेष्काण. (वसंततिलका.)

शुक्रज्ञजीवशनिभूतनयस्यबाणशैलाष्टपंचविशिखाःसमराशिमध्ये ॥
त्रिंशांशको विषमभे विपरीतस्माद्रेष्काणकाःप्रथमपंचनवाधिपानाम् ॥ ४१ ॥

समराशीचे त्रिंशांश स्वामी.					विषमराशीचे त्रिंशांशस्वामी				
शु.	बु.	गु.	श.	मं.	मं.	श.	गु.	बु.	शु.
५	७	८	५	५	५	५	८	७	५

अर्थ–प्रत्येक राशीचे अंश ३० आहेत त्यांतील समराशींचे व विषमराशींचे त्रिंशांश स्वामी बाजूचे कोष्टकावरून समजावे. समराशींत सांगितलेल्या अंश संख्या व त्यांचे स्वामी उलट केल्यानें विषम राशींतील होतात राशीचे तीन भाग करून प्रत्येक भागाला द्रेष्काण म्हणावें प्रत्येक द्रेष्काणाचे अंश १० असतात. राशीचा जो स्वामी तोच पहिल्या द्रेष्काणाचा जाणावा. आणि त्याच राशीपासून पांचव्या राशीचा स्वामी दुसऱ्या द्रेष्काणाचा होय. व नवव्या राशीचा स्वामी तिसऱ्या द्रेष्काणाचा होय. जसे मेषराशींत प्रथम द्रेष्काण स्वामी मंगळ, द्वितीय द्रेष्काणस्वामी रवि व त्रितीय द्रेष्काणस्वामी गुरु.

द्वादशांश व षड्वर्ग फळ (वसंततिलका.)

स्याद्द्वादशांशइहराशितएवगेहंहोराथदृक्कनवमांशकमूर्यभागाः ॥
त्रिंशांशकश्चषडिमेकथितास्तुवर्गाःसौम्यैःशुभंभवतिचाशुभमेवपापैः ॥ ४२ ॥

अर्थ–राशीचें १२ भाग करून प्रत्येक भागाला द्वादशांश म्हणावें. ह्या द्वादशांशांचे स्वामी राशिस्वामीपासून जाणावे. जसे मेषाच्या प्रथम द्वादशांशाचा स्वामी मंगळ, द्वितीय द्वादशांशाचा शुक्र इ० वृषभाचा प्रथम द्वादशांश स्वामी शुक्र, द्वितीय द्वादशांशाचा स्वामी बुध तृतीय द्वादशांशाचा चंद्र इ० गृह, होरा, द्रेष्काण, नवमांश द्वादशांश, आणि त्रिंशांश ह्या सहा प्रकारच्या राशिभागास " षड्वर्ग असें म्हणतात. हे ईष्टकाळीं शुभ ग्रहांचे असतां शुभ होतें, आणि खलग्रहांचे असतां अशुभ होतें. कांहीं खलाचे व कांहीं शुभांचे असें असतां. ६ च्या अर्धाहून अधिक म्हणजे ४ तरी शुभग्रहांचे असावे.

नक्षत्रगंडांत, लग्नगंडांत, आणि तिथीगंडांत. (शार्दूलविक्रीडित.)

ज्येष्ठापौष्णभसार्पभांत्यघटिकायुग्मंचमूलाश्विनीपित्र्यादौघटिकाद्वयंनिगदितं तद्भस्यगंडांतकम् ॥ कर्कालिअंडजभांततोर्धघटिकासिंहाश्वमेषादिगापूर्णांताद्घटिकात्मकंत्वशुभदंनंदातिथेश्चादिमम् ॥ ४३ ॥

अर्थ–ज्येष्ठा, रेवती, आश्लेषा ह्या तीन नक्षत्रांच्या शेवटच्या २ घटिका आणि मघा अश्विनी व मूळ ह्या तीन नक्षत्रांच्या आरंभींच्या २ घटिका हें नक्षत्रगंडांत होय. कर्क, वृश्चिक व मीन ह्या तीन लग्नांच्या शेवटची अर्धी घटिका; आणि सिंह, धन, मेष ह्या तीन लग्नांच्या आरंभीची अर्धी घटिका हें लग्नगंडांत होय. पूर्णातिथींच्या शेवटील १ घटिका व नंदातिथींच्या आरंभींची १ घटिका हें तिथिगंडांत जाणावें हीं तीनहीं गंडांतें शुभकार्यांला अशुभ होत.

कर्तरीदोष. (अनुष्टुप्.

ऋज्वास्यपापौव्ययार्थस्थौयदातदा ॥ कर्तरीनामसाज्ञेयामृत्युदारिद्र्यशोकदा ॥ ४४ ॥

अर्थ-इष्टलग्नापासून बाराव्या राशीला ऋजुगामी ह्मणजे सरळ चालणारा कोणीही खलग्रह व दुसऱ्या राशीला वक्री खलग्रह असे असतील तेव्हां त्या लग्नाला कर्तरी आहे असें जाणावें. ही कर्तरी मृत्यु, दारिद्र्य व शोक देणारी आहे. ह्मणून कर्तरी दोषानें युक्त लग्नीं शुभ कार्य करूं नये.

रव्यादि ग्रहयुक्त चंद्राचीं फळें. (अनुष्टुप्.)

चंद्रेसूर्यादिसंयुक्तेदारिद्र्यंमरणंशुभम् ॥ सौख्यंसापत्न्यवैराग्यंपापद्वययुतेमृतिः ॥ ४५ ।

अर्थ-सूर्यादिग्रहांशीं युक्त चंद्र असतां ह्मणजे कोणताही एक ग्रह व चंद्र हे एक राशीला असतां पुढील फळें जाणावीं. सूर्याशीं युक्त चंद्र असतां दारिद्र्य, मंगळाशीं मरण, बुधाशीं शुभ, गुरूशीं सौख्य, शुक्राशीं सापत्न्य ह्मणजे शत्रुत्व आणि शनीशीं युक्त चंद्र असतां वैराग्य हीं फळें होत. दोन किंवा अधिक पापग्रहांनीं युक्त चंद्र असतां त्याचें फळ मरण होय.

अष्टम लग्नांचा दोष व त्यांचा अपवाद. (अनुष्टुप्.)

जन्मलग्नभयोर्मृत्युराशौनेष्टःक्रूरग्रहः ॥ एकाधिपत्येराशीशमैत्रेवानैवदोषकृत् ॥ ४६ ॥

अर्थ-कन्येच्या आणि वराच्या जन्मलग्नापासून व जन्मराशीपासून अष्टमलग्नीं त्यांचा विवाह करणें इष्ट नाहीं. पण जन्मराशीचा स्वामी व ती पासून जी अष्टम राशि तिचा स्वामी हे एकच असतो किंवा त्यांची परस्पर मैत्री असतां विवाहाला दोष नाहीं. तसाच जन्मलग्नाचा स्वामी व त्यापासून अष्टम राशीचा स्वामी हे एक असतां किंवा त्यांची परस्पर मैत्री असतांही अष्टमलग्नीं विवाह करण्याला दोष नाहीं.

अष्टम लग्नांचा स्पष्ट निर्णय. (उपजाति.)

मीनोक्षकर्कालिमृगास्त्रियोष्टमंलग्नंयदानाष्टमगेहदोषकृत् ॥
अन्योन्यमित्रत्ववशेनसावधूर्भवेत्सुतायुर्गृहसौख्यभागिनी ॥ ४७ ॥

अर्थ—मीन, वृषभ, कर्क, वृश्चिक, मकर, कन्या, ह्या ६ राशी जन्मराशीपासून किंवा जन्मलग्नापासून अष्टम होत असतील तर तीं ६ लग्नें शुभकार्यीं योजिलीं असतां दोषकारक होत नाहींत. कारण वरील मीनादि ६ राशि ज्या राशींपासून अष्टम होतात त्या राशींच्या स्वामींची वरील राशींच्या स्वामींशीं परस्पर मैत्री आहे किंवा त्यांचे स्वामी एकच आहेत ह्मणून अशा अष्टम लग्नांवर विवाह झाल्यानें ती विवाहित कन्या पुत्र, आयुष्य, ग्रह यांचें विपुल सुख भोगणारी होते.

निषिद्धनवांश (कुसुमविचित्रा.)

मृतिभवनांशेयदिचविलग्नेतदधिपतिर्वानशुभकरःस्यात् ॥
व्ययभवनंवाभवतिनदंशस्तदधिपतिर्वाकलहकरःस्यात् ॥ ४८ ॥

अर्थ-कन्येच्या आणि वराच्या जन्मराशीपासून किंवा जन्मलग्नापासून ज्या अष्टमराशि ते नवांश इष्टलग्नीं असतां; अथवा त्या अष्टमराशींचे स्वामी इष्टलग्नीं असतां अशुभकारक होत वधूवरांच्या जन्मलग्नापासून व जन्मराशीपासून ज्या बाराव्या राशि तींच इष्टलग्नें असतां, किंवा ज्या बाराव्या राशि तेच नवांश इष्टलग्नांतील असतां; अथवा त्या बाराव्या राशींचे स्वामी इष्टलग्नीं असतां दंपत्यामध्यें कलह उत्पन्न होतो म्हणून हे सर्व प्रकार विवाहीं वर्ज्य करावे.

नक्षत्रांच्या विषघटी. व ध्रुवांक (वंशस्था १ इंद्रवंशा २)

खरामनोत्यादितिवन्हिपित्र्यभेखवेदतःकरदतश्चतापभे ॥ खबाणतोश्वश्रुतितो
यमांबुपेकृतैर्भगत्वाष्ट्रभविश्वमीत्रभे ॥ ४ ॥ मनांद्रिदैवानिलसौम्यशाकेरु ।

क्षतःशैवकरेष्टिनोजभे ॥ युगाश्वितोबुध्न्यभतोयमाग्यभेखचंद्रतोमित्रभवासवश्रुतौ ॥ ९० ॥ मूले बाणाद्विषनाडिकाःकृतावर्ज्याःशुभेथोविषनाडिकाध्रुवाः । निघ्नाभभोगेनखतर्कभाजिताःस्फुटाभवेयुर्विषनाडिकास्तथा ॥ ९१ ॥

अर्थ—रेवती, पुनर्वसु, कृत्तिका, मघा ध्रुवांक ३०, रोहिणी ४०. आश्लेषा ३२, आश्विनी५०, उत्तराफ. शततारा १८, पूर्वाफ, चित्रा, उत्तराषाढा, पुष्य २०, विशाखा, स्वाती, मृग, ज्येष्ठा १४, आर्द्रा, हस्त २१ पूर्वाभाद्रपदा १६,उत्तराभाद्रपदा पूर्वाषाढा, भरणी २४, अनुराधा, धनिष्ठा, श्रवण १०, मूळ ५६ या प्रमाणें अंक त्यात्यानक्षत्रांचे ध्रुवांक जाणावे. ह्या अंका इतक्या त्या नक्षत्रांच्या घटिका झाल्यावर ४ विषघटी असतात त्या शुभकार्यी वर्ज्य कराव्या. दिवसनक्षत्र बरोबर ६० घटी असतांना मात्र हा नियम झाला. परंतु साठापेक्षा अधिक किंवा उणें दिवसनक्षत्र असतां पुढीलप्रमाणें विषघटी उत्पन्न कराव्या.ज्या दिवसनक्षत्राच्या विषघटी काढणें असतील त्या नक्षत्राच्या भुक्त भोग्य घटिका एकत्र करून त्यांनीं त्याच नक्षत्राच्या ध्रुवांकाला गुणावें. मग त्या गुणाकाराला ६० साठानीं भागावें. जो भागाकार येईल तितक्या घटीनंतर विषघटीला आरंभ होईल असें समजावें. व त्याचप्रमाणें नक्षत्राच्या भुक्त भोग्य घटिकांनीं ४ ह्यांस गुणून६० नीं भागावें ह्मणजे जो भागाकार येईल तितक्या स्पष्ट विषघटी,वर सांगितलेल्या आरंभापासून सोडाव्या उदाहरणः—गुरवारीं पुष्यनक्षत्र ४४ घटिका त्याच्या विषघटी काढणें आहेत पूर्व दिवशीं ह्मणजे बुधवारीं पुनर्वसु ४० घटिका होतें ह्मणून ६०-४०=२० ह्या पुष्याच्या भुक्तघटिका होत. भुक्तघटी २०+४४ पुष्याच्या भोग्यघटी मिळून ६४ ह्यांनी पुष्याचा ध्रुवांक २० ह्याला गुणून गुणाकार १२८० झाला ६० नीं भागून भागाकार २१ घटिका २० पळें ह्मणून ह्या घटी पळानंतर पुष्याच्या विषघटीला आरंभ होईल. आतां पुष्याच्या सर्व घटी ६४ ह्यांनीं ४ ह्याला गुणून गुणाकार २५६ झाला ६० नीं भागून भागाकार घटि ४पळें १६ ह्या पुष्य नक्षत्राच्या स्पष्ट विषघटी होत, ह्मणून पुष्य नक्षत्र लागल्यापासून २१ घटी २० पळें झाल्यावर ४घटी १६ पळें विषघटीचा काळ ह्मणून त्यांत शुभ कार्य करूं नये.

दिवामुहूर्त आणि रात्रिमुहूर्त. (मालिनी १ अनुष्टुप् १.)

गिरिशभुजगमित्राःपित्र्यवस्वंबुविश्वेभिजिदथचविधातापींद्रइंद्रानलौच ॥
निर्ऋतिरुदकनाथोप्यर्यमाथोभगःस्युःक्रमशइहमुहूर्तावासरेबाणचंद्राः ॥ ९२ ॥
शिवोजपादादष्टौस्युर्मुहूर्ता अदितिजीवकौविष्णवर्कत्वाष्ट्रमरुतोमुहूर्तानिशिकीर्तिताः ९३

अर्थ-दिनमानाचे व रात्री मानाचे १५ भाग करावे प्रत्येक भागत प्रति दिवशी व प्रति रात्री १५दिवा मुहूर्त व १५ रात्रिमुहूर्त असतात जसे प्रतिदिवशी सूर्योदया पासून पहिला मुहूर्त आर्द्रा दुसरा आश्लेषा तिसरा अनुराधा चवथा मघा पाचवा धनिष्ठा साहवा पूर्वाषाढा सातवा उत्तराषाढा आठवा अभिजित नववा रोहिणी दहावा ज्येष्ठा अकरावा विशाखा बारावा मूळ तेरावा शततारा चवदावा उत्तराफ पंधरावा-याप्रमाणें दिवा मुहूर्त जाणावें. तसेंचरात्रीं सूर्यास्ता पासून पहिला आर्द्रा दुसरा पूर्वाभाद्रपदा तिसरा उत्तराभाद्रपदा चवथा रेवती पांचवा अश्विनी साहावा भरणी सातवा कृत्तिका आठवा रोहिणी नववा मृग दहावा पुनर्वसु अकरावा पुष्य बारावा श्रवण तेरावा हस्त चौदावा चित्रा पंधरावा स्वाती याप्रमाणे रात्री मुहूर्त जाणावे.

सूर्यादिवारी त्याज्यमुहूर्त (भुजंगप्रयात)

रवावर्यमाब्राम्हरक्षश्च सोमेकुजेवन्हिपित्र्येबुधेचाभिजित्स्यात् ॥
गुरौतोयरक्षोभृगौब्राह्मपित्र्येशनावीशसार्पौमुहूर्तानिषिद्धाः ॥ ९४ ॥

अर्थ-मागें सांगितलेल्या मुहूर्तापैकीं रविवारीं चवदावा अर्यमा मुहूर्त (उत्तराफ०) दिवसास अशुभ जाणावा. सोमवारीं नववा ब्राह्म (रोहिणी) आणि बारावा राक्षस (मूळ) हे दोन मुहूर्त दिवसास अशुभ मंगळवारीं रात्रौ सातवा वन्हि (कृत्तिका) व दिवसास चवथा पित्र्य (मघा) हे दोन मुहूर्त अशुभ. बुधवारीं आठवा अभिजित् मुहूर्त दिवा अशुभ. गुरुवारीं दिवसास सहावा तोय (पूर्वाषाढा) आणि बारावा

राक्षस (मूळ) हे दोन अशुभ. शनिवारीं दिवसास पहिला ईश (आर्द्रा)आणि दुसरा सार्प (आश्लेषा हे दोन मुहूर्त अशुभ समजावे. ज्या वारीं जे अशुभ मुहूर्त सांगितले ते शुभकार्याला निरंतर वर्ज्य करावे

विवाहनक्षत्रें आणि अभिजित् नक्षत्राचें प्रमाण. (प्रहर्षिणी.)

निर्वेधैःशशिकरमूलमैत्रपित्र्यब्राम्ह्यांत्योत्तरपवनैःशुभोविवाहः॥
रिक्तामारहिततिथौशुभेन्हिवैश्वमांत्यांघ्रिःश्रुतितिथिभागतोभिजित्स्यात् ॥ ५५ ॥

अर्थ-पंचशलाका वेधरहित मृगशीर्ष,हस्त, मूळ, अनुराधा, मघा, रोहिणी, रेवती, उत्तराफाल्गुनी उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा आणि स्वाती ह्या ११ नक्षत्रावर विवाह शुभ होय. रिक्ता ह्मणजे चतुर्थी, नवमी चतुर्दशी, आणि अमावास्या ह्या तिथी शिवाय अन्य तिथींवर व शुभ ग्रहांच्या वारीं विवाह करणें शुभ जाणावें. उत्तराषाढा नक्षत्राचा अंत्य ह्मणजे चतुर्थचरण आणि श्रवण नक्षत्राचा पहिला पंधरावा भाग पूर्वहें अभिजित् नक्षत्र आहे.

विवाहाचा पंचशलाका वेध. (शार्दूलविक्रीडित.)

वेधोन्योन्यमसौविरिंच्यभिजितोर्याम्यानुराधर्क्षयोःविश्वेंद्वोर्हरिपित्र्ययोर्ग्रहकृतोहस्तोत्तराभाद्रयोः ॥ स्वातीवारुणयोर्भवेन्निर्ऋतिभितादित्योस्तथोफाल्ययोः खेटेतत्रगतेतुरीयचरणाद्योर्वातृतीयद्वयोः ॥ ५६ ॥

अर्थ—रोहिणी—अभिजित्. भरणी—अनुराधा. उत्तराभाद्रपदा—हस्त. स्वाती—शततरा. उत्तराषाढा—मृगशीर्ष. श्रवण—मघा. मूळ—पुनर्वसु.उत्तराफाल्गुनी—रेवती हीं जीं नक्षत्रें किहिकीं आहेत त्यांचा परस्पर वेध हो तो ह्मणजे कोणताही ग्रह रोहिणीला असतां अभिजिताला त्याचा वेध होतो आणि अभिजिताला ग्रह असतां रोहिणीला त्या ग्रहाचा वेध होतो ह्याप्रमाणेंच भरणी अनुराधा इत्यादिकांचा वेध जाणावा. ज्या दोन नक्षत्रांचा वेध होतो. त्यातील एकाच्या चतुर्थ चरणां ग्रह असतां दुसऱ्याच्या प्रथम चरणाला वेध होतो; किंवा प्रथम चरणीं ग्रह असला तर चतुर्थ चरणाला वेध होतो. याचप्रमाणें तिसऱ्या चरणीं ग्रह असतां दुसऱ्या चरणाला वेध होतो आणि दुसऱ्याला ग्रह असतां तिसऱ्या चरणाला वेध होतो अशा वेधांकां चरणवेध ह्मणतात.

सप्तशलाका वेध. (शार्दूलविक्रीडित.)

शाक्रेज्येशतभानिलेजलशिवेपौष्णार्यमर्क्षेवसुद्वीशेवैश्वसुधांशुभेहयभगेसार्पानुराधेमिथः ॥ हस्तोपांतिमभेविधातृविधिभेमूलादितीत्वाष्ट्रभाजांघ्रीयाम्यमघेःकृशानुहरिभेविद्धेकुभद्रेखिके ॥ ५७ ॥

अर्थ—ज्येष्ठा—पुष्य. शततारा—स्वाती. आश्लेषा—अनुराधा. हस्त-उत्तराभाद्रपदा. पूर्वाषाढा—आर्द्रा. रेवती उत्तराफ०, धनिष्ठा—विशाखा. उत्तराषाढा-मृगशीर्ष. अश्विनी-पूर्वाषाढा. रोहिणी—अभिजित्. मूळ-पूनर्वसु चित्रा—पूर्वाभाद्रपदा. भरणी—मघा. कृत्तिका—श्रवण हा सप्तशलाकावेध मागच्या पंचशलाकावेधाप्रमाणेंच आहे. ह्यांत ज्येष्ठा आणि पुष्य ह्यांचा परस्पर वेध होतो शततारा व स्वाती यांचा इ० जाणावा. चरणवेध हीं पंचशलाकावेधाप्रमाणें यांत घ्यावा. (शुभ ग्रहाचा वेध असतां विद्ध नक्षत्राचा चरण मात्र सोडावा परंतु खलग्रहाचा वेध ज्या नक्षत्राला असेल तें सर्वच नक्षत्र सोडावें.

क्रूरग्रहयुक्तादि नक्षत्रदोष व त्याचा परिहार (अनुष्टुप्.)

ऋक्षाणिक्रूरविद्धानिक्रूरमुक्तादिकानिच॥भुक्त्वाचंद्रेणमुक्तानिशुभार्हाणिप्रचक्षते॥५८।

अर्थ-क्रूरग्रहांनीं विद्ध नक्षत्रें,व क्रूर ग्रहानें मुक्त ह्मणजे ज्या नक्षत्रीं क्रूर ग्रह असेल त्या पूर्वीचें नक्षत्र क्रूरयुक्त नक्षत्र व त्या पुढील नक्षत्र, आणि त्रिविध उत्पातांनीं दूषित हीं सर्व प्रकारचीं नक्षत्रें शुभकार्यी वर्ज्ज करावीं. परंतु ह्या सर्व प्रकारांनीं दुष्टनक्षत्रांवरून चंद्र गेल्यावर मग तीं शुभ कार्याला योग्य होतात.

पंचशलाकाचक्र (अन्यग्रंथांतील.)



सप्तशलाकाचक्र. (अन्यग्रंथांतील.)



लत्ता. (उपजाति.)

ज्ञराहुपूर्णेंदुसिताःस्वपृष्ठेभंसप्तगोजातिशरैर्मितंहि ॥
संलत्तयंतेर्कशनीज्यभौमाःसूर्याष्टतर्काग्निमितंपुरस्तात् ॥ ६९ ॥

अर्थ-बुध, राहु, पूर्णचंद्र, शुक्र हे चार ग्रह ज्या नक्षत्रीं असतात त्या नक्षत्रांपासून मागील ७।९।२२।५ ह्या नक्षत्रांवर क्रमानें लत्ता (लात) मारतात. ह्या लत्तेला पृष्ठलत्ता ह्मणतात. ही पृष्ठलत्ता पाहते वेळीं नक्षत्रें कृत्तिका, भरणी अश्विनी, रेवती इत्यादि उलट मोजावीं. रवि, शनि, गुरु, मंगळ हे चार ग्रह ज्या नक्षत्राला असतात त्यांपासून क्रमानें १२।८।६।३ ह्या नक्षत्रीं लत्ता मारतात. हिला अग्रलत्ता ह्मणतात. अग्रलत्ता पाहतांना नक्षत्रें सरळच मोजावीं अश्विनीला राहु असतां आश्लेषा नक्षत्रावर लत्ता बसतें असें समजावें पूर्णह्मणजे पूर्णिमेचा चंद्र पृष्ठलत्तेनें २२ व्या नक्षत्रीं लत्ता मारितो. हे नक्षत्र गेलेल्या कृष्णपक्षांत पंचमी षष्ठी, सप्तमी ह्या तिथींवर फार करून येतें.

चंडीश चंडायुध पातांचा दोष. (आर्या.)

हर्षणवैधृतिसाध्यव्यतिपातकगंडशूलयोगानाम्॥अंतेयन्नक्षत्रंपातेननिपातितंतत्स्यात् ।६०

अर्थ-हर्षण, वैधृति साध्य, व्यतीपात, गंड, आणि शूल ह्या ६ योगांच्या अंतीं जें नक्षत्र असेल तें चंडीश चंडायुध नांवाच्या पातानें दूषित आहे असें जाणावें. हें नक्षत्र शुभकार्यीं घेऊं नये.

क्रांतिसाम्यनामक महापात दोष. शालिनी.)

पंचास्याजौगोमृगौतौलिकुंभौकन्यामीनौकर्क्यलीचापयुग्मे
तत्रान्योन्यंचंद्रभान्वोर्निरुक्तंक्रांतिःसाम्यंनोशुभंमंगलेषु ॥ ६१ ॥

अर्थ—सिंह-मेष. वृषभ-मकर. तुळ-कुंभ. कन्या-मीन. कर्क-वृश्चिक. धन-मिथून ह्या ज्या दोन दोन राशि लिहिल्या आहेत त्यांतून एकीला चंद्र व दुसरीला सूर्य असेअसतां क्रांतिसाम्य नामक महापात होत असतो. हा मंगळकार्याला शुभ नाहीं. जसा सिंहाला सूर्य व मेषाला चंद्र किंवा सिंहाला चंद्र व मेषाला सूर्य इत्यादि.

खार्जूरचक्रोत्पन्न एकार्गल दोष. (इंद्रवज्रा.)

व्याघातगंडव्यतिपातपूर्वशूलांत्यवज्रपरिघातिगंडे ॥
योगेविरुद्धेत्वभिजित्समत:खार्जूरमर्काद्विषमेशशीचेत् ॥ ६२ ॥

अर्थ-व्याघात, गंड, व्यतीपात, विष्कंभ, शूल, वैधृति वज्र, परिघ, अतिगंड हे ९ विरुद्ध ह्म० दुष्टयोग ज्या दिवशीं असतील त्या दिवशीं सूर्यनक्षत्रापासून अभिजितासह मोजून विषम नक्षत्रीं चंद्र असतां खार्जूर नामक चक्रापासून उत्पन्न होणारा एकार्गलदोष आहे असें जाणावें. समनक्षत्रीं चंद्र असतां हा दोष नाहीं एकार्गल दोषानें युक्त नक्षत्र शुभकार्यी अनिष्ट होय.

उपग्रहदोष आणि त्याचा अपवाद. (उपेंद्रवज्रा.)

शराष्टदिक्शक्रनगातिधृत्यस्तिथिर्धृतिश्चनकृतंश्चरंच ॥
उपग्रहा:सूर्यभतोब्जताराशुभानदेशेकुरुबाल्हिकानाम् ॥ ६३ ॥

अर्थ-सूर्य नक्षत्रापासून ५।८।१०।१४।७।१९।१५।१८।२१।२२।२३।२४।२५ ह्या संख्यांतून कोणत्याही संख्ये इतकें होणारें जें दिवसनक्षत्र त्याला उपग्रह दोष आहे असें समजावें. हें उपग्रहयुक्त नक्षत्र कुरु देशांत व बाल्हिक देशांत शुभ नव्हे.अर्थात् अन्य देशीं याचा दोष नाहीं.

पात, उपग्रह व लत्ता याचा अपवाद आणि अर्धयाम. (अनुष्टुप्.)

पातोपग्रहलत्तासुनेष्टोंघ्रि:खेटपत्समः ॥वारस्त्रिघ्नोष्टभिस्तष्ट:सैक:स्यादर्धयामकः ॥ ६४ ॥

अर्थ-चंडीशचंडायुध नामक पात, उपग्रह, आणि लत्ता हे तीन दोष उत्पन्न करणारे ग्रह नक्षत्राच्या ज्या चरणीं असतील तितकाचा चरण वरील तीन दोषांनीं दुष्ट नक्षत्राचा अनिष्ट होय. रविवारापासून इष्टवार मोजून आलेल्या संख्येची तिप्पट करावी, व ८ नी भागून जी बाकी राहील तींत १ मिळवावा ह्मणजे अर्धयाम होईल. जसा रविवारापासून गुरुवार ५ त्याची तिप्पट १५ त्याला ८ नीं भागून बाकी ७ व तींत १ मिळविल्यानें ८ हा गुरुवारचा अर्धयाम झाला. पुढें लिहिल्याप्रमाणें सर्व वारांचे अर्धयाम जाणा वें रविवार ४. सोमवार ७. मंगळवार २. बुधवार ५ गुरुवार ८. शुक्रवार ३. शनिवार ६.

सूर्यादिवारांचें कुलिक. (अनुष्टुप्)

शक्रार्कदिग्वसुरसाब्ध्याश्विन:कुलिकारवे:रात्रौनिरेकास्तिथ्यंशाशनौचांत्योपिनिंदित ६५

अर्थ-दिवाकुलिक-रवि १४ सोम १२ मंगळ १० बुध ८ गुरु ६ शुक्र ४ शनि २ रात्रिकुलिक रवि १३ चंद्र ११ मंगळ ९ बुध ७ गुरु ५शुक्र३शनि १।१५ याप्रमाणे जाणावे विवाहाला कुलिक अवश्य वर्ज जाणावा.

दग्धतिथि (इंद्रवज्रा.)

चापांत्यगेगोघटगेपतंगेकर्काजगेस्त्रीमिथुनेस्थितेच ॥
सिंहालिगेनक्रघटेसमा:स्युस्तिथ्योद्वितीयाप्रमुखाश्चदग्धाः ॥ ६६ ॥

अर्थ-धन व मीन ह्या दोन राशींस सूर्य असतां शुक्ल व कृष्ण पक्षांतलि द्वितीया तिथि दग्ध होते. वृषभ आणि कुंभ यास सूर्य असतां चतुर्थी, कर्क व मेष यास सूर्य असतां षष्ठी, कन्या आणि मिथुन याला सूर्य असतां अष्टमी, सिंह आणि वृश्चिक यांला सूर्य असतां दशमी, मकर व तूळ ह्या राशींला सूर्य असतां द्वादशी तिथि दग्ध होते. तात्पर्य वरील दोन दोन राशींला सूर्य असतां द्वितीयादि समतिथि दग्ध होतात.

जामित्रदोष (भ्रमरविलसित.)

लग्नाचंद्रान्मदनभवनगेखेटेनस्यादिहपरिणयनम् ॥
किंवाबाणाशुगमितलवगेजामित्रंस्याद्दशुभकरमिदम् ॥ ६७ ॥

अर्थ विवाहाच्या इष्टलग्नापासून किंवा विवाहकाळीं ज्या राशीला चंद्र असेल त्या राशीपासून सप्तम स्थानीं कोणताही ग्रह असतां अशा वेळीं विवाह करूं नये किंवा विवाहलग्नाच्या इष्ट नवांशापासून अगर चंद्र ज्या नवांशीं असेल त्यापासून पंचावन्नाव्या नवांशीं कोणी ग्रह असतां जामित्र होतें. हें जामित्र अशुभ करणारें आहे ह्मणून विवाहीं अवश्यवर्ज्य करावें उदाहरण.—मेषराशीच्या पांचव्या नवांशीं चंद्र असून किंवा मेषलग्नाचा पांचवा नवांश विवाहाचा इष्टांश असून तूळराशी पांचव्या नवांशा मंगळ किंवा कोणी ग्रह असतां जामित्र होतें.

एकार्गलादि दोषांचा अपवाद. (इंद्रवजा)

एकार्गलोपग्रहपातलत्ताजामित्रकर्तर्युदयास्तदोषाः ॥
नश्यंतिचंद्रार्कबलोपपन्नेलग्नेयथार्काभ्युदयेतुदोषा ॥ ६८ ॥

अर्थ—मागें सांगितलेले एकार्गल, उपग्रह, चंडीशचंडायुधपात, लत्ता, मित्र, कर्तरी, आणि पुढें सांगावयाची उदयास्तशुद्ध हे सर्व दोष; चंद्र व सूर्य यांच्या बलानें युक्त इष्टलग्न असतां नाश पावतात. जशी काळोखी रात्र सूर्याचा उदय झाला ह्मणजे नाश पावते. ग्रह आपल्या उच्चीं, मित्रगृहीं, स्वगृहीं, स्वनवांशीं व लग्नापासून सांगितलेल्या शुभस्थानीं असतां बलवान् होतो (हा वसिष्ठाचा श्लोक ग्रंथकारानें आपल्या ग्रंथांत घेतला आहे.)

कित्येक दोषांचे अपवाद (उपजाति)

उपग्रहर्क्षंकुरुबाल्हिकेषुकलिंगवंगेषुचपातितंभम् ॥
सौराष्ट्रशाल्वेषुचलत्तितंभंत्यजेत्तुविद्धंकिलसर्वदेशे ॥ ६९ ॥

अर्थ—कुरु, व बाल्हिक ह्या देशांत उपग्रह दोषयुक्तनक्षत्र शुभकार्याला वर्ज्य करावें. कलिंगदेशांत आणि वंगदेशांत चंडीशचंडायुधपातानें युक्त नक्षत्र सोडावें सौराष्ट्र देशांत, व शाल्वदेशांत लत्तित ह्मणजे लत्ता दोषानें युक्त नक्षत्र वर्जावें. अर्थात् अन्यदेशीं याचा दोष नाहीं. विद्धनक्षत्र मात्र सर्व देशीं शुभकार्याला वर्जावें

दशयोग दोष (उपजाति)

शशांकसूर्यर्क्षयुतेर्भशेषेस्वभूयुगांगानिदशेशतिथ्यः ॥
नागेंद्रवींकेंदुपितानखाश्चेद्भवंतिचेतद्दशयोगसंज्ञाः ॥ ७० ॥

अर्थ—अश्विनीपासून चंद्र ज्या नक्षत्रीं असेल त्यापर्यंत मोजावें व सूर्य ज्या नक्षत्रीं असेल त्यापर्यंत मोजून त्या दोन नक्षत्र संख्या एकत्र मिळवून त्या आलेल्या बेरजेला २७ नीं भागावें. बाकी ०।१।४।६।१०।११।१५।१८।१९।२० ह्यांतून कोणत्याही एका अंका इतकी बाकी राहिली असतां दशयोग दोष आहे व वरील शून्यादि दहा अंकांहून निराळा अंक बाकी राहिली तर दशयोगदोष नाहीं असें जाणावें उदाहरणः—मूळ नक्षत्राला सूर्य आणि पुष्याला चंद्र असे असले तर अश्विनीपासून मूळ १९ आणि पुष्य ८ ह्यांची बेरीज २७ त्याला २७ नीं भागून बाकी शून्य ह्मणून ह्या पुष्यनक्षत्राला दशयोग दोष आहे.

दशयोगांचें फळ व अपवाद (शार्दूलविक्रीडित.)

वाताभ्राग्निमहीपचोरमरणंरुग्वज्रपादक्षतिःयोगांकेदलितेसमेमनुयुतेथौजेतुसैकोर्धिते ॥ मंदाम्राद्यमसंमितास्तुफनुभीरेखाःऋपातसांश्चि खेद्वेधोस्मिन्ग्रहचंद्रयोर्नेशुभदःस्यादेकरेखास्थयोः ॥ ७१ ॥

अर्थ—मागच्या श्लोकांत दशयोगदोष होण्याचे जे दहा अंक सांगितले आहेत त्यांतील शून्याचें फळ वातरोग, १ चें मेघापासून पीडा, ४ चें अग्निपीडा, ६ चें राजपीडा, १० चोरोपद्रव, ११ चें फळ वधूवराला किंवा दोहोंतून एकाला मरण, १५ चें रोग, १८ चें वज्रभय, १९ चें कलि ह्म० कलह, आणि २० चें क्षति ह्म० द्रव्यनाश हीं फळें आहेत ह्या दहांतजे सम अंक आहेत त्यांचें अर्ध करून तें अर्ध १४ नीं युक्त करावें; आणि विषम

दशयोगवेधाकृति
श पु—पुष्य. चं.
आ—आ.
मू—म
रो—पू
कृ—उ
भ—ह शु. के.
अ—चि
रा. मं. रे—स्वा
उ—वि
पू—अ गु
श—ज्ये
ध—मू र.
श्र—पू
बु अ—उ.

अंकांत १ मिळवून अर्ध करावें ह्मणजे अश्विनीपासून नक्षत्र होतें. उदाहरणः— वरील अंकांत शून्यापासून पांचवा अंक १० हा सम आहे. ह्या १० चें अर्ध ५ हें १४ नीं युक्त करून १९ह्मणजे अश्विनीपासून मूळनक्षत्र उत्पन्न झालें आतां सातवा अंक १५ हा विषम आहे. ह्यांत १ मिळवून १६ ह्यांचे अर्ध ८ हें अश्विनीपासून पुष्य नक्षत्र उत्पन्न झालें; ह्या प्रमाणें दहा ही अंकांचीं नक्षत्रें उत्पन्न करावीं. आडव्या १४ रेषा काढून वर सांगितल्याप्रमाणें जें नक्षत्र उत्पन्न होईल तें एका रेषेच्या टोंकास लिहून प्रदक्षिणक्रमानें त्या पुढील सर्व नक्षत्रें अभिजितासह लिहावीं. आणि ज्या ज्या नक्षत्रीं जेजे ग्रह असतील ते त्या त्यां नक्षत्रीं लिहावें. ज्या नक्षत्रीं चंद्र असेल त्या रेषेच्या दुसऱ्या टोंकाच्या नक्षत्राला कोणी ग्रह असतां त्या ग्रहाचा चंद्राला वेध होतो ह्मणून अशा दिवशीं विवाह करूं नये हा दशयोगदोषाचा अपवाद होय, ह्मणून वरच्या रीतीनें चंद्राला ग्रहाचा वेध नसतां त्या दिवशीं विवाह करण्याला दशयोगाचा प्रतिबंध नाहीं. वरील प्रकार स्पष्ट समजण्याकरितां उदाहरणांत निघालेल्या पुष्य नक्षत्रापासून सर्व नक्षत्रें मांडून दाखविलीं आहेत व ग्रहही लिहिले आहेत. ह्यांत चंद्राला शनिचा वेध आहे.

पंचकदोष (शालिनी.)

लग्नेनाढ्यायाततिथ्योंकतष्टाःशेषेनागद्व्यब्धितर्कैंदुसंख्ये ॥
रोगोवन्हीराजचोरौचमृत्युर्बाणश्चायंदाक्षिणात्यप्रसिद्धः ॥ ७२ ॥

अर्थ—ज्या इष्टलग्नाचा पंचकदोष पाहणें असेल त्या लग्नाच्या वेळच्या शुक्लप्रतिपदे पासून गततिथि मोजून त्यांत मेषापासून इष्टलग्नाची संख्या मिळवावी; आणि जी बेरीज होईल तिला ९ नीं भागावें. बाकी ८ असतां रोगपंचक, २ असतां अग्निपंचक, ४ असतां राजपंचक, ६ असतां चोरपंचक, आणि १ बाकी असतां मृत्युपंचक इष्टलग्नाला आहे असें जाणावें. ३।५।७।० बाकी राहिली तर इष्टलग्न निष्पंचक होय. पंचकाला बाण असेंही ह्मणतात. हा पंचकदोष महाराष्ट्र देशांत प्रसिद्ध आहे. अर्थात पून्यदेशीं याचा दोष नाहीं. उदाहरणः—वद्य ८ रोजीं धनलग्नाला पंचक पाहणें ह्मणून गततिथि ७ आणि शुक्लपक्षाच्या १५ मिळवून सर्व २२ ह्यांत धनलग्नाची संख्या ९ मिळविल्यानें ३१ ह्यांला ९ नीं भागून बाकी ४ ह्मणून ह्या धनलग्नाला राजपंचक आहे.

बाण व त्याचा अपवाद (मालिनी.)

रसगुणशशिनागाब्ध्याढ्यसंक्रांतियातांशकमितिरथतष्टांकैर्यदापंचशेषाः ॥
रुगनलनृपचोरामृत्युसंज्ञश्चबाणानवहृतशरशेषेशेषकैक्येसशल्यः ॥ ७३ ॥

अर्थ—ज्यावेळीं बाण पहावयाचा असेल त्या वेळीं सूर्य ज्या राशीला असेल त्या राशीचे अंशघ्यावे. त्या खालीं कला विकला असतील त्या सोडाव्या. मग ते अंश पांच ठिकाणीं मांडून त्यांत ६।३।१।८।४ हे अंक क्रमानें मिळवावे. नंतर सर्व अंकांला नवानीं भागावें., व त्या त्या अंकां, खालीं मांडावी. पहिल्या अंकाची बाकी ५ राहिली तर रोगबाण, दुसऱ्याची ५ बाकी असतां अग्निबाण, तिसऱ्याची ५ बाकी असतां राजबाण, चवथ्याची ५ असतां चोरबाण आणि पांचव्याची ५ बाकी असतां मृत्युबाण आहे असें जाणावें. हे पांचही बाण शल्य रहित ह्मणून ह्यांचा दोष अल्प आहे. पांचही अंकांच्या बाक्यांची बेरीज करून तिला ९ नीं भागावें आणि बाकी ५ राहिली तर सशल्यबाण आहे असें समजावें. ह्याचा मोठा दोष आहे. उदाहरणः—वैशाखकृष्ण ५ बुधवार ह्या दिवशीं ८ घटिका दिवसास बाण पहावयाचा आहे तर ह्या वेळाचा स्पष्ट सूर्य १।१५।२३।४७ ह्याच्या कला विकला सोडून १५ अंश हे पांच ठिकाणीं मांडले.

सूर्याचे भुक्तांश.	१५	१५	१५	१५	१५
मिळविण्याचे अंक.	६	३	१	८	४
दोहोंच्याबेरजा.	२१	१८	१६	२३	१९
नवांनीं भागून बाक्या.	३	०	७	५	१

ह्यांत पवस्था अंकांची पांच बाकी राहिली ह्मणून इष्टवेळीं चोरबाण आहे. आतां सर्व बाक्यांची बेरीज १६ हिला ९ नीं भागून बाकी ७ ह्मणून आलेला चोरबाण सशल्य नाहीं. परंतु ५ बाकी असती तर तो सशल्य झाला असता.

कालपरत्वें वारपरत्वें व कर्मपरत्वे बाणाचा परिहार. (शार्दूलविक्रीडित).

रात्रौचोररुजौदिवानरपतिर्वन्हिःसदासंध्ययोःमृत्युश्चाथशनौनृपोविदिमृतिर्भौ
मेग्निचोरौरवौ ॥ रोगोथव्रतगेहगोपनृपसेवायानपाणिग्रहेवर्ज्याश्चक्रमतोबुधैरु
गनलक्ष्मापालचोरामृतिः ॥ ७४ ॥

अर्थ —सर्वरात्रींस चोर व रोग पंचक वर्ज्य करावें. दिवसास राजपंचक वर्ज्य करावें. दिवसास व रात्रींसही अग्निपंचक त्याज्य होय. प्रातःकाळीं व सायंकाळीं ह्मणजे दोनही संध्यानामक काळीं मृत्युपंचक वर्ज्य करावें. शनिवारीं राजबाण वर्ज्य करावा. बुधवारीं मृत्युपंचक त्याज्य होय. मंगळवारीं अग्निबाण व चोरबाण वर्ज्य होत. आणि रविवारीं रोगबाण वर्ज्य उपनयनाला रोगपंचक सोडावें. गृहसंबंधी कृत्यांला ह्मणजे नवीन बांधणें किंवा नवें आच्छादन घालणें इत्यादि कृत्यांला अग्निपंचक घेऊं नये. राजसेवेला राजपंचक वर्जावें. यात्रेला चोरबाण वर्ज्य जाणावा. आणि विवाहाला मृत्युपंचक वर्ज्य होय. (पंचकाला बाण असें ह्मणतात असें आग्निपंचक किंवा अग्निबाण इत्यादि.)

ग्रहांची दृष्टि (उपजाति.)

त्र्यांशांत्रिकोणंचतुरस्रमस्तंपश्यंतिखेटाश्चरणाभिवृद्ध्या ॥
मंदोगुरुर्भूमिसुतःपरेचक्रमेणसंपूर्णदृशोभवंति ॥ ७५ ॥

अर्थ-ज्या राशीला ग्रह असतात ती पासून पुढें सांगितल्या स्थानीं ते सर्व ग्रह पाहतात. सर्व ग्रहांची ३।१० ह्या दोन स्थानीं एक पाद ह्मणजे चतुर्थांश दृष्टि असते. ९।५ ह्या स्थानीं द्विपाद ह्मणजे अर्धी दृष्टि असते. आणि ४।८ ह्या स्थानीं त्रिपाद दृष्टि असते. सर्वांची सप्तमस्थानीं पूर्ण दृष्टि असते. ह्या शिवाय शनीची ३।१० स्थानीं; गुरूची ९।५ स्थानीं व मंगळाची ४।८ ह्या स्थानीं पूर्ण दृष्टि असते.

उदयास्तशुद्धि दोनप्रकार. (शिखरिणी.) (भुजंगप्रयात.)

यदालग्नांशेशोलवमथतनुंपश्यतियुतोभवेद्वायंवोदुःशुभकृदुमनल्पंरचयति
लवद्यूनस्वामीलवमदनभंलग्नमदनंप्रपश्येद्वाववध्वाःशुभमितरथाज्ञेयमशुभम् ॥ ७६॥
लवेशोलवंलग्नपोलग्नगेहंप्रपश्येन्मिथोवाशुभंस्याद्वरस्य ॥
लवद्यूनपोंशद्युनंलग्नपोस्तंमिथोवेक्षतेस्याच्छुभंकन्यकायाः ॥ ७७ ॥

अर्थ—उदय ह्मणजे लग्न आणि अस्त ह्मणजे लग्नापासून सप्तमस्थान यांची जी शुद्धि ती उदयास्तशुद्धि होय. विवाहलग्नाच्या इष्टनवांशाचा स्वामी नवांशाला पाहील, किंवा त्या नवांशीं युक्त असेल तर तो वराला बहुत सुख देईल. जसा मेष लग्नाच्या मिथुनांशाचा स्वामी बुध तो तूळाला असतां मिथुनाला पाहतो असा किंवा मिथुनालाच युक्त असा असतां शुभ होय. हा उदयशुद्धीचा पहिला प्रकार झाला. असें नसतां लग्नाच्या नवांशाचा स्वामी लग्नीं पाहील किंवा लग्नालाच असेल तरी ही तो वराचें शुभ करतो. जसा मेषाच्या मिथुनांशाचा स्वामी बुध मकराला असतां मेषलग्नीं पाहतो असा, किंवा तो बुध मेषालाच असतांही वराला शुभदायक जाणावा. हा उदयशुद्धिचा दुसरा प्रकार होय लग्नाच्या इष्टनवांशापासून सप्तम नवांशाचा स्वामी इष्टनवांशापासून सप्तम अंशाला पाहत असेल किंवा त्याच सप्तम अंशाला असेल तर असा ग्रह कन्येला विपुल सुखकारी होतो. जसा मेषाच्या मिथुनांशापासून सातवा नवांश धन; त्याचा स्वामी गुरु, हा मेषाला असला तर धनाला पाहतो, असा किंवा तो गुरु धनालाच

असतां कन्येला सुखकर जाणावा. हा अस्तशुद्धीचा पहिला प्रकार झाला. असें नसतां लग्नाच्या इष्टांशा- पासून सप्तमनवांशाचा स्वामी इष्टलग्नापासून सप्तमलग्नीं पाहत असेल अगर त्या सप्तमलग्नालाच असेल तरीही तो वधूला शुभकर जाणावा. जसा वरच्या उदाहरणांतील गुरु कर्कोला असतां धनाला पाहत नाहीं खरा, परंतु मेषापासून सप्तम तूळाला पाहतो असा असतां किंवा तो गुरु तूळालाच असतां कन्ये- ला शुभ जाणावा. हा अस्तशुद्धीचा दुसरा प्रकार होय. वर सांगितलेली उदयशुद्धी दोनही प्रकारची नसतां वराला अशुभ, आणि अस्तशुद्धि नसतां वधूला अशुभ होत. ॥ ७६ ॥ इष्ट नवांशाचा स्वामी अंशाला पाहत असेल, आणि लग्नस्वामी लग्नाला पहात असेल; अथवा नवांश स्वामी लग्नीं पाहत असेल, व लग्नस्वामी नवांशीं पाहत असेल तर वराला शुभ होय. याप्रमाणें इष्टनवांशापासून सप्तम नवांशाचा स्वामी, इष्टांशापासून सप्तम नवांशाला पाहत असेल; आणि लग्नाचा स्वामी, लग्नापासून सप्तमराशीला पाहत असेल तर; अथवा यांची परस्परावर दृष्टि असेल तर, ह्मणजे इष्टांशापासून सप्तमां- शाचा अधिपति इष्टलग्नापासून सप्तमराशीला पाहत असेल आणि इष्ट लग्नापासून सप्तम राशीचा स्वामी इष्टांशापासून सप्तमनवांशीं पाहत असेल तर कन्येला शुभ होय. यांतून एकही प्रकारें दृष्टि नसेल तर तसें लग्न कन्येला आणि वरालाही अशुभ जाणावें हे उदयास्तशुद्धीचे दोन प्रकार झाले.

उदयास्तशुद्धि (तिसराप्रकार.) (मालिनी.)

लग्नपतिशुभमित्रैर्वीक्षितेंऽशे तनौ वापरिणयनकरस्य स्याच्छुभं शास्त्रदृष्टं ॥
मदनलवपमित्रैः सौम्यभैर्वा युतं वा तनुमदनगृहं चेद्वीक्षते शर्म वध्वाः ॥७८॥

अर्थ–चंद्र, बुध, गुरु, शुक्र हे चार शुभ ग्रह आहेत लग्नाच्या इष्टनवांशाच्या स्वामीचा शुभ असून मित्र असणारा अशा ग्रहाची दृष्टि इष्टनवांशावर किंवा लग्नावर असतां विवाह करणाऱ्या वराचें शुभ होतें. लग्नाच्या इष्ट नवांशापासून सप्तम राशीचा जो स्वामी त्याच्या शुभ असून मित्र असणाऱ्या ग्रहाची दृष्टि; इष्टनवांशापासून सप्तम राशीवर, किंवा लग्नापासून सप्तमराशिवर असतां विवाह होणाऱ्या वधूचें कल्याण होतें हा उदयास्तशुद्धीचा तिसरा प्रकार होय. तात्पर्य विवाहाला उदयास्तशुद्धि अवश्य असलीच पाहिजे तीन प्रकारांतून कोणत्याही प्रकारानें असली तरी चालते, परंतु उदयास्तशुद्धि नसतां मात्र विवाह करूं नये.

सूर्याच्या संक्रांतीचा दोष. (मंजुभाषिणी.)

विषुवायनेषु परपूर्वमध्यमान्दिवसांस्त्यजेदितरसंक्रमेषु हि ॥
घटिकास्तु षोडश शुभक्रियाविधौ परतोऽपि पूर्वमपि संत्यजेद्बुधः ॥ ७९ ॥

अर्थ–विषुव ह्मणजे तूळ व मेष आणि अयन ह्मणजे कर्क व मकर ह्या चार सूर्याच्या संक्रांति ज्या दिव- शीं होतात तो दिवस, आणि त्याच्या पुढचा एक व मागचा एक असे तीन दिवस शुभ कर्माला वर्ज्य करावे ह्या चार संक्रांतीं शिवाय बाकी सर्व संक्रांति ज्या वेळीं होतात त्या वेळेच्या पुढें १६ घटिका व पूर्वी १६ घटिका मिळन ३२ घटिका शुभकर्मीं वर्ज्य कराव्या.

सर्व ग्रहांच्या संक्रांतींच्या त्याज्यघटिका. (अनुष्टुप्)

देवद्व्यंकर्तवश्चाष्टौ नाड्योंकाः खनृपाः क्रमात् ॥
वर्ज्याः संक्रमणेऽर्कादेः प्रायोऽर्कस्याति निंदिताः ॥ ८० ॥

अर्थ–रवि ३३ चंद्र २. मंगळ ९. बुध ६ गुरु ८८. शुक्र ९. शनि १६०. ग्रह एक राशि सोडुन दुसऱ्या राशींत गेला ह्मणजे त्या त्या ग्रहाची संक्रांति झाली असें म्हणतात. सर्व ग्रहांचा संक्रांतिकाल अशुभ आहे सूर्यादि ग्रहांच्या संक्रांतीच्या वेळीं जितक्या घटिका अशुभ त्या वर प्रत्येक ग्रहा पुढें दिल्या आहेत. ह्या घटी ज्या वेळीं संक्रांति होत असेल त्याच्या मागें अर्ध्या व पुढें अर्ध्या अशा शुभकार्याला वर्ज्य कराव्या. सर्वांहून सूर्याच्या घटी फार निंद्य आहेत.

लग्नाच्या पंगु. अंध बधिर संज्ञा. उपजाति.)

घस्रे तुलाऽली बधिरौ मृगाश्वौ रात्रौ च सिंहाजवृषा दिवान्धाः ॥

कन्यानृयुक्कर्कटकानिशांधादिनेघटोंत्योनिशिपंगुसंज्ञः ॥ ८१ ॥

अर्थ–दिवसास तूळ आणि वृश्चिक हीं दोन लग्नें बधिर होत. रात्रीस मकर व धन हीं दोन लग्नें बधिर होत. सिंह, मेष, वृषभ हीं तीन लग्नें दिवसास अंध जाणावीं. कन्या, मिथुन, कर्क हीं तीन रात्रीस अंध होत. दिवसास कुंभलग्न पंगु आणि रात्रीस मीनलग्न पंगु जाणावें. ज्या वेळीं ज्या लग्नास दोष सांगितला त्याहून अन्य वेळी तीं लग्नें शुद्ध असतात. सदोपलग्न शुभकार्याला घेऊं नये.

केचिन्मतानें लग्नांच्या अंध, बधिर, पंगु संज्ञा.

बधिराधनुस्तुलालयोपराण्हेमिथुनकर्कटकांगनानिशांधाः ॥

दिवसांधाहरिगोक्रियास्तुकुब्जामृगकुंभांतिमभानिसंध्ययोर्हि ॥ ८२ ॥

अर्थ––धन, तूळ, वृश्चिक ही तीन लग्नें अपराण्हीं ह्मणजे दिनमानाचे ३ भाग करून त्यांतील शेवटच्या तिसऱ्या भागीं बधिर होत. मिथुन, कर्क कन्या हीं तीन रात्रौ अंध होत; सिंह, वृषभ, मेष हीं तीन दिवसास अंध जाणावीं. प्रातःकाल व सायंकाल ह्या दोन संध्या संज्ञककाळीं मकर, कुंभ आणि मीन हीं तीन लग्नें पंगु जाणावीं.

अंध, बधिर पंगु या लग्नांचीं फळें, आणि त्यांचा अपवाद. (प्रहर्षिणी.)

दारिद्र्यंबधिरतनौदिवांधलग्नेवैधव्यंशिशुमरणंनिशांधलग्ने ॥

पंग्वंगेनिखिलधनानिनाशमापुःसर्वत्राधिपगुरुदृष्टिभिर्नदोषः ॥ ८३ ॥

अर्थ–बधिर लग्नावर विवाह झाला असतां दारिद्र्य, दिवांधलग्नीं वैधव्य, निशांधलग्नीं शिशुमरण ह्मणजे अपत्यें मरणें, पंगुलग्नावर सर्व द्रव्यनाश हीं फळें जाणावीं ह्या अंध बधिर, पंगु लग्नावर त्यांच्या स्वामीची किंवा गुरूची दृष्टि असता त्यांचा अशुभतेचा दोष नाहींसा होतो.

शुभनवांश (चित्रपदा.)

कार्मुकतौलिककन्यायुग्मलवेझषगेवा ॥ यर्हिभवेदुपयामस्तर्हिसतीखलुकन्या ॥ ८४ ॥

अर्थ–धन तूळ कन्या, मिथुन ह्या चार नवांशांवर आणि क्वचित् मतानें मीननवांशावर जर कन्येचा विवाह होईल तर ती कन्या सती ह्मणजे पतिव्रता होते ह्मणून हेच नवांश विवाहाला योजावे.

पूर्वोक्त शुभनवांशाचा निषेध. (श्रीछंद.)

अंत्यनवांशेनचपरिणेयाकाचनवर्गोत्तममिहहित्वा ॥

नोचरलग्नेचरलवयोगंतौलिमृगस्थेशशभृतिकुर्यात् ॥ ८५

अर्थ–अंत्य ह्मणजे नवव्या नवांशावर कोणत्याही कन्येचा विवाह करूं नये, परंतु अंत्यनवांश वर्गोत्तम असता त्यावर विवाह करावा. जें लग्न तोच नवांश असला ह्मणजे त्याला वर्गोत्तम ह्मणावें जसा मेषल-ग्नाचा धननवांश शुभ खरा परंतु तो अंत्य ह्मणून त्यावर विवाह करूं नये. मिथुन लग्नाचा अंत्यनवांश मिथुन, हा वर्गोत्तम आहे ह्मणून तो विवाहाला शुभ होय. तूळ व मकर ह्या दोन राशींला चंद्र असतां चर लग्नाचा चरनवांश विवाहाला घेऊं नये. असा घेतल्यानें चरत्रययोग होतो तो विवाहाला अनिष्ट होय. जसा मकर राशीला चंद्र असतां मेषलग्नाचा तूळनवांश इत्यादि ह्यांत मकर, मेष व तूळ हीं तीनहीं चर आहेत.

लग्नाचा भंग करणारे ग्रह (उपजाति.)

व्ययेशनिःखेवनिजस्तृतीयेभृगुस्तनौचंद्रखलानशस्ताः ॥

लग्नेटकविग्लौश्चरिपौमृतौग्लौलग्नेश्वरश्शुभाराश्चमदेचसर्वे ॥ ८६ ॥

अर्थ–विवाहाच्या इष्टलग्नापासून बाराव्या स्थानीं शनि, दहावा मंगळ, तृतीयस्थानीं शुक्र लग्नीं चंद्र आणि पापग्रह, तसेच षष्ठस्थानीं लग्नाचा स्वामी, शुक्र व चंद्र अष्टमस्थानीं चंद्र, लग्नाचा अधिपति, शुभ ग्रह व मंगळ, आणि सप्तस्थानीं सर्व शुभ व खलग्रह विवाहलग्नाला प्रशस्त नाहींत. हे सर्व ग्रह विवाह-लग्नाचा भंग करणारे आहेत, ह्मणून यांतील कोणताही अशोभ ग्रह नसेल असें लग्न विवाहाला योजावें.

लग्नाचे इष्टग्रह. (वसंततिलका.)

त्र्यायाष्टषट्सुरविकेतुतमोर्कपुत्रास्त्र्यायारिगः क्षितिसुतोद्विगुणायगोब्जः ॥
सप्तव्ययाष्टरहितौ ज्ञगुरू सितोष्टत्रिद्यूनषड्व्ययगृहान्परिहृत्यशस्तः ॥ ८७ ॥

अर्थ – विवाहाच्या इष्टलग्नापासून ३।११।८।६ ह्यास्थानीं रवि, केतु, राहू. शनि हे इष्ट ह्मणजे शुभ करणारे होत तसेच ३।११।६ ह्यास्थानीं मंगळ, २।३।११ ह्या स्थानीं चंद्र; ७।१२।८ ह्या तीन स्थानांवांचून बाकी सर्व स्थानीं बुध व गुरु; आणि ८।३।७।६।१२ ह्यांशिवाय सर्व स्थानीं शुक्र विवाहाला प्रशस्त होय. असे ग्रह ज्या लग्नाला इष्ट असतील तें लग्न विवाहाला योजावें.

कर्तरी वगैरे महादोषांचे अपवाद. (शार्दूलविक्रीडित.)

पापौ कर्तरिकारकौ रिपुगृहे नीचास्तगौ कर्तरीदोषो नैव सितेऽरिनीचगृहगे तत्पष्ठदोषोपि न ॥ भौमेऽस्तेरिपुनीचगे न हि भवेद्भौमोष्टमो दोषकृन्नीचे नीचनवांशकेशशिनि रिःफाष्टारिदोषोपि न ॥ ८८ ॥

अर्थ–जे दोन पापग्रह कर्तरी करितात ते जर आपल्या शत्रूच्या राशींला किंवा नीचस्थानीं अगर अस्तंगत असतील तर कर्तरी दोष नाहीं, शुक्र आपल्या शत्रूगृहीं किंवा नीचस्थानीं असतां षष्ठशुक्राचा दोष नाहीं. मंगळ अस्तंगत, शत्रुगृही किंवा नीचस्तानीं असतां अष्टम मंगळाचा दोष नाहीं. आणि चंद्र नीचस्थानीं . किंवा नीचनवांशीं असून तो विवाहाच्या इष्टलग्नापासून १२।८।६ ह्या अशुभस्थानीं असतांही त्याचा दोष नाहीं.

सामान्यदोषांचा अपवाद. (वसंततिलका.)

अब्दायनर्तुतिथिमासभपक्षदग्धतिथ्यंधकाणबधिरांगमुखाश्चदोषाः ॥
नश्यंति विद्गुरुसितेष्विह केंद्रकोणे तद्वच्च पापविधुयुक्तनवांशदोषः ॥ ८९ ॥

अर्थ–वर्ष,अयन, ऋतु तिथि, मास नक्षत्र पक्ष दग्धतिथि आणि अंध, काण, बधिर लग्नें ह्या संबंधानें दोष वयासारखेच दुसरे सामान्यदोष इष्टलग्नापसून बुध गुरु शुक्र हे सप्तम रहित केंद्रीं (१।४।१०) आणि कोणस्थानीं (९।५.) असतां नाश पावतात. आणखी तसाच खलग्रहांनीं किंवा चंद्रानें युक्त नवांशांचा दोषही नाश पावतो.

दोषपरिहार. (शालिनी)

केंद्रे कोणे जीव आये रवौ वा लग्ने चंद्रे वापि वर्गोत्तमे वा ॥
सर्वे दोषा नाशमायांति चंद्रे लाभे तद्वद्दुर्मुहूर्तांशदोषाः ॥ ९० ॥

अर्थ–इष्टलग्नापसून १।४।७।१०।५ ह्यास्थानीं गुरु असतां तसाच एकादशस्थानीं रवि असतां, किंवा इष्टलग्नवर्गोत्तम ह्म० लग्न व नवांश एकच असतां वर्गोत्तमनवांशीं चंद्र असतां सर्व दोष नाश पावतात. तसाच चंद्र एकादशस्थानीं असतां दुर्मुहूर्तांचा दोष आणि दुष्ट नवांश दोष नाश पावतो.

साधारण दोषांच्या समूहाचा परिहार (शिखरिणी.)

त्रिकोणे केंद्रे वा मदनरहिते दोषशतकं हरेत्सौम्यः शुक्रो द्विगुणमपि लक्षं सुरगुरुः ॥
भवेदाये केंद्रेंऽगप उत लवेशो यदि तदा समूहं दोषाणां दहन इव तूलं शमयति ॥ ९१ ॥

अर्थ–इष्टलग्नापासून त्रिकोणस्थानीं (९५) आणि सप्तम रहित केंद्रस्थाना (१।४।१०) असणारा बुध शंभर दोषांचा नाश करितो, ह्याच स्थानीं शुक्र असतां तो दोनशें दोषांचा, आणि गुरु लक्षदोषांचा नाश करितो. इष्टलग्न पासून ११।१।४।१० ह्यास्थानीं इष्टलग्नाचा स्वामी अथवा लग्नांतील इष्टनवांशाचा स्वामी असतां तो; जसा अग्नि कापसाचा नाश करितो, तसा तो दोषसमूहाचा नाश करितो.

कर्मविशोपक. (अनुष्टुप्.)

द्वौ द्वौ ज्ञभृगू रसाः पंचेंदोः सार्धत्रयो गुरोः ॥ रामा मंदागुकेत्वारे र्धैकैकं विशोपकाः ॥ ९२ ॥

अर्थ-बुधाचे २. शुक्राचे २. चंद्राचे ५. रविचे ३॥. गुरूचे ३ शनीचे १॥. राहूचे १॥ केतूचे १॥. मंगळाचे १॥. असे सर्व ग्रहांचे विंशोपक आहेत. सर्वांचे विंशोपक २१॥. होतात. मागें इष्टलग्नापासून कित्येक ग्रह कित्येक स्थानीं अशुभ सांगितले आहेत; आणि कित्येक स्थानीं कित्येक ग्रह शुभ सांगितले आहेत. कोणताही ग्रह ज्या स्थानीं शुभ किंवा अशुभ सांगितला नाहीं त्यास्थानीं तो मध्यम जाणावा. शुभस्थानीं ग्रह असला ह्मणजे त्याला रेखाप्रद ह्मणतात कोणतेंही लग्न विवाहाला ग्राह्य किंवा अग्राह्य हा विचार लग्ना च्या रेखाप्रद ग्रहांच्या विंशोपकावरून करावा. अशुभ व मध्यम ग्रहांचे विंशोपकमुळींच नाहींत जितके ग्रह लग्नाला रेखाप्रद ह्मणजे शुभ असतील त्याचे विंशोपक घ्यावे सर्व मिळून ५ हून कमी होत असतां ते लग्न कधींच घेऊंनये. पांचांपासून दहांपर्यंत असतां तें लग्न अशुभच, परंतु संकटी घ्यावें १० पासून १५ प॰॰ त विंशोपक मिळत असतां तें लग्न मध्यम जाणावें १५ पेक्षां अधिक विंशोपक असणारे लग्न उत्तम होय.

ग्रहपरत्वें श्वशुरादि कल्पना आणि उपयोग (इंद्रवज्रा.)

श्वश्रुःसितोर्कःश्वशुरस्तनुस्तनुर्नाभिन्नपःस्याद्दयितोमनःशशी ॥
एतद्बलंसंप्रतिभाव्यतांत्रिकस्तेषांसुखंसंप्रवदेद्विवाहतः ॥ ९३ ॥

अर्थ-कन्येची श्वश्रू (सासू) शुक्र; श्वशुर (सासरा.) सूर्य; विवाहाचें इष्टलग्न हाच कन्येचा देह इष्टलग्नापासून सप्तमराशीचा स्वामी कन्येचा पति; आणि कन्येचे मन चंद्र; अशी ग्रहांवर कन्येच्या श्वशुरादिकांची कल्पना आहे. विवाहकाळीं ह्या ग्रहांच्या बलाचा विचार करून सिद्धांतवेत्या ज्योतिषानें कन्यका विवाहानंतर त्यापासून सुख होईल ह्मणून सांगावें. जसें विवाहकाळीं शुक्र उच्चीं, स्वगृहीं, मित्रगृहीं, स्वा नवांशीं इत्यादि असून रेखाप्रद असतां कन्येला सासूपासूनसुख, आणि तो, नीचस्थानीं, शत्रुगृहीं, परनवांशीं इत्यादि असतां दुःख होईल याप्रमाणेंच सूर्यादिग्रहांच्या बलाचा विचार करून श्वशुरादिकांपासून कन्येच्या सुख दुःखाची योजना करावी.

संकीर्ण जातींचा विवाहमुहूर्त. (मत्तमयूर.)

कृष्णेपक्षेसौरिकुजार्केपिचवारेवर्ज्येनक्षत्रेपदिवास्यात्करपीडा ॥
संकीर्णानांतर्हिसुतायुर्धनलाभप्रीतिप्राप्त्यैसाभवतीहास्थितिरेषा ॥ ९४ ॥

अर्थ-कृष्णपक्षांत; शनिवारीं, मंगळवारीं व रविवारीं; मागें सांगितलेल्या विवाहनक्षत्रांवांचून अन्य नक्षत्रीं, आणि दुष्टयोगादिकांवर संकीर्णजातींचा विवाह झाला असतां तो पुत्र आयुष्य. धनलाभ आणि दंपत्याची एकमेकांविषयीं प्रीति करणारा होतो ह्मणून संकीर्ण जातींचा दुष्टमुहूर्तांवर विवाह योग्य होय. दुष्टमुहूर्त मिळत नसेल तर शुभ मुहूर्त हीं करावा. हीन वर्णाच्या पुरुषापासून उच्चवर्णाच्या स्त्रियेलाझालेली संतति व उच्चवर्णपुरुषापासून हीनवर्ण स्त्रीच्या ठिकाणीं झालेली संतति, ह्या दोनही संकीर्ण किंवा मिश्र जाति होत.

गांधर्वादि दुष्ट विवाहांचें त्रिपदीचक्र (अनुष्टुप्)

गांधर्वादिविवाहेर्काद्वेदनेत्रगुणेंदवः ॥ कुयुगांगाग्निभूरामाःस्त्रिपद्यामशुभाःशुभाः ॥ ९५ ॥

अर्थ-विवाहाचे आठ प्रकार आहेत. ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, हे चार विवाह श्रेष्ठ होत, आणि गांधर्व, आसूर पैशाच आणि राक्षस हे चार विवाह कनिष्ठ होत. ह्या गांधर्वादि दुष्ट विवाहाला त्रिपदीचक्रांतील शुभ नक्षत्र घ्यावें. सूर्यनक्षत्रापासून दिवस नक्षत्रापर्यंत मोजावें. पहिलीं ४ अशुभ, त्यांपुढील २ शुभ, ३ अशुभ, १ शुभ, १ अशुभ, ४ शुभ, ६ अशुभ, ३ शुभ, १ अशुभ, ३ शुभ अशी नक्षत्रें आहेत. ह्यांतील शुभनक्षत्र योग्य होय.

विवाहाच्या पूर्वींच्या आवश्यक कर्मांची दिनशुद्धि. (पृथ्वी.)

विधोर्बलमवेक्ष्यवादलनकंडनंवारकंगृहांगणविभूषणान्यथचवेदिकामंडपान् ॥
विवाहविहितोडुभिर्विरचयेत्तथोद्वाहतोनपूर्वमिदमाचरेत्त्रिनवषण्मितेवासरे ॥ ९६ ॥

अर्थ-विवाहाच्या पूर्वींची कृत्यें ह्मणजे दळणें, कांडणें, वारक ह्मणजे मंगळ कलश तयार करणें, भिंतींवर चित्रें वगैरे काढून घर सुशोभित करणें, तसेंच आंगण सुशोभित करणे वेदी तयार करणें, मंडप घालणें

वगैरे सर्व कर्में चंद्रबळ पाहून किंवा तें नसतांही विवाहोक्त नक्षत्रांवर करावीं ज्या दिवशीं विवाह व्हावयाचा असेल त्या दिवसाच्या पूर्वीच्या तिसऱ्या, नवव्या आणि सहाव्या दिवशीं मात्र वरील विवाहांग कर्में करूं नयेत. हाच नियम उपनयनाविषयी समजावा उपनयनाचीं पूर्वकृत्येंही उपनयनोक्त नक्षत्रांवरच करावीं.

वेदीलक्षण आणि देवकोत्थापन (शालिनी)

हस्तोच्छ्राया वेदहस्तैः समंतात्तुल्या वेदी सद्मनो वामभागे ॥
युग्मे घस्रे पष्ठहीने च पंचसप्ताहे स्यान्मंडपोद्वासनं सत् ॥ ९७ ॥

अर्थ—एक हात उंच, व चार चार हात लांब रुंद अशी वेदी मंडपांत घराच्या डाव्या बाजूकडे घ० घरांत जात असतां डाव्या हाताकडे होईल अशा जागीं घालावी विवाहवेदी कन्येच्या हातांनीं, व उपनयनाची वेदी बटूच्या हातांनीं घालावी असें या ग्रंथाच्या पीयूष धारा टीकेंत आहे, परंतु विवाहाची वराच्या हातांनीं, व व्रतबंधाची बटूच्या पित्याच्या हस्तप्रमाणानें वेदी घालावी हें योग्य वाटतें; कारण इतर ग्रंथांत याविषयीं मतें आहेत आणि ती वेदी संकुचितही होत नाहीं. विवाहदिवसापासून दुसऱ्या, चवथ्या इ० समदिवशीं देवकोत्थापन करावें. त्यांत सहाव्या दिवशीं मात्र करूंनये विषमांतील पांचव्या व सातव्या दिवशीं देवकोत्थापन शुभ होय.

तेलहळद लावण्याचा नियम. (वसंततिलक.)

मेषादिराशिजवधूवरयोर्वटोश्च तैलादिलापनविधौ कथितात्र संख्या ॥
शैलाः दिशः शरदिगक्षनगा द्विबाणबाणाक्षबाणगिरयो विबुधैस्तु कैश्चित् ॥ ९८ ॥

अर्थ–विवाहांत वधूवराला, आणि उपनयनांत बटूला तेलहळद इ० मंगलकारक पदार्थ लावण्याचा नियम त्यांच्या जन्मराशीवरून सांगितलेला आहे, तो राशी व त्या पुढील संख्या यांवरून जाणावा. ज्याची मेषराशी असेल त्याला ७ वेळां तेलहळद लावावी. वृषभ १०, मिथुन ५, कर्क १०, सिंह ५ कन्या ७, तूळ ७ वृश्चिक ५, धन ५, मकर ५, कुंभ ५, मीन ७.

स्तंभस्थापन [खांबपुरणें] (इंद्रवज्रा)

सूर्येंऽगनासिंहघटेषु शैवे स्तंभोऽलिकोदंडमृगेषु वायौ ॥
मीनाजकुंभे निर्ऋतौ विवाहे स्थाप्योऽग्निकोणे वृषयुग्मकर्के ॥ ९९ ॥

अर्थ –कन्या, सिंह आणि तूळ ह्या तीन राशींला सूर्य असतां मंडपांतील ईशान्य दिशेच्या कोनांत खांब पुरावा वृश्चिक. धन, मकर ह्या तीन राशींला सूर्य असतां वायव्य कोनांत, मीन. मेष, कुंभ ह्यांला सूर्य असेल तर्हा नैर्ऋत्य कोनांत आणि वृषभ, मिथुन कर्क ह्या तीन राशींला सूर्य असतां आग्नेयी दिशेच्या कोनांत स्तंभस्थापन करावे. विवाहव्रतबंधादि शुभकार्यांला स्तंभस्थापनाचा हाच नियम जाणावा.

गोधूलिमुहूर्ताची प्रशंसा. (मंदाक्रांता.)

नास्मिन्पृक्षं न तिथिकरणं नैव लग्नस्य चिंता नो वा वारो न च लवविधिर्नो मुहूर्तस्य चर्चा ॥
नैवा योगो न मृतिभवनं नैव जामित्रदोषो गोधूलिः सा मुनिभिरुदिता सर्वकार्येषु शस्ता १००

अर्थ—रानांतून गाई सायंकाळीं चरून येत असतां त्यांच्या पायांनीं धुरळा उडत असतो ह्मणून अशा वेळच्या मुहूर्ताला गोधूलिमुहूर्त ह्मणतात. ह्या मुहूर्ताचा नक्षत्र तिथि, करण, लग्नाचा विचार, वार, नवांशशुद्धि, कुयोग, जन्मराशीपासून व जन्मलग्नापासून अष्टम लग्न, जामित्र दोष ह्यांचा विचार करण्याचें कारण नाहीं. ऋपांनीं ही गोधूलि वेळा सर्व कार्यांला शुभ सांगितली आहे. (ह्या श्लोकांत गोधूलिमुहूर्ताची केवळ प्रशंसा केली आहे ह्मणून कशाचाही विचार करण्याचें कारण नाहीं असें समजूं नये. महादोष गोधूलिमुहूर्ताला असूं नयेत. इतर मुहूर्ताला जसा अल्पदोषाचाही नियम आहे तसा ह्या गोधुलीका नाहीं हा फलितार्थ जाणावा) सूर्य बिंबाचें अर्धास्त होण्यापूर्वी १५ पळें आणि पुढें १५ पळें मिळून अर्धघटिका गोधूलीचा काळ आहे.

कालपरत्वें गोधूलि भेद (जलधरमाला.)

पिंडीभूतेदिनकृतिहेमंतर्तौस्यादर्धास्तेतपसमयेगोधूलिः ॥
संपूर्णास्तेजलधरमालाकालेत्रेधायोज्यापकलशुभेकार्यादौ ॥ १०१ ॥

अर्थ-हेमंतऋतूच्या आरंभापासून ह्मणजे हिंवाळयाच्या मार्गशीर्षादि चार महिन्यांत सायंकाळीं पश्चिम दिशेला क्षितिजा जवळ पिंडा सारखा गोलाकार व लखलखीत सूर्य जेव्हां ? दिसूं लागतो, तो गोधूलि काल समजावा. उन्हाळयाच्या चैत्रादि चार महिन्यांत सूर्याच्या अर्धास्ताचे वेळीं गोधूलि काळ, आणि आकाशांत मेघमाला असण्याच्या काळीं ह्मणजे पावसाळयाच्या श्रावणादि चार महिन्यांत सूर्याचें संपूर्ण अस्त झाल्यावर गोधूलि समय उत्तम जाणावा. असे हे गोधूलीचे कालपरत्वें तीन भेद आहेत, ह्यांची काला नुरोधानें योजना करावी गोधूलिमुहूर्त सर्व कृत्यांच्या आरंभाला शुभ होय.

गोधूलीकाली अवश्य वर्ज्य

अस्तंयातेगुरुदिवसेसौरसार्द्धेलग्ने मृत्यारिपुभवनेलग्नेचंद्रे ॥
कन्यानाशस्तनुमदमृत्युस्थेभौमेवोद्धुर्लाभेधनसहजेचंद्रेसौख्यम् ॥ १०२ ॥

अर्थ-गुरुवारीं सूर्याचें अस्त झाल्यावर गोधूलिमुहूर्त शुभ होय. अस्तापूर्वी अशुभ, कारण त्या वेळीं यामार्धदोष असतो शनिवारीं सूर्य असतांना गोधुलिमुहूर्त शुभ होय. अस्तानंतर अशुभ, कारण त्यावेळीं कुलिक दोष असतो. गोधूलिकालीं जें लग्न असेल त्यापासून ८।६ ह्या स्थानी आणि लग्नीं चंद्र असतां कन्यानाश होतो; आणखी लग्नीं, सप्तमस्थानीं अष्टमस्थानीं मंगळ असतां वराचा नाश होतो यास्तव अ- सेंग्रह असतां गोधूलिमुहूर्त घेऊं नये. गोधूलिकाळच्या लग्नापासून ११।२।३ यास्थानी चंद्र असतां तो वधु- वरांला सौख्यकारक जाणावा.

सूर्याची स्थूल स्पष्ट गति. (इंद्रवज्रा.)

मेषादिगेर्केष्टशरानगाक्षाःसप्तेषवःसप्तशरागजाक्षाः ॥
गोक्षाःखतर्काःकुरसाःकुतर्काःकंगानिषष्टिर्नवपंचभुक्तिः ॥ १०३ ॥

अर्थ-मेषादि बाराराशींला सूर्य असतां खाली लिहिल्याप्रमाणें त्याची स्थूल स्पष्ट गति असते. हे सर्व अंक कला आहेत ह्या गतीचा उपयो पुढच्या श्लोकांत समजेल. मेष ५८. वृ ५७. मी०५७. कर्क ५७ सिंह ५८. कन्या ५९ तूळ ६०. वृश्चिक ६१ धन ६१ मकर ६१ कुंभ ६० मीन ५९.

इष्टकाळींचा स्पष्टसूर्य करण्याची रीति. (अनुष्टुप्.)

संक्रांतियातघस्राद्यैर्गतिर्निघ्नाखषट्हृता॥लब्धैरंशादिनायोज्यंयातर्क्षेस्पष्टभास्करं १०४

अर्थ-ज्या वेळीं स्पष्ट सूर्य करणें असेल त्या वेळेपर्यंत. सूर्याच्या संक्रांतीपासून जितके दिवस. घटी. पळें झाली असतील त्याला मागील श्लोकांत सांगितलेल्या सूर्याच्या स्पष्ट गतीनें गुणावें. गुणाकार येईल त्याला ६० नीं भागावें भागाकार अंशादि येईल त्यावर ज्या राशीला सूर्य असेल तिच्या मागच्या राशि मांडाव्या ह्मणजे तो राश्यादि स्पष्ट सूर्य होतो. उदाहरण:--मार्गशीर्ष शुद्ध ५ बुधवारीं सूर्योदयापासून १० घटीच्या वेळीं स्पष्ट सूर्य करणें आहे वृश्चिक संक्रांति कार्तिक कृष्ण ६ गुरुवारीं ३५ घटिच्या वेळीं झा ली होती असे पंचांगांत आहे. आतां अहोरात्रीच्या घटी६०ह्यांतून ३५ वजाकरून बाकी २५घटी राहिल्य ह्या घटिका आणि सप्तमीपासून चतुर्थीपर्यंत दिवस १२ व पंचमाच्या इष्ट घटी १० मिळून १३ दिवस३५, घटिका हा संक्रांतीपासून इष्ट तेपर्यंतचा गतकाळ झाला. वृश्चिकाची स्पष्टगति ६१ ह्यांनीं १३ दिवस ३५घटी ह्यांला गुणून गुणाकार ८२८कला, ३५ विकला आला त्याला, ६० नीं भागून १३ अंश ४८ कला, ३५ वि' इतका भागाकार आला. इष्ट दिवशीं वृश्चिकराशीला सूर्य आहे ह्मणून तिच्या पूर्वीची राशी तूळ ही भागा' कार आला त्यावर मांडून ७ राशी, १३ अंश, ४८ कला. ३५ विकला हा इष्ट वेळी स्पष्ट सूर्य झाला.

नवांशावरून लग्न साधन (अनुष्टुप्)

तनोरिष्टांशकात्पूर्वनवांशादशसंगुणाः ॥ रामाप्तालब्धयुक्तश्चतनोर्क्षादिसाध्यके । १०५ ।

अर्थ—लग्नांचा जो इष्टनवांश असेल त्याच्या पूर्वीच्या नवांशांला १० नीं गुणून आलेल्या गुणाकाराला ३ नीं भागावें. ह्मणजे भागाकार येईल. त्या लग्नाच्या अंश कळ निकला होतात. मग इष्टलग्नाच्या पूर्वींच्या राशि त्या अंशादिकांत मिळविल्या ह्मणजे इष्टलग्न सिद्ध होतें. उदाहरण:—सिंहलग्नाचा तूळ इष्टनवांश असला तर सिंहाची प्रवृत्ति मेषापासून आहे ह्मणून तूळ हा सातवा अंश होय. त्याच्या पूर्वींचे नवांश ६ त्याला १० नीं गुणून गुणाकार ६० झाला ३ नीं भागिलें ह्मणजे भागाकार २० अंश ० कळा. ह्यांत सिंहाच्या पूर्वींच्या राशि मिळविल्यानें ४ राशि, २० अंश, ० कळा हें लग्नसिद्ध झालें. अशा सिद्ध केलेल्या लग्नाव- रून षड्वर्गादि साधावें.

इष्टघटीसाधन. (शालिनी)

अर्काल्लग्नात्सायनाद्भोग्यभुक्तैर्भागैर्विघ्नात्स्वोदयात्खाग्निभक्तात् ॥
भोग्यंभुक्तंचांतरालोदयाढ्यंषष्ट्याभक्तंस्वेष्टनाड्योभवेयुः ॥ १०६ ॥

अर्थ—मागें सांगितल्याप्रमाणें सूर्य व लग्न स्पष्ट करून त्या दोहोंतही अयनांश मुंबईतील राशींच्या उदयाचीं पळें मिळवावीं. मग सायन सूर्याचे भोग्यांश काढावें. राशि सोडून अंशादि अंक ३० त वजा केले ह्मणजे भोग्यांश होतात. सायन सूर्य ज्या राशीला असेल त्या राशीच्या पळानीं आणलेल्या भोग्यांशा ला गुणावें; आणि ३० नीं भागावें. तीं सूर्याच्या भोग्यांशांचीं पळें होत याप्रमाणेंच सायन लग्नाचे जे अंशादि अंक ते भुक्तांश होत. त्यांला लग्नाच्या पळानीं गुणावें आणि ३० नीं भागावें येतील तीं लग्नाच्या भुक्तांशांचीं पळें होत. नंतर सूर्याच्या भोग्यांशांचीं पळें लग्नाच्या भुक्तांशांचीं पळें, आणि सूर्य व लग्न यांच्या मध्यें जितक्या राशि असतील त्यांचीं पळें हीं सर्व एकत्र करून त्याला ६० नीं भागावें ह्मणजे येतील त्या इष्ट घटिका होतात. अयनांश काढण्याची रीतिः—चालू शकांत ४४४ वजा करून बाकीला ६० नीं भा- गावें,ह्मणजे अयनांश होतात. राशींच्या उदयांचीं पळें निरनिराळ्या स्थळीं वेगळालीं असतात. हीं काढण्याचा प्रकार ग्रहलाघवादि गणित ग्रंथांत सांगितलेला आहे त्यावरून आपापल्या स्थळांचीं काढून घ्यावीं याठि- काणीं मुंबईचीं मात्र देतों. मुंबईत पलभा ४ आहेत आणि चरखंडें ४०।३२।१३ आहेत मेष मीन २३८ पळें, वृषभ कुंभ २६७ पळें मिथुन मकर ३१० पळें, कर्क धन ३३६ पळें, सिंह वृश्चिक ३३१ पळें, कन्या तुळ ३१८ पळें, याप्रमाणे राशीच्या उदयाची पळे, जाणावी.

इष्ट घटीसाधनाचा विशेष. (शालिनी.)

चेल्लग्नार्कौसायनावेकराशौतद्विश्लेषघ्नोदयःखाग्निभक्तः॥
स्वेष्टःकालोलग्नमूनंयदार्काद्रात्रौशेषेर्कात्सषड्भान्निशायां॥ १०७ ॥

अर्थ—सायन केलेलें लग्न व सूर्य जर एकाच राशीला असतील तर त्या दोहोंच्या अंशादिकांचें अंतर काढून त्यानें सूर्य ज्या राशीला असेल तिच्या उदयाच्या पळाला गुणावें. नंतर आलेल्या गुणाकाराला ३० नीं भागावें जितकीं पळें येतील तोच इष्टकाळ होय. सायन सूर्यांतून सायनलग्न कमी असल्यामुळें वजा. झालें असलें तर त्यांच्या अंतरापासून वरील रीतीनेंच जीं पळें येतील तितकीं पळें सूर्योदयापूर्वी इष्टकाळ आहे असें समजावें स्पष्ट सूर्यांत सहा राशि मिळवून मागच्या श्लोकांत सांगितल्या प्रमाणें इष्टकाळ जाणा- वा ह्मणजे तो सूर्यास्तापासून होतो. जो इष्टकाळ येईल त्यांत ५ पळें मिळवून त्यावेळीं विवाहांतील नि- रीक्षण किंवा इतर सर्व शुभकार्यें करावीं.

विवाहादि शुभ कार्यीं अवश्य वर्ज्य दोष. (शार्दूलविक्रीडित.)

उत्पातान्सहपातदग्धतिथिभिर्दुष्टांश्चयोगांस्तथाचंद्रेज्योशनसामथास्तमयनंति
थ्याःक्षयर्धौतथा ॥ गंडांतंचसावष्टिसंक्रमदिनंतन्वंशपास्तंतथातन्वंशेशविधून
थाष्टरिपुगान्पापस्यवर्गांस्तथा ॥ १०८ ॥ सेंदुक्रूरखगोदयांशमुदयास्ताशुद्धिचं
डायुधानखार्जूरदशयोगयोगसहितंजामित्रलत्तान्वधम् ॥ बाणोपग्रहपापकर्तरि

तथातिथ्युसवारोत्थितंदुष्टयोगमथार्धयामकुलिकाद्यान्वारदोषानपि ॥ १०९ ॥
क्रूराक्रांतविमुक्तभंग्रहणभंयत्क्रूरगंतव्यभंत्रेधोत्पातहतंचकेतुहतभंसंध्योदितंभंत
था ॥ तद्वच्चग्रहभिन्नयुद्धगतभंसर्वानिमान्संत्यजेदुद्वाहेशुभकर्मसुग्रहकृतान्लग्न
स्यदोषानपि ॥ ११० ॥

अर्थ–उत्पातसंबंधी अशुभ दिवस; महापात, दग्धतिथि; व्यतीपातादि दुष्टयोग चंद्र गुरु व शुक्र यांचे अस्त तिथिक्षय तिथिवृद्धि गंडात भद्राकरण संक्रांतीचे दिवस लग्न व नवांश यांच्या स्वामींचें अस्त लग्नाचा स्वामी नवांशाचा स्वामी आणि चंद्र हे लग्नापासून ८।६ स्थानीं असणें; पापग्रहांचें वर्ग; । १०८। चंद्रानें किंवा खलग्रहानें युक्त लग्न व नवांश; उदयास्तशुद्धि नसणें, चंडायुध; खार्जुरदोष दशयोगदोष; योग म्हणजे ग्रहयुति जामित्र लत्ता वेध पंचक उपग्रह खलग्रहांची कर्तरी तिथि नक्षत्र आणि वार यांच्या संयोगानें होणारे दुष्टयोग यामार्धकुलिकादि वार दोष; ॥ १०९ ॥ खलग्रहयुक्त व खलग्रहानें त्यक्त नक्षत्रें ग्रहणनक्षत्र ज्या नक्षत्रीं क्रूर ग्रह जाणार असेल तें त्रिविध उत्पातांनीं दूषित नक्षत्र तसेच धूमकेतूनें दूषित नक्षत्र संध्योदित म्हणजे सूर्यनक्षत्रापासून १४ वें नक्षत्र, ग्रहानें भेदित नक्षत्र, ग्रहाचें युद्ध झालेलें नक्षत्र, आणि ग्रहकृत लग्नदोष हे सर्व विवाहाला व इतर शुभ कार्याला वर्ज्य करावे. ॥ १०१ ॥

॥ इति विवाहप्रकरणम् ॥

॥ अथ वधूप्रवेशप्रकरणम् ॥ ७ ॥

वधूप्रवेशाचा काल. (उपेंद्रवज्रा.)

समाद्रिपंचांकदिनेविवाहाद्वधूप्रवेशोष्टिदिनांतराले ॥
शुभःपरस्ताद्विषमाब्दमासदिनेक्षवर्षात्परतोयथेष्टम् ॥ १ ॥

अर्थ–विवाह दिवसापासून १६ दिवसांतील दुसऱ्या, चवथ्या इत्यादि सम दिवशीं आणि विषमांतील ७।५।९। ह्या दिवशीं वधूप्रवेश शुभ होय सोळा दिवसानंतर विषमवर्षीं. विषममासीं किंवा विषमदिवशीं वधूप्रवेश शुभ जाणावा. पांच वर्षांपुढें पाहिजे तेव्हां वधूप्रवेश करावा मग कालनियम नाहीं.

वधूप्रवेशाचीं नक्षत्रादि (अनुष्टुप्)

ध्रुवक्षिप्रमृदुश्रोत्रवसुमूलमघानिले ॥ वधूप्रवेशःसन्नेष्टोरिक्तारार्केबुधेपरैः ॥ २ ॥

अर्थ–रोहिणी, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा. अश्विनी हस्त, पुष्य, अनुराधा, रेवती, मृग चित्रा, श्रवण धनिष्ठा, मूळ मघा. स्वाती ह्या १६ नक्षत्रांवर वधूप्रवेश शुभ जाणावा. रिक्ततिथि आणि मंगळवार व रविवार त्यांवर वधूप्रवेश अशुभ होय. बुधवारीं वधूप्रवेश करूं नये असे क्वचित् मत आहे.

कन्येनें पितृगृहीं व पतिगृहीं राहण्याचा मास नियम. (इंद्रवंशा)

ज्येष्ठेपतिज्येष्ठमथाधिकेपतिंहंत्यादिमेभर्तृगृहेवधुःशुचौ ॥
श्वश्रूंसहस्येश्वशुरंक्षयेतनुंतातंमधौतातगृहेविवाहतः ॥ ३ ॥

अर्थ–विवाहानंतर प्रथमच्या ज्येष्ठांत सासरीं कन्या राहिली असतां ती पतीच्या मोठ्या भावाला मारिते पहिल्या अधिकमासांत सासरीं असतां आपल्या पतीला मारिते. पहिल्या आषाढांत सासरीं राहिली तर आपल्या सासवेला मारिते. पहिल्या पौषांत सासरीं असतां श्वशुराला मारिते. विवाह झाल्यावर प्रथम आलेल्या क्षयमासांत कन्या सासरीं राहिली तर ती स्वतःच मरण पावते विवाहानंतर पहिल्या चैत्रांत माहेरीं कन्या राहिली तर आपल्या पित्याला मारिते ज्या मासांत ज्या ठिकाणीं कन्या राहिली असतां ज्याला अशुभ फळ सांगितलें आहे तें मनुष्य नसतां त्या मासांत त्या ठिकाणीं राहिली तरी दोष नाहीं जसा पतीहून मोठा भाऊ नसतां ज्येष्ठ मासांत सासरीं राहण्याला दोष नाहीं इत्यादि

॥ इति वधूप्रवेशप्रकरणम् ॥

॥ अथ द्विरागमनप्रकरणम् ॥ ८ ॥

द्विरागमनाचा मुहूर्त. (पंचचामर.)

चरेदथौजहयनेघटालिमेषगेरवौरवीज्यशुद्धियोगतःशुभग्रहस्यवासरे ॥
नृयुग्ममीनकन्यकातुलावृषेविलग्नकेद्विरागमंलघुध्रुवेचरेस्रपेमृदूडुभिः ॥ १ ॥

अर्थ–विवाहानंतर एक वेळ कन्या सासरीं राहून माहेरीं आल्यावर ती दुसऱ्यानें सासरीं जाणें हें द्विरागमन होय. विवाहापासून विषमवर्षांत; कुंभ वृश्चिक, किंवा मेष ह्या राशींला रवि असतां; आणि व. राला रवि व गुरु याचें बळ असतां शुभ ग्रहांच्या वारीं मिथुन, मीन, कन्या, तूळ, वृषभ ह्या लग्नीं आणखी अश्विनी, हस्त, पुष्य, रोहिणी, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, श्रवण, धनिष्ठा, शततारा, पुनर्वसू, स्वाती मूळ, अनुराधा, रेवती मृग, चित्रा ह्या नक्षत्रांवर विवाहित कन्येंचें द्विरागमन शुभ जाणावें.

संमुखशुक्राचा दोष. (प्रहर्षिणी.)

दैत्येज्योह्यभिमुखदक्षिणेयदिस्याद्गाच्छेयुर्नहिशिशुगर्भिणीनवोढाः ॥
बालश्चेद्व्रजतिविपद्यतेनवोढाचेद्वंध्याभवतिचगर्भिणीत्वगर्भा ॥ २ ॥

अर्थ–शुक्र अभिमुख ह्म० पुढें असतां, किंवा दक्षिणेला ह्म० उजवेकडे असतां बालक, गर्भिणी व नवीन विवाहित कन्या यांनीं गमन करूं नये. कारण, अभिमुख किंवा दक्षिणेस शुक्र असतां बालक गेला तर तो दुःख पावतो विवाहित वधू गेली तर ती वंध्या होते आणि गर्भवती स्त्री गेली तर गर्भस्राव होतो. शुक्र आकाशांत मध्यभागीं कधींच दिसत नाहीं परंतु कधीं कधीं पूर्वेकडे व कधीं पश्चिमेकडे दिसत असतां पूर्व दिशेला व उत्तरेला जाऊं नये कारण पूर्वेस जाणाराला तो अभिमुख आणि उत्तरेस जाणाराला उजवा होतो अशा वेळीं पश्चिमेला किंवा दक्षिणेला जावें ह्मणजे दोष नाहीं तोच शुक्र पश्चिमेकडे दिसत असेल तेव्हां पश्चिम दिशेला व दक्षिणेला जाऊं नये अशा वेळीं उत्तरेला अगर पूर्वेला जावें ह्मणजे संमुख शुक्राचा दोष नाहीं

प्रतिशुक्राचा अपवाद. (मंजुभाषिणी.)

नगरप्रवेशविषयाद्युपद्रवेकरपीडनेविबुधतीर्थयात्रयोः ॥
नृपपीडनेनववधूप्रवेशनेप्रतिभार्गवोभवतिदोषकृन्नहि ॥ ३ ॥

अर्थ–आपल्या नगरांत प्रवेश करावयाचा असतां; देशोपद्रव ह्म० परचक्र आलें असतां किंवा दुर्भिक्षादि झालें असतां विवाहाच्या संबंधानें गमन करणें असेल तर अथवा देवाच्या यात्रेला निघणें असेल तर, प्रयागादितीर्थयात्रा करणें असतां राजपीडा ह्म० अपराधाबद्दल कारागृहवासादि राजदंड भोगावयाला जाणें असतां आणि वधूप्रवेशाला प्रतिशुक्राचा दोष नाहीं.

द्विरागमनाविषयीं आणि गोत्रपरत्वें प्रतिशुक्राचा अपवाद. (इंद्रवंशा)

पित्र्येगृहेचेत्कुचपुष्पसंभवःस्त्रीणांनदोषःप्रतिशुक्रसंभवः ॥
भृग्वंगिरोवत्सवसिष्ठकश्यपात्रीणांभरद्वाजमुनेःकुलेतथा ॥ ४ ॥

अर्थ–विवाहा नंतर आपल्या पित्याच्या घरीं राहून कन्या प्रौढ झाली असून स्तनांचा उद्गम झाला व ती ऋतुमती झाली असतां तिला आपल्या पतिगृही आणण्याला प्रतिशुक्राचा दोष नाही. भृगु, अंगिरा वत्स, वसिष्ठ, कश्यप, अत्रि, व भरद्वाज ह्या ऋषीच्या कुळांत उत्पन्न झालेल्या मनुष्यांला देखील सर्वकर्मांला प्रतिशुक्राचा दोष नाहीं.

॥ इति द्विरागमनप्रकरणम् ॥

॥ अथ अग्न्याधानप्रकरणम् ॥ ९ ॥

अग्निहोत्राचा मुहूर्त. (वसंततिलक.)

स्यादग्निहोत्रविधिरुत्तरगे दिनेशे मित्रध्रुवांत्यशशिशक्रसुरेज्यधिष्ण्ये ॥
रिक्तासु नो शशिकुजेज्यभृगौ ननीचे नास्तंगते नाविजिते न च शत्रुगेहे ॥ १ ॥

अर्थ–सूर्याचें उत्तरायण असतां कृत्तिका, विशाखा, रोहिणी, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा रेवती, मृगशीर्ष, ज्येष्ठा पुष्य ह्या नक्षत्रांवर अग्निहोत्र घेणें शुभ होय ह्याला रिक्तातिथि अशुभ जाणाव्या. चंद्र, मंगळ गुरु, शुक्र हे चार ग्रह आपल्या नीचस्थानीं असतां तसेच अस्तंगत असतां, किंवा ग्रह युद्धांत हे चार ग्रह पराभव पावले असतां; अगर हे आपल्या शत्रूच्या राशीला असतां अग्निहोत्र घेऊं नये.

अग्निहोत्राची लग्नशुद्धि. (वसंततिलक.)

नो कर्कनक्रझषकुंभनवांशलग्ने नाब्जेतनौ रवि शशीज्यकुजैस्त्रिकोणे ॥
केंद्रे च षट्त्रिभवगे च परैस्त्रिलाभषट्खस्थितैर्निधनशुद्धियुते विलग्ने ॥ २ ॥

अर्थ–कर्क, मकर, मीन व कुंभ ह्या नवांशीं आणि ह्या चार लग्नीं अग्निहोत्राचा आरंभ करूं नये लग्नीं चंद्र अशुभ होय. (शुक्रही लग्नीं नसावा) रवि, चंद्र गुरु मंगळ हे चार ग्रह अग्निहोत्राच्या इष्टलग्नापासून ९।५।१।४।७।१०।६।३।११ ह्या स्थानीं असतां आणि इतर बुध, शुक्र शनि राहु केतु हे ग्रह ३।११।६।१० ह्या स्थानीं असतां आधान शुभ जाणावें. इष्टलग्नापासून अष्टमस्थानीं मात्र शुभ किंवा खलग्रह असूं नये आणि अग्निहोत्र घेणाऱ्या. यजमानाच्या जन्मराशीपासून व जन्मलग्नापासून जें अष्टम लग्न तें अग्न्याधा. नाला अशुभ होत.

अग्निहोत्र चिरकाल चालण्याचे योग (अनुष्टुप्.)

चापे जीवे तनुस्थे वा मेषे भौमे वरे द्युने ॥ षट्त्र्याये ऽजे रवौ वा स्याज्जाताग्निर्यजति ध्रुवम् ॥ ३

अर्थ-–अग्निहोत्रविधीचें इष्टलग्न धन असून त्या धनलग्नीं गुरु असणें हा एक योग; इष्टलग्न मेष असून त्याला मंगळ असणे हा दुसरा योग; अथवा इष्टलग्नापासून दशमस्थानीं मंगळ असणें. हा तिसरा तसाच सप्तम मंगळ असणें हा चवथा चंद्र ६।३।११ ह्या स्थानीं असणें अथवा ,ह्याच स्थानीं (६।३।११) सूर्य असणें हे सहायोग आणि पहिले चार मिळून १० योग आहेत हे सर्व अग्निहोत्राच्या आरंभाला शुभ जाणावें. ह्या दहायोगांतून कोणत्याही एका योगावर ज्यानें अग्निहोत्र स्वीकारिलें असेल त्याचें चिरकाळ चालतें व ज्योतिष्टोमादि कृत्यें होतात.

॥ इति अग्न्याधानप्रकरणम् ॥

॥ अथ राजाभिषेकप्रकरणम् ॥ १० ॥

राजाभिषेकाचा काळ. (इंद्रवंशा.)

राजाभिषेकः शुभ उत्तरायणे गुर्विंदुशुक्रैरुदितैर्बलान्वितैः
भौमार्कलग्नेशदशेशजन्मपैर्नो चैत्ररिक्तारनिशामलिम्लुचे ॥ १ ॥

अर्थ–उत्तरायणांत राजाभिषेक शुभ होय. गुरु चंद्र आणि शुक्र हे उदित असून ह्मणजे अस्तंगत नसून बलवान् असावे. तसेच मंगळ, रवि; राजाच्या जन्मलग्नाचा स्वामी अभिषेककाळीं राजाला जी महादशा व अंतर्दशा असेल त्यांचे स्वामी, तसाच राजाच्या जन्मराशीचा स्वामी हे बलवान् असावे. चैत्रमास, रिक्तातिथि, मंगळवार रात्रि आणि अधिकमास ह्यांवर राजाभिषेक करूं नयें.

राजाभिषेकाचीं नक्षत्रें आणि लग्नशुद्धि. (इंद्रवंशा.)

शाक्रश्रवःक्षिप्रमृदुध्रुवोडुभिः शीर्षोदये वोपचयेशुभतनौ ॥

पापैस्त्रिषष्ठायगतैःशुभग्रहैःकेंद्रत्रिकोणायधनत्रिसंस्थितैः ॥ २ ॥

अर्थ–ज्येष्ठा, श्रवण, अश्विनी, पुष्य हस्त, चित्रा, मृगशीर्ष रेवती अनुराधा, रोहिणी, उत्तराफा०, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा हीं नक्षत्रें राजाभिषेकाला शुभ जाणावीं. मिथुन, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, कुंभ हीं शीर्षोदय लग्नें; किंवा राजाच्या जन्मलग्नापासून व जन्मराशीपासून उपचय स्था० ३।६।१०।११ हीं लग्नें राजाभिषेकाला शुभ जाणावीं इष्टलग्नीं शुभग्रह असावे किंवा शुभग्रहांची दृष्टि असावी खलग्रह ३।६।११ ह्या स्थानीं असावे, आणि शुभग्रह १।४।७।१०।९।५।११।२।३ ह्या स्थानीं असावे.

पापग्रहांची स्थानपरत्वें फळें, आणि अपवाद. (इंद्रवंशा.)

पापैस्तनौरुग्निधनेमृतिःसुतेपुत्रार्तिरर्थव्ययगैर्दरिद्रता ॥
स्यात्खेलसोभ्रष्टपदोऽम्बुनावुगैःसर्वंशुभंकेंद्रगतैःशुभग्रहैः ॥ ३ ॥

अर्थ–राजाच्या अभिषेकाच्या इष्टलग्नाला खलग्रह असतां राजाला रोग होतो इष्टलग्नापासून अष्टमस्थानीं खलग्रह असतां राजाला मरण, पंचमस्थानीं असतील तर पुत्रशोक द्वितीयस्थानीं व द्वादशस्थानीं असतां दारिद्य, दशमस्थानीं असतां राजाला आळस, सप्तमस्थानीं व चतुर्थस्थानीं पापग्रह असतील तर, राजा पदच्युत होतो. अशीं खलग्रहांचीं स्थानपरत्वें फळें आहेत इष्टलग्नापासून १।४।७।१०। ह्या केंद्रस्थानीं शुभग्रह असतील तर वरील खलग्रहांच्या दुष्ट फळांचा नाश होऊन राजाला सर्व शुभ फळें प्राप्त होतात

राजाभिषेकाचे दोन शुभ योग. (भुजंगप्रयात.)

गुरुर्लग्नकोणेकुजोरौसितःखेसराजादामोदतेराजलक्ष्म्या ॥
तृतीयायगौसौरिसूर्यौखबंधोर्गुरुश्चेद्धरित्रीस्थिरास्यन्नृपस्य ॥ ४ ॥

अर्थ–अभिषेकाच्या इष्टलग्नीं किंवा ९।५ ह्या स्थानीं गुरु असणें, मंगळ षष्ठस्थानीं असणें, व शुक्र दशमस्थानीं असणें हा एक शुभ योग आहे. अशा योगावर राजाला अभिषेक झाला असतां तो सर्वकाळ राजलक्ष्मीनें युक्त होऊन सुखानें नांदतो. तृतीयस्थानीं शनि, एकादशस्थानीं सूर्य आणि दशमस्थानीं अथवा चतुर्थस्थानीं बृहस्पति असणें हा दुसरा शुभयोग आहे. ह्या योगावर राजाला अभिषेक हाईल तर निरंतर राजाच्या हस्तगत पृथ्वी राहते.

॥ इति राजाभिषेकप्रकरणम् ॥

॥ अथ यात्राप्रकरणम् ॥ ११ ॥

यात्रेचे अधिकारी. (प्रहर्षिणी.)

यात्रायांभविदितजन्मनांनृपाणांदातव्यंदिवसमबुद्धजन्मनांच ॥
प्रश्नाद्यैरुदयनिमित्तमूलभूतैर्विज्ञातेऽसुशुभशुभेबुधःप्रदद्यात् ॥ १ ॥

अर्थ–कोणत्याही कार्याच्या उद्देशानें देशांतरीं गमन करणें ह्याचें नांव यात्रा होय. यात्रेचे समरविजया आणि सामान्या असे दोन भेद आहेत. शत्रूचा पराभव करून आपण विजयी व्हावें म्हणून देशांतराला जाणें ही समरविजया यात्रा, आणि द्रव्य संपादन करण्याकरितां किंवा तीर्थाला अगर देवदर्शनाकरितां परदेशीं जाणें ही सामान्या यात्रा जाणावी. (ह्या सर्व यात्राप्रकरणांत जीं जीं फळें राजाला होतात असें सांगितलें आहे तीं तीं सर्व फळें राजाशिवाय इतर साधारण मनुष्यांलाही योग्यतेप्रमाणें होतील असें समजावें. ज्या राजाच्या जन्मकाळाची संपूर्ण माहिती असेल त्याच्या जन्मलग्नकुंडलीवरून, व महादशा, अंतर्दशा इत्यादिकांचा विचार करून ग्रह बलवान् असतील अशा वेळीं त्याला यात्रा करण्याविषयीं शुभ दिवस योजून सांगावा ज्याच्या जन्मकाळाचें संपूर्ण ज्ञान आहे तो यात्रेचा खरा अधिकारी जाणावा. ज्याचा जन्मकाळ अपुरा माहित असेल किंवा जन्मकाळाचें मुळींच मुळीं ज्ञान नसेल अशा राजानें किंवा मनुष्यानें यात्राविषयीं प्रश्न केला असतां प्रश्नकाळच्या लग्नावरून, आणि प्रश्नकाळीं झालेली उपश्रुति

शकुन इत्यादि निमित्तांवरून यात्रेच्या शुभाशुभ फळांचा विचार करून पंडितानें यात्रादिवस योजावा.हा यात्रेचा दुसरा अधिकारी होय.

यात्राप्रश्नाचें फळ. (द्रुतविलंबित.)

जननराशितनूयदिलग्नगतदधिपौयदिवाततएववा ॥
त्रिरिपुखायगृहंयदिवोदयेविजयएवभवेद्वसुधापतेः ॥ २ ॥

अर्थ—यात्रेविषयीं कोणी प्रश्न केला असतां प्रश्नकाळींचें लग्न असेल त्यावरून पुढील रीतीनें विचार करून प्रश्नकर्त्याला मुहूर्त सांगावा. प्रश्नकर्त्याची मूळराशि किंवा जन्मलग्न हींच प्रश्नलग्न असतां; अथवा जन्मराशीचा स्वामी अगर जन्मलग्नाचा स्वामी प्रश्नलग्नीं असतां; किंवा प्रश्नकर्त्यांच्या जन्मराशीपासून ३।६।१०।११ ह्या राशि आणि तसाच जन्मलग्नापासून ३।६।१०।११ ह्या राशि ह्मणून कोणतीही राशि प्रश्नलग्न असतां यात्रेच्या योगानें राजाचा विजयच होईल असें जाणावें.

यात्राप्रश्न फळें. (मंजुभाषिणी.)

रिपुजन्मलग्नभमथाधिपौतयोस्ततएवचोदयसमाचेद्भवेत् ॥
हिबुकेद्युनेथशुभवर्गकस्तनौयदिमस्तकोदयगृहेंतदाजयः ॥ ३ ॥

अर्थ—प्रश्नकर्त्याच्या शत्रूची जन्मराशि व जन्मलग्न, प्रश्नलग्नापासून चतुर्थस्थानीं किंवा सप्तमस्थानीं असेल तर, अथवा शत्रूच्या जन्मराशीचा स्वामी अगर जन्मलग्नाचा स्वामी प्रश्नलग्नापासून ४।७ ह्या स्थानीं असेल तर, किंवा शत्रूच्या जन्मराशीपासून अथवा जन्मलग्नापासून ३।६।१०।११ ह्या उपचयराशि प्रश्नलग्नापासून ४।७ ह्या स्थानीं असतील तर प्रश्न कर्त्या राजाचा जय होईल असें जाणावें. प्रश्न लग्नांत ज्या नवांशीं प्रश्न केला असेल त्याचे सर्व द्वर्ग शुभग्रहांचे असतील तर, किंवा मिथून, सिंह, कन्या, तूळ, वृश्चिक, कुंभ, ह्या शीर्षोदय लग्नांतील कोणतेंही प्रश्नलग्न असेल तर सुद्धां विजय जाणावा.

यात्रा प्रश्नाचीं शुभ निमित्तें (तोटक.)

यदिपृच्छतिनौवसुधारुचिराशुभवस्तुयदिश्रुतिदर्शनगम् ॥
यदिपृच्छतिचादरतश्चशुभग्रहदृष्टयुतंचरलग्नमपि ॥ ४ ॥

अर्थ—पृच्छकानें ज्या स्थळीं यात्रेविषयीं प्रश्न केला असेल त्या ठिकाणची भूमि रुचिर ह्मणजे सारवून रांगोळी घालून सुशोभित केलेली, अगर उत्तम आसनें, बैठका इ० घातलेली अशी सुरेख असेल तर, किंवा प्रश्नकाळीं मंगलपदार्थांचें नांव ऐकूं येईल, अथवा मंगलवस्तु दृष्टीस पडेल तर, अथवा पृच्छकानें आदरानें प्रश्न विचारिला असतां यात्राकर्त्याचा जय होईल असें समजावें. मेष, कर्क. तूळ, मकर ह्या चर राशींतील कोणतेंही प्रश्नलग्न असून त्यांवर शुभ ग्रहांची दृष्टि असेल, किंवा त्या प्रश्नलग्नीं शुभग्रह असतील तर विजय होईल ह्मणून समजावें.

यात्रा प्रश्नाचीं अशुभ फळें. (मालिनी.)

विधुकुजयुतलग्नेसौरिदृष्टेथचंद्रेमृतिभमदनसंस्थेलग्नगेभास्करेपि ॥
हिबुकनिधनहोराद्यूनगेवापिपापेसपदिभवतिभंगःप्रश्नकर्तुस्तदानीम् ॥ ५ ॥

अर्थ—यात्रेच्या प्रश्नलग्नीं चंद्र व मंगळ हे दोन ग्रह असून त्या लग्नावर शनीची दृष्टि असतां पृच्छकाचा पराजय होईल असें जाणावें. प्रश्नलग्नापासून अष्टमस्थानीं किंवा सप्तमस्थानीं चंद्र आणि प्रश्नलग्नीं सूर्य असा योग असतां; अथवा याच्या उलट ह्मणजे अष्टम किंवा सप्तमस्थानीं सूर्य असून लग्नीं चंद्र असा योग असतांही पराभव फळ जाणावें तसेंच प्रश्नलग्नापासून ४।८।१।७ यांतून कोणत्याही स्थानीं पापग्रह असतां प्रश्नकर्त्याचा यात्रा केल्यानें भंग होईल असें समजावें.

गमनकर्ता कोणत्या दिशेला जाईल ह्या प्रश्नाचा निर्णय. (भुजंगप्रयात.)

त्रिकोणेकुजातसौरिशुक्रज्ञजीवायदैकोपिवानोगमोर्काच्चशीघ्रा ॥
बलीयांस्तुमध्येतयोर्योग्रहःस्यात्स्वकीयांदिशंप्रत्युतासौनयेद्वै ॥ ६ ॥

अर्थ—प्रश्नकाळीं मंगळ ज्या राशीला असेल त्या राशीपासून त्रिकोणीं ह्मणजे ९।५ ह्या स्थानीं शनि, शुक्र, बुध, गुरु हे सर्व ग्रह असतां किंवा यांतील कोणताही एक असतां गमनकर्ता ज्या दिशेला जाणार असेल त्या दिशेला त्याचें गमन होणार नाहीं असें समजावें. प्रश्नसमयीं ज्या राशीला रवि असेल तीपासून त्रिकोणीं चंद्र असतांही इष्टदिशेला गमन होणार नाहीं असें जाणावें. याप्रमाणें इष्टदिशेला गमन करण्याचा प्रतिबंध करणारे जे ग्रह वर सांगितले त्यांत सर्वांहून जो ग्रह बलवान असेल तो ग्रह आपल्या दिशेला गमन कर्त्याला नेतो ह्मणजे त्या बलवान् ग्रहाच्या दिशेला गमन करणाराला जाणें भाग पडतें असें जाणावें. (ग्रहांच्या दिशा यात्रा प्रकरणांतील ४९ व्या श्लोकांत पहाव्या.)

गमन दिशेचा निर्णय. (मदलेखा.)

प्रश्नेगम्यदिगीशात्खेटःपंचमगोयः ॥ वोभूयाद्व ·युक्तःस्वामाशांनयतेमौ ॥ ७ ॥

अर्थ—गमनकर्ता ज्या दिशेला जाणार असेल त्या दिशेचा जो स्वामी तो ग्रह प्रश्नकाळीं ज्या राशीला असेल तीपासून पंचमस्थानीं कोणी ग्रह असून बलवान् असतां तो आपल्या दिशेकडे गमन करवितो. तो ह्मणजे अशा बलवान् ग्रहाच्या दिशेला गमन कर्त्याचें अवश्य जाणें होतें.

यात्राकाल. (भुजंगप्रयात.)

धनुर्मेषसिंहेषुयात्राप्रशस्ताशनिज्ञोशनौराशिगेचैवमध्या ॥
रवौकर्कमीनालिसंस्थेतिदीर्घाजनुःपंचसप्तत्रितारा श्चनेष्टाः ॥ ८ ॥

अर्थ—धन, मेष, सिंह ह्या तीन राशींला सूर्य असतां यात्रा शुभ होय. मकर, कुंभ, मिथुन, कन्या, वृषभ, तूळ ह्या राशींला सूर्य असतां मध्यम जाणावी आणि कर्क. मीन, वृश्चिक ह्या तीन राशीला सूर्य असतां यात्रा अतिदीर्घ ह्मणजे बहुकालानें सफल होणारी अर्थात अशुभ होय. गमनकर्त्याच्या जन्मनक्षत्रापासून दिवस नक्षत्र मोजून९ नीं भागावे बाकी १।५।७।३ राहिली तर तें नक्षत्र यात्रेला अनिष्ट जाणावें. अर्थात २।४।६।८।० बाकी राहणारें नक्षत्र गमनाला शुभ होय.

प्रयाणाच्या तिथि व नक्षत्रें. (भुजंगप्रयात.)

नषष्ठीनचद्वादशीनाष्टमीनोसिताद्यातिथिःपूर्णिमामानरिक्ता ॥
हयादित्यमित्रेंदुजीवांत्यहस्तश्रवोवासवैरेवयात्राप्रशस्ता ॥ ९ ॥

अर्थ—षष्ठी द्वादशी, अष्टमी, शुक्लपक्षाची प्रतिपदा, पूर्णिमा, अमावस्या, आणि (४।९।१४) रिक्ता तिथि ह्या सर्व तिथि प्रयाणाला अशुभ होत अर्थात ह्यांशिवाय इतर तिथि गमनाला प्रशस्त जाणाव्या. आश्विनी, पुनर्वसु, अनुराधा, मृगशीर्ष, पुष्य, रेवती, हस्त, श्रवण, धनिष्ठा हीं ९ नक्षत्र यात्रेला शुभ आहेत. (उत्तराफ०, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, शततारा, मूळ ज्येष्ठा, पूर्वाफ०, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा व रोहिणी हीं १० नक्षत्रें प्रयाणाला मध्यम; आणि कृत्तिका, स्वाती, आर्द्रा. विशाखा, चित्रा, आश्लेषा मघा. भरणी, हीं ८ नक्षत्रें गमनाला अशुभ असें वसिष्ठादि ऋषींच्या मतानें आहे.)

वारशूल व नक्षत्रशूल (पृथ्वी)

नपूर्वदिशिशक्रभेनविधुसौरिवारेतथानचाजपदभेगुरौयमदिशीनदैत्येज्ययोः ॥
नपाशिदिशिधातृभेकुजबुधेयमक्षेतथानसौम्यककुभिव्रजेत्स्वजयजीवितार्थीबुधः ॥ १० ॥

अर्थ—ज्येष्ठा नक्षत्रीं, व सोमवारीं आणि शनिवारीं पूर्वदिशेला; पूर्वाभाद्रपदानक्षत्रावर, आणि गुरुवारीं दक्षिणेला; रविवारीं व शुक्रवारीं आणि रोहिणीनक्षत्रावर पश्चिमेला; मंगळवारीं, व बुधवारीं आणि उत्तराफाल्गुनी नक्षत्रावर उत्तरदिशेला, द्रव्य, विजय व आयुष्य इच्छिणाऱ्या चतुरानें गमन करूं नये.

कालशूल (शार्दूलविक्रीडित)

पूर्वाण्हेध्रुवमिश्रभैर्नृपतेर्यात्रानमध्यान्हकेतीक्ष्णाख्यैरपराण्हकेनलघुभैर्नोपूर्वरात्रेतथा ॥ मैत्राख्यैर्नचमध्यरात्रिसमयेचांग्रैस्तथानोचरैराव्यंतेहरिहस्तपुष्यशशिभिःस्यात्सर्वकालेशुभा ॥ ११ ॥

अर्थ– ध्रुवसंज्ञक, व मिश्रसंज्ञक नक्षत्रावर पूर्वाण्हीं गमन करूं नये. तीक्ष्णनक्षत्रीं मध्यान्ह कालीं व लघुसंज्ञक नक्षत्रावर अपराण्ह कालीं राजानें यात्रा करूं नये मैत्रसंज्ञकनक्षत्रावर पूर्वरात्रीं, उग्रनक्षत्रांवर मध्यरात्रीच्यावेळीं. आणि चरसंज्ञकांवर अंत्यरात्रीं प्रयाण अशुभहोय. श्रवण, हस्त, पुष्य, मृगशीर्ष ह्या चार नक्षत्रांवर मात्र सर्वकाळ यात्रा शुभ जाणावी. (दिनमानाच्या पहिल्या भागाला पूर्वाण्ह, दुसऱ्या भागाला मध्यान्ह, व तिसऱ्याला अपराण्ह अशा संज्ञा आहेत त्याचप्रमाणें रात्रि मानाच्या पहिल्या भागाला पूर्वरात्र दुसऱ्याला मध्यरात्र आणि शेवटील तिसऱ्याला अंत्यरात्र अशा रात्रीच्याही संज्ञा आहेत)

(प्रयाणीं नक्षत्रांच्या वर्ज्य घटी) इंद्रवज्रा.)

पूर्वात्रिपित्र्यांतकतारकाणांभूपप्रकृत्यग्रतुरंगमाःस्युः ॥
स्वातीविशाखेंद्रभुजंगमानांनाड्योनिषिद्धामनुसंमिताश्च ॥ १२ ॥

अर्थ- पूर्वाफल्गुनी, पूर्वाषाढा. पूर्वाभाद्रपदा ह्या तीन नक्षत्रांच्या आरंभींच्या १६ घटिका कृत्तिका नक्षत्राच्या २१ घटिका; मघा नक्षत्राच्या ११ घटिका आणि भरणीच्या ७ घटिका गमनाला अशुभ होत. तशाच स्वाती विशाखा, ज्येष्ठा, आश्लेषा ह्या चार नक्षत्रांच्या आरंभींच्या १४ घटिका यात्रेला निषिद्ध जाणाव्या.

प्रयाण नक्षत्रांच्या मतांतरानें वर्ज्य घटी (इंद्रवज्रा)

पूर्वार्धमाग्नेयमघानिलानांत्यजेद्धिचित्राहियमोत्तरार्धम् ॥
नृपःसमस्तांगमनेजयार्थीस्वातींमघांचोशनसोमतेन ॥ १३ ॥

अर्थ—कृत्तिका, मघा, स्वाती ह्या तीन नक्षत्रांचें पूर्वार्ध, आणि चित्रा, आश्लेषा भरणी ह्या तीहोंचें उत्तरार्ध राजानें प्रयाणाला वर्ज्य करावें असें कित्येकांच्या मतानें आहे. जयेच्छु राजानें प्रयाणीं मघा व स्वाती हीं दोन नक्षत्रें संपूर्ण वर्जावीं असें शुक्राचार्यांचें मत आहे.

नक्षत्रांच्या जीवपक्षादि संज्ञा. (भुजंगप्रयात.)

तमोभुक्तताराःस्मृताविश्वसंख्याःशुभोजीवपक्षोमृतश्चापिभोग्याः ॥
तदाक्रांतभंकर्तरीसंज्ञमुक्तंततोक्षेंदुसंख्यंभवेद्ग्रस्तनाम ॥ १४ ॥

अर्थ–राहु हा निरंतर वक्र असतो. याची गति सर्वकाळ इतर ग्रहांच्या उलट असते. राहू ज्या नक्षत्राला असेल त्या पूर्वींच्या त्यानें भोगून सोडलेल्या १३ नक्षत्रांला जीवपक्ष असें जाणावें. हीं जीवपक्ष नक्षत्रें शुभ जाणावीं. ज्या नक्षत्रीं राहु असेल त्यापुढील १३ नक्षत्रांला मृतपक्ष अशी संज्ञा आहे हीं नक्षत्रें अशुभ होत राहु ज्या नक्षत्राला असेल त्याला कर्तरी नक्षत्र ह्मणावें, आणि त्यापासून १५ व्या नक्षत्राला ग्रस्त असे ह्मणावें. (राहु हस्त नक्षत्राला असतां चित्रापासून पूर्वाभाद्रपदापर्यंत १३ भुक्तनक्षत्रें जीवपक्षनामक होत तशीच उत्तराफल्गुनीपासून रेवतीपर्यंत १३ भोग्यनक्षत्रें मृतपक्ष होत. हस्त हें कर्तरी नामक व त्यापासून १५ वें उत्तराभाद्रपदा हें ग्रस्त नामक होय.)

जीवपक्षादि नक्षत्रांचीं फळें. (शार्दूलविक्रीडित)

मार्तंडेमृतपक्षगेहिमकरश्चेज्जीवपक्षेशुभायात्रास्याद्विपरीतगेक्षयकरीद्वौजीवपक्षेशुभा ॥ ग्रस्तर्क्षंमृतपक्षतःशुभकरंग्रस्तात्तथाकर्तरीयायीदुःस्थितिमात्रविजयकरौतौद्वौतयोर्जीवगौ॥ १५॥

अर्थ–सूर्य मृतपक्षनक्षत्राला असून चंद्र जीवपक्षनक्षत्रीं असतां प्रयाण शुभ जाणावें. याच्या विपरीत ह्मणजे मृतपक्षीं चंद्र असून जीवपक्षीं सूर्य असतां क्षयकर यात्रा जाणावी. चंद्र व सूर्य हे दोनही जीवपक्षनक्षत्राला असतां प्रयाण अतिशुभकारक होय. मृतपक्षनक्षत्राहून ग्रस्त नक्षत्र शुभकर जाणावें. तसेच ग्रस्तनक्षत्राहून कर्तरी नक्षत्र शुभ होय शत्रूचा पराजय करण्याकरिता आपलें स्थान सोडून परदेशी शत्रूवर चालून जाणारा राजा यायी होय यायीराजाचा अधिपति चंद्र जाणावा. आपल्या स्थानींच राहणारा राजा स्थायी होय.असा आपल्या ठिकाणांत राहणाऱ्या स्थायीराजाचा अधिपति सूर्य जाणावा चंद्र व सूर्य हे दोघे जीव पक्ष नक्षत्राला असतां स्थायी राजाला व यायीराजाला विजय देणारे होतात ह्मणजे रवि जीव पक्षनक्षत्रीं असतां स्थायीराजाचा जय होतो; आणि चंद्र असतां यायीराजाचा जय होतो, चंद्र व सूर्य हे दोघेही जीवपक्षनक्षत्रीं

असतील तर दोन राजांमध्यें संधि ह्मणजे होतो दोघेही मृतपक्षनक्षत्रीं असतां दोनही राजांचा पराजय होतो.

नक्षत्रांच्या अकुल, कुलाकुल व कुल ह्या तीन संज्ञा आणि त्यांचीं फळें (वसंततिलका १. शार्दूलविक्रीडित १.)

स्वात्यंतकाहिवसुपौष्णकरानुराधादित्यध्रुवाणि विषमास्तिथयोऽकुलाः स्युः ॥ भूयेंदुमंदगुरवश्च कुलाकुलाख्योमूलांबुपेशविधिभं द्विदशद्वितिथ्यः ॥ १६ ॥ पूर्वाश्वीज्यमघेंदुकर्णदहनद्वीशद्विचित्रास्तथा शुक्रारौ कुलसंज्ञकाश्च तिथयोकाष्टेंद्र वेदैर्मिताः ॥ यायीस्यादकुलेजयी च समरेस्थायी च तद्वत्कुलेसंधिः स्याद्युभयोः कुलाकुलगणेभूमीशयोर्युध्यतोः ॥ १७ ॥

अर्थ--स्वाती भरणी, आश्लेषा, धनिष्ठा रेवती हस्त, अनुराधा, पुनर्वसु, रोहिणी, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, हीं १२ नक्षत्रें आणि विषमतिथि ह्मणजे० १।३।५।७।९।११।१३।१५ ह्या आठ तिथि; व रवि, सोम, शनि गुरु हे चार वार ह्या सर्वांला अकुल अशी संज्ञा आहे. बुधवार; आणि मूळ, शततारा, आर्द्रा, अभिजित् हीं चार नक्षत्रें; व दशमी षष्ठी, द्वितीया ह्या तिथि ह्यांला कुलाकुल, अशी संज्ञा आहे ॥ १६ ॥ पूर्वाफल्गुनी, पूर्वाषाढा, पूर्वाभाद्रपदा, अश्विनी, पुष्य, मघा मृगशीर्ष श्रवण, कृत्तिका, विशाखा, ज्येष्ठा चित्रा हीं १२ नक्षत्रें शुक्र व मंगळ हे दोन वार, आणि द्वादशी, अष्टमी. चतुर्दशी चतुर्थी ह्या चार तिथि ह्या सर्वांला कुल असें नांव आहे अकुलसंज्ञक तिथि, वार, नक्षत्रांवर युद्धाचा आरंभझाला असतां यायीराजाचा विजय होतो कुलसंज्ञकांवर स्थायीराजाचा जय होतो आणि कुलाकुल नामक तिथिवारनक्षत्रांवर युद्धारंभ झाला असतां दोन राजांमध्यें संधि होतो.

पथिराहु चक्र निर्माण. (स्रग्धरा)

स्पर्धर्मेदस्रपुष्योरगवसुजलपद्वीशमैत्राण्यथार्थेयाम्याजांघ्रींद्रकर्णादितिपितृपवनोडून्यथोभानिकामे ॥ वन्ह्यार्द्राबुध्न्यचित्रानिर्ऋतिविधिभगाख्यानिमोक्षेधरोहिण्यार्यम्याप्पेंदुविश्वांतिमभादिनकरर्क्षाणिपंथादिराहौ ॥ १८ ॥

धर्म.	अर्थ.	काम.	मोक्ष
अश्वि.	भरणी,	कृत्तिका.	रोहिणी
पुष्य	पुनर्वसु	आर्द्रा.	मृग.
आश्लेषा.	मघा.	पूर्वाफ०	उत्तराफ०
विशाखा	स्वाती.	चित्रा	हस्त
अनुराधा.	ज्येष्ठा	मूळ	पूर्वाषाढा.
धनिष्ठा	श्रवण.	अभिजित्	उत्तराषाढा
शततारा.	पु० भा०	उत्तरा भाद्र०	रेवती

अर्थ-धर्म अर्थ काम मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत ह्या प्रत्येकांत जीं जीं नक्षत्रें जाणावयाचीं तीं बाजूचे कोष्टकांवरून स्पष्ट समजतील. उभ्या रेषा पांच व आडव्या नऊ अशा काढून त्यांत वरीलचार पुरुषार्थ लिहावें आणि खाली अश्विनी पासून सर्पगतीप्रमाणें सर्व नक्षत्रें लिहावीं ह्मणजे तें पथिराहू चक्र उत्पन्न होतें पंथा शब्द ज्याच्या आरंभी आहे अशा राहूचें जें चक्र तें पथिराहुचक्र होय.

पूर्वोक्त पथिराहू चक्राचें फळ. (स्रग्विणी)

धर्मगेभास्करेवित्तमोक्षेशशीवित्तगेधर्ममोक्षास्थितिःशस्यते ॥ कामगेधर्ममोक्षार्थगःशोभनोमोक्षगेकेत्रलंधर्मगःप्रोच्यते ॥ १९ ॥

अर्थ-मागील श्लोकांत धर्म, अर्थ काम मोक्ष ह्या पुरुषार्थांतील प्रत्येकाच्या मार्गाचीं सात सात नक्षत्रें सांगितलीं आहेत त्यांतील धर्ममार्गाच्या नक्षत्रांला सूर्य असून अर्थमार्गाच्या नक्षत्रीं चंद्र असतां तो शुभ जाणावा. तसाच अर्थमार्गी सूर्य असून धर्ममार्गी अथवा मोक्षमार्गी चंद्र असतां तो शुभ होय काममार्गी सूर्य असून धर्म मोक्ष व अर्थमार्गी चंद्र असेल तर तो शुभ मानावा. आणि मोक्षमार्गी सूर्य असतां फक्त

धर्ममार्गी असणारा चंद्र शुभ जाणावा. अर्थात् त्याच्या उलट कोणत्याही प्रकार चंद्रसूर्यांची स्थिति असल तरी ती अशुभ होय. ह्या पथिराहूचक्रातील शुभचंद्र सर्वकृत्यांला असावा, त्यातही प्रयाणाला अवश्य पहावा.

तिथिचक्र (शालिनी.)

पौषेपक्षत्यादिकाद्वादशैवंतिथ्योमाघादौद्वितीयादिकास्ताः ॥ कामाच्चिन्त्याःस्युस्तृतीयादिवच्चयानेप्राच्यादौफलंतत्रवक्ष्ये ॥ २० ॥ सौख्यंक्लेशोभीतिरर्थागमश्च शून्यंनैःस्वंनिःस्वतामिश्रताच ॥ द्रव्यक्लेशोदुःखमिष्टाप्तिरर्थोलाभःसौख्यंमंगलंवित्तलाभः ॥ २१ ॥ लाभोद्रव्याप्तिर्धनंसौख्यमुक्तंभीतिर्लाभोमृत्युरर्थागमश्च ॥ लाभःकष्टंद्रव्यलाभौसुखंचकष्टंसौख्यंक्लेशलाभौसुखंच ॥ २२ ॥ सौख्यंलाभःकार्यसिद्धिश्च कष्टंक्लेशःकष्टात्सिद्धिरर्थोधनंच ॥ मृत्युर्लाभोद्रव्यलाभश्चशून्यंशून्यंसौख्यंमृत्युरत्यंतकष्टम् ॥ २३ ॥

कोष्टक

पौ	मा.	फा.	चै.	वै	ज्ये.	आ	श्रा	भा.	अ	का	मा	पूर्व.	दक्षिण.	पश्चिम.	उत्तर.
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	सौख्य.	क्लेश.	भीति	अर्थागम.
२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१	शून्य.	निःस्वत्व	निःस्वत्व	मिश्रता.
३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१	२	द्रव्यक्लेश	दुःख	इष्टाप्ति.	अर्थलाभ.
४	५	६	७	८	९	१०	११	१२	१	२	३	लाभ	सौख्य	मंगल.	वित्तलाभ.
५	६	७	८	९	१०	११	१२	१	२	३	४	लाभ	द्रव्याप्ति.	धन	सौख्य.
६	७	८	९	१०	११	१२	१	२	३	४	५	भीति.	लाभ	मृत्यु	अर्थागम.
७	८	९	१०	११	१२	१	२	३	४	५	६	लाभ	कष्ट	द्रव्यलाभ	सुख
८	९	१०	११	१२	१	२	३	४	५	६	७	कष्ट	सौख्य.	क्लेशलाभ	सुख.
९	१०	११	१२	१	२	३	४	५	६	७	८	सौख्य	लाभ	कार्यसिद्धि	कष्ट.
१०	११	१२	१	२	३	४	५	६	७	८	९	क्लेश	कष्टात्सिद्धि	अर्थ.	धन.
११	१२	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	मृत्यु	लाभ.	द्रव्यलाभ.	शून्य.
१२	१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	शून्य.	सौख्य.	मृत्यु.	अति कष्ट

अर्थ—पौषमासांत प्रतिपदेपासून द्वादशीपर्यंत क्रमानें तिथि लिहाव्या तशाच माघादिकाच्या द्वितीया तृतीया इत्यादि अनुक्रमानें तिथि लिहाव्या त्रयोदशीचें फळ तृतीयेप्रमाणें. चतुर्दशीचें चतुर्थीप्रमाणें; आणि पौर्णिमेचें पंचमीप्रमाणें जाणावें. ह्या सर्व तिथींचीं फळें पूर्वादि दिशेला प्रयाण केल्यानें निरनिराळीं आहेत. तीं वरील कोष्टकावरून स्पष्ट समजावीं जसें पौष शुक्लप्रतिपदेवर पूर्व दिशेला गमन केलें असतां त्याचें फळ सौख्य; दक्षिणेचें क्लेश; पश्चिमेचें भीति आणि उत्तरेचें अर्थागम ह्मणजे द्रव्यप्राप्ति इ० फळें आहेत हीं पाहून ज्या महिन्यांत ज्या तिथीचें ज्या दिशेला गमनाचें शुभ फळ असेल त्या दिशेला गमन करावें.

सर्वांकज्ञान. (वसंततिलका.)

तिथ्यृक्षवारयुतिरद्रिगजाग्निनष्टा स्थानत्रयेत्र वियतिप्रथमेतिदुःखी ॥
मध्येधनक्षतिरथाचरमेमृतिःस्यात्स्थानत्रयेंकयुजि सौख्यजयौ निरुक्तौ ॥ २४ ॥

अर्थ- यात्रेला जो दिवस योजावयाचा त्या दिवसाची शुक्ल प्रतिपदेपासूनची तिथि नक्षत्र आणि वार ह्या त्या संख्येचा योग करून आलेली संख्या तीन ठिकाणीं मांडावी त्यातील पहिल्या संख्येला ७ नीं दुसरी ला ८ नीं व तिसरी. ३ नीं भागावें. प्रथमस्थानीं शून्य बाकी राहिली तर त्या दिवशीं यात्रा करणारा बहु

दुःख पावतो द्वितीयस्थानीं शून्य असतां धननाश व तृतीयस्थानीं शून्य बाकी असतां यात्राकर्त्याला मरण जाणावे. तीनही स्थानीं अंकच बाकी राहील तर मात्र अशा दिवशीं गमन करणाराला सौख्य व विजय प्राप्त होतात. उदाहरणः–पौषकृष्ण २ बुधवार पुष्यनक्षत्र हा दिवस गमनाला योजिला आहे. तर तिथि १७ वार ४ आणि नक्षत्र ८ ह्याची बेरीज २९ ह्याला प्रथम ७ नीं मग ८, व शेवटीं ३ नीं भागून १।५।२ हे सर्व अंकच बाकी राहिले आहेत ह्मणून हा दिवस प्रयाणीं शुभ आहे जर एकाजागीं शून्य. बाकी राहिली असती तर हाच दिवस अशुभ झाला असतां.

भडल व भ्रमण नामक दोष. (प्रमाणिका.)

रवेर्भतोब्जभोन्मितिर्नगावशेषिताद्यगा ॥ माहाडलोनशस्यतेत्रिषण्मिताभ्रमोभवेत्। २५॥

अर्थ –सूर्य नक्षत्रापासून चंद्राचें नक्षत्र ह्मणजे दिवस नक्षत्र मोजून आलेल्या संख्येला ७ नीं भागावें बाकी २ किंवा ७ राहील तर भडकदोष आहे. आणि ३ अथवा ६ बाकी असतां भ्रमणदोष अवश्य वर्ज्य करावा भडकदोष सुद्धां प्रयाणीं वर्जिला तर चांगलें.

हिंवर नामक योग. (उपजाति.)

शशांकभंसूर्यभतोत्रगण्यंपक्षादितिथ्यादिनवासरेण ॥
युतंनवाप्तंनगशेषकंचेत्स्याद्धिंवरं तद्गमनेतिशस्तम् ॥ २६ ॥

अर्थ–सूर्यनक्षत्रापासून दिवस नक्षत्र मोजावें.आलेल्या संख्येत शुक्लपक्षांत शुक्लप्रतिपदे पासून व कृष्णपक्षांत कृष्णप्रतिपदे पासूनच्या तिथि मिळवाव्या; आणि त्या दिवशींचा वारही मिळवावा मग सर्व संख्येला ९ नीं भागावें बाकी ७ राहील तर हिंवर नांवाचा योग आहे असें जाणावें हा अतिशुभ आहे ह्मणून प्रयाणाला अवश्य घ्यावा.

घातचंद्र. (शालिनी.)

भूपंचांकद्व्यंगदिग्वन्हिसप्तवेदाष्टेशार्काश्चघाताख्यचंद्रः ॥
मेषादीनांराजसेवाविवादेयात्रायुद्धाद्येचनान्यत्रवर्ज्यः ॥ २७ ॥

अर्थ जन्मराशि मेष असेल त्याला पहिला ह्मणजे मेषराशीला असणारा चंद्र घातक होतो. जन्मराशि वृषभ असेल त्याला पांचवा ह्मणजे कन्येचा घातचंद्र मिथुन९ कर्क२ सिंह ६ कन्या,१०तूळ ३ वृश्चिक७धन४ मकर८ कुंभ ११ मीन१२इ० हा घातचंद्र राजसेवेला विवादाला ह्मणजे प्रतिवादीशीं वाद करणें,किंवा विद्येसंबंधी वाद झाला यात्रेला युद्धाला,मृगयेला वर्ज्य करावा याशिवाय अन्नप्राशनादि मंगलकार्यांला वर्ज्य नाहीं.

घातचंद्राचा परिहार. (अनुष्टुप्.)

आग्नेयत्वाष्ट्जलपपित्र्यवासवरौद्रभे॥मूलब्राह्माजपादर्क्षेपित्र्यमूलाजभेक्रमात् ॥ २८ ॥
रूपाब्ध्यग्न्यग्निभूरामब्ध्यग्न्यब्ध्यब्धियुगाग्नयः॥घातचंद्रधिष्ण्यपादामेषाद्वर्ज्यामनीषिभिः २९

अर्थ–मागील श्लोकांत घातचंद्र सांगितला आहे तो त्या त्या राशीला असतां प्रत्येक नक्षत्रें पुढें दिली आहेत त्याच्या चरणांला असेल तेवढा मात्र सोडावा. सर्व राशीचा घातचंद्र सोडूं नये असे असे कितीएकांचें मत आहे जसा मेष राशीला मेषाचा घातचंद्र खरा; परंतु तो अश्विनी व भरणी ह्या दोन नक्षत्राला असतां अशुभ नाहीं कृत्तिकेच्या पहिल्या चरणीं मात्र घातकर होतो. वृषभ राशीला कन्येचा घातचंद्र चित्रा नक्षत्राच्या २ चरणांला असतां घातक होतो इ० जाणावें. कृत्तिका १ चित्रा २. शत ३. मघा ३. धनिष्ठा १ आर्द्रा३ मूल २ रोहिणी ३. पू. भा ४ मघा ४. मूल४ श्रवण ३.इत्यादि

घाततिथि (उपजाति.)

गोस्त्रीझषेघाततिथिस्तुपूर्णाभद्रानृयुक्कर्कटकेथनंदा ॥
कौर्प्याजयोर्नक्रघटेचरिक्ताजयाधनुःकुंभहरौनशस्ताः ॥ ३० ॥

अर्थ–वृषभ; कन्या, मीन ह्या तीन राशि ज्यांच्या आहेत त्यांला पूर्णा ह्मणजे ५।१०।१५ ह्या घाततिथि

होत. मिथुन कर्क ह्या दोहोंच्या भद्रा ह्मणजे २।७।१२ घाततिथि; वृश्चिक, व मेष ह्यांच्या नंदा ह्मणजे १।६। ११घाततिथि; मकर आणि तूळ ह्या दोहोंच्या रिक्ता ह्मणजे ४।९।१४ घाततिथि; आणि धन व सिंह ह्यांच्या जया ह्मणजे ३।८।१३ ह्या घाततिथि जाणाव्या. ह्या यात्रेला शुभ नाहींत.

घातवार. (शालिनी.)

नक्रे भौमो गोहरिस्त्रीषु मंदश्चंद्रो द्वंद्वेऽर्को जमेषेऽथ कर्के ॥
शुक्रः कोदंडालिमीनेषु कुंभ जूके जीवो घातवारा न शस्ताः ॥ ३१ ॥

अर्थ—राशि व त्यापुढें वार दिले आहेत ज्याच्या जन्मराशी पुढें जो वार आहे तो त्याचा घातवार जाणावा. जसा मकर राशीच्या मनुष्याचा मंगळ हा घातवार इत्यादि हे घातवार यात्रेला अशुभ आहेत मकर—मंगळ. वृषभ सिंह, कन्या —शनि. मिथुन—सोम. मेष —रवि कर्क—बुध. धन, वृश्चिक मीन-शुक्र. कुंभ तूळ-गुरु.

घातनक्षत्रें. (अनुष्टुप्)

मघाकरस्वातिमैत्रमूलश्रुत्यंबुपांत्यभम् ॥ याम्यब्राम्हेशसार्पं च मेषादेर्घातभं न सत् ॥ ३२ ॥

अर्थ—मेषादि राशींचीं घातनक्षत्रे पुढील प्रमाणे जाणावीं. हीं यात्रेला अशुभ आहेत. ज्याची जन्मराशि मेष असेल त्याचें मघा घात नक्षत्र इत्यादि. मेष-मघा. वृ-हस्त. मि-स्वाती. कर्क-अनु. सिं-मूळ कन्या-श्रवण.तू-शत. वृश्चि-रेवती. ध--भर. म-रोहि. कुं-आर्द्रा. मी-आश्लेषा.

घातलग्नें. (अनुष्टुप्.)

भूमिद्व्यब्ध्यद्रिदिक्सूर्यांगाष्टांकेशाग्निसायकाः॥मेषादिघातलग्नानि यात्रायां वर्जयेत्सुधीः ३३

अर्थ—खालीं लिहलेलीं त्या त्या राशींचीं घातलग्नें जाणावीं. हीं घातलग्नें यात्रेला वर्ज्य आहेत असें विद्वान् ह्मणतात. जसें मेषराशी ज्याची असेल त्याचें पहिलें ह्मणजे मेष घातलग्न ज्याची जन्मराशि वृषभ, त्याचें वृषभापासून दुसरे ह्मणजे मिथुन घातलग्न मिथुन४ कर्क ७ सिंह १० कन्या १२ तूळ ६ वृश्चिक ८ धन ९ मकर ५ १कुंभ ३ मीन ५ इत्यादि.

योगिनीतिथि.

नवभूम्यः शिववन्हयोऽक्षविश्वेऽर्ककृताः शक्ररसास्तुरंगतिथ्यः ॥
द्विदिशोऽमावसवश्च पूर्वतः स्युस्तिथयः संमुखवामगा न शस्ताः ॥ ३४ ॥

अर्थ—बाजूच्या आकृतींत पूर्वादि आठ दिशाला दोन दोन तिथि आहेत, त्या योगिनी तिथी होत



असें प्राचीनांचें मत आहे गमनकर्त्याला ह्या तिथि संमुख किंवा वामगत असतां अशुभ जाणाव्या. ह्या योगिनीतिथि सव्यभागीं अथवा पृष्ठभागीं प्रयाण कर्त्याला शुभ होत. नवमीला किंवा प्रतिपदेला पूर्वदिशेस जाणाराला ह्या तिथि संमुख होतात; व त्याच तिथींवर दक्षिणेस जाणाराला त्या वामगत होतात ह्मणून नवमीच्या व प्रतिपदेच्या दिवशीं पूर्वेला व दक्षिणेला प्रयाण करूं नये. पश्चिमेला गमन करणें शुभ होय. याप्रमाणेंच सर्व दिशांचा नियम आकृतीवरून बांधावा.

कालयोग आणि पाशयोग. (शालिनी)

कौबेरींतो वैपरीत्येन कालो वारेऽर्काद्ये संमुखे न स्य पाशः ॥
रात्रावेते वैपरीत्येन गण्यौ यात्रायुद्धे संमुखे वर्जनीयौ ॥ ३५ ॥

अर्थ —रविवारादि सातवारीं उत्तरेपासून उलट दिशाला काल फिरत असतो आणि कालदिशेच्या समो॰ रच्या दिशेला निरंतर पाश असतो. जसा रविवारीं उत्तरेला काल, आणि दक्षिणेला पाश असतो. तसाच सोमवारीं वायव्य दिशेला काळ, आणि आग्नेयदिशेला पाश; मंगळवारीं पश्चिमेला काल, व पूर्वेला पाश. याप्रमाणेंच बाकी दिशाला काल व पाश योजावे. हे दिवसाचे झाले. रात्रीस दिवसाच्या उलट काल व पाश असतात ह्मणजे ज्या वारीं दिवसास ज्या दिशेला काल असतो त्या दिशेला रात्रीस पाश येतो, व दिवसास पाश असतो त्या दिशेला रात्रौ काल येतो. जसा रविवारीं रात्रीस उत्तरेला पाश व दक्षिणला काल सोमवारीं रात्रौ वायव्येला पाश व आग्नेयीला काल इ॰ योजावे. व यात्रेला व युद्धाला काल व पाश हे दोनही संमु ख वर्ज्य करावे. हे सव्यभागी आणि वामभागी असावे. त्यांतही उजव्याभागीं काळ आणि डाव्याभागीं पाश असे असतील तर अति शुभ होत.

परिघदंड नामक दोष (अनुष्टुप्)

पूर्वादिषुचतुर्दिक्षुसप्तसप्तानलर्क्षतः ॥ वायव्याग्नेयादिक्संस्थंपारिघंनैवलंघयेत् ॥ ३६ ॥



अर्थ—पूर्व, दक्षिण पश्चिम, उत्तर ह्या चार दिशांला कृत्तिका नक्षत्रापासून सात सात नक्षत्रें मांडून वायव्येकडून आग्नेयीदिशेकडे जाणाऱ्या परिघाचें उलंघन करून प्रयाण कर्यानें जाऊं नये. बाजूच्या आकृतींत प्रत्येक दिशेला सात सात नक्षत्रें आहेत त्यांत ज्या दिशेच्या नक्षत्रांवर गमन करणें असेल त्या दिशेला प्रयाण शुभ जाणावें. जसें कृतिकादि सात नक्षत्रीं पूर्वेलाच जावें. हें अति शुभ होय. याशिवाय पूर्व दिशेच्या नक्षत्रांवर उत्तरेस जाणें, आणि उत्तरेच्या नक्षत्रांवर पूर्वेला जाणें, व दक्षिणेच्या नक्षत्रीं पश्चिमेला जाणें अ॰ सेंही प्रयाण शुभ जाणावें. परंतु पूर्वेच्या उत्तरेच्या नक्षत्रांवर दक्षिणेला किंवा पश्चिमेला; आणि दक्षि॰ णेच्या व पश्चिमेच्या नक्षत्रावर पूर्वेला किंवा उत्त॰ रेला जाणें असें मात्र कधींही शुभ नाहीं. कारण अशा प्रयाणानें परिघाचें उल्लंघन होतें.

विदिशा गमनाचा नियम आणि परिघाचा अपवाद. (वसंततिलक.)

अग्नेर्दिशंनृपइयात्पुरुहूतदिग्भैरेवंमदाक्षिणगताविदिशोथकृत्ये॥
आवश्यकेपिपरिघंपरिलंघ्यगच्छेच्छूलंविहाययदिदिक्तनुशुद्धिरस्ति ॥ ३७ ॥

अर्थ—पूर्वेकडील कृत्तिकादि सात नक्षत्रांवर आग्नेयीला राजानें प्रयाण करावें. आणि या रीतीनें प्रदक्षिण॰ क्रमानें इतर विदिशांलाही गमन शुभ जाणावें, ह्मणजे दक्षिणेच्या मघादि सात नक्षत्रीं नैर्ऋत्यदिशेला, पश्चि॰ मेच्या अनुराधादि सात नक्षत्रीं वायव्य दिशेला आणि उत्तरेच्या धनिष्ठादि सात नक्षत्रांवर ईशान्य दिशे॰ का यात्रा शुभ होय. (मागच्या ३६ व्यां श्लोकातील आकृति पहा.) अवश्य कृत्याकरितां फार अगत्यानें प्रयाण करणें असेल तर परिघाचें उल्लंघन करूनही जावें परंतु मागें सांगितलेल्या वारशूल व नक्षत्रशूल हे सोडून, आणि ज्या दिशेला गमन करावयाचें त्या दिशेचें व ग्रहबल युक्त असें इष्टलग्न असेल तरच परिघ उलंघून प्रयाण करावें अन्यथा अशुभ होय. मेषादि बारा राशि पूर्वादि चार दिशांला अनुक्रमानें सांगित लेल्या आहेत. प्रत्येक दिशेला तीन तीन राशि आहेत त्या खालील प्रमाणें आहेत. पूर्व—मेष, सिंह, धन. दक्षिण—वृषभ, कन्या, मकर. पश्चिम—मिथुन, तूळ, कुंभ. उत्तर—कर्क, वृश्चिक, मीन.

सर्व दिशा गमनाची नक्षत्रें, आणि वक्री ग्रहांचा निर्णय. (इंद्रवज्रा.)

मैत्रार्द्रपुष्याश्विनभैर्निरुक्तायात्राशुभासर्वदिशासुतज्ज्ञैः ॥

वक्रीग्रहःकेंद्रगतोस्यवर्गोलग्नेदिनंवास्यगमेनिषिद्धं ॥ ३८ ॥

अर्थ---अनुराधा,हस्त,पुष्य,अश्विनी हीं चार नक्षत्रें सर्व दिशांच्या प्रयाणाला शुभ आहेत असें ज्योतिः शास्त्रवेत्त्यांनी सांगितलें आहे प्रयाणाच्या इष्टलग्नापासून केंद्रस्थानीं (१।४।७।१०) वक्रीग्रह किंवा इष्टलग्नीं वक्र झालेल्या ग्रहांचा षड्वर्गांतील कोणताही एक वर्ग,अथवा वक्री ग्रहाचा वार हे गमनाला निषिद्ध जाणावें.

अयनशूल. (इंद्रवंशा.)

सौम्यायनेसूर्यविधूतदोत्तरांप्राचींव्रजेत्तौयदिदक्षिणायने ॥
प्रत्यग्यमाशांचतयोर्दिवानिशंभिन्नायनत्वेथवधोन्यथाभवेत् ॥ ३९ ॥

अर्थ---सूर्य व चंद्र ह्या दोहोंचे उत्तरायण असतां उत्तरेला किंवा पूर्वेला जावें. तेच दोघेही दक्षिणायनांत असतां पश्चिमेला अगर दक्षिणेला जावे सूर्य चंद्राचें अयन भिन्न असतां दिवसास व रात्रीस गमन करावें ह्मणचे सूर्याचें उत्तरायण व चंद्राचें दक्षिणायन असेल तेव्हा दिवसास गमन करणे ते उत्तरेला किंवा पूर्वेला करावे. आणि रात्रौ दक्षिणेला किंवा पश्चिमेला करावें. तसेंच सूर्याचें दक्षिणायन, व चंद्राचें उत्तरायण असतां दिवसास पश्चिमेला, अथवा दक्षिणेला; आणि रात्रौ उत्तरेला किंवा पूर्वेला गमन करावें. यः विपरीत गमन कर्त्याचा वध होतो.

संमुख शुक्राचा दोष. (उपजाति.)

तदेतियस्यांदिशियत्रयातिगोलभ्रमाद्वाथकृत्तिभसंघे ॥
त्रिधोच्यतेसंमुखएवशुक्रोयत्रोदितस्तांतुदिशंनयायात् ॥ ४० ॥

अर्थ---संमुखशुक्राचे तीन प्रकार आहेत. शुक्र अस्तंगत झाल्यावर कांहीं दिवसांनीं पूर्वेला अगर पश्चिमेला तो उदय पावतो. ज्या दिशेला त्याचा उदय होतो त्या दिशेकडे जाणाराला तो संमुख होतो हा एक प्रकार होय. उत्तर दक्षिण गोलीं फिरण्यानें ज्या उत्तरेला किंवा दक्षिणेला अयनगतीनें जातो त्या दिशेकडे जाणाराला तो संमुख शुक्राचा दुसरा प्रकार होय. आणि कृत्तिकादि सात सात नक्षत्रें पूर्वादि चार दिशाला क्रमानें आहेत. (यात्राप्र० श्लो० ३६ वी आकृति पहा) त्यांतील ज्या दिशेच्या नक्षत्रांला शुक्र असेल त्या दिशेला प्रयाण करणाराला तो संमुख होतो. हा तिसरा प्रकार जाणावा. ह्या तीन प्रकारांनीं ज्या ज्या दिशेला संमुख शुक्र होत असेल त्या त्या दिशेला गमन करूं नये. त्यातही ज्या दिशेला शुक्र उदय पावलेला दिसत असेल त्या दिशेला तर गमन करूंच नये. तात्पर्य उदित शुक्र ज्या दिशेला दिसेल ती दिशा गमनाला अति दुष्ट आहे.

शुक्राचा वक्रास्तादि दोष व त्याचा अपवाद. (उपजाति.)

वक्रास्तनीचोचगतेभृगोःसुतेराजाव्रजन्यातिवशंहिविद्विषाम् ॥
बुधोनुकूलोयदितत्रसंचलन्प्रेपूनजयंनैवजयःप्रतीदुजे ॥ ४१ ॥

अर्थ---शुक्र वक्र झालेला असतां, अस्तंगत असतां, नीचस्थानीं ह्मणजे कन्या राशीला असतां. तसाच ग्रहयुद्धांत पराभव झालेला असतां, किंवा विवर्ण ह्मणजे तेजरहित असतां प्रयाण करणारा राजा आपल्या शत्रूंच्या आधीन होतो वरील प्रकारें शुक्र असून त्यावेळीं बुध अनुकूल असतांह्मणजे गमनकर्याला पृष्ठगत असतां प्रयाणकर्ता राजा शत्रूला जिंकून आपण विजयी होतो; परंतु बुध संमुख असतां जय होत नाहीं. हा प्रतिशुक्राचा विचार सर्व मनुष्यांच्या प्रथमगमनाला व राजाच्या युद्धार्थ यात्रेला पहावा.

प्रतिशुक्रापवाद व शुक्रास्ती विशेष निर्णय (शालिनी.)

यावचंद्रःपूष्णभात्कृत्तिकाद्येपादेशुक्रोंधोनदुष्टोऽग्रदक्षे ॥
मध्येमार्गेभार्गवास्तेपिराजातावत्तिष्ठेत्संमुखत्वोपितस्य ॥ ४२ ॥

अर्थ---तोंपर्यंत रेवती, अश्विनी, भरणी व कृत्तिकानक्षत्राचा प्रथमपाद मिळून ह्या सवातीन नक्षत्रांला चंद्र असतो तोंपर्यंत शुक्र अंध असतो ह्मणजे तो दिसत असला तरी कांहीं फल देत नाहीं. अशा निष्फळ

शुक्र संमुख. किंवा दक्षिणगत ह्मणजे उजव्या भागीं असला तरी तो दुष्ट नाहीं. सुमुहूर्तावर प्रयाण केले त्या राजानेंही जात असतां मार्गामध्यें शुक्राचें अस्त झालें तर त्याचा उदय होईपर्यंत मुक्काम करावा. नि- घाल्यावर कदाचित शुक्र संमुख झाला तर देखील पुढें जाऊं नये. (गुरूच्या अस्ताचाही शुक्रास्ता- प्रमाणेंच निर्णय जाणावा.)

प्रयाणी निषिद्ध लग्नादि (अनुष्टुप्.)

कुंभकुंभांशकौत्याज्यौसर्वथायत्नतोबुधैः ॥ तत्रप्रयातुर्नृपतेरर्थनाशःपदेपदे ॥ ४३ ॥

अर्थ – कुंभलग्न व मेषादि सर्व लग्नांतील कुंभांश हे प्रयाणाला पंडितानीं सर्वथा वर्ज्य करावे. कारण त्यावर प्रयाण करणाऱ्या राजाचा पदोपदीं नाश होतो

अनिष्ट लग्न व शुभ लग्नें. (मंजुभाषिणी.)

अथमीनलग्नउतवातदंशकेचलितस्यवक्रमिहवर्त्मजायते ॥

जनिलग्नजन्मभपतीशुभग्रहौभवतस्तदातदुदयेशुभोगमः ॥ ४४ ॥

अर्थ—मीनलग्न, किंवा मेषादि लग्नांतील मीनांश यांवर गमन कर्त्याचा मार्ग वक्र होतो, अर्थात् मीनलग्न व मीनांश हे गमनी अनिष्ट जाणावें. प्रयाण कर्त्याचें जन्मलग्न, आणि जन्मराशि यांचे स्वामी शुभ ग्रह असून ते प्रयाणाच्या इष्टलग्नीं असतील तर त्यांच्या लग्नावर ह्मणजे गमन कर्त्याचें जन्मलग्न किंवा जन्मराशि यांतून कोणतेंही एक इष्टलग्न योजून त्यावर गमन करणें शुभ जाणावें. जन्मलग्नें किंवा जन्मराशि हेंच यात्रेचें इष्टलग्न असणें शुभ आहे असें जरी मागें सांगितलें आहे तरी त्यांचे स्वामी खल- ग्रह असून ते त्या इष्टलग्नीं असतील तर तें लग्न प्रयाणाला अनिष्ट होय.

गमनाची अनिष्ट लग्नें. (रथोद्धता.)

जन्मराशितनुतोष्टमेथवाखारिभाचरिपुभेतनुस्थिते ॥

लग्नगास्तदधिपायदाथवास्युर्गतस्तदिनृपतेर्मृतिप्रदम् ॥ ४५ ॥

अर्थ — प्रयाणेच्छु राजाच्या जन्मलग्नापासून व जन्मराशीपासून जीं अष्टमलग्नें अथवा शत्रूच्या जन्मरा- शीपासून आणि जन्मलग्नापासून जीं षष्ठलग्नें तीं प्रयाणाची इष्टलग्नें असतां किंवा त्या अष्टम लग्नाचें स्वामी अगर षष्ठलग्नाचे स्वामी इष्टलग्नीं असतां तशा लग्नावर केलेलें गमन राजाला मृत्युप्रद होतें.

प्रयाणाचें शुभ लग्न. (शालिनी.)

लग्नेचंद्रेवापिवर्गोत्तमस्थेयात्राप्रोक्तावांछितार्थैकदत्री ॥

अंभोराशौवातदंशेप्रशस्तंनौकायानंसर्वसिद्धिप्रदायि ॥ ४६ ॥

अर्थ—मीन आणि कुंभ ह्या दोहोंवाचून कोणत्याही लग्नाचा इष्टनवांश वर्गोत्तम असतां अथवा वर्गोत्तम अंशीं चंद्र असतां केलेलें प्रयाणसर्व मनोरथ पूर्ण करणारें होतें. जलराशि लग्नीं किंवा कोणत्याही लग्नांतील जलराशीच्या नवांशीं नौकागमन सर्व सिद्धि करितें ह्मणूनप्रशस्त होय.

दिशा परत्वें शुभाशुभ लग्नें. (इंद्रवज्रा.)

दिग्द्वारभेलग्नगतेप्रशस्तायात्रार्थदात्रीजयकारिणीच ॥

हानिंविनाशंरिपुतोभयंचकुर्यात्तथानिर्गमतिर्लोमलग्ने ॥ ४७ ॥

अर्थ—ज्या दिशेला गमन करावयाचें त्या दिशेच्या लग्नावर प्रयाण केले असतां तें सफळ होते ह्मणजे द्रव्यलाभ व विजय प्राप्ति होतो (यात्रा प्र० श्लो० ३७ दिशांच्या राशि पहा) ज्या दिशेचें जें लग्न असेल त्यावर समूरच्या दिशेला गमन केलें असतां द्रव्यहानि, नाश व शत्रुभीति होतें. जसें मेषलग्नावर पूर्वदि- शेला प्रयाण शुभ, आणि पश्चिमेला अशुभ होय. तसेंच वृषभलग्नीं दक्षिणेला शुभ व उत्तरेला अशुभ इ०.

शुभलग्नें (वसंततिलक.)

राशिःस्वजन्मसमयेशुभसंयुतोयोयःस्वारिभाद्धिनगोपिचवेशिसंज्ञः ॥

लग्नोपगःसगगनेजयदोथभूपयोगैर्गमोविजयदोमुनिभिःप्रदिष्टः ॥ ४८ ॥

अर्थ—यात्राकर्त्याच्या जन्मकाळीं ज्या राशीला चंद्र, बुध, गुरु व शुक्र हे शुभग्रह असतील त्या लग्नावर, किंवा शत्रूच्या जन्मलग्नापासून व जन्मराशीपासून जीं अष्टमलग्नें त्यावर अथवा वेशिसंज्ञक लग्नावर (ह्मणजे प्रयाण कर्त्याच्या जन्मसमयीं ज्या राशीला रवि असेल ती पासून दुसऱ्या लग्नावर) अथवा जातकांत सांगितलेल्या राजयोगांनीं युक्त लग्नावर राजानें प्रयाण केले असतां त्याचा जय होतो असें मुनि श्रेष्ठ ह्मणतात. (बृहज्जातक, सारावली, टोडरानंद इत्यादि जातक ग्रंथांत राजयोग आहेत.

दिशास्वामी (उपजाति.)

सूर्यःसितोभूमिसुतोथराहुःशनिःशशीज्ञश्चबृहस्पतिश्च ॥

प्राच्यादितोदिक्षुविदिक्षुचापिदिशामधीशाःक्रमशःप्रदिष्टाः ॥ ४९ ॥

अर्थ—पुढील पूर्वादि आठ राशींचे स्वामी जाणावें सूर्य-पूर्वदिशेचा. शुक्र-आग्नेयेचा; मंगळ-दक्षिणेचा राहु-नैर्ऋत्येचा. शनि-पश्चिमेचा. चंद्र-वायव्येचा. बुध-उत्तरेचा. गुरु-ईशान्येचा याप्रमाणें स्वामी जाणावें.

दिशा स्वामीचा उपयोग. (तनुमध्या.)

केंद्रेदिगधीशेगच्छेदवनीशः ॥ लालाटिनितस्मिन्नेयादरिसेनाम् ॥ ९० ॥

अर्थ—मागच्या श्लोकांत सर्व दिशांचे स्वामी आहेत. ते प्रयाणाच्या इष्टलग्नापासून केंद्रस्थानीं असतां राजानें गमन करावें. परंतु ते लालाटिक असतां शत्रूच्या सैन्यावर जाऊं नये, ह्मणजे प्रयाण करूं नये.

लालाटिक योग (शार्दुलविक्रीडित.)

प्राच्यादौतरणिस्तनौभृगुसुतोलाभव्ययेभूसुतःकर्मस्थोथतमोनवाष्टमगृहेसौरिस्तथासप्तमे ॥ चंद्रःशत्रुगृहात्मजेपिचबुधःपातालगोगीष्पतिःवित्तभ्रातृगृहेविलग्नसदनाल्लालाटिकाःकीर्तिताः ॥ ९१ ॥

अर्थ—पुढील कोष्टकावरून ग्रहाचे लालाटिकयोग समजावे. पूर्व दिशेला गमन करणारला प्रयाणलग्नीं रवि असतां तो लालाटिक होतो आग्नेयीला जाणाराला प्रयाणलग्नापासून १२।२१ ह्या दोन स्थानीं शुक्र असतां तो लालाटिक होतो इत्यादि. लालाटिक स्थानावांचून केंद्रस्थानीं अभीष्टदिशेचा स्वामी असतां प्रयाण करावें हें तात्पर्य.

लालाटिक योग कोष्टक.

रवि.	शुक्र.	मंगळ.	राहु	शनि.	चंद्र.	बुध.	गुरु.
पूर्व १	आग्नेयी. १२।११	दक्षिण १०	नैर्ऋती ९।८	पश्चिम. ७	वायवी. ६।५	उत्तर. ४	ईशानी ३।२

पर्युषित यात्रेचे चार योग. (अनुष्टुप् १. इंद्रवज्रा १.)

मृगेत्वाशिवेस्थित्वादितौगच्छञ्जयेद्रिपून् ॥ मैत्रेप्रस्थायशाक्रेहिस्थित्वामूलेव्रजंस्तथा ॥ ९२ ॥ प्रस्थायहस्तेनिलतक्षधिष्ण्येस्थित्वाजयार्थीप्रव्रजेद्द्विदैवे ॥ वस्वंत्यपुष्येनिजसीम्नि चैकरात्रोषितःक्ष्मांलभतेवनीशः ॥ ९३ ॥

अर्थ—मृगनक्षत्रावर आपल्या घरांतून निघून आर्द्रानक्षत्रीं आपल्या इष्टमित्राच्या घरीं राहून पुनर्वसु नक्षत्रांवर मित्राचें घर सोडून देशांतरीं जाणारा राजा आपल्या शत्रूचा पराभव करितो. हा एक योग होय. याप्रमाणेंच अनुराधानक्षत्रीं निघून ज्येष्ठांवर गांवांतच कोठें राहून मूळनक्षत्रीं देशांतर करणारा राजा विजयी होतो. हा दुसरा योग, हस्तावर निघून स्वाती व चित्रा ह्या दोन नक्षत्रीं राहून विशाखेवर विजयेच्छु राजानें प्रयाण करावें. हा तिसरा योग जाणावा आणि धनिष्ठा, रेवती, किंवा पुष्य ह्या नक्षत्रांवर निघून

आपल्या नगराच्या सीमेवर एकरात्र राहून नंतर अन्य देशीं प्रयाण करणारा राजा शत्रूचें राष्ट्र पादाक्रांत करून विजयी होतो. हा पर्युषित यात्रेचा चवथा योग होय. हे चारही शुभ आहेत.

समय बल. (अनुष्टुप्)

उपःकालोविनापूर्वांगोधूलिःपश्चिमांविना ॥
विनोत्तरांनिशीथःसन्यानेयाम्यांविनाभिजित् ॥ ५४ ॥

अर्थ--पूर्वदिशेवांचून बाकी सर्व दिशांस प्रयाण करण्याला प्रति दिवशीं उपःकाल ह्मणजे सूर्योदयकाल शुभ जाणावा. तसाच पश्चिमेवांचून सर्व दिशास गमनाला गोधूलिकाल शुभ होय. उत्तरेवांचून निशीथकाल ह्मणजे मध्यरात्रीची वेळा, आणि दक्षिणेवांचून अभिजिताचा काल सर्व दिशांच्या प्रयाणाला प्रतिदिवशीं शुभ असतो. प्रत्येक दिवशीं मध्यान्हकाळीं अभिजित् नक्षत्र असतें.

लग्नादि भावांच्या संज्ञा. (अनुष्टुप्)

लग्नाद्भावाःक्रमाद्देहकोशधानुष्कवाहनम् ॥ मंत्रोरिमार्गआयुश्चहृद्व्यापारागमव्ययाः॥५५॥

अर्थ--१ देह, २ कोश, (द्रव्यसंचय) ३ धानुष्क (शस्त्रधारीसैन्य), ४ वाहन, ५ मंत्र (मसलत), ६ शत्रु, ७ मार्ग, ८ आयुष्य, ९ मन, १० व्यापार, ११ आगम (प्राप्ती) १२ व्यय ह्या प्रयाणाच्या इष्ट लग्नादि बारा स्थानांच्या संज्ञा आहेत. जो भाव खलग्रह युक्त असेल त्यापासून पीडा होते. आणि शुभग्रह युक्त भावापासून शुभ होतें. जसें प्रयाणलग्नीं खलग्रह असतां प्रयाण कर्त्याच्या देहाला पीडा व शुभग्रह असतां सुख. द्वितीयभावीं खळग्रह असल्यानें कोशनाश व शुभग्रह असतां कोशवृद्धि इत्यादि.

ग्रहांची विशेष फळें. (शालिनी.)

केंद्रेकोणेसौम्यखेटाःशुभाःस्युर्यानेपापास्त्र्यायषट्खेषुचंद्रः ॥
नेष्टोलग्नांत्यारिरंध्रेशनिःखेऽस्तेशुक्रोलग्नेट्नगांत्यारिरंध्रे ॥ ५६ ॥

अर्थ--इष्टलग्नापासून केंद्रीं (१।४।७।१०) आणि कोणीं (९।५) शुभग्रह प्रयाणाला इष्ट जाणावें. तसेंच पापग्रह ३।११।६।१० ह्या स्थानी इष्ट होत. चंद्र १।१२।६।८ ह्या स्थानीं, शनि दशमस्थानीं, शुक्र सप्तमस्थानीं, आणि प्रयाणलग्नाचा स्वामी ७।१२।६।८ ह्या स्थानीं अनिष्ट कारक होय.

योगयात्रा प्रयोजन. (पादाकुलक.)

योगात्सिद्धिर्धरणिपतीनामृक्षगुणैरपिभूदेवानाम् ॥
चौराणामपिशकुनैरुक्ताभवतिमुहूर्तादपिमनुजानाम् ॥ ५७ ॥

अर्थ-पुढें लग्नाचे ग्रहयोग आहेत त्या योगांनीं युक्त लग्नावर प्रयाण केल्यानें राजाची यात्रा सिद्धीला पावतें. तिथी वार इ० दुष्ट असतांही केवळ लग्नबळानेंच राजाचे मनोरथ पूर्ण होतात. नक्षत्रगुणांनीं ह्म० चंद्रबल, ताराबल व यात्रोक्त शुभ नक्षत्र आणि साधारण पंचांगशुद्धि ह्यांनीं ब्राह्मणाची यात्रा सफल होते. पुढें शकून सांगितले आहेत त्या शुभ शकूनांनींच चोराच्या गमनाची कार्यसिद्धी होते. याशिवाय इतर सर्व मनुष्यांच्या यात्रेची सिद्धी यात्रोक्त मुहूर्तांनींच होते. (या ठिकाणीं विवाह प्र० श्लो० ५२।५३ ह्यांतील मुहूर्त पहावें.)

यात्रायोग (मंजुभाषिणी.)

सहजेरविर्दशमभेशशीतथाशनिमंगलौरिपुगृहेसितःसुते ॥
हिबुकेबुधोगुरुरपीहलग्नगःसजयत्यरीन्प्रचलितोऽचिरान्नृपः ॥ ५८ ॥

अर्थ--इष्टलग्नापासून तृतीय रवि, दशम चंद्र, षष्ठस्थानीं शनि व मंगळ, पंचम शुक्र, चतुर्थ बुध आणि लग्नी गुरु असा ज्या लग्नाला ग्रहयोग असेल त्यावर प्रयाण करणारा राजा शत्रूंला त्वरित जिंकितो.

लग्नयोग (गाथा.)

भ्रातरिसौरिर्भूमिसुतौवैरिणिलग्नेदेवगुरुः ॥ आयगतेर्केशत्रूञ्जयश्चेदनुकूलोदैत्यगुरुः ।५९।

अर्थ--तृतीय शनि, षष्ठ मंगळ लग्नीं गुरु, एकादश रवि ह्याग्रहयोग प्रयाण लग्नाला असून शुक्र अनुकूल ह्मणजे पृष्ठभागीं असेल तर गमनकर्ता राजा शत्रूला पराजीत करितो.

लग्नयोग. (गाथा.)

तनौजीवइंदुर्मृतौवैरिगोर्कः ॥ प्रयातोमहींद्रोजयत्येवशत्रून् ॥ ६० ॥

अर्थ--इष्टलग्नीं गुरु. अष्टम चंद्र, षष्ठ रवि अशा योगावर निघणारा राजा शत्रूला जिंकितो.

लग्नयोग. (पंक्ति)

लग्नगतःस्याद्देवपुरोधाः ॥ लाभधनस्थैःशेषनभोगैः ॥ ६१ ॥

अर्थ--इष्टलग्नीं गुरु, आणि एकादशस्थानीं व द्वितीयस्थानीं इतर सर्व ग्रह ह्या योगावर प्रयाणकर्ता राजा विजयी होतो.

विशेषलग्नयोग. (मत्ता.)

द्यूनेचंद्रेसमुदयगेर्केजीवेशुक्रेविदिधनसंस्थेईदृग्योगेचलतिनरेशोजेताशत्रूनूगरुडवाहीन् ६२

अर्थ--सप्तमचंद्र; इष्टलग्नीं सूर्य; आणि गुरु. शुक्र, बुध हे तीन ग्रह द्वितीयस्थानीं असतील अशा योगावर गमनकर्ता राजा, सर्पाला जसा गरुड तसा आपल्या शत्रूला जिंकील.

लग्नयोग. (चित्रपदा.)

वित्तगतःशशिपुत्रोभ्रातरिवासरनाथः ॥ लग्नगतेभृगुपुत्रेस्युःशलभाइवसर्वे ॥ ६३ ॥

अर्थ--द्वितीयस्थानीं बुध. तृतीयस्थानीं रवि, आणि लग्नगत शुक्र अशा योगावर गमन कर्त्या राजा. पुढें त्याचे सर्व शत्रु शलभांसारखे (टोळासारखे) होतात, ह्मणजे टोळ जसे आपण होऊन अग्नींत उडी टाकून मरण पावतात, त्याप्रमाणें वरच्या योगावर निघालेल्या राजाच्या प्रतापरूपअग्नींत त्याचे शत्रूरूपी टोळ स्वतःउड्या टाकून मरण पावतात.

लग्नयोग (गाथा.)

उदयेरविर्यदिसौरिरिरिगःशशीदशमेपि ॥ वसुधापतिर्यदियातिरिपुत्राहिनीवशमेति ६४

अर्थ लग्नीं रवि, शष्ठ शनि; दशम चंद्र अशा योगानें युक्त लग्नावर जो राजा प्रयाण करितो त्याच्या स्वाधीन शत्रुसेना होते.

यात्रायोगद्वय. (जलोद्धतगति.)

तनौशनिकुजौरविर्दशमभेबुधोभृगुसुतोपिलाभदशमे ॥

त्रिलाभरिपुभेषुभूसुतशनीगुरुज्ञभृगुजास्तथाबलयुताः ॥ ६५ ॥

अर्थ--लग्नीं शनि, व संगळ असणें; दशमस्थानीं रवि असणें बुध, व शुक्र एकादशस्थानीं किंवा दशमस्थानीं असणें हा एक शुभयोग आहे. तसाच ३।११।६ ह्यांतून कोणत्याही स्थानीं मंगळ, व शनि असणें; आणि गुरु बुध, व शुक्र हे बारा स्थानां पैकीं उग्रा कोणत्या स्थानीं असतील त्या ठिकाणीं ते बलवान् असणें हा दुसरा योग आहे ह्या दोन योगांवर गमनकर्ता राजा विजयी होतो.

लग्नयोग. (त्वरितगति.)

समुदयगेत्रिदशगुरौमदनगतेहिमकिरणे॥हिबुकगतौबुधभृगुजौसहजगताःखलखचराः॥६६॥

अर्थ--लग्नीं गुरु; सप्तमस्थानीं चंद्र; चतुर्थस्थानीं बुध आणि शुक्र व तृतीयस्थानीं खलग्रह असतील अशा योगावर प्रयाण विजयकारक जाणावें.

लग्नयोग. (सुमुखी)

त्रिदशगुरुस्तनुगोमदनेहिमकिरणोरविरायगतः ॥

सितशशिजावपिकर्मगतौरविसुतभूमिसुतौसहजे ॥ ६७ ॥

अर्थ--लग्नीं गुरु, सप्तमस्थानीं चंद्र, एकादश रवि; दशमस्थ शुक्र व बुध, आणि शनि व मंगळ तृतीयस्थानीं असतील असा योग साधून प्रयाण करणारा राजा विजयी होतो.

लग्नयोग. (अनुकूला.)

देवगुरौवाशशिनितनुस्थेवासरनाथेरिपुभवनस्थे ॥
पंचमगेहेहिमकरपुत्रःकर्मणिसौरिःसुहृदिसितश्च ॥ ६८ ॥

अर्थ—लग्नीं गुरु किंवा चंद्र षष्ठस्थानीं रवि; पंचमस्थानीं बुध; दशम शनि; आणि चतुर्थ स्थानगत शुक्र; असा योग राजाच्या प्रयाणाला असतां तो जय पावतो.

लग्नयोग. (मंदाकिनी.)

हिमकिरणसुतोबलीचेत्तनौत्रिदशपतिगुरुर्हिकेंद्रस्थितः ॥
व्ययगृहसहजारिधर्मस्थितोयदिभवतिनिर्बलःचंद्रमाः ॥ ६९ ॥

अर्थ—लग्नीं बलवान् बुध; केंद्रस्थानीं (१।४।७।१०) गुरु आणि १२।११।३।६।९ ह्यांतील कोणत्यातरी एकास्थानीं चंद्र असून तो निर्बल असेल तर प्रयाणकर्ता राजा विजयी होतो.

लग्नयोग. (अभिनवतामरस.)

अशुभखगैरनवाष्टमदस्थैर्हिबुकसहोदरलाभगृहस्थः ॥
कविरिहकेंद्रगगीष्पतिदृष्टोवसुचयलाभकरःखलुयोगः ॥ ७० ॥

अर्थ—इष्टलग्नासून ९।८।७ ह्या तीन स्थानांवांचून बाकी कोणत्याही स्थानीं खलग्रह असतां; आणि ४।३।११ यांतून कोणी एकस्थानीं शुक्र असून त्यावर केंद्रस्थानीं असणाऱ्या गुरूची दृष्टि असतां घडणारा जो यात्रायोग हा धनाची समृद्धि करणारा आहे.

लग्नयोग. (प्रमिताक्षरा.)

रिपुलाभकर्महिबुकेशशिजेपरिवीक्षितेशुभनभोगमनैः
व्ययलग्नमन्मथगृहेषुजयःपरिवर्जितेष्वशुभनामचरैः ॥ ७१ ॥

अर्थ—लग्नापासून ६।३।११।१०।४ ह्यांतील कोणत्यातरी एकस्थानीं चंद्र असून त्यावर शुभग्रहांची दृष्टि असेल आणि १२।१।७ ह्या तीन स्थानाशिवाय इतर स्थानीं खलग्रह असतील अशा योगावर जाणाराचा जय होतो.

दोनलग्नयोग. (मणिमाला.)

लग्नेयदिजीवःपापायदिलाभेकर्मण्यपिचेद्राज्याधिगमःस्यात् ॥
द्यूनेबुधशुक्रौचंद्रोहिबुकेवातद्वत्फलमुक्तंसर्वैर्मुनिवर्यैः ॥ ७२ ॥

अर्थ—जर लग्नीं गुरु असेल; आणि खलग्रह एकादशस्थानीं व दशमस्थानीं असतील तर प्रयाणकर्त्याला शत्रूचें राज्य प्राप्त होतें अथवा सप्तमस्थानीं बुध व शुक्र; आणि चतुर्थस्थानीं चंद्र; ह्या योगावरही सर्व ऋषिश्रेष्ठांनीं तसेंच ह्मणजे राज्यप्राप्ति होणें हें फल सांगितलें आहे.

तीनलग्नयोग (चंद्रिका)

रिपुतनुनिधनेशुक्रजीवेंदवोह्यथबुधभृगुजौतुर्यगेहस्थितौ ॥
मदनभवनगश्चंद्रमावांबुगःशशिसुतभृगुजांतर्गतश्चंद्रमाः ॥ ७३ ॥

अर्थ—षष्ठस्थानीं शुक्र; लग्नीं गुरु, व अष्टमस्थानीं चंद्र हा एक योग होय. चतुर्थस्थानीं बुध व शुक्र आणि सप्तमस्थानीं चंद्र हा दुसरा योग जाणावा. अथवा एक चंद्रच चतुर्थस्थानीं असून तो बुध व शुक्र यांच्यामध्यें असेल ह्मणजे यात्रेच्या इष्टलग्नापासून चतुर्थराशीला चंद्र, बुध व शुक्र हे तीन ग्रह असून त्यांचें त्या राशीचे अधिकउणे अंश भोगून झाले असल्या मुळें बुधशुक्रांच्या मध्यें चंद्र असेल तर तो तिसरा योग होय ह्या तिहींतून कोणत्याही एका योगावर प्रयाणकर्ता विजयी होतो. तृतीययोगाचें उदाहरणः-प्रयाणाचे इष्टलग्न सिंह असतां त्यापासून चतुर्थ राशी वृश्चिक, हिचे४अंश २८ कला भोगलेला शुक्र आहे.

त्यापुढें १३ अंश ५२ कळा चंद्र आहे व शेवटीं २४ अंश २७ कळा बुध आहे ह्मणून चंद्र हा बुधशुक्राच्या मध्यें आला. इ०

लग्नयोगद्वय. (कलहंस.)

सीतजीवभौमबुधभानुतनूजास्तलुमन्मथारिहिबुकत्रिगृहेचेत् ॥
क्रमतोरिसोदरखशात्रवहोराहिबुकायगैर्गुरुदिनेखिलखटैः ॥ ७४ ॥

अर्थ—लग्नीं शुक्र. सप्तम गुरु; षष्ठ मंगळ. चतुर्थ बुध. व तृतीय शनि ह्या योगावर प्रयाणकर्ता विजयी होतो. हा एक योग झाला. दुसरा असा कीं, गुरवारी ६।३।१०।६।१।४।११ ह्या सात स्थानीं क्रमानें सूर्यादि सात ग्रह असतील ह्म० षष्ट रवि, तृतीय चंद्र, दशम मंगळ, षष्ठ बुध, लग्नीं गुरु. चतुर्थ शुक्र, व एकादशस्थानीं शनि असे ग्रह गुरवारीं मिळत असतील तर त्यावरील प्रयाण विजय करितें.

यात्रालग्नाचे दोन योग (मंजुभाषिणी.)

सहजेकुजोनिधनगश्चभार्गवोमदनेबुधोरविररौतनौगुरुः ॥
अथचेत्सुरीज्यसितभानवोजलत्रिगताहिसौरिरुधिरौरिपुस्थितौ ॥ ७५ ॥

अर्थ—तृतीय मंगळ, अष्टम शुक्र, सप्तम बुध, षष्ठ सूर्य, आणि लग्नीं गुरु अशा ग्रहयोगानें युक्त लग्नावर प्रयाणकर्ता राजा विजयी होतो. गुरु, शुक्र, सूर्य हे तीन ग्रह, चतुर्थस्थानीं किंवा तृतीयस्थानीं असतील, आणि शनि व मंगळ हे दोन षष्ठस्थानीं असतील तर तो योग राजाला विजयदायकच होय.

योग, अधियोग व योगाधियोग. (शार्दूलविक्रीडित.)

एकोज्ञेज्यसितेषुपंचमतपःकेंद्रेषुयोगस्तथाद्वौचेत्स्वधियोगएषुसकलायोगाधियोगःस्मृतः ॥ योगेक्षेममथाधियोगगमनेक्षेमं रिपूणांवधंचाथाक्षेमयशोवनीश्च लभतेयोगाधियोगेव्रजन् ॥ ७६ ॥

अर्थ—प्रयाणाच्या इष्टलग्नापासून ५।९।१।४।७।१० ह्या सहा स्थानापैकीं कोणत्याही एका स्थानीं बुध, गुरु, किंवा शुक्र यांतील कोणी एक ग्रह असतां योग होतो. त्याच सहा स्थानीं ह्म० केंद्रीं व कोणीं. त्याच बुधगुरुशुक्रांतील कोणतेही दोन ग्रह असतां अधियोग होतो. आणि त्या स्थानीं ते तीनही ग्रह असतील तर योगाधियोग होतो. योगावर प्रयाण करणारा सुखरूपपणें परत येतो, अधियोगावर गमन करणारा राजा आपण सुखी राहून शत्रूला मारितो, आणि योगाधियोगावर प्रयाणकर्ता कल्याण, यश व पृथिवी यांचा लाभ करून घेतो याप्रमाणें ह्या तीन योगांचीं फळें क्रमानें अधिक अधिक शुभ आहेत. (सहा स्थानें व तीन ग्रह ह्यांच्या संयोगानें होणारे असे वरील तीन योग आहेत त्या सहा स्थानीं बुध असणें, गुरु असणें, किंवा शुक्र असणें अशा रीतीनें पहिल्या योगाचे तिहींच्या सहापट ह्म० १८ प्रकार होतात. बुधगुरु, गुरुशुक्र, किंवा बुधशुक्र असे दोन ग्रह एकत्र व वेगळे सहा स्थानीं असल्यानें अधियोगाचे भेद १०८ होतात. योगाधियोगाचे भेद तर फारच होतात. ते गणितज्ञांनीं बीजगणितांतील पाक्षिकविपर्यय नांवाच्या गणितरीतीनें जाणावें.

विजयादशमीचा सिद्ध मुहूर्त. (तोटक.)

इषमासिसितादशमीविजयाशुभकर्मसुसिद्धिकरीकथिता ॥
श्रवणर्क्षयुतासुतरांशुभदानृपतेस्तुगमेजयसंधिकरी ॥ ७७ ॥

अर्थ—अश्विनमासांतील शुक्लपक्षाची दशमी (दसरा) ही तिथि शुभकर्माची सिद्धि करून देणारी आहे. ती श्रवण नक्षत्रानें युक्त असतां अति शुभ होय. ह्या तिथीवर राजानें प्रयाण केलें असतां जय किंवा संधि ह्मणजे तह करणारी आहे परंतु पराजय कधीं होणार नाहीं.

प्रयाणीं चित्तशुद्धीची अवश्यकता. (वसंततिलक.)

चेतोनिमित्तशकुनैरतिसुप्रशस्तैर्ज्ञात्वाविलग्नबलमुर्व्यधिपःप्रयाति ॥
सिद्धिर्भवेदथपुनःशकुनादितोपिचेतोविशुद्धिरधिकानचतांविनेयात् ॥ ७८ ॥

अर्थ—प्रयाणाविषयीं उत्सुक व प्रशस्त असें मन असतां, व अंगस्फुरणादि शुभ निमित्तें होत असतां, तसेंच शकुन शुभ होत असतां, आणि मागें सांगितलेल्या योगांनीं युक्त अशा बलवान् लग्नावर राजा प्रयाण करील तर त्याची कार्यसिद्धि होईल. शकुन व निमित्तें यांहूनही गमनाविषयीं मनाची उत्सुकता ही अधिक आहे. याकरितां ती असल्यावांचून जाऊं नये.

अवश्य निषिद्ध निमित्तें. (वसंतमालिका.)

व्रतबंधनदेवताप्रतिष्ठाकरपीडोत्सवसूतकासमाप्तौ ॥
नकदापिचलेदकालविद्युद्घनवर्षातुहिनेपिसप्तरात्रम् ॥ ७९ ॥

अर्थ—उपनयन, देवप्रतिष्ठा, विवाह, होलिकादिउत्सव, जननसूतक, आणि मरण सूतक ह्यांची समाप्ति झाल्यावाचून कधींही प्रयाण करूं नये. तसेंच अकाळीं ह्मणजे पौषादि चार मासांत वीजपडणें, मेघगर्जना होणें, पाऊस पडणें व धुकें उत्पन्न होणें हीं अशुभें झालीं असतां त्यांपासून सात दिवसपर्यंत प्रयाण करणें शुभ नाहीं.

एक दिवसाच्या यात्रेचा विशेष नियम. (वंशस्थविर.)

महीपतेरेकदिनेपुरात्पुरेयदाभवेतांगमनप्रवेशकौ ॥
भवारशूलप्रतिशुक्रयोगिनीर्विचारयेन्नैवकदापिपंडितः ॥ ८० ॥

अर्थ—राजाचा एकादिवसांत आपल्या नगरांतून निघून दुसऱ्या नगरीं प्रवेश होईल अशा जवळच्या यात्रेच्या मुहूर्ताला नक्षत्रशूल वारशूल प्रतिशुक्र व योगिनी ह्यांचा विचार पंडितानें कधींही करूं नये. अशा मुहूर्तांची सामान्य पंचांगशुद्धीनेंच योजना करावी.

एकदिन यात्रेचा मुहूर्तविचार. (आर्या.)

यद्येकस्मिन्दिवसेमहीपतेर्निर्गमप्रवेशौस्तः ॥
तर्हिविचार्यःसुधियाप्रवेशकालोनयात्रिकस्तत्र ॥ ८१ ॥

अर्थ—मागील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें राजाचें प्रयाण व प्रवेश एका दिवसांत होणार असतील तर त्या यात्रेच्या प्रयाणाला मुहूर्त न पाहतां प्रवेशाला पहावा.

प्रयाणीं नवमतिथिवार नक्षत्रांचा निषेध. (अनुष्टुप्.)

प्रवेशान्निर्गमंतस्मात्प्रवेशंनवमेतिथौ ॥ नक्षत्रेचतथावारेनैवकुर्यात्कदाचन ॥ ८२ ॥

अर्थ—यात्रा करून आल्यावर गृहप्रवेश केल्यानंतर फिरून प्रयाण करणें, किंवा प्रयाणानंतर प्रवेश करणें तें, प्रवेशापासून व प्रयाणापासून नवव्या तिथीवर, नवव्या नक्षत्रावर, तसेंच नवव्या वारावर कधींही करूं नये.

प्रयाणदिवसाचा विधि (शालिनी.)

अग्निंहुत्वादेवतांपूजयित्वानत्वाविप्रानर्चयित्वादिगीशम् ॥
दत्वादानंब्राह्मणेभ्योदिगीशंध्यात्वाचित्तेभूमिपालोधिगच्छेत् ॥ ८३ ॥

अर्थ—अग्नीला हवनानें संतुष्ट करून, आपल्या अभीष्ट देवतेची पूजा करून, ब्राह्मणांला नमस्कार करून, गमनदिशेच्या स्वामीची पूजा करून, ब्राह्मणांला यथाशक्ति दान देऊन, प्रयाणदिशेच्या स्वामीचें ध्यान करित राजानें गमन करावें.

नक्षत्रदोहद (शार्दूलविक्रीडित.)

कुल्माषांस्तिलतंडुलानपितथामाषांश्चगव्यंदधित्वाज्यंदुग्धमथैणमांसमपरंतस्यै
वरक्तंतथा ॥तद्वत्पायसमेवचाषपललंमार्गंचशाशंतथाषाष्टिक्यंचप्रियंगवपूपमथ
वाचित्रांडजानसत्फलं ॥ ८४ ॥ कौर्मंसारिकमौधिकंचपललंशाल्यंहविष्यंहया
द्दत्स्यात्कृसरान्नमुद्गमपिवापिष्टंयवानांतथा ॥ मत्स्यान्नंखलुचित्रितान्नमथवा

द्ध्यन्नमेवंक्रमात्भक्ष्याभक्ष्यमिदंविचार्यमतिमान्भक्षेत्तथालोकयेत् ॥ ८५ ॥

अर्थ--खालच्या सर्व नक्षत्रांपुढें जे जे पदार्थ लिहिले आहेत ते ते त्या नक्षत्रांच्या दोहदाचे आहेत. ज्या नक्षत्रावर प्रयाण करावयाचें असेल त्याचा दोहदपदार्थ भक्षण करून किंवा निघतेवेळीं पाहून अथवा स्पर्श करून गमन करावें. गमनकर्त्यानें स्वजातिपरत्वें व देशपरत्वें त्या पदार्थाच्या भक्ष्याभक्ष्याचा विचार करावा. नक्षत्रवारादिक अशुभ असतां त्यांच्या दोहदपदार्थांचें भक्षण केल्यानें त्यांचें अशुभत्व नाश पावेल. नक्षत्रें व त्यांचे दोहदपदार्थ अश्विनी-घुगऱ्या. भरणी-तिलमिश्र तंडुल, कृतिका-उडीद. रोहिणी-गाईचे दहीं. मृगशीर्ष-गाईचें तूप आर्द्रा-गाईचें दूध. पुनर्वसु-हरिणमांस. पुष्य-हरिणरक्त. आश्लेषा-पायस. मघा-चापमांस. पूर्वाफल्गुनी-मृगमांस. उत्तराफल्गुनी-सशाचेंमांस हस्त-षष्टिकान्न (६० दिव पिक.). चित्रा-वाघांटो स्वाती-तुपांततळलेले घारगे. विशाखा-नानावर्णपक्षी. अनुराधा-उत्तमफळ. ज्येष्ठा-कांसवांचें मांस. मूळ-साळूंकीचें मांस. पूर्वाषाढा-घोरपडीचें मांस. उत्तराषाढा-साळईचें मांस. अभिजित्-मुगाचें अन्न श्रवण-खिचडी. धनिष्टा-मुद्गान्न शततारा-यवपिष्ट पूर्वाभाद्रपदा-मत्स्यसहित अन्न. उत्तराभाद्रपदा--नाना धान्याचें अन्न. रेवती-दधिसहित अन्न.

दिशादोहद (अनुष्टुप्.)

आज्यंतिलौदनंमत्स्यंपयश्चापियथाक्रमम् ॥ भक्षयेद्दोहदंदिश्यमाशांपूर्वादिकांव्रजेत् ॥८६॥

अर्थ-पूर्वेला आज्य, दक्षिणेला तिलमिश्र अन्न, पश्चिमेला मत्स्य, आणि उत्तरेला दुग्ध, हे पदार्थ भक्षण करून त्या त्या दिशेला प्रयाण करावें. हें दिशादोहद होय.

वारदोहद (अनुष्टुप्.)

रसालांपायसंकांजींशृतंदुग्धंतथादधि ॥ पयोऽश्रितंतिलान्नंचभक्षयेद्वारदोहदम् ॥ ८७॥

अर्थ--खालीं लिहिलेले त्या त्या वाराचे दोहदपदार्थ आहेत. ज्या वारीं प्रयाण करावयाचें असेल त्या वाराच्या दोहपदार्थाचें भक्षण करून निघावें. रविवारीं श्रीखंड सोमवारीं-पायस. मंगळवारीं-कांजी बुधवारीं-तापलेलें दूध. गुरुवारीं-दहीं. शुक्रवारीं न तापलेलें-दूध. शनवारीं तिळ घातलेलें अन्न.

तिथिदोहद (वसंत तिलक.)

पक्षादितोर्कदलतंडुलवारिसर्पिःश्राणाहविष्यमपिहेमजलंत्वपूपम् ॥
भुक्त्वाव्रजेद्रुचकमंबुचधेनुमूत्रंयावान्नपायसगुडानमृगन्नमुद्गान् ॥ ८८ ॥

अर्थ-शुक्लपक्षांतील व कृष्णपक्षांतील प्रतिपदादि सर्व तिथींचे दोहपदार्थ पुढील प्रमाणें जाणावे. प्रतिपदा-रुईचेंपान. २ धुवण ३ तूप. ४ पातळ भात. ५ मुगाचें अन्न. ६ सोन्याचें पाणी. ७ घारगे. ८ महाळुंग. ९ पाणी. १० गोमूत्र. ११ यवान्न. १२ पायस. १३ गूळ. १४ रक्त. १५ खिचडी.

गमनकाळीं कर्तव्यविधि. (प्रहर्षिणी)

उध्दृत्यप्रथमतएवदक्षिणांघ्रिंद्वात्रिंशत्पदमभिगत्यदिश्ययानम् ॥
आरोहेत्तिलघृतहेमताम्रपात्रंदत्वादौगणकवरायचप्रगच्छेत् ॥ ८९ ॥

अर्थ-निघतेवेळीं प्रथम उजवापाय उचलून चालत चालत ३२पावलें जमिनीवरूनच राजानें जावें. मग ज्या दिशेला जावयाचें असेल त्या दिशेच्या वाहनावर चढतेवेळीं (दिशांचीं वाहनें पुढच्या श्लोकांत पहा) तील, घृत व सुवर्ण यांनींयुक्त ताम्रपात्र श्रेष्ठ ज्योतिषाला किंवा इतर ब्राह्मणाला दान देऊन नंतर वाहनावर बसून प्रयाण करावें.

पूर्वादि दिशांच्या गमनाचीं वाहनें. (अनुष्टुप्)

प्राच्यांगच्छेद्गजेनैवदाक्षिणस्यांरथेनहि ॥ दिशिप्रतीच्यामश्वेनतथोदीच्यांनरैर्नृपः ॥९०॥

अर्थ पूर्वदिशेला जाणें असेल तर हत्तीवर बसून जावें, दक्षिणेला रथांत बसून जावें, पश्चिमेला घोड्यावरून जावें आणि उत्तरेला नरयानांतून ह्मणजे पालखी, मेणा इत्यादिकांत बसून राजानें प्रयाण करावें.

निघण्याची स्थानें. (पादाकुलक.)

देवगृहाद्वा गुरुसदनाद्वा स्वगृहान्मुख्यकलत्रगृहाद्वा ॥
प्राश्य हविष्यं विप्रानुमतः पश्यन् शृण्वन्मंगलमेयात् ॥ ९१ ॥

अर्थ—देवघर, विद्या शिकविणारा गुरु, किंवा कुलगुरु यांचें घर; स्वतःचें निजण्याचें घर, पट्टराणीचें घर हीं राजाचीं निघण्याला योग्य स्थानें आहेत. ह्यांपैकीं कोणत्याही एका घरीं हविष्यान्न भक्षण करून ब्राह्मणांचीं संमति घेऊन मंगळ वाद्यांचा सुस्वरनाद श्रवण करीत आणि मंगल वस्तूकडे पहात ब्राह्मणांचे शुभसूचक आशीर्वाद चालले असतां राजानें निघावें.

प्रस्थानवस्तु. (प्रहर्षिणी)

कार्याद्यैरिह गमनस्य चेद्विलंबो भूदेवादिभिरुपवीतमायुधं च ॥
क्षौद्रं चामलफलमाशु चालनीयं सर्वेषां भवति यदेव हृत्प्रियं वा ॥ ९२ ॥

अर्थ—येथपर्यंत ह्या यात्राप्रकरणांत सांगितल्याप्रमाणें शुभमुहूर्त शोधून काढिलेला असून त्यावर कोणत्याही अवश्य कार्यामुळें किंवा कसल्याही अगत्य कारणामुळें प्रयाणकर्त्याला स्वतः निघण्यास मिळत नसून विलंब असेल तर ब्राह्मणानें यज्ञोपवीत (जानवें) क्षत्रियानें आयुध, वैश्यानें मध, आणि शूद्रानें अमल—फळ ह्मणजे नारळ, सुपारी इ० फळ योजिलेल्या शुभमुहूर्तावर घराबाहेर नेऊन ठेवावें. अथवा ब्राह्मणादि चारही वर्णांनीं आपल्या मनाला जो पदार्थ प्रिय वाटेल तो मुहूर्तावर बाहेर काढून ठेवावा.

प्रस्थान परिमाणें. (प्राचीन मतें.) (मंदाक्रांता.)

गेहाद्गेहांतरमपि गमस्तद्धि यात्रेति गर्गः सीम्नः सीमांतरमपि भृगुर्बाणविक्षेपमात्रम् ॥ प्रस्थानं स्यादिति कथयते थो भरद्वाज एवं यात्राकार्या बहिरिह पुरात्स्याद्वसिष्ठो ब्रवीति ।९३।

अर्थ—आपल्या घरांतून निघून दुसऱ्या घरीं—तें जवळ असो किंवा दूर असो—गमन केलें ह्मणजे यात्रा झाली असें गर्गाचार्यांचें मत आहे. आपली सीमा उल्लंघून सीमांतरीं गेल्यानें प्रयाण होतें असें भृगुऋषि ह्मणतो. साधारण योध्यानें सोडलेला बाण जितका दूर जातो तितकें गेल्यानें यात्रा होते असें भरद्वाज सांगतो. आणि आपलें गांव अथवा नगर सोडून बाहेर गेलें तरच यात्रा होते असें वसिष्ठ ह्मणतो.

मुनिमतानें प्रस्थानपरिमाण. (वसंततिलक.)

प्रस्थानमत्र धनुषां हि शतानि पंच केचिच्छतद्वयमुशंति दशैव चान्ये ॥
संप्रस्थितो य इह मंदिरतः प्रयातो गंतव्यदिक्षु तदपि प्रयतेन कार्यम् ॥ ९४ ॥

अर्थ—चार हात ह्मणजे एक धनुष्य होय. अशा प्रमाणानें पांचशें धनुष्यें ह्मणजे दोन हजार हात प्रस्थान करावें (आपल्या घरांतून निघून जावें) असें कित्येक ह्मणतात. किती एकांच्या मतानें दोनशें धनुष्यें ह्मणजे आठशें हात प्रस्थान करावें असें आहे. आणि दुसरे किती एक ऋषि दहा धनुष्यें ह्मणजे चाळीस हात प्रस्थान करावें असे ह्मणतात. अशीं प्रस्थानाचीं तीन परिमाणें आहेत. यांतून कोणत्याही एका मताला अनुसरून आपल्या घरांतून निघून पूर्वोक्त परिमाणांच्या पलीकडे गमनकर्त्यानें शुभमुहूर्तावर जावें ह्मणजे प्रयाण सिद्ध होतें. अशा रीतीनें गमन करावयाचें तेंही ज्या दिशेला गमनकर्तव्य असेल त्याच दिशेला तत्पर मनुष्यानें जावें.

प्रस्थानाचा अवधि व प्रयाणीं मैथुननिषेध. (स्रग्धरा.)

प्रस्थाने भूमिपालो दशदिवसमभिव्याप्य नैकत्र तिष्ठेत्सामंतः सप्तरात्रं तदितरमनुजः पंचरात्रं तथैव ॥ ऊर्ध्वं गच्छेच्छुभाहेप्यथ गमनदिनात्सप्तरात्राणि पूर्वं चाशक्तौ तद्दिने सौ रिपुविजयमना मैथुनं नैव कुर्यात् ॥ ९५ ॥

अर्थ—प्रस्थानानंतर राजानें दहा दिवसपर्यंत एकजागीं राहू नये. मांडलिकानें सात दिवस राहू नये. आणि त्यासिवाय इतर सर्व मनुष्यांनीं पांच दिवस एकत्र राहूं नये. असा प्रस्थानाचा अवधि आहे. जर कोणी करणानें वरील अवधीपर्यंत एकजागीं राहणें होईल तर मग घरीं येऊन फिरून दुसऱ्या मुहूर्तावर

प्रयाण करावें गमन दिवसाच्या पूर्वी सातरात्रीं विजयेच्छु राजानें मैथुन वर्ज्य करावें अतिकामुक असल्या. मुळे सात रात्रीं वर्ज्य करण्याला असमर्थानें प्रयाण दिवशीं तरी मैथुन वर्जावें.

यात्राकर्त्याचे नियम. (शालिनी.)

दुग्धंत्याज्यंपूर्वमेवत्रिरात्रंक्षौरंत्याज्यंपंचरात्रंचपूर्वम् ॥
क्षौद्रंतैलंवासरेस्मिन्वमिश्चत्याज्यंयत्नाद्भूमिपालेननूनम् ॥ ९६ ॥

अर्थ—गमनदिवसाच्या पूर्वी तीन दिवस दूध पिऊं नये. तसेंच पांच दिवस क्षौर वर्ज्य करावें. मध खाणें अंगाला तेल लावणें व गमन होण्याचें औषध घेणे हीं तीन प्रयाणदिवशीं राजानें अवश्य वर्ज्य करावीं.

गमन कर्त्याचे नियम. (आर्या)

भुक्त्वागच्छतियदिचेत्तैलगुडक्षारपक्वमांसानि ॥
विनिवर्ततेसरुग्णःस्त्रीद्विजमवमान्यगच्छतेमरणम् ॥ ९७ ॥

अर्थ--जर तैलपक्वपदार्थ (वडे वगैरे), गूळ व त्याचे केलेले पदार्थ, क्षारपदार्थ आणि शिजलेले मांस भक्षण करून प्रयाणकर्ता गमन करील तर तो रोगग्रहस्त होऊन माघारा येतो स्वपत्नी किंवा इतर कोणतीही स्त्री आणि ब्राह्मण यांचा निघतेवेळीं अवमान करणाराला मरण जाणावें.

अकालवृष्टि लक्षण. (वसंतमाला.)

यदिमाःसुचतुर्षपौषमासादिषुवृष्टिर्हिभवेदकालवृष्टिः ॥
पशुमर्त्यपदांकितानयावद्वसुधास्यान्नहितावदेवदोषः ॥ ९८ ॥

अर्थ—जर पौष, माघ, फाल्गुन व चैत्र ह्या चार मासांत वृष्टि होईल तर ती अकालवृष्टि जाणावी. अशी अकालिकवृष्टि झाली असून जोंपर्यंत पशु व मनुष्य यांच्या पायांनीं भूमि चिन्हित झाली नाहीं (पशूंचीं व मनुष्यांचीं पावलें जमिनीवर उमटलीं नाहींत) तोंपर्यंत अकालवृष्टीचा दोष नाहीं; अर्थात् नंतर दोष जाणावा.

अकालवृष्टीचा व दुष्ट शकुनांचा परिहार. (गाथा.)

अल्पायांवृष्टौदोषोल्पोभूयस्यांदोषोभूयान् जीमूतानांनिर्घोषेवृष्टौवाजातायांभूपः ॥
सूर्येंद्वोर्बिंबेसौवर्णेकृत्वाविप्रेभ्योदद्याद्दुःशाकुन्येसाज्यंस्वर्णंदत्वागच्छेत्स्वेच्छाभिः॥९९॥

अर्थ—अकालवृष्टि अल्प होईल तर तिचा दोषही अल्पच, आणि फार होईल तर तिचा दोषही फारच जाणावा. निघतेवेळीं अकालिवृष्टि झाली तर प्रयाण करूं नये; परंतु प्रयाण करणें अवश्य असून निघते वेळेस मेघगर्जना होईल किंवा वृष्टि होईल तर राजानें " अन्य मनुष्यानेंही" सूर्य व चंद्र यांचीं बिंबें सुवर्णाचीं करून तीं ब्राह्मणाला देऊन नंतर प्रयाण करावें. निघतांना दुष्ट शकुन झाला असतां ब्राह्मणाला आज्यासहित सुवर्ण दान देऊन मग स्वैच्छ गमन करावें.

शुभशकुन. (शार्दूलविक्रीडित.)

विप्राश्वेभफलान्नदुग्धदधिगोसिद्धार्थपद्मांबरंवेश्यावाद्यमयूरचाषनकुलाबद्धैकप
श्वामिषम् ॥ सद्वाक्यंकुसुमेक्षुपूर्णकलशच्छत्राणिमृत्कन्यकारत्नोष्णीषसितोक्षम
द्यसमुत्स्त्रीदीप्तवैश्वानराः ॥ १०० ॥ आदर्शांजनधौतवस्त्ररजकामीनाज्यार्सि
हासनंशावंरोदनवर्जितंध्वजमधच्छाग(?)स्रग्गोरोचनम् ॥ भारद्वाजनृयानवेदनिनदा
मांगल्यगीतांकुशाद्दृष्टाःसत्फलदाःप्रयाणसमयेरिक्तोघटःस्वानुगः ॥ १०१ ॥

अर्थ--दोन किंवा बहुत ब्राह्मण, (एक असतां मात्र अशुभ) अश्व, न माजलेला हत्ती, उत्तमफळें अन्न, दुग्ध, दधि, धेनु, सिद्धार्थ ह्मणजे पांढरे शिरस, कमल, स्वच्छवस्त्र, वेश्या, मृदंग सवार इत्यादि वाद्यें, मयूरपक्षी, चापपक्षी नकुल (मुंगूस), बांधलेला पशु, मांस, सद्वाक्य (कार्यसिद्धि होऊ इत्यादि), उत्तमपुष्पें, न तोडलेला ऊंस, उदकानें भरलेला कलश, छत्र, ओली माती, कन्या, हिरामाणिकादि रत्नें

पागोटें मोकळा किंवा बांधलेला पांढरा बैल, मद्य. पुत्रासहित कोणतीही स्त्री, ज्वाळा निघत असणारा अग्नि, ॥ १०० ॥ आरसा, काजळ, धुतलेलें वस्त्र घेतलेला परीट, मत्स्य, आज्य, सिंहासन, वरोवरचे लोक रडत बसतील असें प्रेत, ध्वजपताका, छाग ह्मणजे बोकड, धनुष्यादि अस्त्र, गोरोचन, भारद्वाजपक्षी, डोली, मेणा इत्यादि नरयान, वेदघोष, मंगलपदार्थ, गायन, हत्तीचा अंकुश हे पदार्थ प्रयाणाला निघते समयीं दृष्टीस पडतील तर शुभफल देणारे होतात. रिकामें पात्र घेऊन पाण्याकारितां जाणारे मनुष्य प्रयाणकर्त्यांच्या मागून निघालें असतांही शुभ होय. हे शकुन दैवयोगानें आपोआप होतील तर फार शुभ जाणावें. मुद्दाम करवून घेतले असताही कांहींसे शुभकारक होतात.

अपशकून (शार्दूलविक्रीडित.)

वंध्याचर्मतुषास्थिसर्पलवणांगारेंधनक्लीबविट्तैलोन्मत्तवसौषधारिजटिलप्रव्राट्
तृणव्याधिताः ॥ नग्नाभ्यक्तविमुक्तकेशपतिताव्यंगक्षुधार्तासृक् ॥ स्त्रीपुष्पं
सरठःस्वगेहदहनंमार्जारयुद्धंक्षुत ॥ १०२ ॥ काषायीगुडतक्रपंकविधवाकुब्जाः
कुटुंबेकलिःवस्त्रादेःस्खलनंलुलायसमरंकृष्णानिधान्यानिच ॥ कार्पासंवमनंच
गर्दभरवोदक्षेतिरुड्गर्भिणीमुंडार्द्रांबरदुर्वचोंधबधिरोदक्यानदृष्टाः शुभाः ॥ १०३ ॥

अर्थ-वंध्या स्त्री; चर्म धान्याचें भूस हाडें सर्प मीठ निखारे लांकडें नपूंसक विष्ठा, तेल कैफीपदार्थांच्या सेवनानें उन्मत्त झालेला मनुष्य, वसा ह्म ० चरबी; ओषधपदार्थ. शत्रू, जटावाढलेला मनुष्य; संन्यासी, तृण; रोगी, नागवा किंवा अंगाला तेल किंवा केश मोकळे सोडलेला, अथवा जातिभ्रष्ट शालेला. नाक कान इ० अवयव नसणारा, अगर फार भुकावलेला असा मनुष्य, रक्त, स्त्रियाचे आर्तव, सरडा, गमनकर्त्यांचें घर जळणें; मांजराचें भांडणशिंक; ॥ १०२ ॥ काषाय वस्त्र धारणकेलेला गुड, तक्र, चिखल, विधवा स्त्री, कुबडा मनुष्य, आपल्याच कुटूंबात कलह होणे; निघतांना आपलेच वस्त्र अडखळणें; किंवा हातांतील कांहीं जिन्नस कारणावांचून अकस्मात् पडणें रेड्यांचें झूज उडीद वगैरे काळीं धान्यें; कापूस; वमन, उजव्या बाजूला गाढव ओरडणे (अर्थात् डावीकडे ओरडला तर शुभ) अकस्मात कोणी अतिशय रागावणे; गर्भवती स्त्री, मुंडन केलेला, ओलें वस्त्र नेसलेला किंवा दुसऱ्याच्या तोंडांतून दुष्ट भाषण निघणे, आंधळा, बहिरा, रजस्वला स्त्री हीं प्रयाणकाळीं दृष्टीस पडलीं असतां अशुभ जाणावीं.

अन्य शुभशकून (शार्दूलविक्रीडित.)

गोधाजाहकसूकराहिशशकानांकीर्तनंशोभनंनोशब्दोनाविलोकनंचकपिऋक्षाणा
मतोव्यत्ययः ॥ नद्युत्तारभयप्रवेशसमरेनष्टार्थसंवीक्षणेव्यत्यस्ताःशकुनानृपेक्ष
णविधौयात्रोदिता शोभनाः ॥ १०४ ॥

अर्थ-घोरपर, जाहक (गात्रें संकुचित करणारा एक जंतु आहे), डुक्कर, सर्प, आणि ससा ह्या प्राण्यांचें नांव प्रयाणकाळीं आपल्या तोंडानें आलें तर, किंवा दुसऱ्यानें उच्चारलेलें ऐकूं आलें तर शुभ जाणावें. परंतु ह्यांचा साक्षात् शब्द ऐकूं येईल किंवा हे दृष्टीस पडतील तर अशुभ होत. वानर व अस्वल ह्यांचें फळ वरच्या उलट आहे ह्मणजे ह्यांचें नांव ऐकणें किंवा आपल्या मुखानें येणें हें अशुभ; आणि साक्षात त्या वानराचें किंवा अस्वलाचें दर्शन झालें तर शुभ होय. गंगादि नद्या उतरून पलीकडे जावयाचें असतां, कोणतेंही परचक्रादि भय उत्पन्न झाल्यामुळें पळून जावयाचें असतां युद्धांत, आणि सोडलेली वस्तू शोधण्याचे वेळीं यात्रेचे शुभ शकुन अशुभ, व अपशकून शुभ असे उलटमानावे. राजदर्शनार्थ गमन करणें असेल तर त्याला यात्रेप्रमाणेचे शकून जाणावे.

पशुपक्षिशकुन (अनुष्टुप्)

वामांगेकोकिलापल्लीपोतकीसूकरीरला ॥
पिंगलाछुच्छुकाःश्रेष्ठाःशिवापुरुषसंज्ञिताः ॥ १०५ ॥

अर्थ-कोकिला, पाल, पोतकी ह्मणजे दुर्गा, सूकरी ह्मणजे एक पशुविशेष, रला ह्मणजे एक पक्षिविशेष, पिंगला ह्मणजे भैरवी, छुछुका ह्मणजे चिचुंदरी आणि शिवा ह्मणजे भालू हीं गमनकाळीं प्रयाणकर्त्यांच्या वामभागानें जातील तर शुभ होत, आणि पुरुषसंज्ञेचे ह्मणजे तित्तिर, खंजन, कपोत हंस इत्यादि पक्षी वामभागानें गेले असता शुभ जाणावे.

पशुपक्षि शकून. (अनुष्टूप्.)

छिक्करःपिक्कोभासःश्रीकंठोवानरोरुरुः ॥
स्त्रीसंज्ञकाःकाकऋक्षश्वानःस्युर्दक्षिणाः शुभाः ॥ १०६ ॥

अर्थ-छिक्कर (पशुविशेष) पिक्क (पक्षिविशेष भास (या नांवाचा पक्षी), श्रीकंठ (यानांवाचा पक्षी) वानर. रुरु ह्म०एका प्रकारचा हरिण ज्याला सुवार अथवा रोहें असें ह्मणतात तो स्त्रीसंज्ञेचे पशुपक्षी, आणि काक, अस्वल, श्वान हे गमनकाळीं उजव्या बाजूनें जातील तर शुभ होत.

पशुपक्षि शकुन. (अनुष्टूप्)

प्रदक्षिणगताःश्रेष्ठायात्रायामृगपक्षिणः ॥ ओजामृगाव्रजंतोतिधन्यावामेखरस्वनः ॥१०७॥

अर्थ-प्रयाणसमयीं दरूवांचून सर्व मृग व पक्षी प्रदक्षिणिक गतीनें गेले असतां शुभ जाणावे. विषम संख्यांक ह्मणजे तीन, पांच, सात इत्यादि मृग धांवत जाणारे प्रयाणकाळीं दृष्टीस पडल तर शुभ होत. वामभागीं गर्दभाचा शब्द ऐकूं येईल तर तो शुभ होय.

अपशकुनांचा परिहार. (अनुष्टुप्.)

आद्येपशकुनेस्थित्वाप्राणानेकादशव्रजेत् ॥ द्वितीयेषोडशप्राणांस्तृतीयेनक्वचिद्व्रजेत् १०८

अर्थ-प्रयाणाला निघतांच प्रथम अपशकून झाला तर ११प्राणांपर्यंत राहून मग अवश्य जाणें असेल तर जावे. फिरून निघाल्यावर दुसऱ्यानें अपशकून होईल तर १६ प्राणांपर्यंत राहून नंतर जावें तिसऱ्यानेंही निघाल्यावर अपशकून होईल तर कधींही जाऊं नये घरीं येऊन राहून नंतर दुसऱ्या मुहूर्तावर प्रयाण करावे दीर्घ १० अक्षर उच्चारण्यास जोकाळलागतो त्यास' प्राण. असे ह्मणावे.

यात्रेहून आल्यावर गृहप्रवेश करण्याचीं नक्षत्रे (उपजाति,)

यात्रानिवृत्तौशुभदंप्रवेशनंमृदुध्रुवैःक्षिप्रचरैःपुनर्गमः ॥
द्वीशेनलेदारुणभेस्त्रीगेहपुत्रात्मविनाशनंक्रमात् ॥ १०९ ॥

अर्थ-चित्रा, अनुराधा, मृग, रेवती, रोहिणी, उत्तराफ० उत्तराषा उत्तराभाद्रपदा ह्या ८ नक्षत्रावर यात्रेहून आल्यावर गृहप्रवेश करणे शुभ होय. अश्विनी, पुष्य, हस्त, अभिजित्, श्रवण धनिष्ठा, शततारा, पुनर्वसु, स्वाती ह्या ९ नक्षत्रांवर प्रवेश केला असतां फिरून प्रयाण करावे लागते. अर्थात् हीं ऊन नक्षत्रे गृहप्रवेशाला मध्यम होत. विशाखा नक्षत्रावर प्रवेश केला असतां प्रवेश कर्त्याच्या पत्नाचा, कृतिकांवर घराचा, दारुण संज्ञक नक्षत्रांवर पुत्राचा, आणि उग्र नक्षत्रावर स्वतः प्रवेशकर्त्याचा नाश होतो, यास्तव हीं ११नक्षत्रे गृहप्रवेशाला फार अशुभ जाणावीं.

प्रयाणीं वर्ज्यपंचांगदोष (मंजुभाषिणी.)

अयनर्क्षमासतिथिकालवासरोद्भवशूलसंमुखसितज्ञदिक्पाः ॥ भृगुवक्रतादिपरिघाख्यदंडकत्रृतुजायशौचमपिचोत्सवादिकम् ॥ ११० ॥ मृतपक्षरिक्तरवितर्कसंख्यकास्तिथयश्चसौरिरविभौमवासराः ॥ अपिवामपृष्ठगविधुस्तथाडलोवसुपंचकाभिजिदथापिदक्षिणे ॥ १११ ॥

अर्थ-अयनशूल, नक्षत्रशूल, मासशूल, तिथिशूल कालशूल व वारशूल; प्रतिशुक्र, संमुखबुध, संमुखदिक्पति. शुक्राचें वक्रत्व, अस्त बाल्य इ० परिघनामक दंड, प्रयाणकर्त्याची पत्नी रजस्वला, असणे. जननाशौच, मरणाशौच दीपोत्सवाची किंवा विवाहादि उत्सवांची असमाप्ति, मृतपक्ष, रिक्ता, द्वादशी, व

षष्ठी ह्या निंद्यतिथि, शनि. मंगळ रवि, हे वार; वामगत व पृष्ठगत चंद्र अडल धनिष्ठापंचक, आणि दक्षि- णादिशेला गमन करण्याला अभिजित् मुहूर्त हे सर्व दोष प्रयाणी अशुभ जाणावे हे सर्व ह्या प्रकरणांत मागे सांगितले आहेत परंतु या ठिकाणी सर्व दोषांच्या स्मरणार्थ येथें घेतले आहेत.

प्रयाणीं वर्ज्यलग्नदोष. (स्रग्धरा.)

लग्नेजन्मर्क्षतन्वोर्मृतिगृहमहितर्क्षाच्चषष्ठंतदीशावालग्नेकुंभमीनौर्क्षनवलतनूचापि- पृष्ठोदयंच ॥ पृष्ठाशासंस्थमृक्षंदशगशनिरथोसप्तमेचापिकाव्यःकेंद्रेवक्राश्चवक्रीग्र हदिवसविवाहोक्तदोषाश्चनेष्टाः ॥ ११२ ॥

अर्थ—प्रयाणकर्त्यांच्या जन्मराशीपासून व जन्मलग्नापासून अष्टमलग्नें आणि शत्रूच्या जन्मराशीपासून आणि जन्मलग्नापासून षष्ठ राशि ह्या इष्टलग्नी असणे, तसेंच अष्टम व षष्ठ लग्नांचे स्वामी इष्टलग्नीं असणे कुंभ व मीन हीं दोन लग्नें, व सर्व लग्नांतील कुंभनवांश आणि मीननवांश, पृष्ठोदयलग्नें. पृष्ठदिशेचें लग्न (गंतव्य दिशेच्या समोरील दिशेचें लग्न) इष्टलग्नापासून दशमशनि सप्तमशुक्र, केंद्री असणारा वक्रीग्रह, आणि वक्रीग्रहांचे वार हे दोष व विवाहाला सांगितलेले सर्व दोष प्रयाणाला वर्ज आहेत.

॥ इति यात्राप्रकरणम् ॥

॥ अथ वास्तुप्रकरणम् ॥ १२ ॥

ग्रामाचे शुभाशुभत्व, काकिणी आणि गृहद्वार नियम. (शार्दूलविक्रीडित.)

यद्भंद्व्यंकसुतेशदिङ्मितमसौग्रामःशुभोनामभात्स्ववर्गंद्विगुणंविधायपरवर्गाढ्यं गजैःशेषितं ॥ काकिण्यस्त्वनयोश्चतद्विवरतोयस्याधिकाःसोर्थदोथद्वारंद्विजवै श्यशूद्रनृपराशीनांहितंपूर्वतः ॥ १ ॥

अर्थ—घर बांधणाराच्या व्यावहारिकनामाच्या राशीपासून २।९।५।११।१० इतकी संख्या, ज्या गांवा- च्या राशीची होत असेल तो गांव घर बांधण्याला शुभ होय. उदाहरणः—चरणादि नांवाच्या गांवांत नी- लकंठ नामक मनुष्य घर बांधणार असेल जर अवकहड चक्रावरून चरणाद्रीची राशि मीन, व नीलकंठ नांवाची राशि वृश्चिक, ह्या वृश्चिकापासून मीन ही पांचवी होते ह्मणून नीलकंठाला चरणाद्रिगांव शुभ आहे. आपल्या नांवाच्या वर्गाची दुप्पट करून तींत गांवाच्या नांवाचा वर्ग मिळवावा, व आलेल्या सं- ख्येस ८ नीं भागावें. तसेंच गांवाच्या वर्गाच्या दुप्पटींत आपला नामवर्ग मिळवून त्या संख्येलाही ८ नीं भागावें. ज्या दोन बाक्या राहतील त्या काकिणी होत. (विवाहप्रकरणांतील ३६ व्या श्लोकांत वर्ग सांगि- तले आहेत ते येथें पाहावे.) मग काकिणींची वजाबाकी करून ज्याच्या अधिक असतील तो दुसऱ्याला द्रव्य देणारा आहे असे समजावें, उदाहरणः—नीलकंठाचा वर्ग सर्प हा गरुड वर्गापासून पांचवा आहे. ह्या ५ ची दुप्पट १० झाली, हींत चरणाद्रीचा सिंहवर्गाची संख्या ३ ही मिळवून सर्व संख्या १३ हिला ८ नीं भागून बाकी ५ ह्या नीलकंठाच्या काकिणी होत आतां चरणाद्रीच्या. वर्गाची संख्या ३ हिची दुप्पट ६ तींत. नील कंठाचा वर्ग ५ हा मिळवून सर्व संख्या ११झाली; तिला ८ नीं भागून बाकी ३ ह्या चरणा- द्रि गावाच्या काकिणी होत. नीलकंठाच्या काकिणी ५ ह्यांतून चरणाद्रीच्या ३ ह्या वजा करून बाकी २ राहते, ह्मणून नीलकंठाला चरणाद्रि हा गांव शुभ नाहीं. कारण नीलकंठानें चरणाद्रीचें देणें आहे असे सिद्ध झालें तात्पर्य गांवाच्या काकिणीपेक्षा घर बांधणाराच्या काकिणी अधिक असूं नये कर्क, वृश्चिक. मी- न ह्या ब्राह्मणराशि ज्यांच्या जन्मराशि असतील त्यानी घराचें दार पूर्वेकडे लावावें वृषभ, कन्या, मकर, ह्या वैश्यराशि ज्यांच्या त्यांनीं दक्षिणेकडे द्वार करावें मिथुन, तूळ, कुंभ ह्या शूद्रराशि ज्यांच्या त्यानीं प- श्चिमेस दार करावें आणि मेष, सिंह, धन ह्या क्षत्रिय राशि ज्यांच्या जन्मराशि असतील त्यांनी आपल्या घराचें दार उत्तर दिशेला करावें.

गांवांतील अशुभस्थानें. (वसंततिलक.)

गोसिंहनक्रमिथुनंनिवसेन्नमध्येग्रामस्यपूर्वककुभोलिझषांगनाश्च ॥
कर्कीधनुस्तुलभमेषघटाश्चतद्वद्वर्गाःस्वपंचमपराबलिनःस्युरैन्द्र्याः ॥ २ ॥

अर्थ---वृषभ, सिंह मकर, मिथुन ह्या चार ज्यांच्या जन्मराशि असतील त्या मनुष्यांनीं गांवाच्या मध्य- भागी राहूं नये, (घर बांधूं नये) आणि वृश्चिक, मीन, कन्या कर्क, धन तुला, मेष व कुंभ ह्या आठ ज्याच्या जन्मराशि असतील त्यांनीं अनुक्रमानें गांवाच्या पूर्वादि आठदिशांला राहूं नये. विवाहप्र० श्लो० ३६ यांत सांगितलेले अ. क. च. ट. त. प. य. श. हे ८ वर्ग, क्रमानें पूर्वादि आठ दिशाला बलवान् आहेत. कोणत्याही एका वर्गापासून पांचवा वर्ग त्याचा शत्रु आहे म्हणजे आपल्या नांवाच्या वर्गापासून पांचव्या वर्गाच्या दिशेला घर बांधूं नये, व घराचें दारही त्या दिशेला लावूं नये.

इष्टनक्षत्र व इष्टआय यांपासून घराची लांबी रुंदी आणणें (इंद्रवज्रा.)

एकोनितेष्टर्क्षहताद्वितिथ्यारूपोनितेष्टायहतेंदुनागैः ॥
युक्ताघनैश्चापियुताविभक्ताभूपाश्विभिःशेषमितोहिपिंडः ॥ ३ ॥
स्वेष्टायनक्षत्रभवोथदैर्घ्यहृत्स्याद्विस्तृतिर्विस्तृतिहृच्चदीर्घता ॥

अर्थ---मागें विवाहप्रकरणांत वधूवरांच्या जन्मनक्षत्रावरून घटित पाहण्याचा प्रकार सांगितला आहे. गृहकर्त्यांचे व्यावहारिक नांवावरून अवकहड चक्रानें उत्पन्न होणारें नक्षत्र आणि गृहनक्षत्र यांचें घटित शुभ असलें पाहिजे. याकरितां गृहकर्त्याचे नक्षत्राशीं जं कोणतेंही एक नक्षत्र घटितानें शुभ होत असेल तें भावी गृहाचें इष्टनक्षत्र होय पुढें ध्वजादि आठ आय सांगितले आहेत त्यातील जो आय गृहकर्त्याला पा- हिजे असेल तर तो भावी गृहाचा इष्ट आय होय. इष्टनक्षत्र संख्येंत १ उणा करून तिनें १५२ ला गुणावें. मग त्या गुणाकारांत, इष्टआयांत १ उणा करून त्यानें ८१ ला गुणून आलेला गुणाकार आणि १७ मि- ळवावे. नंतर त्या सर्व संख्येला २१६ नीं भागावें; ह्मणजे जी बाकी राहील ती, इष्ट आय व इष्टनक्षत्र यापासून उत्पन्न झालेला पिंड ह्मणजे गृहाचे क्षेत्रफळ जाणावें. घराची जी लांबी इष्ट असेल तिनें क्षेत्रफ- ळाला भागावें ह्मणजे आलेला भागाकार रुंदी होते; आणि रुंदीनें क्षेत्रफळाला भागावें ह्मणजे येणारा भा- गाकार घराची लांबी होतें. उदाहरणः— नीलकंठनामक पुरुषाचें नक्षत्र अनुराधा होय. त्याच्याशीं घटि- तानें रोहिणी नक्षत्र योग्य होतें ह्मणून तें गृहनक्षत्र मानिलें अश्विनीपासून रोहिणीची संख्या ४ त्यांत १ उणा करून बाकी ३ ह्यांनीं १५२ ह्यांला गुणून गुणाकार ४५६ आला. आतां इष्ट आय सिंह घेतला; ह्याची संख्या ३ त्यात १ उणा करून बाकी २ ह्यानीं ८१ ह्यांला गुणून गुणाकार १६२ हा, आणि १७ ह्या दोन संख्या पूर्वीच्या ४५६ त मिळवून सर्व संख्या ६३५ हिला २१६ नीं भागून बाकी २०३ हेंच क्षेत्रफळ होय. आतां कल्पित लांबी २९ हात ह्यांनीं २०३ ह्या क्षेत्रफळाला भागून भागाकार ७ ही घराची रुंदी होय. ह्या रुंदीनें क्षेत्रफळाला भागिले तर लांबी २९ हात येईल, उघडच आहे. क्षेत्रफल सिद्ध केल्यावर इष्टलांबीनें क्षेत्रफळास भागून रुंदी काढतेवेळीं कांहीं बाकी राहूं लागली तर तीपासून अंगुलें वगैरे काढावी.

ध्वजादि आय आणि वर्णपरत्वें द्वारदिशा. (उत्तरार्ध इंद्रवंशा१. उपजाति.)

आयाध्वजोधूमहरिश्वगोखरेभध्वांक्षकाःपिंडइहाष्टशेषितं ॥ ४ ॥
ध्वजादिकाःसर्वदिशिध्वजेमुखंकार्यंहरौपूर्वयमोत्तरेतथा ॥
प्राच्यांवृषेप्राग्यमयोर्गजेथवापश्चादुदक्पूर्वयमेद्विजादितः ॥ ५ ॥

अर्थ---क्षेत्रफळाला ८ नीं भागून जी बाकी राहील तीवरून ध्वजादि आठ आय जाणावे. बाकी १ अ- सतां ध्वज, २ धूम ३ सिंह, ४ श्वान, ५ वृषभ ६ गर्दभ ७ हस्ती, आणि ८ बाकी असतां ध्वांक्ष असे आय आहेत. ध्वज आय असतां चार ही दिशांला गृहाचें द्वार करणें शुभ होय. सिंह आय असतां पूर्वेस द- क्षिणेस उत्तरेस द्वार करावें. वृष आय असतां पूर्वेसच द्वार करावें. हस्ती आय असतां पूर्वेला व दक्षिणेला गृहद्वार करावे. अथवा ब्राह्मणानें पश्चिमेस, क्षत्रियाने उत्तरेस, वैश्यानें पूर्वेस व शूद्रानें दक्षिणेस अशीं वर्णपरत्वें गृहद्वारे करावीं.

गृहारंभाचा विशेष निषिद्धकाल (उपजाति.)

गृहेशतत्स्त्रीसुखवित्तनाशोऽर्केन्दुजीज्यशुक्रे विबलेऽस्तनीचे ॥
कर्तुःस्थितिर्नो विधुवास्तुनोर्भे पुरःस्थिते पृष्ठगते खनिःस्यात् ॥ ६ ॥

अर्थ--रवि चंद्र, गुरु, शुक्र हे चार ग्रह गृहारंभाच्या वेळीं निर्बळ, अस्तंगत किंवा नीचस्थ असतां क्रमानें गृहकर्ता त्याची स्त्री, सुख व द्रव्य ह्यांचा नाश होतो. ह्मणजे रवि निर्बळ, अस्तंगत, किंवा नीच--स्थानीं असतां स्वतः गृहकर्त्याचा, तसाच चंद्र असतां गृहकर्त्यांच्या पत्नीचा, गुरु असतां सुखाचा, व शुक्र असतां द्रव्याचा नाश होतो असे जाणावे. गृहारंभाचें दिवसनक्षत्र आणि गृहाचेंनक्षत्र (क्षेत्रफळाला ८ नीं गुणून व २७ नीं भागून बाकी राहील तें) हीं दोन नक्षत्रें, गृहाचें द्वार ज्या दिशेला करावयाचे असेल त्या दिशेला संमुख असतां गृहकर्त्याची त्या घरांत स्थिति होत नाहीं; आणि तीं नक्षत्रें गृहाच्या पृष्ठभागीं असतां चोर घर खणून सर्वस्व नाश करितात. तात्पर्य कृत्तिकादि सात नक्षत्रांत व अनुराधादि सात नक्षत्रात गृहारंभ नक्षत्र किंवा वास्तुनक्षत्र असतां पूर्वद्वार व पश्चिमद्वार गृह करूं नये. आणि मघादि सात नक्षत्रांत व धनिष्ठादि सात नक्षत्रांत गृहारंभनक्षत्र व वास्तुनक्षत्र असतां दक्षिणद्वार किंवा उत्तरद्वार असे गृह करूं नये. (हें सप्तशलाकाचक्र पाहिल्यानें स्पष्ट समजेल.)

गृहव्यय, अंशक व त्याचें फळ. (उपजाति.)

भं नागतष्टं व्यय ईरितोऽसौ ध्रुवादिनामाक्षरयुक्तपिंडः ॥
तष्टो गुणैरिंद्रकृतांतभूपाख्यांशा भवेयुर्नशुभोऽंतकोऽत्र ॥ ७ ॥

अर्थ-- गृहाच्या नक्षत्राला ८ नीं भागून जी बाकी राहील तो गृहाचा व्यय होय. हा व्यय ध्रुवादि--नांवाचीं अक्षरें व क्षेत्रफळ ह्या तिहींची बेरीज करून तिला ३ नीं भागावें. बाकी १ राहील तर इंद्रांशक २ राहील तर यमांशक व ३ राहील तर राजांशक जाणावा. ह्या तीन अंशकांतील यमांशक अशुभ आहे अर्थात इंद्रांशक व राजांशक शुभ होत. उदाहरणः - गृहाचें रोहिणी नक्षत्र आहे. त्याची संख्या ४ ही आठापेक्षा कमी आहे म्हणून ४ हाच व्यय होय. पूर्वेस व पश्चिमेस द्वारें करावयाचीं आहेत. म्हणून पूर्वेचा शालांक १ व पश्चिमेचें ४ ह्यांची बेरीज ५ त्यांत १ मिळवून ६ झाले. ध्रुवादि नावांतील सहावें नांव "कांत ह्यांचीं अक्षरें दोन आहेत. (पुढील श्लोक पहा.) आतां व्यय ४ ध्रुवादिनामाक्षरें २ आणि क्षेत्रफळ २०३ ह्या सर्वांची बेरीज २०९ ह्याला ३ नीं भागून बाकी २ राहते, म्हणून यमांशक आला हा अशुभ होय.

शालाध्रुवज्ञान. (अनुष्टुप्.)

दिक्षु पूर्वादितः शालाध्रुवा भूद्वौ कृता गजाः ॥ शालाध्रुवांकसंयोगः सैको वेश्मध्रुवादिकम् ॥८॥

अर्थ--पूर्वादि चार दिशांला १।२।४।८ हे शालाध्रुव जाणावे. ह्मणजे गृहाचें द्वार पूर्व दिशेला करणे असेल तर शालाध्रुव १ दक्षिणेला २पश्चिमेला ४ आणि उत्तरेला द्वार करणें असतां ८असे शालाध्रुव आहेत घराला जितक्या दिशांला द्वारें करावयाचीं असतील तितक्या दिशांच्या शालाध्रुवांकांचा योग ह्मणजे बेरीज करून तींत १ मिळवावा आणि त्या संख्येइतकें ध्रुवादि गृहनाम घ्यावें. (हीं नावें याच प्रकारणांतील १०व्या श्लोकांत आहेत) जसें घराला पूर्वेला व पश्चिमेला द्वारें कर्तव्य असतां त्या दिशांचे शालाध्रुवांक १ आणि ४ ह्यांचीं बेरीज ५ त्यांत १ मिळवून ६ होतात म्हणून ध्रुवादिनांवांतील सहावें नांव कांत हें आलें. ह्यांचीं अक्षरें दोन आहेत.

ध्रुवादि नांवांची अक्षरसंख्या. (अनुष्टुप्.)

तिथ्यर्काष्टाष्टिगोरुद्रशक्रैर्नामाक्षरं त्रयम् ॥ भूम्यब्धीश्वंगदिग्वाग्निहरिक्षुद्रौ नगेऽब्धयः ॥ ९ ॥

अर्थ-- ध्रुवादि गृहनामें १६ आहेत त्यातील १५।१२।८।१६।९।११।१४ हीं सात नावें तीन तीन अक्षरीं आहेत.१।२।४।५।६।१०।३।१३ हीं आठ नावें दोन दोन अक्षरांचीं आहेत, आणि७वें चार अक्षराचें आहे.

ध्रुवादि गृहनामें (आर्यागीति)

ध्रुवधन्येजयनंदौखरकांतमनोरमसुमुखदुर्मुखोग्रंच ॥
रिपुदंवित्तदनाशंचाक्रंदंविपुलविजयाख्यंस्यात् ॥ १० ॥

अर्थ---१ ध्रुव, २ धन्य, ३ जय, ४ नंद, ५ खर ६ कांत ७ मनोरम, ८ सुमुख, ९ दुर्मुख १० उग्र, ११ रिपुद, १२ वित्तद, १३ नाश १४आक्रंद, १५ विपूल, आणि १६ विजय अशीं गृहनामें आहेत ह्यांचीं. फळें त्या त्या नांवांच्या अर्थाप्रमाणें जाणावी

गृहाचे आयादिनवक. (उपजाति. १ अनुष्टुप्. १)

पिंडेनवांकांगगजाग्निनागनागाब्धिनागैर्गुणितैःक्रमेण ॥ विभाजितैर्नागनगांकसूर्यनागर्क्षतिथ्यृक्षखभानुभिश्च ॥ ११ ॥ आयोवारोंशकोद्रव्यमृणमृक्षंतिथियुतिः ॥ आयुश्चाथगृहेशर्क्षगृहभैक्यंमृतिप्रदम्॥ १२ ॥

अर्थ---गृहाचें जें क्षेत्रफळ असेल तें नऊ जागीं मांडून त्यातील प्रत्येकाला ९।९।६।८।३।८।८।४।८ ह्या अंकांनीं क्रमानें निरनिराळें गुणावें. मग आलेल्या नऊ गुणाकाराला अनुक्रमानें ८।७।९।१२।८।२७।१५।२७।१२० ह्या नऊ अंकांनीं भागावें ह्मणजे ज्या नऊ बाक्या राहतील त्यांवरून गृहाचीं आय, वार, अंशक, द्रव्य, ऋण, नक्षत्र तिथि, योग व आयुष्य हीं जाणावीं. गृहकर्त्याचें व गृहाचें नक्षत्र एक असतां मृत्युकारक जाणावें उदाहरण:---गृहाचें क्षेत्रफळ २०३ ह्याला ९ नीं गुणून गुणाकार १८२७ येतो ह्याला ८ नीं भागून बाकी ३ राहते ह्मणून तिसरा आय सिंह हागृहाचा आहे. याप्रमाणेंच वारादिकही काढावीं.

गृहारंभाचें वृषवास्तुचक्र. (शालिनी.)

गेहाद्यारंभेर्कभाद्वत्सशीर्षेरामैर्दाहोवेदभैरग्रपादे ॥ शून्यंवेदैःपृष्ठपादेस्थिरत्वंरामैःपृष्ठेश्रीर्युगैर्दक्षकुक्षौ ॥ १३ ॥ लाभोरामैःपुच्छगैःस्वामिनाशोवेदैर्नैःस्वयंवामकुक्षौमुखस्थैः ॥ रामैःपीडासंततंचार्कधिष्ण्यादश्वैरुद्रैर्दिग्भिरुक्तंह्यसत्सत् ॥ १४ ॥

अर्थ --गृह, राजवाडा, देवालय किंवा ग्राम याचा आरंभ करते वेळीं सूर्य ज्या नक्षत्राला असेल त्यापासून ३ नक्षत्रें वास्तुवृषभाच्या मस्तकावर असतात त्याचें फळ जळणें आहे. त्यांपुढील नक्षत्रें ४ पुढच्या दोन पादांवर, त्याचें फळ लोकवस्ती न होणें. पुढची ४ नक्षत्रें मागल्या दोन पायावर असतात त्याचें फळ गृहकर्त्याचा वास स्थिर होणें असें आहे. त्यांपुढील ३ नक्षत्रें पृष्ठावर असतात; त्याचें फळ संपत्ति प्राप्त होणें. पुढचीं ४ नक्षत्रें दक्षिण कुक्षीवर असतात; ह्यांचें फळ लाभ होय. पुढची ३ नक्षत्रें पुच्छावर असतात; त्याचें फळ धन्याचा नाश आहे. त्यापुढची ४ वामकुक्षीवर असतात; ह्याचें फळ दारिद्र्य आहे. आणि शेवटील ३ नक्षत्रें मुखावर राहतात; ह्याचें फळ निरंतर पीडा जाणावी. तात्पर्य गृहादिकांच्या आरंभाला सूर्यनक्षत्रापासून ७नक्षत्रें अशुभ, होत. गृहादिकांच्या आरंभाला जें दिवस नक्षत्र घ्यावयाचें तें ह्या वृषवास्तुचक्रांतील शुभ पाहून योजावे.

कालपरत्वें गृहद्वारनियम, गृहारंभनक्षत्रें व सूतिकागृह प्रवेश. (स्रग्धरा.)

कुंभेर्केफाल्गुनेप्रागपरमुखगृहंश्रावणेसिंहकर्क्योःपौषेनक्रचयाम्योत्तरमुखसदनंगोजगेर्केचराधे ॥ मार्गेजूकालिगेसद्ध्रुवमृदुवरुणस्वातिवस्वर्कपुष्यैःसूतीगेहंत्वदित्यांहरिभविधिभयोस्तत्रशस्तप्रवेशः ॥ १५ ॥

अर्थ---पूर्वद्वार किंवा पश्चिमद्वार असें गृह फाल्गुनमासांत कुंभराशीला सूर्य असतां आणि श्रावणांत सिंहाला किंवा कर्काला सूर्य असतां, अथवा पौषांत मकराला सूर्य असतां बांधावें. दक्षिणद्वार किंवा उत्तरद्वारगृह, वैशाखमासांत वृषभाला, किंवा मेषराशीला सूर्य असतां; आणि मार्गशीर्षांत तूळाला किंवा वृश्चिकाला सूर्य असता शुभ जाणावें. रोहिणी, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, मृगशीर्ष रेवती, चित्रा अनुराधा, शततारका, स्वाती, धनिष्टा, हस्त व पुष्य हीं १३ नक्षत्रें गृहारंभाला शुभ होत. बाळंतिणीकरितां बांधावयाचें घर पुनर्वसु नक्षत्रावर बांधावें. त्या गृहांत गर्भवती स्त्रीनें नवव्या महिन्यांत प्रसूत होण्यास्तव श्रवण किंवा अभिजित नक्षत्रावर प्रवेश करावा.

केचिन्मतानें गृहारंभाचे शुभमास. (शार्दूलविक्रीडित)

कैश्चिन्मेषरवौमधौवृषभगेज्येष्ठेशुचौकर्कटेभाद्रेसिंहगतेघटेश्वयुजिचोर्जेलिगौमृगेपौ

षके ॥ नावंनकघटेशुभंनिगदितंगेहंतथोर्जेनसत्कन्यायांचतथाधनुष्यपिनसत्कृष्णादिमासाद्भवेत् ॥ १६ ॥

अर्थ--मेषराशीला रवि असतां चैत्र, वृषभाला सूर्य असतां ज्येष्ठ, कर्काला रवि असतां आषाढ, सिंहाला रवि असतां भाद्रपद, तूळराशीला सूर्य असतां अश्विन, वृश्चिकस्थ रवि असतां कार्तिक, मकरस्थ सूर्य असतां पौष, मकरस्थ आणि कुंभस्त सूर्य असतां माघ, हे मास गृहारंभाला शुभ आहेत असें कित्येक ग्रंथकारांच्या मतानें आहे. कन्याराशीला सूर्य असतां कार्तिक व धनाला सूर्य असतां माघ हे दोन मास गृहारंभी अशुभ होत. शुक्लादि व कृष्णादि असे मासाचे दोन प्रकार आहेत ज्यांत प्रथम शुक्ल व नंतर कृष्ण असे पक्ष मानितात तो कृष्णादिमास. या ठिकाणीं कृष्णादिमास मानावे, म्हणजे कार्तिकांत कन्येच्या रवीचा संभव होतो.

तिथिपरत्वें द्वारदिशानियम. (उपजाति.)

पूर्णेंदुतःप्राग्वदनंनवम्यादिषूत्तरास्यंत्वथपश्चिमास्यम् ॥
दर्शादितःशुक्लदलेनवम्यादौदक्षिणास्यंनशुभंवदंति ॥ १७ ॥

अर्थ--पूर्णिमेपासून कृष्णअष्टमीपर्यंत पूर्वद्वारगृह, कृष्णनवमीपासून व चतुर्दशीपर्यंत उत्तरद्वारगृह अमावास्येपासून शुक्ल अष्टमीपर्यंत पश्चिमद्वारागृह, आणि शुक्लनवमीपासून चतुर्दशीपर्यंत दक्षिणद्वारगृह बांधणें शुभ नाहीं असें प्राचीन ऋषि सांगतात.

गृहारंभाची पंचांगशुद्धि. (अनुष्टुप्.)

भौमार्करिक्तामाद्यूनेचरोनेंगविपंचके ॥ व्यष्टांत्यस्थैःशुभैर्गेहारंभस्त्र्यारिगैःखलैः॥१८॥

अर्थ--मंगळवार, रविवार, रिक्ता तिथि (४।९।१४) अमावास्या, प्रतिपदा, अष्टमी हीं वर्ज्य करून अन्य दिवशीं गृहारंभ शुभ होय. मेष, कर्क, तूळ, मकर, ह्या चार लग्नांशिवाय बाकीचीं स्थिर व द्विस्वभाव लग्नें गृहारंभाला शुभ होत. गृहारंभाचें इष्टलग्न निष्पंचक असावें. इष्टलग्नापासून अष्टम व द्वादशस्थानावांचून इतर सर्वस्थानीं शुभगृह असतां, आणि ३।११।६ ह्या स्थानीं खलगृह असतां गृहारंभ करावा.

राहुमुख. (इंद्रवंश)

देवालयेगेहविधौजलाशयेराहोर्मुखंशंभुदिशोविलोमतः ॥
मीनार्कसिंहार्कमृगार्कतस्त्रिभेखातेमुखात्पृष्ठविदिक्शुभाभवेत् ॥ १९ ॥

अर्थ--देवालय, गृह व जलाशय यांच्या आरंभाचे वेळीं ज्या ज्या राशीला सूर्य असेल त्या वरून ईशान्यादि विदिशांला राहुमुख असतें तें पुढच्या कोष्टकावरून जाणावें. राहुमुखापासून पृष्टदिशा म्हणजे ज्या दिशेला राहुमुख असेल तिच्या पाठीमागची दिशा जमीन खणण्यास आरंभ करण्याला शुभ होय. देवालयारंभ करणें असेल तर मीन, मेष, वृषभ ह्या तीन राशींला सूर्य असतां राहुमुख ईशान्येला असतें म्हणून तिच्या पाठीमागची दिशा जी आग्नेयी तिकडे खणण्याला आरंभ करावा. राहुमुख वायव्येला असतां ईशान्य दिशेकडे खणण्यास आरंभ करावा इत्यादि जाणावें. राहूचें ईशान्येला जेव्हां मुख असतें तेव्हां त्याचें वायव्येला उदर व नैर्ऋत्येला पुच्छ असतें, म्हणून त्या वेळीं आग्नेयी दिशा शुभ असते.

राहुमुख कोष्टक.

	ईशान्य.	वायव्य.	नैर्ऋत्य.	आग्नेय.
देवालयारंभ.	मीन, मेष, वृषभ.	मिथुन, कर्क, सिंह.	कन्या, तूळ, वृश्चिक.	धन, मकर, कुंभ.
गृहारंभ.	सिंह, कन्या, तूळ.	वृश्चिक, धन, मकर.	कुंभ, मीन, मेष.	वृषभ, मिथुन, कर्क.
जलाशयारंभ.	मकर, कुंभ, मीन.	मेष, वृषभ, मिथुन.	कर्क, सिंह, कन्या.	तूळ, वृश्चिक, धन.

गृहांत वापीकूपादि करण्याचीं दिशापरत्वें फळें. (शालिनी.)

कूपेवास्तोर्मध्यदेशेर्थनाशस्त्वैशान्यादौपुष्टिरैश्वर्यवृद्धिः ॥

सूनोर्नाशः स्त्रीविनाशोमृतिश्चसंपत्पीडाशत्रुतः स्याच्चसौख्यम् ॥ २० ॥

अर्थ--गृहाच्या मध्यभागीं कूप केला असतां द्रव्यनाश होतो. ईशान्यदिशेला कूप असतां पुष्टि, पूर्वेला ऐश्वर्यवृद्धि, आग्नेयीला पुत्रनाश, दक्षिणेला स्त्रीनाश नैर्ऋत्येला गृहेशमृत्यु, पश्चिमेला संपत्ति, वायव्येला शत्रूपासून पीडा आणि गृहांत उत्तर दिशेला कूप असतां घरधन्यांला सुख होतें अशीं दिशापरत्वें कूपाचीं फळें आहेत घरांत कूप करणे तो ज्या दिशेचे वर शुभफळ सांगितलें आहे त्या दिशेला करावा.

दिशापरत्वें स्नानादि कृत्यांचीं व पदार्थसंग्रहांचीं स्थानें. (वसंततिलक.)

स्नानाग्निपाकशयनास्त्रभुजेश्चधान्यभांडारदैवतगृहाणिचपूर्वतःस्युः ॥
तन्मध्यतस्तुमथनाज्यपुरीषविद्याभ्यासाख्यरोदनरतौषधसर्वधाम ॥ २१ ॥

अर्थ --गृहाच्या पूर्वदिशेला स्नानगृह करावें. आग्नेयीला पाकगृह, दक्षिणेला शयनगृह. नैर्ऋत्येला शस्त्रगृह, पश्चिमेला भोजनगृह, वायव्येला धान्यसंग्रहाचें गृह, उत्तरेला द्रव्यसंचयाचें गृह आणि ईशान्येला देवगृह याप्रमाणें मुख्यगृहांत निरनिराळीं स्थानें करावीं. तशीच पूर्व व आग्नेयी यामध्ये दधिमंथन, आग्नेयी व दक्षिण यांच्यामध्यें घृतसंग्रह, दक्षिण व नैर्ऋत्य यांच्यामध्यें विष्ठात्याग नैर्ऋत्य व पश्चिम यांच्यामध्यें विद्याभ्यास, पश्चिम व वायव्य यांच्या मध्यें रोदन, वायव्य व उत्तर यांच्यामध्यें मैथुन, उत्तर व ईशान्य, यांच्यामध्यें औषधिपदार्थ आणि ईशान्य व पूर्व यामध्यें इतर सर्व पदार्थांचें गृह, याप्रमाणें स्थानांची योजना करावी.

गृहाचे दोन आयुर्योग (उपजाति.)

जीवार्कविच्छुक्रशनैश्चरेषुलग्नारिजामित्रसुखत्रिगेषु ॥
स्थितिःशतंस्याच्छरदासितार्कारेज्येतनुर्व्यंगसुतेशतेद्वे ॥ २२ ॥

अर्थ--लग्नींगुरु, षष्ठस्थानीं रवि, सप्तमस्थानीं बुध, चतुर्थस्थानीं शुक्र, आणि तृतीयस्थानीं शनि, असा ग्रहयोग ज्या लग्नाला असेल त्या लग्नावर गृहाचा आरंभ केला असतां तें गृह शंभर वर्षेंपर्यंत कायम पणें टिकतें. हा एक गृहयोग जाणावा. लग्नींशुक्र, तृतीयस्थानीं सूर्य, षष्ठस्थानीं मंगळ व पंचमस्थानीं गुरु असा ग्रहयोग असतां आरंभिलेलें गृह दोनशें वर्षें कायम रहातें. हा गृहाचा दुसरा आयुर्योग जाणावा.

गृहायुर्योगद्वय (इंद्रवंशा.)

लग्नांबराये भृगुज्ञभानुभिःकेंद्रेगुरौवर्षशतायुरालयः ॥
बंधौगुरुर्व्योम्नि शशीकुजार्कजौलाभेतदाशीतिसमायुरालयः ॥ २३ ॥

अर्थ--लग्नींशुक्र, दशमस्थानीं बुध, एकादशस्थानीं रवि, आणि ४।७।१० ह्या स्थानीं गुरु अशा गृहयोगानें युक्त लग्नावर आरंभ केलेल्या गृहाला पूर्ण शंभर वर्षें आयुष्य जाणावें. हा एक योग झाला चतुर्थ गुरु, दशमचंद्र, आणि एकादशमंगळ व शनि ह्या ग्रहयोगावर ज्या गृहाचा आरंभ केला असेल तें ८० वर्षें टिकेल. हा दुसरा योग होय.

गृहचिरकाल लक्ष्मीयुक्त नांदण्याचे तीन योग. (अनुष्टुप्)

स्वोच्चेशुक्रेलग्नगेवागुरौवेश्मगतेथवा ॥ शनौस्वोच्चेलाभगेवालक्ष्म्यायुक्तंचिरंगृहं ॥ २४ ॥

अर्थ— आपल्या उच्ची ह्मणजे मीनराशीला असणारा शुक्र गृहारंभाच्या इष्टलग्नीं असणें हा एक योग; अथवा स्वोच्चींचा गुरु ह्मणजे कर्कराशीला असणारा गुरु इष्टलग्नापासून चतुर्थस्थानीं असणें, हा दुसरा योग, आणि स्वोच्चींचा शनि ह्मणजे तूळराशीला असणारा शनि एकादशस्थानीं असणें, हा तिसरायोग ह्या तीन योगांतून कोणत्याही एका योगावर गृहाचा आरंभ केला असतां तें चिरकाल लक्ष्मीयुक्त नांदेलें.

गृह परहस्तीं जाण्याचा योग. (अनुष्टुप्)

द्यूनांबरेयदैकोपिपरांशस्तोग्रहोगृहम् ॥ अब्दांतःपरहस्तस्थंकुर्याच्चेद्वर्णपोबलः ॥ २५ ॥

अर्थ-गृहारंभाच्या इष्टलग्नापासून सप्तमस्थानीं किंवा दशमस्थानीं असणारा कोणताही ग्रह, आपल्या शत्रुग्रहाच्या नवांशीं असेल; व गृहकर्त्याचा वर्णस्वामी बलहीन असेल तर एक वर्षाचे आंत तें घर दुस-

ज्याच्या हस्तगत होईल; परंतु गृहकर्त्यांचा वर्ण स्वामी बलवान् असतां परहस्तगत होणार नाहीं. (संस्कार प्रक० श्लो० ४३ वर्णस्वामी पहा.)

गृहारंभाला शुभ नक्षत्रवार योग. (वसंततिलक.)

पुष्यध्रुवेंदुहरिसर्पजलैः सजीवैस्तद्वासरेण च कृतं सुतराज्यदं स्यात् ॥
द्वीशाश्वितक्षवसुपाशिशिवैः सशुक्रैर्वारे सितस्य च गृहं धनधान्यदं स्यात् ॥ २६ ॥

अर्थ—पुष्य, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, रोहिणी, मृगशीर्ष, श्रवण, आश्लेषा, पूर्वाषाढा, हीं ९ नक्षत्रें गुरूनें युक्त असून गुरुवारींच असतील, त्या दिवशीं गृहारंभ केला असतां तें गृह, पुत्राची व राज्याची प्राप्ती करून देतें. विशाखा, अश्विनी, चित्रा, धनिष्टा, शततारका, आर्द्रा हीं ६ नक्षत्रें शुक्रानें युक्त असून शुक्रवारींच असतील अशा दिवशीं आरंभिलेलें गृह धनधान्य विपूल देतें.

गृहारंभाचा अशुभ योग आणि शुभयोग. (इंद्रवज्रा.)

सारैः करेज्यांत्यमघांबुमूलैः कौजेऽन्हि वेश्माग्निसुतार्तिदं स्यात् ॥
सज्ञैः कदास्त्रार्यमतक्षहस्तैर्ज्ञस्यैव वारे सुखपुत्रदं स्यात् ॥ २७ ॥

अर्थ—हस्त, पुष्य, रेवती, मघा, पूर्वाषाढा, मूळ हीं ६ नक्षत्रें मंगळानें युक्त असून मंगळवारींच असतील अशा दिवशीं आरंभिलेलें गृह अग्नीनें दग्ध होतें, व पुत्रशोक उत्पन्न करितें. रोहिणी, अश्विनी, उत्तराफल्गुनी, चित्रा, हस्त. हीं ५ नक्षत्रें बुधानें युक्त असून बुधवारींच असतील अशा दिवशीं आरंभिलेलें गृह, सुखलाभ व पुत्रलाभ करितें.

गृहारंभीं अशुभयोग. (अनुष्टुप्..)

अजकपादहिर्बुध्न्यशक्रामित्रानिलांतकैः ॥ समंदैर्मंदवारे स्याद्रक्षोभूतयुतं गृहम् ॥ २८ ॥

अर्थ—पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, ज्येष्ठा, अनुराधा, स्वाती, भरणी हीं ६ नक्षत्रें शनीनें युक्त असून शनिवारीं असतील अशा दिवशीं आरंभिलेल्या गृहांत, राक्षस, व भूतपिशाचादि वास करितात.

द्वारचक्र (केचिन्मताचें) (शार्दूलविक्रीडित.)

सूर्यर्क्षाद्युगभैः शिरस्यथ फलं लक्ष्मीस्ततः कोणगैः नागैरुद्वसनं ततो गजमितैः शाखासु सौख्यं भवेत् ॥ देहल्यां गुणभैर्मृतिर्गृहपतेर्मध्यास्थितैर्वेदभैः सौख्यं चक्रमिदं विलोक्य सुधिया द्वारं विधेयं शुभम् ॥ २९ ॥

अर्थ—सूर्यनक्षत्रापासून ४ नक्षत्रें द्वाराच्या शिरावर असतात त्यांचें फळ लक्ष्मी प्राप्ति होणें; त्यांपुढचीं ८ नक्षत्रें द्वारकोणांत असतात त्याचें फळ उद्वसन ह्मणजे घरांत लोकांची वस्ति न होणे, त्यापुढील ८ नक्षत्रें द्वारशाखांवर ह्मणजे द्वाराच्या दोन बाजूंवर असतात, ह्याचें फळ सुख होणें; त्यापुढची ३ नक्षत्रें द्वाराच्या देहलीवर ह्मणजे उंबरठ्यावर राहतात, त्याचें फळ घरधन्याला मृत्यु येणें त्यापुढची ४ नक्षत्रें द्वाराच्या मध्यभागीं राहतात, ह्याचें फळ सुख होणें. याप्रमाणें द्वारचक्राचीं फळें आहेत. हें बाजूचें चक्र पाहून विद्वानानें शुभ असें द्वार लावावें.

इति वास्तुप्रकरणम् ॥

॥ अथगृहप्रवेशप्रकरणम् ॥ १३ ॥

गृहप्रवेशकाल. (इंद्रवंशा.)

सौम्यायने ज्येष्ठतपोंत्यमाधवे यात्रानिवृत्तौ नृपतेर्नवे गृहे ॥
स्याद्वेशनं द्वाःस्थमृदुध्रुवोडुभिर्जन्मर्क्षलग्नोपजयोदये स्थिरे ॥ १ ॥

अर्थ–प्रवेशाचे प्रकार चार आहेत. अपूर्वप्रवेश, सपूर्वप्रवेश, द्वंद्वाभयप्रवेश आणि वधूप्रवेश नवीन बांधलेल्या गृहांत प्रथम करावयाचा तो अपूर्वप्रवेश; यात्रेहून आल्यावर करावयाचा तो सपूर्वप्रवेश आग्नीनें किंवा उदकानें नाश पावलेलें गृह बांधल्यावर यांत करावयाचा तो द्वंद्वाभयप्रवेश आणि विवाहित वधूचें प्रथम पतिगृहीं जाणें हा वधूप्रवेश होय. पूर्वी ७ व्या प्रकरणांत वधूप्रवेशाचा काल सांगितला आहे. त्या ठिकाणीं अपूर्व व सपूर्व प्रवेशाचा काल सांगावयाचा तो:––उत्तरायणांतील ज्येष्ठ, माघ, फाल्गुन, वैशाख ह्या मासांत यात्राकरून देशांत राहून आलेल्या राजानें आपल्या गृहांत, आणखी सर्वांनी नवीन बांधलेल्या गृहांत प्रवेश करावा. गृहांत प्रवेश करण्याचें द्वार ज्या दिशेला असेल त्या दिशेच्या नक्षत्रांतील अनुराधा रेवती, मृगशीर्ष चित्रा, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा रोहिणी हीं ८नक्षत्रें प्रवेशाला शुभ जाणावीं. (प्रतिदिशेला सात सात नक्षत्रें आहेत तीं सप्तशलाकाचक्र पाहून जाणावीं) प्रवेश कर्त्यांची जन्मराशि व जन्मलग्न ह्यांपासून जीं उपचयलग्नें ह्मणजे ३ रें, ६ वें १० वें ११ वें त्यांतील असून स्थिर अशा लग्नावर प्रवेश करणे शुभ होय. (वृषभ, सिंह वृश्चिक, कुंभ हीं ४ लग्नें स्थिर आहेत.

जीर्ण गृहप्रवेशाचा कालविशेष. (इंद्रवज्रा.)

जीर्णेगृहेग्न्यादिभयान्नवेपिमार्गोर्जयोःश्रावणिकेपिसन्स्यात् ॥
वेशोंबुपेज्यानिलवासवेषुनावश्यमस्तादिविचारणात्र ॥ २ ॥

अर्थ––जीर्ण झालेलें गृह फिरून बांधिलें असतां; किंवा अग्नि, उदक यांच्या भयानें, अथवा राजाच्या कोपानें मोडलेलें पुन्हा बांधिलें असतां त्या गृहांत प्रवेश करण्याला मागच्या श्लोकांत सांगितलेले मास व नक्षत्रें शुभ जाणावी. त्या शिवाय मार्गशीर्ष, कार्तिक व श्रावण हे मास, आणि शततरका, पुष्य स्वाती धनिष्ठा हीं नक्षत्रें सुद्धां शुभ होय. ह्या प्रवेशाला गुरु शुक्रांचें अस्त, बाल्य, वृद्धत्व, सिंहस्थगुरु इत्यादि दोषाचा विचार करण्याचीं अवश्यकता नाहीं.

वास्तुशांतीचीं नक्षत्रें व गृहप्रवेशाची लग्नशुद्धि. (उपजाति १. इंद्रवज्रा १.)

मृदुध्रुवक्षिप्रचरेषुमूलभेवास्तवर्चनंभुतबलिंचकारयेत् त्रिकोणकेंद्रायधनत्रिगैः
शुभैर्लग्नेत्रिषष्ठायगतैश्चपापकैः ॥ ३ ॥ शुद्धांबुरंध्रेविजनुर्भमृत्यौव्यर्कारिरिक्ता
चरदर्शचैत्रे ॥ अग्रेम्बुपूर्णकलशंद्विजांश्चकृत्वाविरोद्धेश्मभकूटशुद्धम् ॥ ४ ॥

अर्थ––अनुराधा, रेवती, मृगशीर्ष, चित्रा, रोहिणी, उत्तराफल्गुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, आश्विनी, हस्त, पुष्य, श्रवण, धनिष्ठा शततारा, पुनर्वसु, स्वाती, मूळ ह्या १७ नक्षत्रांवर वास्तुशांति व भुतबलि करणें शुभ होय. गृहप्रवेशाच्या इष्टलग्नापासून १।५।१।४।७।१० ११।२।३। ह्यास्थानीं शुभग्रह असतां, आणि ३।६।११ ह्यास्थानीं खलगृह असतां, तशींच ४।८ हीं स्थानें सर्व गृहांनीं रहित असतां. आणि प्रवेश कर्त्यांची जन्मराशि व जन्मलग्न ह्यांपासून जीं अष्टमलग्नें तीं सोडून अन्य लग्नांवर गृहप्रवेश शुभ जाणावा, रविवार, मंगळवार, रिक्तातिथि, चरलग्नें (मेष, कर्क, तूळ, मकर हीं लग्नें व चरनवांश) आमावास्या. आणि चैत्रमास हीं सर्व प्रवेक्षाला अशुभ होत. मागें विवाहप्रकरणांत सांगितलेल्या घटित विचाराप्रमाणें ज्याची राशि, आपल्या राशीशीं राशिकूटादिकांनीं शुद्धपणें जमली असेल अशा गृहांत; सुशोभित व उदकपूर्ण कलश आणि अनेक विद्वान् ब्राह्मण पुढें करून त्यांमागून कर्त्यानें प्रवेश करावा.

वामगतसूर्याचा नियम आणि तिथिपरत्वें शुभप्रवेश. (इंद्रवज्रा.)

वामोरविर्मृत्युसुतार्थलाभतोर्कंपंचभेप्राग्वदनादिमंदिरे ॥
पूर्णातिथौप्राग्वदनेगृहेशुभोनंदादिकेयाम्यजलोत्तरानने ॥ ५ ॥

अर्थ––प्रवेशाला सूर्य वामगत असवा. प्रवेशाच्या इष्टलग्नापासून ८।९।१०।११।१२ ह्या पांचस्थानीं सूर्य असतां तो पूर्वद्वारगृहांत प्रवेश करणाराला वामगत होतो. इष्टलग्नापासून ५।६।७।८।९ ह्या पांचस्थानीं, सूर्य असतां तो, दक्षिणद्वार गृहांत प्रवेश करणाराला वामगत होतो. इष्टलग्नापासून ११।१२।१।२।३ ह्या पांचस्थानीं असणारा सूर्य उत्तरद्वार गृहांत प्रवेश करणाराला वामगत होतो पूर्णा तिथींवर (५।१०।१५)

पूर्वद्वारगृहांत; भद्रातिथींवर (१।६।११) दक्षिणद्वार गृहांत भद्रातिथींवर (२।७।१२) पश्चिमद्वारगृहांत आणि जयातिथींवर (३।८।१३) उत्तरद्वार गृहांत, प्रवेश करणें शुभ होय.

कलशवास्तुचक्र. (शार्दूलविक्रीडित.)

वक्त्रेभूरविभात्प्रवेशसमयेकुंभेग्निदाहःकृताःप्राच्यामुद्वसनंकृतायमगतालाभः कृताःपश्चिमे ॥ श्रीर्वेदाःकलिरुत्तरेयुगमितागर्भेविनाशोगुदेरामाःस्थैर्यमताः स्थिरत्वमनलाः कंठेभवेत्सर्वदा ॥ ६ ॥

अर्थ – प्रवेशकाळीं सूर्य ज्या नक्षत्राला असेल तें १ नक्षत्र कलशरूप वास्तूच्या मुखावर असतें त्यावर प्रवेश केल्याचें फळ गृहाचा अग्नीनें दाह होतो त्या पुढचीं ४नक्षत्रें कलशाच्या पूर्वभागीं असतात, त्याचें फळ उद्वसन ह्मणजे लोकांची वस्ति न होणें; त्यांपुढचीं ४ कलशाच्या दक्षिणभागीं असतात, ह्यांचें फळ द्रव्यलाभ, त्यांपुढचीं ४ पश्चिमेस असतात त्याचे फळ लक्ष्मीप्राप्ति; त्यापुढचीं ४ उत्तरेला असतात, त्याचें फळ कलह; त्यापुढील ४ कलशाच्या गर्भांत ह्मणजे मध्यभागीं असतात त्याचें फळ विनाश त्यापुढचीं ३ नक्षत्रें गुदस्थानीं ह्मणजे कलशाच्या बुडावर असतात ह्यांचें फळ स्थिरत्व; व शेवटील ३ कंठावर असतात, त्यांचें फळ ही सर्वदा स्थिरत्व अशीं फळे आहेत ह्या कलशचक्राचें तात्पर्यः— सूर्यनक्षत्रापासून प्रवेशाचे दिवसनक्षत्र मोजून त्याची संख्या ६।७।८।९।१०।११।१२।१३।२२।२३।२४।२५।२६।२७ ह्यांतील कोणत्याही अंका इतकी होईल तर शुभ आणि अन्य संख्या अशुभ जाणावी.

प्रवेशानंतरचें कर्तव्य. (उपजाति.)

एवंसुलग्नेस्वगृहंप्रविश्यावितानपुष्पश्रुतिघोषयुक्तम् ॥ शिल्पज्ञदैवज्ञविधिज्ञपौरान्राजाचयेद्भूमिहिरण्यवस्त्रैः ॥ ७ ॥

अर्थ—पूर्वी सांगितल्याप्रमाणें शुभलग्नावर, छत, चांदवा, सुवासिक पुष्पें, वेदघोष इत्यादि मंगलकारक पदार्थांनी युक्त अशा आपल्या स्वतःच्या सुशोभितगृहांत प्रवेश केल्यानंतर सुतार गवंडी, कामकरी वगैरे, ज्योतिषी, वास्तुपूजा, भूतबळी इत्यादि कर्में करणारे पुरोहितादि ब्राह्मण आणि पुरवासी लोक ह्या सर्वांला भूमि, द्रव्य, वस्त्रें वगैरे यथाशक्ति देऊन राजाने संतुष्ट करावे.

॥ इति गृहप्रवेशप्रकरणम् ॥

ग्रंथालंकार

पितामहवर्णन. (शार्दूलविक्रीडित.)

आसीद्धर्मपुरेषडंगनिगमाध्येतृद्विजैर्मंडितेज्योतिर्वित्तिलकःफणींद्ररचितेभाष्ये कृतातिश्रमः ॥ तत्तज्जातकसंहितागणितकृन्मान्योमहाभूजांतर्कालंकृतिवेद वाक्यविलसद्बुद्धिःसचिंतामणिः ॥ ८ ॥

अर्थ–ह्या ग्रंथाचा कर्ता रामदैवज्ञ आपल्या पितामहाचें वर्णन करितोः–षडंगें ह्मणजे शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद आणि ज्योतिष यासहित वेदाचें अध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांनीं मंडित अशा नर्मदानदीच्या तीरावरील धर्मपुर नामक ग्रामांत; ज्योतिःशास्त्रवेत्त्यांमध्यें तिलकाप्रमाणें श्रेष्ठ असा आणि जातक, संहिता, व गणित ह्या ज्योतिषाच्या तीन स्कंधावर लहान मोठे अनेक ग्रंथ करणारा असा, तसाच मोठमोठ्या राजांला मान्य आणि तर्कशास्त्र, न्यायशास्त्र, अलंकारशास्त्र, व वेदवाक्यांनीं प्रतिपादित मीमांसा आणि वेदांत ह्यामध्यें ज्याची बुद्धि निरंतर विलास करित असे असा तो चिंतामणि नामक होता.

पितृवर्णनम्. (शार्दूलविक्रीडित.)

ज्योतिर्विद्गणवंदितांघ्रिकमलस्तत्सूनुरासीत्कृतीनाम्नानंतइतिप्रथामधिगतोभूमं

डलोभास्करः । योरम्यांजनिपद्धतिंसमकरोदुष्टाशयध्वंसिनींटीकांचोत्तमकाम धेनुगणितेऽकार्षीत्सतांप्रीयये ॥ ९ ॥

अर्थ–ग्रंथकार आपल्या पित्याचें वर्णन करितो तें:–मोठमोठ्या ज्योतिषी लोकांचा समुदाय ज्याच्या चरण कमलांचें वंदन करित असे असा, चिंतामणि दैवज्ञाचा पुत्र अनंत ह्या नांवानें सर्व प्रसिद्ध असून मोठा कुशल आणि या भूमंडलावर सूर्याप्रमाणें शोभणारा असा होता. ज्यानें अनेक लोकांच्या दुष्ट आशयांचा नाश करणारी व रमणीय अशी जनिपद्धति (ह्या नांवाचा ग्रंथ) केली आणखी आर्यसिद्धांत व ब्रह्मसिद्धांत यांच्या मतानें जें उत्तम कामधेनुगणित (नांवांचा ग्रंथ) त्यावर सज्जनांच्या संतोषाकरितां टीका केली.

स्वनामकथन व ग्रंथनिर्माणकाल. (पृथ्वी.)

तदात्मजउदारधीर्विबुधनीलकंठानजोगणेशपदपंकजंहृदिनिधायरामाभिधः ॥
गिरीशनगरेवरेभुजभुजेषुचंद्रैर्मितेशकेविनिरमादिमंखलुमुहूर्तचिंतामणिम् ॥ १० ॥

अर्थ—ग्रंथकार ह्मणतो:–मी अनंत दैवज्ञाचा पुत्र आहे. मी उदार बुद्धि ह्मणजे अनेक शिष्यांला उदार-पणें विद्यादान करणारा आहे. महाविद्वान् जो नीलकंठदैवज्ञ त्याचा मी कनिष्ठ बंधु माझें नांव रामदैवज्ञ; माझें कुलदैवत जो गणपति त्याचें पदकमल हृदयामध्यें निरंतर ठेवून, महादेवाचें प्रिय व पवित्र असें जें काशीनगर त्यामध्यें राहून, शालिवान शक १५२२ ह्या वर्षांत हा मुहूर्तचिंतामणि नामक ग्रंथ मी रचिला.

॥ मुहूर्तचिंतामणिः समाप्तः ॥

विक्रीस तयार.

खालील ज्योतिषाचीं पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीस तयार आहेत त्यांची यादी.

पुस्तकांचें नांव.	किंमत.
मुहूर्तमार्तंड मूळ श्लोक, संस्कृत मार्तंडवल्लभा टीका व मराठी भाषांतर.	१.
मुहूर्तचिंतामणि मराठी भाषांतर.	८१२.
मुहूर्ततत्त्व मराठी भाषांतर.	८१२.
जातकालंकार मूळ श्लोक, हरभानुकृत संस्कृत टीका व मराठी भाषांतर	८१२.
षट्पंचाशिका मराठी भाषांतर.	८३.
ग्रहलाघव मराठी भाषांतर.	१.
पल्लंगसा[illegible] मराठी भाषांतर.	१.
बृहज्जातक मराठी भाषांतर.	१८८.
शिवस्वरोदय मराठी भाषांतर.	८१०.
ज्योतिषरत्न मराठी भाषांतर	१.
सहदेवभाडळीमताचें ज्योतिषरत्न.	८६.
सामुद्रिकशास्त्र	८८.
मुहूर्तगणपति.	१.
जातकाभरण मराठी भाषांतर.	१८८.
प्रश्नभैरव मराठी भाषांतर	८७.
चमत्कारचिंतामणी मराठी भाषांतर.	८१३.

महादेव भास्कर गोडबोले.